# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# विसाव्या शतकातील जग

**(Twentieth Century World)**
**(1900 to 1950)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२**
**इतिहास**
Compulsory : Paper 302

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (विसाव्या शतकातील जग)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-28-1

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''विसाव्या शतकातील जग-१९०० ते १९५०'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

विसाव्या शतकातील जग-१९०० ते १९५० या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये १९ व्या शतकाचा वारसा, १९१९ पर्यंतचा जग, दोन युद्धामधील जग, दुसरे महायुद्ध आणि युद्धोत्तर जग इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**
रयत शिक्षण संस्थेचे,
श्री. आर. आर. पाटील महाविद्यालय, सावळज
ता. तासगांव, जि. सांगली

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(विसाव्या शतकातील जग–१९०० ते १९५०)**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ३०२ (आवश्यक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. चांगदेव बंडगर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **प्रा. दत्तात्रय मचाले**<br>सहाय्यक प्राध्यापक, इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. ए. बी. नाडगौडा**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | ३ |
| **डॉ. सौ. वैशाली अभिजीत सारंग**<br>डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**
रयत शिक्षण संस्थेचे,
श्री. आर. आर. पाटील महाविद्यालय, सावळज
ता. तासगांव, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | १९ व्या शतकाचा वारसा | १ |
| २. | १९१९ पर्यंतचे जग | ४३ |
| ३. | दोन युद्धामधील जग | १२१ |
| ४. | दुसरे महायुद्ध आणि युद्धोत्तर जग | १५६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक-१

# १९ व्या शतकाचा वारसा

# (Legacy of Nineteenth Century)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ राष्ट्रवादाचा उदय : फ्रान्स, इटली, जर्मनी

१.२.२ साम्राज्यवाद : इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स आणि जपान

१.२.३ तह-करार पद्धती : त्रिराष्ट्र मैत्री करार आणि त्रिराष्ट्र मित्रसंघ.

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ सारांश

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

१. राष्ट्रवाद म्हणजे काय? हे समजू शकेल.

२. राष्ट्रवादाचा उदय कसा झाला हे समजेल व फ्रान्स, इटली आणि जर्मनीमध्ये त्याचा प्रसार कसा झाला त्याची माहिती मिळेल.

३. साम्राज्यवाद म्हणजे काय? साम्राज्यवादाची कारणे व साम्राज्यवादी प्रमुख राष्ट्रे, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स आणि जपान इत्यादीचा अभ्यास करता येईल.

४. युरोपातील १९व्या शतकातील दोन गट कसे उभे राहिले व त्याचे कोणते परिणाम झाले याची माहिती मिळेल.

## १.१ प्रस्तावना

आधुनिक काळातील राष्ट्रवाद ही अत्यंत प्रभावी प्रेरणा बनली आहे. राष्ट्र (Nation) आणि राष्ट्रीयत्व (Nationality) हे शब्द लॅटिन शब्दापासून बनलेले आहेत. राष्ट्रीयत्वाच्या भावनेने लोक एकत्र येतात आणि एकी टिकवून धरतात म्हणून ''राष्ट्र म्हणजे ज्या राज्यात एखादा जनसमुदाय मुलभूत अशा प्रेरणांनी एकत्रित येतो आणि ज्या प्रेरणा इतक्या मजबूत असतात आणि त्या इतक्या जिवंत वाटतात की त्याकरिता त्यांची एकत्रित राहण्याची तयारी असते. अशा समुदायाला 'राष्ट्र' ही संज्ञा प्राप्त होते. आपल्या जन्ममातीबद्दल, वतनाबद्दल, राष्ट्राबद्दल, प्रदेशाबद्दल मनुष्याच्याठायी निर्माण झालेली निष्ठा किंवा प्रेम जिव्हाळा याला राष्ट्रवाद असे म्हणतात.

आधुनिक जगाच्या इतिहासात आपल्या राष्ट्राबद्दल मनुष्याने आपल्या भावविश्वात राष्ट्रवाद बाळगलाच पाहिजे असा संकेत पडला आहे. जगाच्या पाठीवरील सर्व संस्कृतीनी राष्ट्र निष्ठेला अग्रक्रम देवून मानवी जीवनाचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने लोकांच्या मनाचे परिवर्तन करून देशाच्याप्रती प्रेम निर्माण करून राष्ट्रवादाची भावना जागृत केली येथून पुढे राष्ट्रवादास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

युरोपीयन राष्ट्रांनी इ.स. १४५० ते १७५० या काळापासून व्यापारात मोठे बदल घडवून आणले. त्यामुळे युरोपाचा चेहरा-मोहराच बदलला. जलमार्गाचे नव्याने लागलेले शोध, बँकींग संस्थात झालेली वाढ, व्यापाऱ्यांना तेथील राज्यसरकारने सहकार्य व संरक्षण दिल्यामुळे व्यापारवाढ घडून आली. औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात युरोपातील राष्ट्रानी वसाहती स्थापन केल्या, त्यातूनच वसाहतवादी साम्राज्यवादाला सुरवात झाली.

१९ व्या शतकात युरोपियन राष्ट्रांमध्ये साम्राज्य वाढीकरिता स्पर्धा निर्माण झाली. यामध्ये त्यांनी त्या राष्ट्रात वसाहती निर्माण केल्या तेथील समाजाची आर्थिक पिळवणूक करून त्याठिकाणी आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले. युरोपियन संस्कृती रुजवण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रवाद आणि साम्राज्यवादी स्पर्धा यामुळे युरोपात १९व्या शतकात जगामध्ये दोन तट निर्माण झाले. बिस्मार्कच्या मुत्सद्दीपणामुळे 'त्रिराष्ट्र मैत्रीकरार' (Triple Alliance) व राष्ट्र मित्र संघ (Triple Entente) निर्माण झाले. यामुळेच पहिले महायुद्ध घडून आले.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ राष्ट्रवादाचा उदय : फ्रान्स, इटली, जर्मनी

१९वे शतक राष्ट्रवादाचे शतक मानले जाते. राष्ट्रवादाच्या उदयाला १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने

जोरदार चालना मिळाली. या क्रांतीने फ्रान्सचा कायापालट घडवून आणला. त्याचबरोबर युरोपातल्या अंधकारमय युगाचा अंत करून युरोपाला आधुनिकतेकडे नेण्याचा प्रयत्न केला. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला मानवी हक्काचा जाहीरनामा बहाल केला आणि स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा महामंत्र दिला. त्याचबरोबर फ्रेंच राज्यक्रांतीमुळे जगामध्ये आधुनिक राष्ट्रवादाची सुरवात झाली.

## १ राष्ट्रवादाचा अर्थ :-

'राष्ट्रवाद' (Nationalism) हा शब्द भारतीय भाषामध्ये राष्ट्रभावना, राष्ट्रीयत्व, राष्ट्रीयता असा समानार्थी वापरला जातो. कारण राष्ट्र ही संकल्पना मूलत: पाश्चात्य आहे. भारतीयांनी तिचा स्वीकार आधुनिक काळात केलेला आहे. अर्थात, Nationalism ही संज्ञा लॅटिनमधील 'Natio' म्हणजे 'birth' वा जन्म यापासून बनली आहे. अर्थात 'Nation-Nationalism' हा शब्दप्रयोग एकाच वंशात जन्म घेतलेल्या लोकांसाठीच वापरला जातो. राष्ट्रीयता किंवा राष्ट्रीयत्व ही एक आध्यात्मिक संकल्पना (Spiritual Concept) आणि ही भावना ज्या लोकांची वंश, भाषा, परंपरा, इतिहास, संस्कृती, धर्म, भौगोलिक वसतिस्थान समान आहे अशा लोकांमध्येच निर्माण होवू शकते. राष्ट्रवादाची व्याख्या अनेक विचारवंतानी पुढील प्रमाणे केलेली आहे.

**१. जॉन रॅन्डल :** 'राष्ट्रीयत्व ही एक अशी भावना आहे, ज्यासाठी माणसे प्राण द्यायला तयार होतात.'

**२. अर्नाल्ड टॉयन्बी :** 'राष्ट्रवाद' सत्ताप्राप्तीसाठी प्रयत्न करीत असेल त्याचवेळी ही भावना प्रकर्षाने प्रचितीस येते.'

**३. वाल्टरशार्प व ग्रेसन किर्क यांच्या मते :** ''एखाद्या इमारतीमधील प्रत्येक दालनात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तीजवळ गुरुकिल्ली असणे जेवढे आवश्यक असते. तेवढेच आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकाला राषट्रवादाचे ज्ञान देणे आवश्यक असते.'

**४. प्रो. हॅन्स कोन म्हणतात,** ''राष्ट्रवाद मुख्यत्वेकरून एक मनस्थिती आहे. ती एक जागृती आहे, विसाव्या शतकात 'राष्ट्रवाद' हा सर्व जगातील राजकीय जीवनाचा एक सामान्य प्रकार झाला आहे.''

थोडक्यात, राष्ट्रवाद ही एक भावना आहे. राष्ट्रवाद प्रत्येकाला आपल्या देशावर प्रेम करायला शिकवतो, परंतु दुसऱ्या राष्ट्राची घृणा करण्यास सांगत नाही.

## २ राष्ट्रवादाचे मुख्य घटक :-

**१. भौगोलिक एकता :** समान भूप्रदेश व भौगोलिक समीपता ही तेथे राहणाऱ्या लोकांमध्ये एकत्वाची भावना निर्माण करते. जगातील बहुतेक राष्ट्रे अशा भौगोलिक एकतेतूनच तयार झाली आहेत.

**२. समान ऐतिहासिक पार्श्वभूमी :** ज्या लोकांचा इतिहास स्फूर्तिदायी असतो. असा इतिहास तेथील लोकांमध्ये एकात्मतेची भावना जागृत करण्यास कारणीभूत ठरतो.

**३. समान हितसंबंध :** लोकांचे आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक हितसंबंध समान असतील तर असे लोक सहजपणे एक होऊ शकतात.

**४. समान वंश :** एकाच वंशाचे लोक नैसर्गिकदृष्ट्या फार लवकर एकत्र येतात व त्यांच्यात एकतेची भावना जबरदस्त असते. उदा. ज्यू लोकांतील एकतेचा प्रखर जाणिवेमुळे इस्त्राईल हे नवे राष्ट्र निर्माण झाले.

**५. समान भाषा :** विचारांचे भावभावनांचे आदान-प्रदान होण्यासाठी समान भाषिक लोकांना भाषा हे प्रभावी संपर्क माध्यम असते. त्याचा उपयोग राष्ट्रभावनेसाठी केला गेल्याची अनेक उदाहरणे पहायला मिळतात.

**६. समान धर्म :** अतिप्राचीन काळापासून धर्म ही भावना मानवी जीवनाची जडणघडण करण्यात प्रभावी ठरली आहे. समान धर्म असणाऱ्यांनी आपल्या धर्माच्या रक्षणासाठी हौतात्म्य पत्करले आहे. म्हणून समान धर्मीय लोक आपल्या आशा-आकांक्षासाठी लवकर एकत्र येतात.

**७. समान संस्कृती :** लोकसमुदायास एकत्र ठेवण्यासाठी संस्कृती हा फार मोठा आधार असतो. ही एकता कायम राखण्यासाठी संस्कृतीच्या ठेव्याचे जतन केले जाते.

**८. समान राजकीय उद्दिष्टे :** एकाच राजकीय उद्दिष्टातूनही राष्ट्रीयत्व उमलू शकते. जगाच्या इतिहासात स्वातंत्र्यप्राप्ती या समान राजकीय उद्दिष्टासाठी विभिन्न लोकसमुदायात राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाल्याची विविध उदाहरणे आहेत.

**९. समान आदर्श :** राष्ट्रीयत्वाची ज्योत सतत धगधगती राहण्यासाठी त्या-त्या राष्ट्रातील थोर व्यक्तीची चरित्रे अत्यंत उपयुक्त ठरतात.

**१०. स्वराज्य :** आपले सरकार-जनतेचे सरकार अशा आपुलकीच्या भावनेतून निर्माण झालेल्या शासनात स्व-राज्याच्या जिव्हाळा असतो. लोकांना एकत्र ठेवण्यास स्वराज्य उपयुक्त ठरते. पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी झालेले संघर्ष राष्ट्रभावनेचे द्योतक असतात.

## ३ फ्रान्समधील राष्ट्रवाद :-

जगाच्या वैचारिक जडणघडणीत युरोपातून उदयास आलेल्या विचारधारा प्रभावशाली होत्या. राष्ट्रवाद ही अशीच विचारसरणी होती. या राष्ट्रवादाने जगाच्या इतिहासात प्रचंड परिवर्तन घडवून आणले. युरोपात राष्ट्रवादाचा उदय झाला व काही काळातच या राष्ट्रवादाचा जगभर प्रसार झाला. या राष्ट्रवादातूनच अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध घडून आले. फ्रेंच राज्यक्रांती हा राष्ट्रवादाचाच अविष्कार होता. नेपोलियनची

राजवट हा राष्ट्रवादाचा आक्रमक आविष्कार होता. हा राष्ट्रवाद दडपण्याचा युरोपातील प्रतिगामी शक्तींनी प्रयत्न केला. पण १८३० व १८४८ च्या क्रांतीने तो पुन्हा उफाळून आला. फ्रान्समधील या राष्ट्रवादाचे प्रारंभिक स्वरूप आपण पुढील प्रमाणे विचारात घेऊ शकतो.

### अ) अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाची प्रेरणा :-

आपल्या राष्ट्रावरील पारतंत्र्याची श्रृंखला तोडायची असेल तर आपण संघटित झालो पाहिजे. साम्राज्यवाद्यांशी संघर्ष केला पाहिजे. हे विचार अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाने लोकांच्या मनावर बिंबवले. आधुनिक राष्ट्रवादाची सुरूवात फ्रेंच राज्यक्रांतीने झाली असली तरी फ्रेंच राज्यक्रांतीपुढे आदर्श अमेरिकन क्रांतीचा होता. वास्तविक अमेरिकेचा संघर्ष साम्राज्यवादी इंग्रजांशी होता. पण फ्रान्सने स्वत:हून या संघर्षात अमेरिकेला मदत केली. १७७४ मध्ये अमेरिकेने स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करून इंग्रजांना आव्हान दिले. झालेल्या संघर्षात इंग्लंडचा पराभव झाला. अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात अमेरिकेला मदत करणाऱ्या फ्रेंच सैन्याचा 'लाफायेत' हा सेनापती होता. फ्रेंचांनी अमेरिकेच्या न्याय्य बाजूला प्रोत्साहन दिले होते. या स्वातंत्र्य युद्धाचा फ्रेंच जनतेवर सखोल परिणाम झाला. या युद्धातून स्वातंत्र्य, समता, बंधुता इत्यादी तत्वांचा फ्रेंच जनतेला परिचय झाला. आपल्याला नको असलेले सरकार आपण केव्हाही बदलू शकतो. लोकशक्तीने लोकांचे हक्क मिळविता येतात. या सर्व गोष्टी, फ्रेंचांना जागृत करणाऱ्या ठरल्या. त्यामुळेच फ्रान्समध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला.

### ब) फ्रेंच राज्यक्रांती (१७८९) :-

अमेरिकन क्रांतीचा फ्रेंच राज्यक्रांती पुढे आदर्श होता. इतरही अनेक कारणांचा परिपाक होऊन फ्रान्समध्ये १७८९ ला क्रांती घडून आली. ही क्रांती राष्ट्रवादाचा दृश्य आविष्कार होता. पिढ्यान् पिढ्या अनिर्बंध राजेशाही खाली दबलेल्या फ्रेंचांनी ती राजसत्ताच उलथून टाकली व प्रजासत्ताक राजवट निर्माण केली. राष्ट्रवादाच्या भावनेने फ्रेंच जनता जागृत झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही जगाला देणगी मिळाली. क्रांतीच्या प्रेरणेने फ्रान्समध्ये सामाजिक ऐक्य प्रस्थापित झाले. राष्ट्रवादी भावनेला उत्तेजन मिळाले. आपल्या राष्ट्राबद्दल प्रेम, अभिमान, आदर निर्माण झाला. या क्रांतीतून निर्माण झालेल्या राष्ट्रवादी भावनेने व्यापक स्वरूप धारण केले. पुढे युरोपचा संपूर्ण इतिहास राष्ट्रवादाच्या प्रभावाचा इतिहास बनला.

### क) क्रांतीनंतरचा राष्ट्रवाद :-

१७ जून १७८९ रोजी लोक प्रतिनिधींची राष्ट्रीय सभा प्रस्थापित झाली. १७९१ ला फ्रान्ससाठी नवी राज्यघटना निर्माण झाली. १७९२ ला अनियंत्रित राजेशाही लादणाऱ्या राजांना ठार केले व फ्रान्समध्ये गणराज्य आकाराला आले. फ्रान्समध्ये क्रांतीला काही काळ अवकळा आली ती रॉबेस्पीयरच्या दहशतवादाने पण १७९९ मध्ये हे दहशतवादाचे राज्यही संपले व फ्रान्समधील राष्ट्रवादाची वाटचाल पुढे चालूच राहिली.

स्वातंत्र्य, लोकशाही प्रजासत्ताक या संकल्पना बळकट बनत गेल्या. या तत्वांचा युरोपभर प्रसार होऊ लागला. क्रांतीनंतर फ्रान्समधील राष्ट्रवाद व्यापक बनत गेला.

## ड) नेपोलियनची राजवट व राष्ट्रवाद :-

१७९९ मध्ये राज्यकारभार करणारे संचालक मंडळ बरखास्त करून नेपोलियनने फ्रान्सचा कारभार आपल्या ताब्यात घेतला. नेपोलियनच्या काळात राष्ट्रवादाने आक्रमक रूप धारण केले. आपल्या राष्ट्राबद्दल अवाजवी प्रेम त्याने फ्रेंचांच्या मनात निर्माण केले. नेपोलियनच्या नेतृत्वाखाली फ्रान्सने मोठ्या प्रमाणात ऐक्य प्रस्थापित केले. नेपोलियनच्या राजवटीचा दुसरा एक परिणाम असा झाला की, त्याने इतरांच्या राज्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचे धोरण राबविले त्यामुळे नेपोलियनच्या आक्रमकतेला शह देण्यासाठी युरोपातील राष्ट्र एकसंघ होऊ लागली. त्यामुळे राष्ट्रवादाला आणखी चालनाच मिळाली. प्रत्येक राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी सामूहिक जबाबदारीने एक होऊ लागले. नेपोलियनच्या काळात त्याने सामाजिक समतेचा पुरस्कार करून एक प्रकारे राष्ट्रवादाला बळकटच केले.

## इ) प्रतिगाम्यांची दडपशाही :-

नेपोलियनची राजवट आक्रमक होती. त्याने आक्रमक राष्ट्रवादाचा अवलंब करून आपल्या सत्तेचा विस्तार केला. नेपोलियनच्या रूपाने क्रांतीतत्त्वांचा प्रसार होऊ लागला, पण ही तत्त्वे युरोपियनांना मानवणारी नव्हती. नेपोलियनमुळे हा राष्ट्रवाद व क्रांती तत्त्वे काही काळ युरोपात पसरू लागली पण ही तत्त्वे व हा राष्ट्रवाद दडपण्याचा प्रयत्न युरोपीय राष्ट्रांनी केला. फ्रान्सविरुध्द राष्ट्रांनी आघाडी उघडली. १८८५ मध्ये वॉटर्लूच्या मैदानावर नेपोलियनचा पराभव केला. पण त्यामुळे राष्ट्रवाद थांबला नाही. उलट फ्रेंच राष्ट्रवादाला उत्तेजनच मिळाले. व्हिएन्ना परिषद, संयुक्त युरोप, मटेरनिक पद्धती या सर्व ठिकाणी प्रतिगाम्यांनी राष्ट्रवाद दडपण्याचे कसोशीने प्रयत्न केले. पण त्यामुळे फ्रेंच राष्ट्रवादाला उत्तेजनच मिळाले व युरोपभर राष्ट्रवादाचा प्रसार झाला.

## ई) १८३० ची क्रांती :-

नेपोलियनच्या पाडावानंतर १८१४ मध्ये १८व्या लुईला फ्रान्सच्या गादीवर बसविले. राजेशाहीच्या प्रस्थापनेमुळेच पुन्हा फ्रान्समध्ये प्रतिगामी राजवट आली असे वाटते. पण अठराव्या लुइने फ्रेंच जनतेच्या भावना न दुखावता घटनेनुसार राज्य करण्याचे धोरण राबविले. मंत्रिमंडळाच्यामार्फत हा राज्यकारभार करावा असे निश्चित करण्यात आले. पण पुढे लुई राजांनी लोकमताला बाजूला ठेवून राज्यकारभार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे फ्रान्समधील क्रांतिकारकांनी १८३० मध्ये बुरबॉन घराण्यातील राजांचे उच्चाटन करून अर्लियन्स घराण्याचा लुई फिलिपीला राजा बनविले. त्याने जनमताची कदर करत राज्यकारभार केला. 'जनमताचा प्रभाव असणारा राजा' किंवा 'फ्रेंच जनतेचा राजा' असे त्याला म्हटले जात असे. थोडक्यात

फ्रेंचांची राष्ट्रवृत्ती यामुळे बळकट बनत गेली. ही क्रांती १७८९ च्या क्रांतीचा पुढचा टप्पा होती. कारण या क्रांतीने राजाचा वारसा डावलला, दैवी अधिकाराचा सिद्धांत डावलला व जनमताचा प्रभाव प्रस्थापित केला.

### फ) १८४८ ची क्रांती :-

१८३० च्या क्रांतीने लुई फिलिपीला सत्तेवर आणले. पण आपल्या १८ वर्षाच्या काळात तो कोणालाही संतुष्ट करू शकला नाही. १८३५ पासून त्याने अनेक कायदे करून व्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध लादले. राजकीय पक्ष व संस्थांवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे लुई फिलिपच्या धोरणावर प्रजासत्ताकवादी, समाजवादी, उदारमतवादी, बोनापार्टिस्ट सर्वच लोक नाराज झाले. त्याचे परराष्ट्रीय धोरणही फ्रेंच जनतेची निराशा करणारे ठरले. १८४८ मध्ये फ्रान्समधील सर्व जनतेने पुन्हा एकदा राष्ट्रवादाचा प्रभाव दाखविला. लुई फिलिपीला राजपदावरून दूर केले. २४ फेब्रुवारी १८४८ ला राजत्याग करून लुई इंग्लंडला पळून गेला. या क्रांतीमुळे १७८९ च्या क्रांतीने सुरू केलेल्या पर्वाची समाप्ती झाली. राजाचा दैवी अधिकाराचा सिद्धांत संपला व जनतेचे सार्वभौमत्व सिद्ध झाले.

### ग) राष्ट्रवादाचा प्रसार :-

१७८९ मध्ये फ्रेंच क्रांतीच्या रूपाने राष्ट्रवादाचा उदय झाला. या राष्ट्रवादाला आपले महत्त्व सिद्ध करण्याकरिता खूप संघर्ष करावा लागला. नेपोलियनने या राष्ट्रवादाला झळाळी दिली. पुन्हा प्रतिगाम्यांच्या धोरणामुळे राष्ट्रवादी तत्त्व दडपण्याचा प्रयत्न युरोपभर सुरू झाला. पण १८३० व १८४८ च्या क्रांत्यांनी राष्ट्रवादाला पुन्हा ताकद पुरविली. त्यामुळे राष्ट्रवादाची वाटचाल सर्व युरोपभर दमदारपणे सुरू राहिली. प्रारंभीचा राष्ट्रवाद नंतर युरोपभर विस्तारत गेला. राष्ट्रवादी भावना दडपल्या जाऊ शकत नाहीत हे १८३० व १८४८ च्या क्रांत्यांनी दाखवून दिले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादी भावना वाढीस लागल्यामुळेच इटली व जर्मनीच्या एकीकरण चळवळी १८७० मध्ये यशस्वी झाल्या. अशा अनेक छोट्या-मोठ्या राष्ट्रात राष्ट्रवादाचा प्रसार झाला. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने राष्ट्रवादाचा उदय झाला.

## ४ इटलीमधील दहशतवाद :-

रोमन साम्राज्याच्या लयाबरोबर इटलीचे अस्तित्वही संपुष्टात आले व इटली हा भूगोलातील एक शब्द राहिला. इटली हा देश अनेक लहान-मोठ्या राज्यांत विभागला गेला. एकमेकांना खाली ओढण्याचा खेळच अनेक शतके इटलीत सुरू होता. त्यामुळे इटलीची फारशी प्रगती या काळात झाली नाही. १५व्या शतकापासून ते १८व्या शतकापर्यंत युरोपातील अनेक राज्यांनी इटलीवर राज्य करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे एक राष्ट्र ही कल्पना लवकर मूळ धरू शकली नाही. उत्तरेला आल्प्स पर्वत व तिन्ही बाजूंनी समुद्र अशी भौगोलिक रचना असलेल्या इटलीला राष्ट्र बनता आले नव्हते, हे त्या राष्ट्राचे दुर्दैव होय. इटलीत

प्रांताप्रांतात, शहराशहरांत, कुटुंबाकुटुंबात, माणसांमाणसांत वैर निर्माण होणे कठिण होते. शिवाय ग्रीकांप्रमाणे इटालियन लोकांच्या प्रत्येक ठिकाणाच्या रूढी, परंपरा भिन्न होत्या.

अशा बुरसटलेल्या व मागासलेल्या इटलीत नेपोलियनच्या स्वारीने नवीन पर्व सुरू झाले. त्याने जिंकलेल्या इटलीत एकछत्री अंमल सुरू केला. दंडविधानसंहिता तेथे रुजविली. दळणवळणाची सोय करून इटलीला एके ठिकाणी आणले. नेपोलियनच्या आक्रमक युद्धातून राष्ट्रवादाचा युरोपमध्ये उदय झाला. या राष्ट्रवादानेच नेपोलियनचा पराभव केला, असे असले तरी तेथील जनतेत कमालीचे ऐक्य निर्माण झाले. त्यांना राष्ट्रीयत्वाच्या तत्त्वावर इटलीचे एकीकरण व्हावे असे वाटू लागले. कारण नेपोलियनच्या स्वारीमुळे लहान-लहान राज्ये संपुष्टात आली होती. त्यांचे एकीकरण करून इटलीत राष्ट्रीय भावना वाढविली होती. अशा तऱ्हेने इटलीच्या एकीकरणाला नेपोलियनने अप्रत्यक्षपणे मदतच केली होती. वास्तविक इटलीची भौगोलिक परिस्थिती सुद्धा एकीकरणास अनुकूल होती. इटलीच्या चोहोबाजूस समुद्र आणि उत्तरेला दुर्गम असे पर्वत असल्याने वास्तविक राष्ट्र म्हणून एकीकरण साध्य होऊ शकत होते, परंतु इटलीच्या निरनिराळ्या बलिष्ठ राज्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याने त्यांनी वेळोवेळी इटलीच्या एकीकरणास विरोध केला व त्यामुळेच एकीकरण घडून येऊ शकले.

## अ) नेपोलियन बोनापार्टच्या स्वारीचे परिणाम :-

फ्रान्समध्ये इ.स. १७७९ मध्ये जी फ्रेंच राज्यक्रांती घडून आली त्याने मात्र मृत इटलीत चैतन्य निर्माण होऊन एक राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाली. फ्रेंच क्रांतीत निर्माण झालेल्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्वांचा सुद्धा इटलीत सखोल ठसा उमटला; परंतु इटलीत विविध राष्ट्रांचा वरचष्मा असल्याने एकीकरणाच्या दृष्टीने विशेष प्रगती होऊ शकली नाही. इटलीतील लोकांना आपले एक राज्य असावे अशी तीव्र इच्छा निर्माण झाली; परंतु घटनात्मक चळवळीच्या दृष्टीने विशेष प्रगती होऊ शकली नाही. नेपोलियन बोनापार्टच्या इटलीतल्या स्वाऱ्यांमुळे मात्र इटलीचा अप्रत्यक्षपणे फायदाच झाला. इटली जिंकून घेतल्यानंतर इटलीच्या विविध पृथक राज्यात नेपोलियनची सत्ता प्रस्थापित झाल्यामुळे एक प्रकारची राजकीय एकता प्रस्थापित झाली. 'इटलीत नेपोलियनने सत्तेचे केंद्रीकरण घडवून आणल्याने इटलीत आपोआपच एक राष्ट्रीयत्वाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

## ❁ व्हिएन्ना काँग्रेस व इटली :-

व्हिएन्ना काँग्रेसमध्ये राष्ट्रीय भावनेचा विचार केला गेला नाही; कारण मेटरनिकला राष्ट्रवाद व लोकशाही ही भयंकर तत्त्वे वाटत होती. व्हिएन्ना काँग्रेसमध्ये बड्यांनी इटलीला केवळ बाहुले बनविले व इटलीची फाळणी करण्यात आली.

१. लोंबार्डी व व्हेनेशिया ऑस्ट्रियाला देण्यात आला.

२. पार्मा–ऑस्ट्रियन राजकुमारी लुसीला देण्यात आली, ती थोरल्या नेपोलियनची बायको होती.

३. टस्कनी हॅब्जबर्ग घराण्यातील तिसऱ्या फर्डिनंडला देण्यात आले.

४. नेपल्स व सिसिलीवर ब्युरबॉन घराण्यातील पहिला फर्डिनंड यास गादीवर बसविले.

५. रोमवर ७ व्या पोपला गादीवर बसविण्यात आले.

६. इटलीपैकी सार्डिनिया–पिडमाँट हे राज्य फक्त इटालियन राज्याचे होते. तेथे व्हिक्टर इम्यानुअल याला राजा बनविला.

वारसदाराचे तत्त्व पुढे करून इटलीची चिरफाड करण्यात आली होती. इटलीत एक–राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागू नये म्हणून मेटरनिकने हा खटाटोप केला होता. इटलीचा बहुतेक भाग ऑस्ट्रियाच्या पंजाखाली होता. ऑस्ट्रियाबरोबर पोपचा व इटलीतील अनेक राजांचाही इटलीतील अनेक राजांचाही इटलीच्या एकीकरणाला विरोध होता. दडपशाही व दशहतवादाचा मार्ग अवलंबून राष्ट्रीय चळवळी हाणून पाडण्याचे मेटरनिकचे धोरण होते. म्हणूनच इटालियन देशभक्तांना भूमिगत राहूनच त्यांना स्वातंत्र्य चळवळ जीवंत ठेवायचीच होती. त्यासाठी त्यांनी 'कार्बोनरी' ही गुप्त संघटना स्थापन केली. एकसूत्रता व कार्यक्रमाचा अभाव यामुळे ही संघटना फार काळ टिकली नाही. तरीदेखील स्वातंत्र्याची भावना जनतेत तेवत ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी या संघटनेने केली. त्यामुळे इटलीच्या एकीकरणाच्या चळवळीला पुढे चालना मिळाली.

### ❀ युरोपातील क्रांत्यांचा इटलीवरील प्रभाव :–

मेटरनिकने कितीही दडपशाही केली तरीही इटलीतील लोकांची स्वातंत्र्य मिळविण्याची इच्छा तो दडपून टाकू शकला नाही. इटलीतून ऑस्ट्रियाची हाकलपट्टी केली पाहिजे ही भावना आता वाढीस लागली होती. इटलीला स्वातंत्र्य मिळवून देणे व इटलीचे एकीकरण घडवून आणणे ही दोन ध्येये इटालियन देशभक्तांनी आपल्या डोळ्यासमोर ठेवली होती. परंतु इटालियन देशभक्तांचे हे स्वप्न साकार होण्यात अनेक अडचणी होत्या. या काळात युरोपातील विविध देशात ज्या क्रांत्या घडून आल्या त्यांचा सुद्धा इटलीतल्या एकीकरणाच्या चळवळीवर परिणाम घडून आला.

### ब) 'कार्बोनरी' चळवळ :–

लोकशाहीची आणि एकीकरणाची चळवळ उघडपणे चालवणे अशक्यच होते; कारण मेटरनिकने प्रस्थापित केलेले पोलिस दल दडपशाही करण्यात अतिशय कार्यक्षम होते. यावर उपाय म्हणून नेपल्समध्ये 'कार्बोनरी' (Carbonary) नावाची एक गुप्त संघटना निर्माण झाली. देशामध्ये भूमिगत राहून कार्य करणाऱ्या देशभक्तांनी गुप्त संघटना प्रस्थापित केली होती. कोळसे पेटवून या संस्थेचे सभासद एकमेकांना संदेश देत असत. म्हणून या चळवळीला 'कार्बोनरी' चळवळ असे नाव पडले. इटलीचे एकीकरण करणे व इटलीत लोकशाही प्रस्थापित करणे हे या संस्थेचे प्रमुख ध्येय होते. 'परकीय गुलामगिरीतून मुक्त होणे' हे या

चळवळीचे प्रमुख ध्येय होते. या चळवळीत इटलीतील सर्व प्रकारचे लोक सामील झाले. निश्चित योजना व निश्चित कार्यक्रम यांच्या अभावी ही कार्बोनरी चळवळ लयाला गेली. या चळवळीचा तरीसुद्धा एकच परिणाम दिसून आला तो म्हणजे इटालियन जनतेत तिने क्रांतीची भावना सतत जागृत ठेवली. उदारमतवादी आणि लोकशाहीच्या कल्पना यामुळे इटालियन लोकांच्या मनात कायमच्या रूजल्या गेल्या. कार्बोनरी चळवळीने हे कार्य सिद्ध केले ते इटलीच्या इतिहासात महत्त्वाचे समजले जाते. कार्बोनरी चळवळीने केलेल्या जनजागृतीचा फायदा घेऊन इटालियन देशभक्तांनी एकीकरणाची चळवळ पुढे चालविली व इटलीचे एकीकरण घडवून आणले.

### क) नेपल्स क्रांती (इ.स. १८२०) :-

इ.स. १८२० मध्ये स्पेनमध्ये जी क्रांती घडून आली, त्याचे पडसाद नेपल्समध्ये उमटले. नेपल्सचा राजा फर्डिनंड पहिला याने इ.स. १८१५ मध्ये आपण लवकरच उदारमतवादी घटना नेपल्समध्ये अंमलात आणू असे वचन दिले होते. परंतु ते वचन पूर्ण न झाल्याने नेपल्यच्या जनतेने फर्डिनंड पहिला विरुद्ध बंड पुकारून ताबडतोब उदारमतवादी घटनेची मागणी केली. (इ. स. १८२०) फर्डिनंड पहिला याने घाबरून जाऊन ती राज्यघटना देण्याचे कबूल केले.

### ड) पिडेमाँटमधील उठाव (इ.स.१८२१) :-

नेपल्समधील राज्यक्रांती ही नेपल्सपुरती मर्यादित राहिली नाही. इटलीत सर्व गुप्त संस्था प्रस्थापित झाल्याने त्यांनी ठिकठिकाणी बंडाळ्या करण्याचे प्रयत्न चालविले. त्यामुळे नेपल्समधील क्रांतीची लाट पिडेमाँटमध्ये येऊन पोहोचली. 'ऑस्ट्रियाने वर्चस्व झुगारून देऊन उदारमतवादी राज्यघटना मंजूर करा' अशा लोकांनी घोषणा केल्या व क्रांतीचा झेंडा फडकविला. पिडेमाँटचा राजा व्हिक्टर इमान्युएल पहिला हा दुर्बल व प्रतिगामी राजा होता; त्यामुळे त्याने घाबरून जाऊन राजत्याग केला व आपला भाऊ चार्लस् फेलिक्स याला गादीवर बसविले.

### इ) ऑस्ट्रियाची दडपशाही व क्रांतीचा पाडाव :-

नेपल्स व पिडेमाँट यामधील क्रांतीकारक चळवळी फार दिवस टिकल्या नाहीत. लायबेकची परिषद आटोपल्यानंतर (इ.स. १८२१) मेटरनिकने क्रांती दडपून टाकण्याकरिता पहिल्याप्रथम नेपल्समध्ये व नंतर डिपेमाँटमध्ये ऑस्ट्रियन सैन्य पाठविले व दोन्ही ठिकाणच्या क्रांती दडपून टाकल्या व पुन्हा या दोन्ही देशांत प्रतिगामी राजवटीस प्रारंभ झाला.

### ई) फ्रान्समधील इ.स. १८३० च्या राज्यक्रांतीचा परिणाम :-

जुलै, १८३० मध्ये जी राज्यक्रांती घडून आली त्याचे इटलीवर सुद्धा परिणाम दिसून आले. पोपचे

राज्य, पिडेमाँट, पार्मा आणि मोडेना या राज्यात सर्व बंडाळ्या झाल्या. या सर्व बंडाळयात जनतेला सर्वत्र यश मिळाले. परंतु पोप ग्रेगॉरी सोळावा याने ऑस्ट्रियाची मदत मागितली. म्हणून मेटरनिकने ऑस्ट्रियन सैन्य पोपच्या मदतीला पाठविले व तेथील क्रांती चिरडून टाकली. पार्मा या ठिकाणची क्रांतीसुद्धा अशाचप्रकारे चिरडून टाकण्यात आली. मेटरनिकच्या नेतृत्त्वाखील अशाप्रकारे इटलीच्या चळवळीला दडपून टाकण्यात ऑस्ट्रियाला दोनदा यश मिळाले. परंतु इटलीतील एक राष्ट्रीयत्वाची व स्वातंत्र्याची चळवळ जी चेतविली गेली होती ती मुळापासून नष्ट करण्यात मेटरनिकला यश लाभले नाही.

### फ) इ.स. १८४८ च्या क्रांतीचा परिणाम :-

इ.स. १८४८ मध्ये ज्यावेळी फ्रान्समध्ये क्रांती घडून आली त्यावेळी त्या क्रांतीचे पडसाद इटलीत सुद्‌धा उमटले. ऑस्ट्रियाच्या ताब्यात लोम्बार्डी आणि व्हेनेशिया ही जी दोन राज्ये होती, त्यांत क्रांती घडून आली. पिडेमाँटचा राजा चार्लस्‌ याने या क्रांतीला मदत केली. या क्रांतीची लाट संपूर्ण इटलीत पसरली. पोपचे साम्राज्य, नेपल्स, टस्कनी या राज्यात क्रांती होऊन त्यात त्यांना यश आले. इ.स. १८४८ मध्ये निर्माण झालेली ही क्रांतीची लाट इतकी जबरदस्त होती की ऑस्ट्रियाला इटलीत आपले वर्चस्व टिकवून धरणे अशक्य झाले.

अशारितीने इ.स. १८४८ च्या क्रांतीचा फायदा घेऊन इटालियन देशभक्तांनी आपला देश ऑस्ट्रियन वर्चस्वापासून मुक्त करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्या प्रयत्नांत त्यांना यश आले नाही. इ.स. १८४८ च्या राज्यक्रांतीत जरी इटालियन देशभक्तांना अपयश प्राप्त झाले तरी इटालियन जनतेत त्यामुळे फार मोठी जागृती निर्माण झाली. इटालियन देशभक्तांनी परस्परांच्या सहकार्याने आणि सुसंघटितपणे परकीय सत्तेशी लढा देण्याचे ठरविले. एकमेकांच्या सहकार्याने त्यांनी स्वातंत्र्याचा लढा चालविल्याने त्यांना इटलीच्या एकीकरणात यश प्राप्त झाले.

इटलीच्या या स्वातंत्र्यसंग्रामात जोसेफ मॅझिनी, काऊंट कॅमिली डी काव्हूर, गॅरिबाल्डी आणि पिडेमाँटचा राजा व्हिक्टर इन्युन्युएल यांचे कार्य इतिहासात अविस्मरणीय समजले जाते. या चौघांना इटालियन स्वातंत्र्याचे शिल्पकार समजले जाते. या चौघांच्या अविश्रांत प्रयत्नांमुळे आणि ध्येयवादामुळे नवीन इटली घडविला गेला. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणे याठिकाणी आवश्यक ठरते.

## ❑ राष्ट्रभक्तांचे योगदान :-

### अ) जोसेफ मॅझिनी (१८०५ ते १८७२) :-

जोसेफ मॅझिनी यांचा जन्म २२ जून १८०५ रोजी इटली जवळ जिनोआ येथे झाला. मॅझिनीचे वडिल विश्वविद्‌यालयात प्रोफेसर होते. वडिलांच्या क्रांतिकारक विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. मोठा झाल्यावर

त्याने देशाच्या स्वतंत्र्य आंदोलनात भाग घेतला. मॅझिनीनेच राष्ट्रवादी आंदोलनाचा पाया घातला. तो महान देशभक्त होता. पुढे 'मॅझिनी म्हणजे इटली' असे समीकरण झाले. सुरूवातीला त्याने कार्बोनरी संघटनेत प्रवेश केला. ही क्रांतीकारी संघटना १८३० मध्ये बंद झाली. मॅझिनीला अटक झाली व सेव्हॉयच्या तुरूंगात त्याला सहा महिने रहावे लागले. याच ठिकाणी चिंतन करून 'यंग इटली' (Young Italy) या संघटनेची संकल्पना तयार केली. देशातील तरुणांच्या सामर्थ्यावर त्याचा प्रचंड विश्वास होता. मॅझिनी प्रभावी वक्ता होता. त्याच्या विचारांनी तरुणांना भारावून टाकले. इटालियन तरुणांच्यात त्याग, देशप्रेम, धाडस व चारित्र्य निर्माण करण्याचे श्रेय या संघटनेला आहे. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरुणांना मॅझिनीने या चळवळीत सामावून घेतले. इटलीच्या एकीकरणासाठी वाटेल तो त्याग करण्याची तयारी या संघटनेतील सभासदांची होती. 'देवावर व जनतेवर श्रद्धा' हे या संघटनेचे ब्रीद वाक्य होते. 'स्वातंत्र्य, एकीकरण व प्रजासत्ताक' ही मॅझिनीची त्रिसूत्री होती. कोणत्याही परकीय राष्ट्राच्या मदतीशिवाय हे ध्येय साध्य करायचे असे मॅझिनीचे मत होते. मॅझिनीच्या युवक इटलीमुळे इटालियन लोकांच्यात एकराष्ट्रीयत्वाची ज्योत सतत तेवत राहिली.

१८४८ च्या क्रांतीच्या इटलीच्या चळवळीवरही मोठा प्रभाव पडला होता. इटलीतील बऱ्याच राज्यात बंडाळ्या झाल्या. मॅझिनीच्या नेतृत्वाखाली रोममध्ये उठाव झाला. मॅझिनीने तिथे प्रजासत्ताक स्थापन केले, पण फ्रान्सच्या लुई नेपोलियनने लष्करी सामर्थ्यावर क्रांतीकारकांना पराभूत केले. रोमच्या पोपची पुन्हा गादीवर प्रतिष्ठापना केली. मॅझिनी पोपच्या राज्यातून पळून गेला व सिसिली बेटाचा त्याने आश्रय घेतला. सिसिलीत मॅझिनी स्वस्थ्य बसला नाही. तेथे त्याने राष्ट्रीयत्वाचा प्रसार केला. त्याचाच परिणाम म्हणून पुढे १८६० साली गॅरीबाल्डीने सिसिली व नेपल्स जिंकून घेतले. आपल्या काळात मॅझिनीला इटलीचे एकीकरण साध्य करता आले नाही. पण त्याच्या प्रयत्नामुळे इटलीची एकीकरणाच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू झाली. १८७२ मध्ये मॅझिनीचा मृत्यू झाला. मॅझिनीच्या कार्याबद्दल गॅरीबाल्डी म्हणतो, ''माझ्यासारखाच स्वातंत्र्यासाठी तहानलेला महान देशभक्त व मार्गदर्शक मला मॅझिनीच्या रूपाने प्राप्त झाला.''

## ब) काऊंट काव्हूर-डी केमिलो (१८१० ते १८६२) :-

पिटमॉट राज्यातील एक सरदार घराण्यात काव्हूरचा जन्म झाला. लष्करी शिक्षणानंतर लष्करात इंजिनिअर म्हणून तो काम करू लागला. १८३१ मध्ये त्याने आपल्या लष्करातील पदाचा राजीनामा दिला व इटलीच्या एकीकरणाचा अभ्यास केला. काव्हूर हा इटलीचा शिल्पकार होता. त्याच्याच प्रयत्नाने इटलीच्या एकीकरणाची पूर्तता झाली. काव्हूर देशभक्त व दूरदर्शी नेता होता. त्याची भूमिका मॅझिनी व गॅरीबाल्डी यांच्यापेक्षा भिन्न होती. १८४८ मध्ये पिडमॉट मध्ये जी क्रांती झाली त्याला काव्हूरने प्रोत्साहन दिले. त्यानंतर १८५० मध्ये पिडमॉटच्या लोकांनी त्याला मंत्रिमंडळात निवडून दिले. तो १८५२ मध्ये पिडमाँटचा मुख्यमंत्री झाला. व्हिक्टर इमॅन्युअल या पिडमॉडच्या राजाचे नेतृत्व व काव्हूरचा मुत्सद्दीपणा

यांचा सुरेख मेळ या ठिकाणी बसला. कर्तबगार हाताला बुध्दिची जोड मिळाल्याने इटलीच्या एकीकरणाला एक प्रकारचा भक्कमपणा प्राप्त झाला.

'मॅझिनीने जे पेरले त्याचे पीक काव्हूरने घेतले.' मॅझिनी स्वप्नाळू होता तर काव्हूर व्यवहारी होता. परकीय राष्ट्राच्या मदतीशिवाय ऑस्ट्रियाची इटलीतून हकालपट्टी होणार नाही. या वास्तववादी विचारसरणीचा काव्हूर होता. पिडमॉटला बलिष्ठ बनविण्यास काव्हूरने अविश्रांत प्रयत्न केले. ऑस्ट्रियाचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी त्याने फ्रान्सचा नेपोलियन तिसरा व पिडमॉटचा राजा व्हिक्टर इमॅन्यूअल दूसरा यांच्यात मैत्री निर्माण केली. तिसऱ्या नेपोलियनने इटलीला मदत केली पण ती अर्धवटच केली. त्यामुळे काव्हूरचे इटलीच्या स्वातंत्र्याचे प्रयत्न पूर्णपणे यशस्वी होऊ शकले नाहीत. तरीही १८६१ मध्ये रोम व व्हेनेशिया व्यतिरिक्त संपूर्ण इटलीचे त्याने एकीकरण घडवून आणले. १८६१ मध्ये काव्हूरचा मृत्यू झाला. मृत्यूच्या वेळी तो म्हणाला, ''इटली अस्तित्वात आली, आता सर्व सुरक्षित होईल.'' त्याच्या कामगिरीबद्दल फिलिप हा इतिहासकार म्हणतो- Italy as nation is the legacy of the work of count cavonr. तर इंग्लंडच्या पंतप्रधान लॉर्ड पामर्स्टन म्हणतो- ''ज्यांच्या जीवनापासून बोध व स्फूर्ति घ्यावी असे काव्हूरचे जीवन होते.'' काव्हूरच्या मुत्सद्दीपणाऐवजी गॅरीबाल्डी व मॅझिनीचे कार्य वाया गेले असते, असे कटुसत्य नाकारता येत नाही.

## क) गॅरीबाल्डी (१७०८ ते १८८२) :-

इटलीच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा शिल्पकार होता. १८०७ मध्ये 'नॉइस' या शहरात त्याचा जन्म झाला. सुरूवातीच्या काळात तो युवक इटलीचा सभासद होता. १८३४ मध्ये मॅझिनीच्या प्रेरणेने झालेल्या बंडात गॅरीबाल्डीने सक्रीय सहभाग घेतला, त्यामुळे त्याला फाशीची शिक्षा सुनावली. पण तो अमेरिकेत पळून गेला. अमेरिकेत राहून १४ वर्षांच्या काळात त्याने 'लाल डगलेवाले सैन्य' (Red Shirts) तयार केले. १८४८ मध्ये फ्रेंच क्रांती व मेटरनिक युगाचा अस्त झाल्यावर गॅरीबाल्डी आपल्या लाल डगलेवाल्या सैन्यासह इटलीत आला. त्याने मॅझिनीच्या सहकार्याने रोमचे राज्य जिंकले पण लुई नेपोलियनच्या हस्तक्षेपाने गॅरीबाल्डीचा पराभव झाला. तो पुन्हा अमेरिकेत गेला.

१८५४ मध्ये तो पुन्हा इटलीत येऊन कॅम्प्रेरा बेटावर शेती करू लागला. १८६० मध्ये सिसिली बेटातील लोकांनी बंड करताच गॅरीबाल्डी आपल्या निवडक लाल डगलेवाल्या सैन्यासह सिसिलीत गेला व सिसिली जिंकले. सिसिली पाठोपाठ नेपल्सही जिंकले. वास्तविक गॅरीबाल्डी यावेळी संपूर्ण दक्षिण इटलीचा राजा होऊ शकला असता पण इटलीच्या एकीकरणाशी प्रामाणिक असलेल्या गॅरीबाल्डीने काव्हूरचे नेतृत्व मान्य केले होते. त्यामुळे तो प्रदेश काव्हूरच्या ताब्यात देऊन पुन्हा कॅम्प्रेरा बेटावर शेती करण्यासाठी निघून गेला. 'गॅरीबाल्डी सारखा लढाऊ जर हात काव्हूरला प्राप्त झाला नसता तर काव्हूरला इटलीचे एकीकरण घडवून आणता आले नसते.' हे एका इतिहासकाराचे विधान गॅरीबाल्डीचे मूल्यमापन करण्यास पुरेसे आहे.

वैयक्तिक स्वार्थाचा विचार न करता इटलीचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व यासाठी आयुष्य वेचणारा तो सर्वश्रेष्ठ राष्ट्रभक्त होता.

## ड) व्हिक्टर इमॅन्युअल दुसरा (१८२० ते १८७८) :-

पिडमॉटचा राजा व्हिक्टर इमॅन्युअल दुसरा याने इटलीच्या एकीकरणात महत्त्वाचा सहभाग दिला. सेव्हॉय सोडेनिया व पिडमॉट या संयुक्त राज्याचा तो एकमात्र इटालियन राजा होता. त्यामुळे इटालियन लोकांच्यात त्याला खूप आदर होता. १८४९ मध्ये तो गादीवर आला. इटलीच्या एकीकरणाची राजा या नात्याने त्याने समर्थपणे जबाबदारी सांभाळली. या कामात त्याला काव्हूरसारख्या मुख्यमंत्र्यांची साथ मिळाली. उत्तम प्रशासक, न्यायाधिश, सेनापती या दृष्टीने व्हिक्टर इमॅन्युअल हा महत्त्वाचा राजा होऊन गेला.

## ❑ इटलीच्या एकीकरणाची पुढील वाटचाल (१८५० ते १८७०) :-

पिडमॉटच्या नेतृत्वाखाली व्हिक्टर इमॅन्युअल, काव्हूर, गॅरीबाल्डी यांनी इटलीचे एकीकरण टप्प्या टप्प्याने घडवून आणले. त्यातील प्रमुख घडामोडी पुढीलप्रमाणे :-

## अ) क्रिमियन युद्धाचा लाभ (१८५६) :-

१८५६ मध्ये पूर्वेकडील प्रश्नावरून इंग्लंड, फ्रान्स विरुद्ध रशिया यांच्यात जे युद्ध झाले त्याला क्रिमियन युद्ध असे म्हणतात. वास्तविक या युद्धाशी इटलीचा म्हणजेच काव्हूरचा काहीही संबंध नव्हता. पण काव्हूरने धूर्तपणे या युद्धात फ्रान्सच्या बाजूने भाग घेतला. कारण इटलीच्या एकीकरणासाठी त्याला फ्रान्सची मदत घ्यावयाची होती. काव्हूर नेहमी म्हणायचा ''आपली इच्छा असो वा नसो परंतु आपले भाग्य फ्रान्सशी जोडले आहे हे निश्चित, युरोपच्या राजकीय मंचावर लवकरच एका नाटकाचा प्रयोग होणार आहे, त्यात आपण फ्रान्सकडून असणार आहोत.'' त्यानुसार काव्हूरने क्रिमियन युद्धात इंग्लंड-फ्रान्सच्या बाजूने भाग घेऊन इटलीचे १७ हजार सैन्य पाठवून दिले. क्रिमियन युद्ध इंग्लंड-फ्रान्सने जिंकले त्यानंतर पॅरिसचा तह झाला. त्यात काव्हूर सहभागी झाला व त्याने इटलीच्या एकीकरणाचा प्रश्न मांडला. याचवेळी अर्सेनो नावाच्या इटालियन व्यक्तीने फ्रान्सच्या नेपोलियन तिसरा याच्यावर प्राणघातक हल्ला केला. अर्सेनोला फासावर लटकविले. पण त्याने फासावर चढताना शेवटची इच्छा व्यक्त केली. ती म्हणजे तुम्ही इटलीचे एकीकरण करा. याचा नेपोलियनच्या मनावर खूपच परिणाम झाला. त्याने काव्हूरला मदत करण्याचे मान्य केले. त्यातूनच १८५८ मध्ये नेपोलियन व काव्हूर यांच्यात बेलोनियसचा मदतीचा तह झाला.

## ब) ऑस्ट्रियाशी युद्ध :-

बेलोनियसच्या तहानुसार लोंबार्डी व व्हेनेशिया येथून ऑस्ट्रियाची हकालपट्टी करण्यासाठी नेपोलियनने

काव्हूरला मदत करण्याचे ठरविले. त्यासाठी पिडमॉटने लष्कर जमवायला सुरूवात केली. काव्हूरच्या हालचाली ऑस्ट्रियाला समजताच ऑस्ट्रियाने काव्हूरला लष्कर विसर्जित करण्यास सांगितले. पण पिडमॉटने (काव्हूरने) नकार दिला. त्यामुळे ऑस्ट्रियाने पिडमॉटशी युद्ध पुकारले. या युद्धात लोंबार्डी इटलीने जिंकले. फ्रान्सची मदत असल्याने व्हेनेशियाही ताब्यात येणार होता. पण नेपोलियनने मध्येच माघार घेतली, त्यामुळे काव्हूरचाही नाईलाज झाला. युद्धानंतर ऑस्ट्रिया व पिडमॉट यांच्यात 'व्हिलाफ्रॅंका' तह झाला. या तहानुसार व्हेनेशिया ऑस्ट्रियाला द्यावे असे ठरले. वास्तविक पिडमॉटला हे मान्य नव्हते. पण नेपोलियनच्या माघारीमुळे त्यांचा नाईलाज झाला.

## क) मध्य इटलीतील उठाव :-

ऑस्ट्रियाशी पिडमॉटचे युद्ध होताच मध्य इटलीतील पार्मा, मोडेना, टस्कनी येथील जनतेने उठाव केला. ऑस्ट्रियाने नियुक्त केलेल्या राजांची तेथील जनतेने हकालपट्टी केली. या सर्व ठिकाणी हंगामी सरकारे स्थापन करण्यात आली. मध्य इटलीतील संस्थानांना वास्तविक पिडमॉटच्या नेतृत्वाखाली एकत्र येण्याची इच्छा होती. याचवेळी इंग्लंडच्या पामर्स्टनने जाहीर केले की, 'मध्य इटलीतील राज्यांना इंग्रज आणि फ्रेंचसारखे आपले राज्यकर्ते निवडण्याचा किंवा बदलण्याचा पूर्ण हक्क आहे.' शेवटी आंतरराष्ट्रीय दडपणामुळे मध्य इटलीतील संस्थानातील राजांनी सर्वमत घेतले. त्यानुसार पार्मा, मोडेना, टस्कनी या राज्यांचे इटलीत विलीनीकरण करण्यात आले. (१२ मार्च १८६०).

## ड) सिसिली नेपल्सचे एकीकरण :-

सिसिली व नेपल्स या दक्षिण इटलीतील प्रदेशावर पहिला फर्निनंड राज्य करत होता. मध्य इटलीतील उठावा पाठोपाठ सिसिली व नेपल्समध्ये उठाव झाले. गॅरीबाल्डी या देशभक्ताने ५ मे १८६० रोजी आपले 'लाल डगलेवाले सैन्य' सिसिलीमध्ये घुसवून फर्निनंडच्या सैन्यांचा पराभव केला. सिसिलीवर त्याने कब्जा केला. त्यानंतर गॅरीबाल्डीने नेपल्सवर असाच विजय मिळविला. अशाप्रकारे हे दोन्ही प्रदेश इटलीच्या प्रभावाखाली आले. हे दोन्ही प्रांत गॅरीबाल्डी आपल्याच वर्चस्वाखाली आणून स्वत:चे राज्य निर्माण करतोय की काय अशी भिती काव्हूर व व्हिक्टर इमॅन्युअल यांना होती. पण गॅरीबाल्डी सच्चा राष्ट्रभक्त होता. त्याने हे दोन्ही प्रदेश काव्हूरच्या ताब्यात दिले व स्वत: कॅम्प्रेरा बेटावर शेती करण्यासाठी गेला.

## इ) व्हेनेशियाची प्राप्ती :-

व्हेनेशिया व पोपच्या ताब्यातील रोमचा प्रदेश सोडल्यास जवळ-जवळ सर्व इटलीचे एकीकरण झाले होते. व्हेनेशियावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व होते. १८६० च्या व्हिला फ्रॅंका तहानुसार पिडमॉटने ऑस्ट्रियाला व्हेनेशिया दिले होते. व्हेनेशिया व रोम मिळविण्याचा इटलीने प्रयत्न चालविला. तत्पूर्वीच १८६१ मध्ये पिडमॉटच्या राज्याचे नाव इटली असे करण्यात आले. व्हिक्टर इमॅन्युअल दुसरा याला इटलीचा राजा म्हणून

घोषित करण्यात आले. आता इटली ऑस्ट्रियाकडून व्हेनेशिया मिळविण्याचा प्रयत्न करू लागला. तशी संधी आपोआप चालून आली.

या काळातच बिस्मार्क जर्मनीच्या एकीकरणाचे काम करत होता. त्याला ऑस्ट्रियाचा मोठा अडथळा होता. तेव्हा बिस्मार्कने ऑस्ट्रियावर स्वारी केली. ही संधी साधून व्हिक्टर इमॅन्युअलने देखील ऑस्ट्रियावर स्वारी केली. पण या युद्धात इटलीचा पराभव झाला. त्यामुळे आपोआपच व्हेनेशियावरील ऑस्ट्रियाचे नियंत्रण सैल झाले व १८६६ मध्ये व्हेनेशिया इटलीला मिळाला.

### ई) रोमची प्राप्ती व इटलीचे एकीकरण :-

रोमचा पोप जगातील ख्रिस्ती लोकांचा धर्मगुरू होता. त्यामुळे त्याला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा होती. रोमच्या पोपचे राज्य अद्याप इटलीला मिळायचे होते, त्याविरुध्द लष्करी मोहिम काढणेही अशक्य होते. कारण फ्रेंच रोमच्या पोपचे संरक्षण करत होते. पण १८७० मध्ये फ्रान्स व प्रशिया (जर्मनी) यांच्यात युद्ध होताच फ्रान्सने रोममधील आपले लष्कर रशियात हलविले. या संधीचा फायदा घेऊन व्हिक्टर इमॅन्युअलने रोमवर स्वारी केली व रोम जिंकून घेतले.

अशा रितीने १८१५ मध्ये व्हिएन्ना काँग्रेसने लोकमताची कदर न करता इटलीची चिरफाड केली, पण राष्ट्रवादाच्या उदयामुळे इटालियन देशभक्तांनी इटलीवासियांना संघटित केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे १८७० मध्ये इटलीच्या एकीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली. व्हिएन्ना पूर्वीचा इटलीचा सर्व मुलूख इटलीला मिळाला. फक्त ट्रेन्सचा मुलूख व ट्रिस्ट बंदर ऑस्ट्रियाच्या ताब्यात राहिले. हे प्रदेश इटलीला पहिल्या महायुद्धानंतर मिळाले. रोम ही नव्या इटलीची राजधानी झाली. १८७० मध्ये युरोपात एक प्रभावशाली देश राष्ट्रवादाच्या चैतन्यामुळे अस्तित्वात आला.

## ५ जर्मनीतील राष्ट्रवाद :-

युरोपातील राष्ट्रवादाच्या वाटचालीत जर्मनीतील राष्ट्रवादी चळवळ विशेष उल्लेखनीय आहे. छोट्या-छोट्या राज्यात विभागलेल्या जर्मनीत राष्ट्रवादाने प्राण ओतला व त्यातूनच जर्मनीत एकीकरणाची चळवळ सुरू झाली. अवघ्या काही वर्षातच एक सुसंघटित व बलाढ्य जर्मनी उदयास आली. अगदी सुरूवातीला १८१५ च्या व्हिएन्ना काँग्रेसमध्येच स्टाईनसारख्या देशभक्ताने जर्मन राज्यांच्या एकीकरणाचा पाठपुरावा केला.

### १. एकीकरणापूर्वीची जर्मनी :-

युरोपात रोमन साम्राज्याला महत्त्वाचे स्थान होते. इटलीत उदयास आलेल्या या प्राचीन रोमन साम्राज्याचा संपूर्ण युरोपखंडावर प्रभाव होता. इ.स. ४७६ मध्ये रोमन साम्राज्याचा अस्त झाला. रोमन

साम्राज्याच्या विघटनानंतर युरोपात इंग्लंड फ्रान्ससारखी काही प्रभावशाली राष्ट्रे उदयास आली. पुढे ऑस्ट्रिया, प्रशियासारख्या काही राष्ट्रांनी या रोमन साम्राज्याचे पुनरूज्जीवन करण्याचा संकल्प केला. त्यातूनच पूर्व युरोपातील ३६० च्यावर लहान-मोठ्या राज्यांनी पवित्र रोमन साम्राज्याची (Hoy Roman Empire) स्थापना केली. यात प्रशियाचे 'जर्मन राज्य' मोठे होते. आज ज्याला जर्मनी म्हटले जाते, तो प्रदेश एकीकरणापूर्वी पाच राज्यांचा एक विस्कळीत संघ होता.

### २. नेपोलियन व जर्मनी :-

पवित्र रोमन साम्राज्यात ३६० राज्यांचा समावेश होता. १८०६ मध्ये नेपालियनने पवित्र रोमन साम्राज्याचा धुव्वा उडविला. ही ३०० राज्ये त्याने ३८ राज्यात संघटित केली. त्याला 'ऱ्हाईनचा राज्य संघ' असे नाव दिले. नेपोलियनच्या काळातच या संघात जर्मन राष्ट्रीयत्वाची भावना वाढू लागली. त्याचवेळी नेपोलियनने प्रशियावर जाचक अटींचा 'टिलासिहचा तह' लादला. त्यामुळे प्रशियाचा स्वाभिमान जागृत झाला. याच काळात कांट फिश्ते, हेगेल, हर्डर यांच्या लिखाणाने जर्मनीत राष्ट्रवादाच्या उदयाला चालना मिळाली. नेपोलियन ऱ्हाईन राज्य संघाचा संरक्षक बनला. त्याने या संघाचा राजा म्हणून राज्य प्रस्थापित केले. समान कायदा, समान न्याय, समान कर, समान प्रशासन पद्धती निर्माण केली. ही समानता राष्ट्रवादास कारणीभूत ठरली.

### ३. व्हिएन्ना कॉंग्रेस व जर्मनी (१८१५) :-

१८१५ साली नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपला पूर्वपदावर आणण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी व्हिएन्ना या ठिकाणी एक परिषद घेतली. ती कसली परिषद? ती तर स्वार्थी राष्ट्रांची लुटारू संघटनाच असल्यासारखी होती. जर्मन एक राष्ट्र होणे या राष्ट्रांना परवडण्यासारखे नव्हते. प्रतिगामी विचारांच्या मेटरनिकने जर्मनीचे विघटन करण्याचा प्रयत्न केला. त्याने १८०६ चा ऱ्हाईनचा संघ नष्ट करून '३८ राज्यांचा दुसरा जर्मन संघ' स्थापन केला. या संघाचे अध्यक्ष पद ऑस्ट्रियाकडे होते तर उपाध्यक्ष पद प्रशियाकडे होते. जर्मनी एकीकरणाची कल्पना ही लाजीरवाणी कल्पना आहे. (German Unity was as un famous object) असे मेटरनिकचे मत होते. या राज्यसंघाच्या कारभारासाठी जर्मन राज्याच्या सर्व सभासदांची एक सभा फ्रँकफूर्ट याठिकाणी भरावी असे ठरले. व्हिएन्ना कॉंग्रसने जर्मनीचे तुकडे केल्यामुळे जर्मनीतून मेटरनिकला विरोध होऊ लागला.

### ❑ जर्मनी एकीकरण व जेना विद्यापीठ :-

मेटरनिकच्या प्रतिगामी धोरणास प्रथम विरोध झाला, तो जर्मनीतील जेना विद्यापीठातील विद्यार्थ्यांकडून, त्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी जर्मनीच्या एकीकरणासाठी चळवळ सुरू केली. या विद्यार्थ्यांनी लिपझिकच्या

लढाईचा स्मृतीदिन साजरा केला. याचवेळी बर्टनबर्न विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी मार्टिन ल्यूथर यांची १८९ वी जयंती साजरी केली. याच ठिकाणी जर्मनीचे एकीकरण या विषयावर विद्वानांनी व्याख्याने आयोजित केली. तसेच या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या आवारात प्रतिगामी राजवटीची किंवा अनियंत्रित राजवटीची प्रतिके असलेली नेपोलियनची कायदे संहिता, लष्करी राजवटीची प्रतिके असणारे साहित्य इत्यादींची होळी केली. विद्यार्थी चळवळींनी केलेल्या जागृतीमुळे जेना विद्यापीठ राष्ट्रवादी व लोकशाही विचारांचे प्रमुख ठिकाण बनले.

## ❑ कार्लस्बाद डिक्रीज (१८१९) :-

जर्मनीतील विद्यार्थ्यांच्या हालचालीने मेटरनिक अस्वस्थ झाला. त्याने जर्मन राज्यावर दडपण आणले. त्याने प्रशियाच्या नेतृत्वाखाली जर्मन राज्यांची एक बैठक कार्लस्बादला घेतली. या ठिकाणी त्याने जे वटहुकूम काढले, त्यालाच कार्लस्बाद डिक्रीज (Carlsbad Decrees) असे म्हणतात. त्यानुसार प्राध्यापक जर्मन एकीकरणाचा प्रसार करणार नाहीत. विद्यापीठांच्या हालचालीवर नियंत्रण ठेवले जाईल. भाषण, मुद्रण, लेखन, स्वातंत्र्यावर बंदी घातली जाईल. वर्तमानपत्रांचे मजकूर छापण्यापूर्वी तपासले जातील. क्रांतिकारी विद्यार्थी व प्राध्यापक यांना बडतर्फ केले जाईल. ही कडक बंधने घालून जर्मनीच्या बौध्दिक जीवनावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात मेटरनिकला यश आले.

## ❑ जकात संघ :-

जर्मन एकीकरणात राष्ट्रवादी चळवळीप्रमाणेच आर्थिक घटक देखील महत्त्वाचा ठरला. मेटरनिकच्या दडपशाहीच्या धोरणामुळे जर्मन लोकांची सर्वच क्षेत्रात गळचेपी होत राहिली. जर्मन राज्यात ३८ छोट्या-छोट्या राज्यांचा समावेश होता. या प्रत्येकाची जकात व्यवस्था वेगवेगळी होती. या वेगवेगळ्या जकात पध्दतीमुळे व्यापारी तंग होत होते. त्यासाठी मारसेन या प्रशियातील मंत्र्याने पुढाकार घेऊन १८१८ ला एक जकात संघ तयार केला. या जकात संघामुळे इतरत्र विखुरलेला जर्मन प्रदेश या संघाच्या कक्षात आला. १८४२ पर्यंत जकात संघाची संख्या तीसवर गेली व त्या-त्या प्रदेशातील जकात संघ ऐक्याची ठिकाणे बनली. १८४२ नंतर प्रशियाच्या नेतृत्वाखाली या सर्व राज्यांचा एकत्र जकात संघ स्थापन करण्यात आला. प्रशियाने या आर्थिक एकीकरणाचा राजकीय एकीकरण साध्य करण्यासाठी कौशल्याने उपयोग केला. प्रांता-प्रांतात दळणवळणामुळे घनिष्ठ संबंध प्रस्थापित होत गेले. आर्थिक क्षेत्रात नेत्रदिपक ऐक्य प्रस्थापित झाले. पुढे जर्मनीची प्रशियाच्या नेतृत्वाखाली जी भरभराट झाली त्याचा पाया हे जकात संघ होते.

## ❑ १८३० च्या क्रांतीचा प्रभाव :-

१८३० च्या क्रांतीचे पडसाद जर्मनीत देखील उमटले. जर्मनीत जागृती होऊन तेथील जनतेने

आपल्यातील प्रतिगामी राजवटीविरुद्ध आंदोलनास सुरूवात केली. अनेक राज्यांनी आपल्याला स्वतंत्र राज्यघटनांची मागणी केली. जर्मनीतील हॅनोव्हर, नासाऊ, वॉन्साविक, सॅक्सनी, हेसीकेसल इत्यादी ठिकाणी राज्यघटना मान्य करण्यात आली. परंतु लगेचच मेटरनिकने या सर्व चळवळी दडपून टाकल्या. यामुळे जर्मनीतील राष्ट्रवादी चळवळीत काही काळ अडथळा निर्माण झाला.

### ❑ १८४८ च्या क्रांतीचे पडसाद :-

१८४८ च्या फ्रेंच क्रांतीची लाट जबरदस्त होती. या क्रांतीचे पडसाद ही जर्मनीत अतिशय वेगाने उमटले. राष्ट्रवादाच्या मार्गातील अडथळा दूर करण्याचा बराचसा प्रयत्न या क्रांतीतून निर्माण झालेल्या वादळाने केला. खुद्द ऑस्ट्रियात मेटरनिक साम्राज्याचा अंत झाला. मेटरनिकला पलायन करावे लागले. त्यामुळे जर्मन संघावरील ऑस्ट्रियाचे वर्चस्व संपुष्टात आले. जर्मनीतून खूप मोठ्या बंडाळ्या झाल्या. प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यम चौथा याला प्रशियाकरिता नवीन घटना मंजूर करावी लागली. एवढेच नव्हे तर त्याने जर्मनीच्या एकीकरणासाठी प्रयत्न करण्याचे कबूल केले.

### ❑ फ्रॅंकफुर्ट पार्लमेंट (१८४८) :-

प्रशियात वारंवार होणाऱ्या उठावामुळे प्रशियाचा राजा फ्रेड्रिक विल्यम चौथा याने जर्मन एकीकरणाचा विचार करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्याने मे १८४८ मध्ये जर्मन नॅशनल असेंब्लीची बैठक फ्रँकफुर्ट या ठिकाणी घेतली. म्हणून याला फ्रँकफुर्ट पार्लमेंट असे म्हणतात. या पार्लमेंटसमोर काही मूलभूत प्रश्न होते. जर्मनीकरिता राज्य घटना तयार करणे, जर्मनीचे एकीकरण कसे व कोणत्या पद्धतीने करायचे? जर्मन एकीकरणानंतर ऑस्ट्रियाचे भवितव्य काय? जर्मनीचे संघराज्य कसे असावे? इत्यादी विविध प्रश्नावर प्रदीर्घ चर्चा होऊन काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. संकल्पित संघराज्यात शासन प्रमुख म्हणून सम्राटाची तरतूद करण्यात आली. जर्मन संघराज्याचे सम्राटपद प्रशियाचा राजा फ्रेड्रिक विल्यम चौथा याला द्यायचे व त्याच्या नेतृत्वाखाली एकीकरण चळवळ पुढे चालवायची असे ठरले.

### ❑ फ्रेड्रिकचा सम्राट होण्यास नकार?

फ्रँकफुर्ट पार्लमेंटमध्ये ठरल्याप्रमाणे फ्रेड्रिक विल्यमला संकल्पित संघराज्याचे सम्राटपद दिले. पण त्याने असे सम्राटपद स्वीकारण्यास नकार दिला. कारण आपण सम्राटपद स्वीकारले. तर ऑस्ट्रियाचा आपल्यावर रोष राहिल. ही अनामिक भीती त्याला वाटत होती. तसेच नवीन व्यवस्थेत सम्राट पदावर जर्मन राष्ट्रीय सभेचे प्रभुत्व राहणार होते. त्यामुळे त्याच्या पदावर बऱ्याच मर्यादा पडणार होत्या. त्याचप्रमाणे विल्यम चौथा पारंपारिक विचारांचा होता. फ्रेड्रिक विल्यमच्या कचखाऊ धोरणामुळे फ्रॅंकफुर्ट पार्लमेंट अयशस्वी ठरली. पण त्यातूनच जर्मन एकीकरणातील अडथळे जर्मनीच्या लक्षात आले.

## ❑ एकीकरणातील अडथळे :-

१. ऑस्ट्रिया प्रबळ आहे तोपर्यंत जर्मनीचे एकीकरण अशक्य आहे.

२. प्रशियाच्या नेतृत्वाखाली एकीकरण करण्यासाठी प्रशियाला मजबूत करणे आवश्यक आहे.

३. सनदशीर मार्गाने एकीकरण अशक्य आहे.

४. एकीकरणासाठी लष्करी तयारी करणे व आंदोलनाचा मार्ग अवलंबणे गरजेचे आहे.

## ❑ विल्यम चौथ्याचा शेवट :-

विल्यम चौथा कचखाऊ व प्रतिगामी होता. त्यामुळे जर्मन एकीकरणात मोठा अडथळा निर्माण झाला होता. अशातच १८५७ मध्ये विल्यम चौथा वेडा झाला. त्यामुळे त्याचा भाऊ विल्यम पहिलाहा मुख्य कारभारी झाला. पुढे १८६१ मध्ये फ्रेड्रिक विल्यम चौथ्याचा मृत्यू झाला व विल्यम पहिला प्रशियाचा राजा झाला.

## ❑ विल्यम पहिला व बिस्मार्क :-

'ज्याला जर्मनीवर राज्य करायचे आहे त्याने ते जिंकूनच घेतले पाहिजे. हे साध्य करताना केवळ भाषणे उपयोगी पडणार नाहीत' असे म्हणणारा विल्यम पहिला व 'तलवारीचा खणखणाट आणि रक्त सांडण्याची तयारी असल्याशिवाय जगातील प्रश्न सुटत नाहीत' असे म्हणणारा बिस्मार्क यांच्या तारा बरोबर जुळल्या होत्या. १८६१ मध्ये वयाच्या ६४ व्या वर्षी विल्यम पहिला हा लष्कर प्रेमी राजा प्रशियाचा सम्राट झाला. हे दोघेही युद्ध धोरणाचे पुरस्कर्ते होते. प्रथम या दोघांनी प्रशियाला आर्थिक व लष्करीदृष्ट्या प्रबळ केले. प्रशियाच्या नेतृत्त्वाखाली जर्मनीचे एकीकरण हे त्यांचे ध्येय होते. आपल्या मुत्सद्देगिरीने, कुशल राजकीय डावपेचाने व आक्रमक लष्करी हालचालींनी त्यांनी जर्मनीचे एकीकरण घडवून आणले. या एकीकरणासाठी त्यांनी अनेक आक्रमक युद्ध केली.

## ❑ जर्मन एकीकरणातील महत्त्वाचे तीन टप्पे :-

## १. डेन्मार्कशी युद्ध (१८६४) :-

आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्याची पहिली संधी बिस्मार्कला डेन्मार्कच्या युद्धाने मिळाली. श्लेसविग व हॉलेस्टीन हे जर्मनीतील दोन प्रदेश होते. या प्रदेशात जर्मन लोक जास्त संख्येने होते. फ्रेड्रिक सातवा या ठिकाणी कार्य पहात होता. हे प्रदेश डेन्मार्कच्या राजाकडे होते. पण ते डेन्मार्कचा भाग कधीच नव्हते. तेथील लोकांना जर्मनीत विलीन व्हायची इच्छा होती. पण १८६३ मध्ये डेन्मार्कचा नवीन राजा ख्रिश्चन नववा याने हे दोन्ही प्रांत डेन्मार्कला जोडले. त्यामुळे बिस्मार्कने डेन्मार्कशी युद्ध पुकारले. ऑस्ट्रिया

प्रशियाचा शत्रू असताना बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी युती केली. ऑस्ट्रिया व प्रशियाने १८६४ मध्ये डेन्मार्कचा पराभव केला व ठरल्याप्रमाणे श्लेसविग स्वत:कडे ठेवले व हॉलेस्टीन ऑस्ट्रेलियाला दिले.

## २. ऑस्ट्रियाशी युद्‌ध (१८६६) :-

वास्तविक प्रशियाचा खरा शत्रू ऑस्ट्रिया होता. पण ऑस्ट्रियाशी युद्‌ध करणे म्हणजे केवळ लष्करी तयारी करून चालणार नव्हते. तर युरोपातील राष्ट्रांच्यात प्रशियाबद्दल सहानुभूती मिळवून ऑस्ट्रीयाला एकटे पाडणे बिस्मार्कला आवश्यक वाटत होते. म्हणूनच त्याने रशिया, फ्रान्स व इटलीचे सहकार्य मिळवून १६ जून १८६६ ला हॉलेस्टीन मधील ऑस्ट्रियाच्या गैरकारभारावरून ऑस्ट्रियाशी युद्‌ध पुकारले. केवळ सात आठवड्याच्या युद्‌धात त्याने सॅडोव्हा या ठिकाणी ऑस्ट्रियाचा धुव्वा उडविला. हे युद्‌ध ''सात आठवड्याचे युद्‌ध'' म्हणून प्रसिद्‌ध आहे.

- **प्रागचा तह :** २३ ऑगस्ट १८६६ सॅडोव्हाच्या युद्‌धानंतर ऑस्ट्रिया व प्रशिया यांच्या प्राग या ठिकाणी तह झाला. त्या तहानुसार-

१. १८१५ च्या व्हिएन्ना करारादृवारा ऑस्ट्रियाच्या नेतृत्वाखाली निर्माण केलेला जर्मन राज्यसंघ रद्‌द करावा.

२. श्लेसविग व हॉलोस्टीन हे दोन प्रदेश प्रशियाला मिळाले.

## ३. फ्रान्सशी युद्‌ध (१८७०) :-

ऑस्ट्रिया, प्रशिया युद्‌धामुळे व्हिएन्ना काँग्रेसने केलेला जर्मनसंघ संपुष्टात आला. श्लेसविंग, हॉलोस्टीन प्रदेश प्रशियाला मिळाले. त्याचबरोबर हॅनोव्हर, सॅक्सनी, नासाऊ व फ्रँकफुर्ट हे प्रदेश प्रशियात विलीन झाले. फक्त दक्षिण जर्मन राज्यातील आल्सेस व लॉरॅन्स हे प्रदेश प्रशियात विलीन व्हायचे राहिले होते. बिस्मार्कने याहीवेळी फ्रान्सला एकाकी पाडून फ्रेंच सैन्याची दाणादाण उडवून दिली. मेटझच्या किल्ल्यात फ्रेंच सैन्याने शरणागती पत्करली.

- **फ्रँकफुर्टचा तह :** १० मे १८७० फ्रान्स व प्रशियातील या तहानुसार-

१. फ्रान्सने प्रशियाला ३०० कोटी रुपये युद्‌ध खंडणी दिली.

२. फ्रान्सने आल्सेस व लॉरॅन्स हे दोन्ही प्रदेश प्रशियाला दिले.

## ❑ जर्मन साम्राज्याची स्थापना :-

फ्रान्स, प्रशिया युद्‌धानंतर जर्मनीचे एकीकरण पूर्णत्वास आले. १८ जानेवारी १८७१ ला प्रशियाचा राजा विल्यम पहिला जर्मन सम्राट झाला व बिस्मार्क नव्या जर्मनीचा पहिला प्रधानमंत्री झाला. बर्लिन ही

नव्या जर्मनीची राजधानी होती. अशाप्रकारे व्हिएन्ना कराराने मोडतोड केलेल्या जर्मन विभागांचे १८७१ ला एकत्रीकरण घडून आले.

## १.२.२ साम्राज्यवाद

एखाद्या बलवान राष्ट्राने दुर्बल राष्ट्रावर गाजवलेले वर्चस्व म्हणजे 'साम्राज्यवाद' होय. या साम्राज्यवादाचे आर्थिक, राजकीय, वैचारिक, सांस्कृतिक, धार्मिक असे अनेक प्रकार पडतात. 'साम्राज्य' ही संज्ञा प्राचीन काळापासून प्रचलित आहे. जगाच्या इतिहासात रोमन साम्राज्य अशोकाचे साम्राज्य, मुघलांचे साम्राज्य यांची नोंद आहे. परंतु अशी साम्राज्ये केवळ प्रादेशिक विस्तारापुरती मर्यादित होती आणि अशा साम्राज्यावरती तत्कालीन सम्राटांचे वा बादशहांचे वर्चस्व असे. साम्राज्यातील अशा प्रदेशांतून काही खास आर्थिक लाभ होत असेलच असे नाही. पंधराव्या शतकात नौकायान, जलप्रवास, दारूगोळा इत्यादी साधनांचा शोध लागल्यानंतर नवनव्या देशांचा शोध युरोपीय राष्ट्रांनी लावला व तेथे वसाहती स्थापन करून आर्थिक लाभ मिळवण्याच्या पाठीमागे ही राष्ट्रे लागली. आधुनिक साम्राज्यवादाची ही सुरवात होती. औद्योगिक क्रांतीने साम्राज्यवादाचा अर्थ आणि स्वरूप बदलून टाकले. १८७० च्या सुमारास युरोपातील इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, जर्मनी, हॉलंड या राष्ट्रांनी आशिया-आफ्रिका खंडात वसाहती मिळविण्यासाठी जोरदार स्पर्धा आरंभली व त्यातून छोटी-मोठी युद्धेदेखील उद्‌भवली.

### अ) साम्राज्यवादाचा अर्थ :-

''एका राष्ट्राचे दुसऱ्या राषट्रांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न म्हणजे साम्राज्यवाद होय.'' साम्राज्यवादाचे प्राचीन इतिहासातील काल्पनिक वा मांडलिकत्वाच्या स्वरूपातील वर्चस्व आणि आधुनिक काळातील राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व लष्करी वर्चस्व लक्षात घेता साम्राज्यवादाच्या संकल्पनेचा काहीचा अर्थबोध होतो. परंतु 'साम्राज्यवाद' या संज्ञेची व्याख्या करणे कठीण होते. साम्राज्यवादाचा अर्थ स्पष्ट करताना वेगवेगळ्या मुद्द्यांवर भर देऊन विविध व्याख्या केल्या आहेत. त्यापैकी शूमण आणि मॉर्गेन्थो यांच्या साम्राज्यवादाच्या व्याख्या बऱ्याच अंशी सर्वसमावेशक व अर्थवादी आहेत. शूमन यांच्या मते, ''परक्या देशातील प्रजेवर बलप्रयोग व हिंसक मार्गाने लादलेली सत्ता म्हणजे साम्राज्यवाद होय. तसेच मॉर्गेन्थो यांनी साम्राज्यवादाची केलेली व्याख्या अशी आहे की, आपल्या राज्याच्या समीपलीकडे केलेला आपला सत्ताविस्तार म्हणजे साम्राज्यविस्तार.''

वरील विचारवंताच्या व्याख्यावरून साम्राज्यवादाचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होते.

### ब) साम्राज्यवादाची कारणे :-

अठराव्या शतकामध्ये औद्योगिक क्रांतीने जसा भांडवलशाहीला जन्म दिला, त्या भांडवलशाहीच्या

विस्तारातून साम्राज्यवादाची वाढ झाली. या साम्राज्यवादाच्या वाढीस अनेक घटक कारणीभूत आहेत. त्यातील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे :-

### १. भौगोलिक शोध :-

पोर्तुगाल, स्पेन इत्यादी देशांनी नव्या भूभागाचा शोध लावल्यामुळे युरोपियन राष्ट्रांना अमेरिका, आशिया व आफ्रिका खंडामध्ये वसाहती स्थापन करण्यास प्रेरणा मिळाली. यातूनच साम्राज्यवादाचा उदय झाला.

### २. आर्थिक लाभ :-

आशिया, आफ्रिका आणि अमेरिका नैसर्गिक साधनसंपत्तीने संपन्न असल्याने स्पेन, फ्रान्स, इंग्लंड, पोर्तुगाल इत्यादी राष्ट्रांनी आर्थिक लाभ मिळवण्यासाठी अनेक वसाहती जिंकून घेतल्या.

### ३. औद्योगिक क्रांती :-

या क्रांतीने प्रादेशिक वसाहती मिळवणे ही उद्योगप्रधान देशांची एक गरज होवून बसली. क्रांतीमुळे उत्पादन वाढले. वसाहती जिंकून घेतल्यामुळे अशा वाढीव उत्पादनासाठी हक्काची बाजारपेठ मिळणे शक्य झाले. त्याचप्रमाणे उद्योगप्रधान देशांतील कारखान्यांना आपले उत्पादन वाढवण्यासाठी लागणारा कच्चा माल स्थानिकदृष्ट्या अपुरा पडत होता, म्हणून कच्च्या मालाच्या पुरेशा पुरवठ्यासाठी वसाहती आपल्या ताब्यात असणे अत्यंत फायदेशीर ठरत होते.

### ४. राज्यकर्त्यांची महत्त्वाकांक्षा :-

युरोपातील राज्यकर्त्यांनी प्रतिष्ठेपायी अनेक युद्धे केली. वसाहतवादाचा पाठपुरावा करणाऱ्या कंपन्या, व्यापारी यांना या राज्यकर्त्यांनी कमालीचे प्रोत्साहन दिले. इंग्लंडमधील ह्यूडर घराण्यातील राजे, फ्रान्समधील बुरबॉन घराण्यातील राजे, कैसर विल्यम पहिला, राजा किओ पोल्ड, बिस्मार्क, ज्युलिसफेरी, नेपोलियन, डिझारायली, थिओडर रूझवेल्ट इत्यादी शासनकर्त्यांनी साम्राज्यवादास प्रोत्साहन दिले.

### ५. साम्राज्यवादी विचारसरणी :-

अनेक विचारवंत, लेखकांनी, राज्यकर्त्यांनी साम्राज्यवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. डार्विनने "might is right" हा सिध्दांत मांडून बलवानांना दुर्बलांवर राज्य करण्याचा अधिकार आहे, असे सांगितले. बिस्मार्कने Blood and Iron Policy चा स्वीकार करून युद्ध हे पुरुषार्थाचे लक्षण आहे असे सांगितले, अशा प्रकारे साम्राज्यवादाला वैचारीक पार्श्वभूमि मिळाल्यामुळे त्यात कमालीची वाढ झाली.

## ६. अतिरिक्त भांडवलाची सोय :–

भांडवलवादी अर्थव्यवस्थेत नफा हेच उद्दिष्ट असल्याने उद्योगातून मिळणारा प्रचंड नफा हीच एक भांडवलदाराची समस्या होऊन बसली होती. नफ्याच्या स्वरूपात मिळालेले अतिरिक्त भांडवल गुंतवण्यासाठी वसाहती हा उत्तम उपाय होता.

## ७. लोकसंख्या वाढ :–

वैद्यकशास्त्रातील अनेक सुधारणांमुळे युरोपीय लोकांचे आयुर्मान वाढले व लोकसंख्येत वाढ झाली. या वाढीव लोकसंख्येसाठी वसाहती ताब्यात असणे महत्त्वाचे ठरले.

## ८. धर्मप्रसार :–

ख्रिश्चन मिशनऱ्यांना आपल्या धर्मप्रसारासाठी नव्या वसाहतीची गरज होती. युरोपीय साम्राज्यवाद्यांनी आपल्याबरोबर ख्रिश्चन मिशनरी वसाहतीत गेले होते. त्याठिकाणी ख्रिश्चन धर्मप्रसार वसाहतीवर सत्ता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. शिक्षण व आरोग्याला सुविधा उपलब्ध करून व कधी नोकऱ्या देवून या मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्माचा जगभर प्रसार केला.

## ९. दळणवळण व संपर्क यंत्रणेत सुधारणा :–

रेल्वे, तारायंत्रे इत्यादी दळणवळणाच्या सुधारणा व सोयी औद्योगिक उत्पादनाच्या वाहतुकीसाठी आवश्यक होत्या. त्यामुळे मालाची मागणी व पुरवठा वेळेवर करणे शक्य होणार होते. साहजिकच याचा फायदा साम्राज्यवाद वाढीस झाला.

## १०. आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा :–

वसाहती जिंकून घेण्यात युरोपीय राष्ट्रांना राजकीय व आर्थिक लाभ झाले होतेच, त्याशिवाय वसाहतीवर ताबा असणे ही आंतरराष्ट्रीय जगतात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी उपयोगी पडणारी घटना ठरली होती. इंग्लंडच्या वसाहती जगाच्या सर्व भागांवर पसरलेल्या होत्या. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंड हे प्रतिष्ठाप्राप्त बडे राष्ट्र झाले होते.

## ११. आफ्रिका व आशियातील जनतेमध्ये स्वत्व जाणिवेचा अभाव :–

या खंडातील मागासलेल्या देशातील लोकांना आपल्या अवस्थेची जाणीव नव्हती. अज्ञान व दारिद्र्य हे त्यांचे मोठे शत्रू होते. त्यांच्याशी झगडण्यात त्यांची सर्व शक्ती खर्च होत होती. आपण कोणाच्या ना कोणाच्या गुलामगिरीतच राहिले पाहिजे, अशी त्यांची ठाम धारणा होती. त्यामुळे शेकडो वर्षे ही जनता मुकाटपणे वसाहतवाद्यांचे जुलूम अन्याय सहन करत होती.

## क) साम्राज्यवादी राष्ट्रे :-

पंधराव्या शतकापासून पोर्तुगालसारख्या साहसी राष्ट्रांनी जगभर वसाहती स्थापन केल्या, परंतु या वसाहती औद्योगिक क्रांती भरात येईपयंत त्यांना टिकवता आल्या नाहीत. या काळात प्रामुख्याने अतिरिक्त लोकसंख्येची सोय करण्यासाठी वसाहती स्थापन झाल्या. तेथे वास्तव्य करणारे युरोपीय वंशीयच होते. वांशिक साम्य असल्यामुळे युरोपीयन लोकांनी अशा वसाहतीचा झपाट्याने विकास केला. त्यामुळेच या वसाहतीमध्ये स्वातंत्र्य चळवळीचा प्रारंभ झाला, त्यातूनच युरोपीयनांना काही वसाहती सोडून द्याव्या लागल्या. साधारणपणे १७८० ते १८८० या शंभर वर्षाच्या काळात युरोपीयन साम्राज्यवादाला उतरती कळा लागली यास इंग्लंडचा अपवाद होता. या काळातच इंग्लंडच्या वसाहतीचा अफाट विस्तार झाला.

१८८० नंतर पुन्हा एकदा साम्राज्यवादास चालना मिळाली. त्यातून नवी साम्राज्यस्पर्धा सुरू झाली. १८८० ते १९१० या ३० वर्षाच्या काळात मोठी युरोपीय राष्ट्रे व अतिपूर्वेकडील आधुनिक जपान यांनी अविकसित जगाची आपसात वाटणी करून घेतली. साम्राज्ये मिळवण्यासाठी त्याचे समर्थन करणारी विचारसरणीही प्रस्तुत होऊ लागली. साम्राज्यविस्तार व व्यापार वाढवला नाहीतर इंग्लंडला नष्ट व्हावे लागले असा धोक्याचा इशारा जॉन रस्किन सारख्या विचारवंतांने इंग्लंडच्या राज्यकर्त्यांना दिला, इतर राष्ट्रांची सत्तास्पर्धा पाहून फ्रान्सनेही वसाहती मिळवल्या पाहिजेत. अन्यथा युरोपाचे नेतृत्व फ्रान्सकडून हिरावून घेतले जाईल व फ्रान्सला दुय्यम स्थान प्राप्त होईल. या भितीने फ्रान्सने वसाहती वाढवण्यास सुरवात केली. स्पेन, पोर्तुगाल, बेल्जियम, हॉलंड ही राष्ट्रेही या स्पर्धेत उतरली. त्यामुळे १८८० नंतर ही साम्राज्य स्पर्धा अत्यंत तीव्र झाली. त्याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे :-

### १. इंग्लंडचा साम्राज्यविस्तार :-

१६०० साली ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करून व्यापाराच्या आमिषाने इंग्लंडने साम्राज्यवादाची सुरवात केली. यापूर्वी पोर्तुगालने हिंदुस्थानचा शोध लावून त्या ठिकाणी आपल्या वसाहती सुरू केलेल्या होत्या. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत इंग्लंडने मुघल राजवटीच्या काळात सुरत येथे पहिली व्यापारी वखार सुरू केली व हिंदुस्थानातील छोट्या-मोठ्या राजवटीचा दुबळेपणा, मागासलेपणा पाहून सुमारे तीन शतकांच्या अवधीत आपल्या राजकीय कौशल्याच्या व मुत्सद्देगिरीच्या जोरावर इंग्लंडने एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हिंदुस्थानवर आपले अधिराज्य स्थापन केले. युरोपीय साम्राज्यवादी राष्ट्रे आफ्रिकेत उतरली होती. त्यांच्याबरोबर इंग्लंडही आफ्रिका खंडात वसाहती मिळवण्यासाठी स्पर्धेत राहिले. दक्षिण आफ्रिकेत इंग्लंडने प्रथम पाऊल ठेवले, परंतु डच राज्यकर्त्यांशी झालेल्या शेअर युद्धात इंग्लंडने वर्चस्व मिळवून बोअर लोकांना अंतर्गत स्वातंत्र्य देवून आपले स्वामित्व प्रस्थापित केले. दक्षिण आफ्रिकेतील ट्रान्सवाल, ऑरेंज फ्री व नायजेरिया हे प्रदेशही इंग्लंडने आपल्या ताब्यात घेतले आणि १९०१ मध्ये आफ्रिकेच्या दक्षिण भागातील इंग्लंडच्या स्वामीत्वाखाली असलेल्या सर्व प्रदेशांचे ''युनियन ऑफ साऊथ

आफ्रिका'' हे राज्य तयार केले. अतिपूर्वेकडे इंग्लंडने हाँगकाँगचा अपवाद वगळता, वसाहती मिळवण्यासाठी फारसा रस घेतला नव्हता. मध्य अमेरिकेत वेस्ट इंडिज बेटे इंग्लंडने आपल्याकडे ठेवली होती. अर्थात अमेरिका व कॅनडा या एकेकाळी ब्रिटीश वसाहती असल्या तरी त्या वसाहती अमेरिकेतील नवी राष्ट्रे म्हणून उदयाला आल्या होत्या. इतकेच नव्हे तर अमेरिकेचे अध्यक्ष यांनी 'मन्शे सिद्धांत' जाहीर करून युरोपीय राष्ट्रांना अमेरिका खंडात प्रवेश करण्यास मज्जाव करून टाकला त्यामुळे युरोपीय राष्ट्रे दक्षिण अमेरिकेत वसाहती मिळवण्यापासून दूर राहिली. अशा प्रकारचा इंग्लंडने साम्राज्यविस्तार केलेला दिसून येतो.

## २. जर्मनीचा साम्राज्यविस्तार :-

बिस्मार्कच्या नेतृत्वाखाली १८७१ साली जर्मनीचे एकीकरण घडून आल्यानंतर, जर्मनीची परराष्ट्र धोरण जर्मनीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या दिशेने आखले गेले होते. बिस्मार्कच्या माध्यमातून युरोपात जर्मनीने दबदबा निर्माण केला. याच जर्मनीलाही आपल्या वसाहती असाव्यात असे वाटू लागले. आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा व कच्चा मालाची बाजारपेठ प्राप्त करणे ही दोन कारणे वसाहती मिळवण्यापाठीमागे होती. आफ्रिका बळकावण्याच्या स्पर्धेत जर्मनी उतरला. जर्मनीने १८८४ पर्यंत टोगोलँड, कॅमेसन, जर्मन, नैऋत्य आफ्रिका या विशाल प्रदेशांवर आपल्या वसाहती स्थापन केल्या. याशिवाय इंग्लंड, फ्रान्स यांच्याशी करार करून हेनिगोलॅड, जर्मन ईस्ट आफ्रिका असे प्रदेश जर्मनीने आपल्या वर्चस्वाखाली आणले. अतिपूर्वेत चीनच्या दुबळेपणाचा फायदा घेवून चीनमध्ये जर्मन व्यापाऱ्यांनीही आपले बस्तान बसवले. अशा प्रकारे इंग्लंड पाठोपाठ जर्मनीनेही आपला साम्राज्यविस्तार केलेला दिसतो.

## ३. फ्रान्सचा साम्राज्यविस्तार :-

पोर्तुगाल, इंग्लंड पाठोपाठ फ्रान्सने नेपोलियनच्या काळात साम्राज्यविस्ताराची आकांक्षा ठेवून वसाहती मिळवण्यासाठी धडपड सुरू केली होती. त्याच्या धडपडीमुळे हिंदुस्थानात व आग्नेय आशियातील काही भागांत व्यापारी ठाणी सुरू करून छोट्याशा वसाहती मिळवल्या होत्या. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर फ्रान्सलाही कच्चा माल व पक्क्या मालासाठी बाजारपेठ म्हणून वसाहती मिळवणे आवश्यक वाटले. त्यासाठी आफ्रिका हे नजीकचे खंड त्यास अत्यंत सोयीस्कर होते. लिव्हिंगस्टन व स्टॅन्ले या संशोधकांनी आफ्रिकेच्या कानाकोपरा धुंडाळून आफ्रिका खंडाची भरपूर माहिती आपल्या 'Through the Dark conitinent, in the Darkest Africa, How found Livingstone' या ग्रंथातून आणि 'न्यूयॉर्क हेरल्ड' व 'लंडन डेली टेलिग्राफ' या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली होती.

आफ्रिकेतील खनिज संपत्तीने समृद्ध असलेले व सुपीक भूभाग असलेले उत्तोमत्तम प्रदेश बळकावण्याची जोरदार स्पर्धा युरोपीयन साम्राज्यवादी राष्ट्रात सुरू झाली. फ्रान्सने त्यामध्ये शिरकाव करून आपला 'ब्रान्झा' या संशोधकांने मिळवलेल्या माहित्याच्या आधारावर कांगो नदीच्या उगमापासून कांगा खोरे व्यापण्यास सुरवात केली. याचवेळी युरोपामधील बेल्जियम या राष्ट्राच्या दुसरा लिओपोल्ड या राजाने स्टॅन्ले या

संशोधकाच्या मार्गदर्शनाखाली कांगो खोऱ्यात प्रवेश केला होता. कांगो नदीच्या मुखाकडून बेल्जियम व उगमाकडून फ्रान्स कांगो खोरे व्यापू लागले. दोन्ही राष्ट्रात संघर्षाची परिस्थिती उद्‌भवली. परंतु अखेरीस समझोता होऊन उत्तर पश्चिम कांगो खोरे फ्रान्सला मिळाले. तो प्रदेश 'फ्रेंच कांगो' या नावाने ओळखला जाऊ लागला व 'बेल्जियम कांगो' म्हणून ओळखला जाणारा कांगो खोऱ्याचा उर्वरित प्रदेश बेल्जियमला मिळाला. त्याचप्रमाणे पश्चिम किनारपट्टीवरील सेनेगल, गॅबन हे प्रदेश आयव्हरी कोस्ट, ट्युनिशिया, दोहाम, अल्जिरिया हे प्रदेशही फ्रान्सने मिळवले. भूविस्ताराचा विचार करता फ्रान्सने सर्वात जास्त वसाहती या काळात मिळवल्या होत्या.

## ४. जपानचा साम्राज्यविस्तार :-

जपानने आधुनिकीकरणानंतर विस्तारवादी धोरणाचा स्वीकार केला. आशियातील बडी सत्ता म्हणून जपानला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळवायची होती. चीनची दुबळी सत्ता, जपानची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी पूरकच ठरली. याशिवाय जपानला आपल्या साम्राज्यविस्तारासाठी अन्य काही कारणे होती, त्यात जपानची आधुनिकीकरणानंतर वाढलेली लोकसंख्या आणि जपानी उद्योगधंद्यांचे आधुनिकीकरण महत्त्वाची कारणे होती. जपानची लोकसंख्या अफाट वेगाने वाढून १८७२ साली असलेली ३ कोटी ५० लाख लोकसंख्या १९९४ मध्ये ४ कोटी १० लाख झाली. या वाढल्या लोकसंख्येला अन्नधान्य, जागा आणि काम देण्याची समस्या जपानला भेडसावू लागली होती. आपल्या प्रभावाचा उपयोग करून साम्राज्यविस्तार करणे एवढाच यावर उपाय होता. याच कालखंडात युरोपीय राष्ट्रांनी अशाच प्रकारच्या समस्यांवर उपाय म्हणून साम्राज्यविस्ताराचे धोरण अवलंबले.

साम्राज्य विस्तारासाठी जपानचे पहिले लक्ष चीन होते. चिनी राजवट प्रचंड विस्तार असलेल्या भूभागावर असली तरी चिनी सम्राट या प्रंचड विस्तारावर पूर्ण अधिराज्य गाजविण्यास असमर्थ होता. चीनचा भाग असलेल्या कोरिया जपानने आपल्या ताब्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यातूनच १८९४-९५ मध्ये चीन-जपान युद्‌ध झाले. त्यात चीनचा पराभव होवून १८९५ मध्ये शिमानोसेकीचा तह झाला. या तहान्वये कोरियावर जपानचे प्रभुत्व संपादित झाले व पोर्ट ऑर्थर व लिओतुंग ही बंदरे सर्वस्वी जपानच्या ताब्यात आली. त्यामुळे जपानची प्रतिष्ठा वाढली. जपानचे पॅसिफिक क्षेत्रातील वर्चस्व वाढले. १९०२ साली ॲग्लो-जपान तह घडून आला त्यामुळे जपानला युरोपातील बढ्या सत्तेचा पाठिंबा मिळाला व इंग्लंडला, रशियाचे पॅसिफिक क्षेत्रातील वर्चस्व रोखणारा मित्र मिळाला. यावेळी रशिया-जपान यांच्यात (१९०४-०५) युद्‌ध झाले व रशियाचा पराभव झाला. बलाढ्य असणाऱ्या रशियाला हा पराभव जिव्हारी लागला. युद्‌धानंतर झालेल्या 'पोर्टस्मथच्या' तहाने रशियाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा धुळीस मिळाली. यानंतरही जपानने आपले विस्तारवादी धोरण सातत्याने चालू ठेवले.

अशा रितीने औद्योगिक क्रांतीनंतर एकोणिसाव्या शतकात उदयाला पावलेली भांडवलशाही विचारसरणी

या विचारसरणीचा नैसर्गिक परिणाम म्हणून साम्राज्यवादाचा जन्म झाला आणि इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व जपान इत्यादी साम्राज्यविस्ताराची धोरण राबविणारी बडी राष्ट्रे हा एकोणिसाव्या शतकाने नव्या जगाला दिलेला वारसाच होता.

### ड) साम्राज्यवादाचे परिणाम :-

आशिया-आफ्रिका खंडावर साम्राज्यवादाचे दूरगामी परिणाम झालेले दिसून येतात. काही मुलभूत बदल घडले तर काही बदल होण्यास अनुकूल स्थिती निर्माण झाली. आशिया-आफ्रिका खंडाला साम्राज्यवाद घातक ठरला असला तरी काही प्रागतिक गोष्टीचे ज्ञानही तेथील लोकांना झाले. युरोपीयन राष्ट्राच्या साम्राज्यवादाचे दूरगामी परिणाम जगावर झाले.

**साम्राज्यवादाचे परिणाम**

| **वाईट परिणाम** | **चांगले परिणाम** |
|---|---|
| १) आर्थिक शोषण | १) आधुनिकतेला सुरुवात |
| २) देशी उद्योग नष्ट झाले | २) उदारमतवादाचा प्रसार |
| ३) वसाहतीतील लोकांचे राहणीमान खालावले | ३) शिक्षणप्रसार |
| ४) धर्मांतराची सक्ती | ४) राष्ट्रभावनेचा उदय |
| ५) पाश्चमात्य संस्कृतीचा प्रभाव | ५) स्वयंशासन संकल्पनेचा उदय |
| ६) फोडा-झोडा नीतीचा अवलंब | ६) भांडवलदार, मध्यम वर्ग व कामगार वर्गाचा वसाहतीमध्ये उदय |
| ७) वसाहतीतील लोकांना अमानुष वागणूक | |
| ८) वसाहतीमधील स्वराज्ये बुडाली. | |
| ९) साम्राज्यवादी राष्ट्रामधील संघर्ष. | |

## १.२.३ तह-करार पद्धती

### १ त्रिराष्ट्र मैत्री करार (System of Alliances)

❑ **प्रस्तावना :-**

१८७१ मध्ये जर्मनीचे एकीकरण बिस्मार्कने घडवून आणले हे एकीकरण करत असताना जर्मनी-डेन्मार्क, जर्मनी-ऑस्ट्रिया आणि जर्मनी-फ्रान्स युध्दे करूनच जर्मनीचे एकीकरण पूर्णत्वाला नेले होते.

जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कचे योगदान मोठे होते. १८७० मध्ये फ्रेंच सम्राट लुई नेपोलियनचा पराभव करून जर्मनीचे एकीकरण पूर्णत्वास गेले होते. बिस्मार्कने पॅरीसच्या राजवाड्यात जर्मनीचा सम्राट कैसर विल्यम पहिल्याची घोषणा केली होती. तसेच आल्सेस व लॉरेन्स हे प्रदेश तेथील जनतेच्याविरुध्द जर्मनीला देणे भाग पडले व फ्रान्सवर पाच हजार दशलक्ष फ्रँक इतकी प्रचंड युद्धखंडणी लादली. फ्रान्सला अपमानकारक तह स्विकारावयाला लावला. त्यामुळे फ्रान्सची मानहानी झाली. आल्सेस व लॉरेन्स हे प्रदेश तेथील जनतेच्याविरुध्द जर्मनीला देणे भाग पडले व फ्रान्सवर पाच हजार दशलक्ष फ्रँक इतकी प्रचंड युद्धखंडणी लादली. फ्रान्सला अपमानकारक तह स्विकारावयाला लावला. त्यामुळे फ्रान्सची मानहानी झाली. आल्सेस व लॉरेन्स प्रदेश जर्मनीने घेतल्याने फ्रान्स दुखावला गेला. तेव्हा फ्रान्स स्वस्थ बसणार नाही. आल्सेस-लॉरेन्स हे दोन प्रदेश घेतल्याशिवाय फ्रान्सला चैन पडणार नाही. याची पूर्णपणे बिस्मार्कला जाणीव होती. फ्रान्सचा भावी काळात जर्मनीला धोका आहे हे लक्षात घेऊन बिस्मार्कने युरोपच्या राजकारणात फ्रान्सला एकाकी पाडणे, फ्रान्सला युरोपातील कोणताही प्रबळ असा मित्र राष्ट्र मिळता कामा नये याची दक्षता बिस्मार्कने घेतली. तेच त्याचे परकीय परराष्ट्रीय धोरण बनविले. आंतरराष्ट्रीय राजकारणात युरोपचे नेतृत्व जर्मनीकडे घेऊन ''राजकीय बुद्धीबळातील राजा-वजिरासकट सर्व काही स्वत:च्या मर्जीप्रमाणे १८७१ ते १८९० या कालावधीत पुढे-मागे सरकवली.''

बिस्मार्कने इंग्लंड-फ्रान्स या राष्ट्रातील अनेक वर्षांपासून शत्रूत्व होते असे असले तरी इंग्लंड हा प्रबळ मित्र फ्रान्सला मिळणार नाही. याची दक्षता बिस्मार्कने घेवून इंग्लंडला न दुखविण्याचे धोरण स्विकारले. नवीन वसाहतीची व आरमार वाढीची जर्मनीला आवश्यकता नाही असे जाहीर करून इंग्लंडचा विश्वास संपादन केला. इंग्लंडची सागरी सत्तांचे प्रभुत्व मान्य केले. इंग्लंडशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले. इंग्लंडला फ्रान्सपासून अलिप्त राखण्यात बिस्मार्कला यश मिळाले. गमावलेले आल्सेस-लॉरेन्स हे प्रदेश परत मिळविणेसाठी फ्रान्स सर्वतोपरी प्रयत्न करणार, बिस्मार्क हे जाणून होता. आर्थिक, लष्करी बाबतीत जर्मनीचे सामर्थ्य फ्रान्सपेक्षा मोठे होते. तेव्हा फ्रान्स एकाकी जर्मनीविरुध्द आव्हान देणार नाही, त्यातूनही फ्रान्सने आक्रमण केले तरी फ्रान्सला जर्मनी निश्चितच पराभूत करेल याची बिस्मार्कला खात्री होती. परंतु फ्रान्सला एखादा मित्र मिळाला तर मात्र जर्मनीला फ्रान्स निश्चितच धक्का देणार हे बिस्मार्क जाणून होता म्हणून बिस्मार्कने अत्यंत मुत्सद्दीपणाने व कुटनीतीचा, धूर्तपणाचा आपल्या परराष्ट्रीय धोरणात दोन प्रमुख सुत्रे बनविली.

१. युरोपातील राजकारणात फ्रान्सला एकटे पाडणे.
२. फ्रान्सशिवाय इतर राष्ट्रांशी तह करार करून आंतरराष्ट्रीय परिस्थिती 'जैसे-थे' ठेवणे हे परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र बनविले.

## अ) बिस्मार्कची केलेल्या आंतरराष्ट्रीय तह-करार पद्धतीची पार्श्वभूमी :-

बिस्मार्कने प्रशियाचा चान्सलर म्हणून सुत्रे हाती घेतल्यावर त्याने प्रथम जर्मनी (प्रशिया) रशियाचे

मित्रत्वाचे संबंध निर्माण करण्यासाठी १८६३ च्या पोलीश स्वातंत्र्याच्या उठावात रशियाला लष्करी मदत देऊ केली होती. या उपकाराची परतफेड ऑस्ट्रिया-प्रशिया युद्धात केली होती. १८७०-७१ च्या प्रशिया-फ्रान्स युद्धात रशियास १८५६ च्या पॅरीस तहाचा भंग करण्यास उत्तेजन देवून काळ्या समुद्रात आरमार उभारण्यास रशियाला अप्रत्यक्षपणे उत्तेजन दिले. रशिया-जर्मनी संबंध घनिष्ठ मैत्रीचे बनविले. १८६६ च्या ऑस्ट्रिया-प्रशिया युद्धात जर्मनीच्या एकीकरणातील ऑस्ट्रियाचा अडथळा मोठ्या चातुर्याने बाजूला सारला. ऑस्ट्रियाला पराभूत करून सहानभूतीपूर्वक सौम्य अटी ऑस्ट्रियावर लादल्या. परिणामी प्रागच्या तहाने ऑस्ट्रियाची सहानुभूती मिळविली. ऑस्ट्रियाला अत्यंत उदार वागणूक दिली. त्यामुळे ऑस्ट्रियाशी मैत्रीचे संबंध निर्माण होऊ शकेल. यातच बाल्कन प्रदेशातील ऑस्ट्रियाच्या महत्वाकांक्षेस बिस्मार्कने पाठिंबा दिला. त्यामुळे जर्मनी-ऑस्ट्रिया यांच्यात अत्यंत जवळीक निर्माण केली. रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करताना बिस्मार्कला तारेवरची करसरत करावी लागली. कारण बाल्कन प्रदेशातील रशिया-ऑस्ट्रियाचे हितसंबंध हे परस्पर विरोधातील होते. या दोन्ही राष्ट्रात उघड असा संघर्ष निर्माण होणार नाही. याची दक्षता घेऊन हा प्रश्न अत्यंत नाजूकपणे हाताळला, कौशल्यपूर्णपणे युद्धप्रसंग टाळला.

इटलीला व्हेनेशिया व रोमची प्राप्ती केवळ बिस्मार्कच्या मुत्सद्दीपणाने मिळाली होती तेव्हा इटली जर्मनीशी कृतज्ञच होती. फ्रान्स-इटली यांच्यातील धार्मिक वैमनस्याचा फायदा घेऊन इटलीला आपल्या गटात सामील करून घेतले. १८७० ते १८९० या वीस वर्षाच्या काळात इंग्लंडने परराष्ट्रीय धोरण हे युरोपच्या सत्तास्पर्धेपासून अलिप्त राहण्याचे होते. ही इंग्लंडची प्रभावी अलिप्तता बिस्मार्कच्या पथ्यावर पडली. बिस्मार्कचे आंतरराष्ट्रीय महत्व वाढले. अशा पद्धतीने इंग्लंडच्या हितसंबंधांना बाधा न आणता ऑस्ट्रिया, रशिया, इटली या बड्या राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध निर्माण करून वेगवेगळे गुप्त करार करून जर्मनीच्या दावणीला बांधले आणि फ्रान्सला एकाकी पाडण्यात बिस्मार्कला यश मिळाले.

### ब) फ्रान्सचे एकटेपण :-

बिस्मार्कने फ्रान्समधील प्रजासत्ताकास विरोध केला नव्हता. कारण हे प्रजासत्ताक दुबळे बनले होते. अशा परिस्थितीत जर्मनीशी फ्रान्सला युद्ध करणे शक्य नव्हते. याशिवाय ऑस्ट्रिया-रशिया यांचा फ्रान्सच्या प्रजासत्ताकास विरोध होता. तेव्हा फ्रान्स-ऑस्ट्रिया, फ्रान्स-रशिया हे एकत्र येणे शक्य नव्हते. यातच बिस्मार्कने अत्यंत चाणाक्षपणे इजिप्त, सुदान येथील वसाहतविषयक स्पर्धेत हेतुपुरस्सर खतपाणी घालून इंग्लंड-फ्रान्स यांच्यातील संबंध कसे दुरावतील हे पाहिले. ट्युनिशियाबाबत इटलीशी फ्रान्सचा संघर्ष सुरूच होता. या सर्व बाबी फ्रान्सचे एकीकीपण निर्माण होण्यास कारणीभूत ठरल्या आणि बिस्मार्कने फ्रान्सला एकाकी पाडण्याच्या धोरणाची पूर्तता करण्यासाठी आपली तह-करार पद्धती निर्माण केली.

### क) तीन सम्राटांचा संघ-१८७२ (Three Emperors League) :-

ऑस्ट्रिया-हंगेरी आणि रशिया या दोन बलाढ्य सत्तांशी बिस्मार्कने अत्यंत जाणीवपूर्वक मैत्रीपूर्ण संबंध

निर्माण केले. १८७१ मध्ये बिस्मार्कने ऑस्ट्रियाला सम्राट फ्रान्सिस जोसेफ व जर्मनीचा सम्राट कैसर विल्यम पहिला यांची भेट घडवून आणली. १८७२ मध्ये रशियाचा झार अलेक्झांडर दुसरा यांचीही बर्लिन येथे भेट घडवून आणली. भेटीत चर्चा व विचारविनिमयानंतर संघ निर्माण होऊन तिन्ही राष्ट्रांच्या संबंधांना पोषक ठरतील असे ठराव व राजनीती निश्चित केली. हा संघ तीन सम्राटांचा राजेशाहीवर विश्वास असल्याकारणाने निर्माण झाला. १८७१ मधील युरोपची स्थिती जैसे थे ठेवावी व पूर्वीय प्रश्नाबाबत तिन्ही राष्ट्रांना मान्य होईल असा तोडगा काढावा. युद्धात धोका निर्माण झाल्यास तिन्ही राष्ट्रांनी परस्पर विचार विनिमय करून समान धोरण आखावे. या संघामुळे आल्सेस-लॉरेन्स प्रदेशाबाबत फ्रान्सने जर आक्रमण केले तर ऑस्ट्रिया-रशियाचा जर्मनीला पाठिंबा मिळाला. लोकशाही व समाजवाद याविरुध्द अनियंत्रित राजसत्ताक पद्धतीच्या तीन राष्ट्रांचे ऐक्य या कराराने साध्य झाले. फ्रान्सचे युरोपातील राजनैतिक एकीकीपण निश्चित झाले मात्र हा संघ फार काळ टिकू शकला नाही.

## ड) राईशस्टॅट करार-१८७३ (Reichstat Agreement) :-

बाल्कन प्रश्नावर रशिया-ऑस्ट्रिया युद्ध झाल्यास जर्मनीची कोणती प्रतिक्रिया असू शकेल. रशियाने विचारणा केली असता बिस्मार्कने अत्यंत मुत्सद्दीपणाने जर्मनी बाल्कन प्रदेशातील आपला प्रभाव नष्ट होऊ देणार नाही किंवा कोणताही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नष्ट होऊ देणार नाही. याचा स्पष्ट अर्थ असा होता की रशियाने ऑस्ट्रियाचा पराभव करू नये. जर्मनीच्या या वृत्तीमुळे रशियाच्या पदरात निराशा पडली. बाल्कन हितसंबंधाबाबत रशियाला जर्मनीचा वर्मी घाव बसल्याने बाल्कन बाबत ऑस्ट्रियाशी पुन्हा समेट करावा लागला. रशिया-ऑस्ट्रिया यांच्यात राईश स्टॅट करार केला. या करारान्वये संधी मिळेल तेव्हा ऑस्ट्रियाचे बोसनिया व हर्झेगोविना ताब्यात घ्यावा व रशियाने बल्गेरिया आपल्या प्रदेशास जोडावा.

## इ) बर्लिन परिषद (१८७८) :-

फ्रान्स-प्रशिया युद्धाने फ्रान्सची झालेली हानी, डोईजड युद्धखंडणीमुळे किमान २५ ते ३० वर्षे फ्रान्स डोके वर काढू शकणार नाही हा भ्रम बिस्मार्कचा फ्रान्सने खोटा ठरवत केवळ वर्षात युद्धखंडणी देवून फ्रान्सच्या भूमीवरून जर्मनीला सैन्य परत घ्यावयाला भाग पाडले आणि बिस्मार्क अत्यंत अस्वस्थ झाला. याकाळात फ्रान्सला थिअर्स याचे खंबीर नेतृत्व मिळाले होते आणि फ्रान्सचे लष्करीकरण करण्याचा १८७२ मध्ये प्रयत्न सुरू झाला. आल्सेस, लॉरेन्स हे प्रदेश घेण्यासाठी फ्रान्स प्रयत्न करणार हे उघड होते. फ्रान्सच्या परराष्ट्र मंत्र्याने इंग्लंड-रशिया या राष्ट्रांना फ्रान्ससमोरील संकटांची कल्पना देवून युध्द टाळण्याकरिता मध्यस्थी करण्याचे सूचित केले. तेव्हा इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरियाने विल्यम पहिला यास युद्धाबाबत नापसंतीचा खलिता धाडला. तर रशियाने जर्मन-फ्रेंच युद्धाला आपला तीव्र विरोध केला. युद्ध झाल्यास रशियाच्या तटस्थेची हमी बाळगू नये अशी दर्पोक्ती झार सरकारने जर्मनीला केली. या घटनेमुळे रशियाची मैत्री ही बेभरवशाची आहे हे समजते. १८७७-७८ साली रशिया-तुर्कस्थान युद्धात तुर्कस्थानचा पराभव करून

सॅनस्टिफॅनोचा तह केला. त्यामुळे रशियाचे बाल्कन प्रदेशातले वजन वाढले. इंग्लंड-ऑस्ट्रियाने सॅनस्टिफॅनोचा तह रद्द करण्यात यावा अशी मागणी केली तेव्हा बिस्मार्कने १८७८ मध्ये बर्लिन परिषद बोलावली. बर्लिन परिषदेत मध्यस्थीचा देखावा केला. मात्र ऑस्ट्रियाच्या बाजूने निर्णय घेतला. बल्गेरिया, बॉस्निया, हर्जेगोविना या प्रदेशांच्या बाबतीत बर्लिन परिषदेतील बिस्मार्कच्या विश्वासघातकी धोरणाबद्दल रशियामध्ये जर्मनीविरुध्द अतिशय कटू प्रतिक्रिया झाली. लष्करवृध्दीला प्रारंभ झाला, शस्त्रास्त्रे खरेदीचे हुकूम देवून जर्मनी सीमालगत रशियन फौजा पुढे नेण्यात आल्या. आणि तीन सम्राटांचा संघ जवळ-जवळ मोडखळीस आला.

## ई) ऑस्ट्रिया-जर्मनी मैत्री करार (द्विराष्ट्र मैत्रीकरार) Austro-German Alliance (Dual Alliance) :-

बर्लिन परिषदेमुळे तीन सम्राटांच्या संघातील रशिया दुखावला गेला होता. तेव्हा फ्रान्सला रशिया जावून मिळेल व फ्रान्स-रशिया मैत्री करार निर्माण होईल अशी शक्यता बिस्मार्कला वाटल्याने आपल्या बरोबर एखादा घनिष्ठ मित्र असावा या हेतूने जर्मनी-ऑस्ट्रिया मैत्री निकटची करण्याचा प्रयत्न बिस्मार्कने चालविले. बोस्निया-हर्जेगोविना प्रदेशाच्याबाबत ऑस्ट्रियाला उत्तेजन देवून खुश केले. तर बाल्कन प्रदेशातील रशियाच्या वर्चस्वाला शह देवून आपले प्रभुत्व निर्माण करण्यासाठी ऑस्ट्रियाला जर्मनीची आवश्यकता होतीच.

धूर्त, मुत्सद्दी ऑस्ट्रियाचा चान्सलर काऊंट आंद्रेसी हा फ्रान्सविरोधी मदत करण्यास तयार नव्हता. पण रशियाविरुध्द ऑस्ट्रियास जर्मनीने मदत केली पाहिजे ही अट काऊंट आंद्रेसींची होती. दीर्घकाळ चर्चेनंतर बिस्मार्कने ऑस्ट्रियाच्या अटी मान्य केल्या. द्वि-राष्ट्र-मैत्री करार ७ ऑक्टोबर १८७९ रोजी झाला. करारातील कलमे पुढीलप्रमाणे :-

१. रशियाने जर्मनी किंवा ऑस्ट्रिया यांच्यावर हल्ला केल्यास परस्परांनी लष्करी मदत करावी.
२. दुसऱ्या एखाद्या राष्ट्राने ऑस्ट्रिया किंवा जर्मनी यापैकी एकावर आक्रमण केल्यास दुसऱ्या राष्ट्राने तटस्थ रहावे.
३. फ्रान्सला रशिया मिळाला आणि संयुक्त फौजेने कोणाही एका राष्ट्रावर आक्रमण केल्यास जर्मनी-ऑस्ट्रिया यांनी संयुक्तपणे लढा द्यावा.
४. हा करार प्रथम पाच वर्षाकरिता राहिल. जरूर भासल्यास दर तीन वर्षांनी नूतनीकरण व्हावे हा करार पूर्णपणे गुप्त राहिल. हा करार बिस्मार्कने १८८७ पर्यंत अत्यंत चातुर्याने गुप्त ठेवला व युरोपात गुप्त करार पध्दती सुरू झाली.

## ❀ तीन सम्राटांच्या संघाची नवी दिशा (१८८१) :-

फ्रान्स-रशिया यांच्यात मैत्री निर्माण होण्याचा धोका बिस्मार्कला भेडसावत होता. ऑस्ट्रिया-जर्मनी मैत्री करार झाला असला तरी रशियाचे शत्रुत्व जर्मनीला नको होते. याच कालावधीमध्ये रशियाच्या

सम्राटपदी आलेला झार तिसरा अलेक्झांडरला रशियाचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एकाकीपणा जाणवला. १८८० मध्ये दार्दानेल्स व बॉस्फोरस समुद्रधुन्याच्या प्रश्नाबाबत रशियाने जर्मनीपुढे वाटाघाटीचा हात पुढे केला. या संधीचा बिस्मार्कने फायदा उठवून १८८१ मध्ये तीन सम्राट संघाला नवी दिशा देवून जर्मनी-ऑस्ट्रिया-रशिया यात एक गुप्त करार केला. त्यातील ठराव पुढीलप्रमाणे होते.

१. ऑस्ट्रिया-जर्मनी-रशिया यापैकी कोणतेही राष्ट्र चौथ्या राष्ट्राबरोबर युध्दात गुंतल्यास इतर दोन राष्ट्रांनी अर्थपूर्ण तटस्थता (Benevolent Neutrality) पाळावी.

२. बाल्कन प्रदेशातील बोस्निया, हर्जेगोविना या दोन प्रांतावरील ऑस्ट्रियाच्या हक्कास रशियाने मान्यता दिली.

३. तुर्कस्थानमधील अॅटोमन तुर्क बाल्कन प्रदेशाबाबत धोरण ठरविताना रशिया-ऑस्ट्रिया यांनी परस्परांशी सल्ला घ्यावा. हा करार ३ वर्षांकिता झालेला होता, १८८४ मध्ये याचे नुतनीकरण करण्यात आले.

## फ) त्रिराष्ट्र मैत्रीकरार-२० मे, १८८२ (Triple Alliance) :-

फ्रान्समधील रोमन कॅथॉलिक लोक रोमच्या गादीवर पुन्हा पोपची पुर्नस्थापना करावी अशी मागणी प्रजासत्ताकाकडे करीत होते. यातच उत्तर आफ्रिकेतील ट्युनिशियाच्या मालकीबाबत इटली व फ्रान्स यांच्यात संघर्ष सुरू होता. इटलीची साम्राज्यवादाची तीव्र इच्छा व पोपच्या कारवाईमुळे इटलीला मित्राची गरज भासली. साहजिकच इटलीने बिस्मार्ककडे मदतीची मागणी केली. फ्रान्स-इटली यांच्यातील भांडणाचा फायदा उठवून इटलीला बिस्मार्कने आपल्या मैत्री कराराच्या पंखाखाली घेतले.

बिस्मार्कच्या पुढाकाराने २० मे १८८२ रोजी जर्मनी-ऑस्ट्रिया-इटली या राष्ट्रांत 'त्रिराष्ट्र मैत्री करार' (Triple Alliance) केला. या करारात इटलीला असा फायदा झाला की जर फ्रान्सने पुन्हा रोमच्या गादीवर पोपला प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तर जर्मनी-ऑस्ट्रिया यांची मदत मिळणार होती. याशिवाय ऑस्ट्रियाच्या हल्ल्याची भिती नष्ट होऊन युरोपच्या राजकारणात इटलीला महत्व प्राप्त झाले. या करारातील कलमे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. फ्रान्सने जर इटलीवर हल्ला केल्यास ऑस्ट्रिया-जर्मनी यांनी इटलीच्या मदतीस जावे. फ्रान्सने जर जर्मनीवर हल्ला केला तर इटलीने जर्मनीला सहाय्य करावे.

२. त्रिराष्ट्र युतीमधील एक वा दोन राष्ट्रांचे एकाचवेळी अन्य दोन किंवा अधिक राष्ट्रांशी युद्ध झाल्यास तिन्ही राष्ट्रांनी संयुक्त लढा द्यावा.

३. इंग्लंडविरुध्द लढाई झाल्यास इटली त्यामध्ये भाग घेणार नाही.

४. हा करार प्रथम ५ वर्षाकरिता राहिल, गरज पडल्यास त्याचे नूतनीकरण ५ वर्षानंतर करावे.

### ह) रशियाशी पुनमैत्रीचा तह (जून १८८७) (Reinsurance Treaty) :-

तीन सम्राटांचा संघ हा बाल्कन प्रदेशातील बल्गेरियाच्या प्रश्नावरून संकटाच्या भोवऱ्यात सापडला. ऑस्ट्रिया-रशिया यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले. सर्बियाने जेव्हा बल्गेरियाविरुद्ध युद्ध पुकारले तेव्हा ऑस्ट्रियाने सर्बियाला पाठिंबा दिला. तर रशियाने बल्गेरियाला पाठिंबा दिला. तेव्ह बिस्मार्कची राजकारणातील मुत्सुद्दीपणाची कसोटी लागली. यातच भर म्हणून फ्रान्सचा युद्धमंत्री बौलंगार युध्द पुकारण्याचा प्रभावी प्रचार फ्रेंच जनतेत करू लागला. तेव्हा बिस्मार्कची विचित्र अवस्था बनली. कारण रशियाच्या झारने फ्रान्स-रशिया करार करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. तेव्हा रशिया फ्रान्सला मिळाल्यास जर्मनीची अवस्था बिकट होईल. मोठ्या मुस्किलीने बाल्कनमधील रशिया-ऑस्ट्रिया मधील संभाव्य युद्धाची शक्यता नष्ट केली. यात बिस्मार्कने अत्यंत कौशल्याने ऑस्ट्रिया-रशियाशी वाटाघाटी केल्या. ऑस्ट्रिया-रशिया या बड्या राष्ट्रातील संभाव्य युध्द थोपवून धरले. रशियाचा विश्वास संपादन केला. त्याच विश्वासाच्या जोरावर १८८७ मध्ये रशियाशी पुनमैत्रीचा तह केला.

१. जर्मनी किंवा रशिया दुसऱ्या राष्ट्रांशी युध्दात गुंतले तर दुसऱ्याने तटस्थ रहांवे. पण रशियाने ऑस्ट्रियावर व जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केल्यास लागू होणार नाही.

२. जर्मनीने रशियाचे बल्गेरियातील वर्चस्व मान्य केले.

३. डार्डनेल्स समुद्रधूनीवरील तटस्थेच्या धोरणाचा पुनरुच्चार केला.

४. रशियाने योग्यवेळी बल्गेरियात आपल्या प्रभुत्वाखाली सरकार उभे करावे हे कलम गुप्त ठेवले. बाल्कन प्रदेशावरून ऑस्ट्रिया-रशियातील युध्दस्थिती टाळली. फ्रान्स-रशिया मैत्राचा संभव नष्ट केला. बल्गेरियातील रशियाचे वर्चस्व बिस्मार्कने मान्य केले.

## २ त्रिराष्ट्र मित्रसंघ-१९०७ (Triple Entente-1907) :-

इ. स. १८७१ जर्मनीचे एकीकरण पूर्णत्वास गेले. तेव्हापासून जर्मन राष्ट्र युरोपच्या राजकारणाचे केंद्रबिंदू बनले. युरोपच्या राजकारणात गतीशिलता आली. युरोपचे राजकारण पुन्हा ढवळले. परिणामी १९०७ मध्ये जर्मनीविरुध्द इंग्लंड-फ्रान्स-रशिया यांचा त्रिराष्ट्र मित्रसंघ (दोस्तांचा) (Triple Entente) स्थापन झाला. त्याची सुरूवात अर्थातच बिस्मार्कच्या परराष्ट्र धोरणातून झाली. फ्रान्सला एकाकी पाडण्यासाठी, युरोपात शांतता टिकवून धरण्यासाठी विविध करार करून जर्मनीची बाजू भक्कम केली हे करताना सावधगिरीने इंग्लंडला न दुखावता केले. त्याच्या पदत्यागानंतर मात्र चित्र बदलले.

कैसर विल्यम दुसरा यांच्या आक्रमक परराष्ट्र धोरणामुळे युरोपात जर्मनीविरोधी परिस्थिती बनू लागली. कैसर विल्यम दुसरा याने जर्मनीचे लष्करीकरण करून नौदल वाढविले. परिणामी जर्मनीच्या विरोधात युरोपातील राष्ट्रे एकत्र येण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला, यातून दोन गट निर्माण झाले. जर्मनी-

ऑस्ट्रिया-इटली व इंग्लंड-फ्रान्स-रशिया हे शक्तीशाली गट युरोपमध्ये निर्माण झाले. स्थापन होण्याच्या दृष्टीने त्रिराष्ट्र मित्रसंघ फ्रान्स-रशिया यांच्यातील १८९४ च्या कराराने प्रारंभ झाला.

## अ) फ्रान्स-रशिया मैत्री करार (१८९४) :-

बिस्मार्कच्या राजीनाम्यानंतर जर्मनीचा सम्राट विल्यम दुसरा याने आक्रमक धोरण स्विकारले. जर्मनीचे साम्राज्य वाढविण्याचा, त्यासाठी लष्करी सामर्थ्य, नौदल वाढविण्याचा प्रयत्न केला. त्याकारणाने इतर राष्ट्रांच्या मनात जर्मनीबद्दल संशय निर्माण झाला. रशियाबरोबर १८९० साली पुनमैत्रीचे नूतनीकरण करण्यास विल्यम दुसरा याने नकार दिला. त्याकारणाने रशिया स्वत:ला असुरक्षित समजू लागला आणि मित्र शोधण्यास सुरूवात केली. १८८७ मध्ये फ्रान्समध्ये नवीन मंत्रीमंडळाच्या धोरणामुळे रशिया-फ्रान्स जवळीकता निर्माण होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. रशियाने १८८९ साली ५० हजार बंदुका बनविण्याचे कंत्राट फ्रान्सला दिले. त्यास फ्रान्सने संमती दिली. १८९० साली रशियन राजपुत्र निकोलस याने फ्रान्सला भेट दिली. दोन्ही देशातील मैत्रीची भावना बळावली. १८९१ साली फ्रान्सचे काही नौदल रशियात गेले. रशियाने फ्रान्सकडून आणखी कर्ज घेतले तर १८९३ साली रशियन नौदल तुकडी फ्रान्समध्ये गेली, तिचे फ्रान्समध्ये स्वागत केले. परिणामी फ्रान्स-रशिया यांच्यात १८९४ मध्ये करार झाला. या करारातील कलमे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. जर्मनी किंवा जर्मनीच्या मदतीने ऑस्ट्रियाने रशियावर स्वारी केली तर फ्रान्सने लष्करी सामर्थ्यासह रशियाला सहकार्य करावे.

२. जर्मनी किंवा जर्मनीच्या मदतीने इटलीने फ्रान्सवर आक्रमण केल्यास रशियाने लष्करी सामर्थ्यासह फ्रान्सला सहकार्य करावे.

३. दोन्ही राष्ट्रे इतर राष्ट्रांशी वेगळ्या रूपाने करार करणार नाही.

४. हा करार गुप्त राहिल. फ्रान्स-रशिया कराराचे स्वरूप सुरक्षात्मक असले तरी त्याने लवकरच आक्रमक रूप धारण केले. फ्रान्सचे एकाकीपण संपुष्टात येवून युरोपच्या राजकीय इतिहासाला नवे वळण मिळाले.

## क) इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार (१९०४) :-

युरोपमधील इंग्लंडचे नौदल सामर्थ्य व वसाहतींच्या साम्राज्यांची ताकद ओळखून बिस्मार्कने शक्यतो इंग्लंडला न दुखावता फ्रान्सपासून कसे दूर राहिल याची काळजी घेतली होती. कैसर विल्यम दुसरा याने बिस्मार्कच्या राजीनाम्यानंतर आक्रमक धोरण स्वीकारले ''जगावर जर्मनीचे प्रभुत्व किंवा जर्मनीचा नाश'' असा नारा देवून ''जर्मनीचे भवितव्य सागरावर अवलंबून आहे'' असे जाहीर करून नौदलाचे सामर्थ्य वाढविण्यास सुरूवात केली, त्यामुळे जर्मनी, इंग्लंड यांचे संबंध बिघडले. युरोपमध्ये आपणाला मित्र असावा

याची जाणीव इंग्लंडला झाली. जर्मनीचा शत्रू फ्रान्स यांच्याकडे लक्ष इंग्लंडचे गेले. इंग्लंड-फ्रान्स यांचे शत्रुत्व दीर्घ काळापासून होते. वसाहतवादापासून इंग्लंडचे संबंध हे तणावाचे बनले होते. अशा अवस्थेत फॅशोडा प्रकरणात फ्रान्सचा परराष्ट्र मैत्री डेलकासीने अत्यंत कौशल्याने इंग्लंडशी संघर्ष टाळला. इजिप्तवरील इंग्लंडचे आणि मोरोक्कोवर फ्रान्सचे वर्चस्व परस्परांच्या विचारविनिमयाने दोन्ही राष्ट्रांनी मान्य केले. याचवेळी सातवा एडवर्ड हा इंग्लंडचा राजा बनला. त्यास फ्रान्सच्या राष्ट्रपती लुबेर व परराष्ट्रमंत्री डेलकासे यांनी अभिनंदन संदेश पाठविला. एडवर्ड सातवा याचा कैसर विल्यम दुसरा याने अनेकवेळा अपमान केला होता. त्यामुळे तो जर्मनीचा कट्टर विरोधक बनला होता. १९०३ मध्ये एडवर्ड हा फ्रान्सला गेला तेव्हा फ्रान्समध्ये त्याचे मोठे स्वागत झाले होते. या सर्व घटनामुळे इंग्लंड-फ्रान्स यांच्यातील संघर्षाचे काळे ढग संपुष्टात येऊन मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले व १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार झाला. दोन्ही राष्ट्रांनी व्यापार व वसाहत क्षेत्रातील स्पर्धा व इतर प्रश्न शांततापूर्ण मार्गाने सोडविण्याचे मान्य करून इजिप्त, मोरोक्को, पश्चिम आफ्रिका, न्यफाऊडलंड, सयाम, मादागास्कर इ. प्रदेशाबाबत इंग्लंड-फ्रान्समध्ये समझोता केला गेला. अँग्लो-फ्रेंच करारान्वये अन्य कोणत्याही राष्ट्राविरुध्द निश्चित स्वरूपाची लष्करी योजना करण्यात आली नव्हती. परंतु या कराराने इंग्लंड-फ्रान्स यांच्यामधील शत्रुत्व नष्ट झाले. त्यांच्यातील मित्रत्वाच्या नव्या युगाला सुरूवात झाली. या मैत्रीचे दोन्ही देशात प्रचंड स्वागत झाले. १९०५-०६, १९०८ आणि १९११ साली मोरोक्कोच्या प्रश्नाबाबत झालेल्या परिषदेत फ्रान्सचीच बाजू इंग्लंडने उचलून धरली.

## ड) फ्रान्स-इटली करार (१९०२) :-

आफ्रिकेतील ट्युनिस प्रदेशावरून १८८१ इटली, फ्रान्सवर नाराज होती. त्रिराष्ट्र मित्र करारातील इटलीला कोठेच स्थान मिळत नसल्याने नाराज होते. इटलीचे या कराराला मनापासून सहकार्य नव्हते. ऑस्ट्रियाच्या ताब्यातील प्रदेशही परत मिळविणेही अशक्य बनले होते. १८९६ मध्ये फ्रान्सने ट्युनिसमधील इटालियन लोकांच्या हक्काच्या संरक्षणाची हमी इटलीला दिली. परिणामी इटलीच्या मनातील फ्रान्सबाबतची कटुत्वाची भावना हळुहळु कमी झाली. यातच १८९८ मध्ये फ्रान्सच्या परराष्ट्रमंत्री थिओफिल डेलकासीने इटलीशी मैत्रीचा हात पुढे केला. फ्रान्स-इटलीने परस्परांच्या मालावरील जकातीच्या पद्धतीमध्ये बदल केला. तर १९०० साली डेलकासीने इटलीचा ट्रिपोली व सागरेनाइकावरील वर्चस्व मान्य केले. इटलीने मोरोक्कोवरील फ्रान्सचे वर्चस्वाला मान्यता दिली. १९०२ मध्ये डेलकासीच्या मुत्सद्दीपणामुळे फ्रान्स-इटलीत करार झाला. करारानुसार जर्मनीने फ्रान्सविरुध्द अगर फ्रान्सच्या प्रतिष्ठेसाठी जर्मनीविरुध्द युद्ध करावे लागले. तर इटलीने अलिप्त/तटस्थ रहावे, त्याचप्रकारे फ्रान्सनेही आश्वासन इटलीला दिले. परिणामी १९०६ मध्ये अल्जेसिराज येथील परिषदेत मोरोक्कोबाबत फ्रान्सला इटलीने जर्मनीविरोधी उघड पाठिंबा दिला.

## इ) अॅग्लो-जपान करार (१९०२) :-

युरोपातील सत्तेचा समतोल राखण्यासाठी नेहमीच इंग्लंडने महत्वाची भूमिका पार पाडली. युरोपच्या

आंतरराष्ट्रीय राजकारणापासून शक्यतो तटस्थ राहून इंग्लंडने स्वत:च्या वसाहतीचे साम्राज्य वाढविण्याचाच प्रयत्न केला. १८९८ नंतर जर्मनी व रशिया चीन पॅसिफिक क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू लागली. दक्षिण आफ्रिकेत ओबरशी युद्ध भडकण्याची चिन्हे होती. इंग्लंडविरोधी दोन राष्ट्रगटाची युती होण्याची शक्यता होती. त्यामुळे इंग्लंडला एखादा मित्र मिळविण्याची गरज निर्माण झाली. युरोपात मित्र मिळाला नाही, म्हणून शेवटी जपान या अतिपूर्वेकडील राष्ट्राबरोबर ३० जानेवारी, १९०२ रोजी संरक्षणाच्या दृष्टीने तह केला. करारानुसार ''इंग्लंड किंवा जपान यापैकी कोणतेही राष्ट्र तिसऱ्या राष्ट्राबरोबर युद्धात गुंतले तर मित्र राष्ट्राने तटस्थ राहून ते युध्द दोन युद्धमान राष्ट्रातच सिमीत राहिल यासाठी प्रयत्न करावा. अन्य एखादे राष्ट्र शत्रुराष्ट्राच्या मदतीला आले तर मित्र राष्ट्राने परस्परांना मदत करणे'' हा करार इंग्लंडच्या अलिप्ततेच्या धोरणाचा शेवट करणारा ठरला. इंग्लंडचे राजकीय एकीकीपण संपले. रशियाच्या विरोधात इंग्लंडच्या अतिपुर्वेकडील साम्राज्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने या करारामुळे मोठा दिलासा मिळाला.

## ई) इंग्लंड-रशिया मैत्री करार (१९०७) :-

कैसर विल्यम दुसरा याने बिस्मार्कच्या पदत्यागानंतर नौदल वाढविणेस सुरूवात केली. जगात जर्मनीचे वर्चस्व निर्माण होईल असे वक्तव्य केल्याने फ्रान्स-रशिया-इंग्लंडला जर्मनीपासूनचा धोका स्पष्टपणे जाणवू लागला. यामधूनच १८९४ फ्रान्स-रशिया, १९०२ मध्ये फ्रान्स-इटली, इंग्लंड-जपान, १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स असे मित्र जर्मनीविरुध्द एकत्र आले. इंग्लंड-रशिया या दोन बड्या राष्ट्रांत मैत्री निर्माण करण्यासाठी फ्रान्सने पुढाकार घेतला. यामधूनच जर्मनीविरोधात इंग्लंड-रशिया बाल्कन प्रदेश, चीन, तिबेट, इराण या प्रदेशातील स्पर्धेतील मतभेद मिटवून घेण्याची आवश्यकता दोन्ही राष्ट्रांना भासू लागली. मोरोक्कोच्या प्रश्नावरून इंग्लंड-रशिया जवळ आले. १९०४ मध्ये मोरोक्कोवर फ्रान्सने वर्चस्व प्रस्थापित केले होते ते जर्मनीच्या कैसर विल्यम दुसरा याला मान्य झाले नाही. त्याने टॅंजीयर येथे जाऊन मोरोक्कोच्या सुलतानाची भेट घेऊन त्याला मदतीचे आश्वासन दिले. याशिवाय त्याने आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्याची मागणी केली. फ्रेंच परराष्ट्रमंत्री डेलकासीच्या राजीनाम्याची मागणी केली. परिणामी युरोपातील तणाव वाढला. जानेवारी १९०६ मध्ये स्पेनमधील अल्जिसियर्स येथे परिषद भरली. तीमध्ये मोरोक्को, फ्रान्स, जर्मनी त्यांच्याशिवाय इंग्लंड, रशिया, स्पेन, ऑस्ट्रिया, इटली, बेल्जिअम, हॉलंड, स्विडन आणि अमेरिका यांनी भाग घेतला. जर्मनीच्या बाजूने फक्त ऑस्ट्रियाने मत नोंदविले. बाकी सर्व राष्ट्रे फ्रान्सच्या बाजूने उभी राहिली. परिणामी जर्मनीने जी भूमिका घेतली त्यामुळे जर्मनीच्या शक्तीची व इराद्याची इंग्लंडला जाणीव झाली. फ्रान्सने पुढाकार घेतला आणि रशियाबरोबर इंग्लंडने मित्रत्वाचा करार केला. या करारातील कलमे पुढीलप्रमाणे ठरविली.

१. उत्तर इराणवर रशियाचे व दक्षिण इराणवर इंग्लंडचे नियंत्रण मान्य केले. या दोन्ही प्रदेशामध्ये एक सुरक्षित प्रदेश ठेवण्यात आला.

२. अफगाणिस्तानातील ब्रिटिशांचे हितसंबंध रशियाने मान्य केले.

३. तिबेटमध्ये अंतर्गत हस्तक्षेप न करण्याचे ठरवून कोणतीही सवलत प्राप्त न करण्याचे दोन्ही राष्ट्रांनी मान्य केले. या करारामुळे युरोपात जर्मनीविरुध्द इंग्लंड-फ्रान्स-रशिया असा त्रिमित्र (दोस्त) संधीगट निर्माण झाला.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **भौगोलिक समिपता :** भौगोलिक जवळीकता.

२. **प्रतिगामी व्यवस्था :** जुनी व्यवस्था.

३. **शह देणे :** आव्हान देणे.

४. **विघटन होणे :** तुकडे होणे.

५. **एकत्व :** ऐक्य.

६. **साम्राज्यवाद :** विकसित राष्ट्राने अविकसित राषट्रावर वर्चस्व प्रस्थापित करणे.

७. **फोडा आणि राज्य करा नीती :** फोडा आणि राज्य करा ही नीती म्हणजे अस्तित्वात असलेल्या शक्तीशाली रचनेला भेदणे आणि छोट्या-छोट्या शक्तिशाली समूहांना एकत्र येऊ न देणे या नीतीचा मुख्य उद्देश.

८. **व्यापारवाद :** व्यापारीकरण (व्यापाराचा विस्तार करणे)

९. **नौकानयन :** सागरी संचार नौकेतून करणे.

## १.४ सारांश

१९वे शतक हे आधुनिक जगाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे ठरले. कारण या शतकापूर्वी जगात राष्ट्रवादाचा उदय झाला. राष्ट्रवादाच्या उदयामुळे अनेक राष्ट्रात स्वातंत्र्य चळवळी, आंदोलने झाली. क्रांत्या, उठाव होऊन युरोपातील आशिया-आफ्रिकेतीय राष्ट्रे स्वतंत्र झाली. प्रस्थापित अन्यायी वसाहतीच्या अन्यायी सत्ता, अनियंत्रित राजसत्ता त्या-त्या राष्ट्रांनी झुगारून दिल्या. परिणामी नोकरशाहीचा विकास झाला. राष्ट्रवादाची जोपासना सुरू झाली. फ्रान्स, इटली, जर्मनीतील राष्ट्रवादामुळे आशिया-आफ्रिका खंडातील पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्राच्यामध्ये राष्ट्रवाद निर्माण होऊन जनजागृती झाली. त्या-त्या राष्ट्रांत स्वातंत्र्य चळवळी उभ्या करून अन्यायी सत्ता झुगारून दिल्या व आपले स्वतंत्र 'राष्ट्र' म्हणून जगात महत्त्वाचे स्थान मिळवण्याचा प्रयत्न केला.

जगाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण जलमार्ग शोध मोहिमेमुळे युरोपियन राष्ट्रांना पूर्वेकडील राष्ट्रांशी

साम्राज्यवादाची वाढ युरोपीयन राष्ट्रात निर्माण झाली. औद्योगिक क्रांतीमुळे वसाहती निर्माण करण्याची स्पर्धाच युरोपियन राष्ट्रांच्यात सुरू झाली. ऑस्ट्रिया या शब्दांनी साम्राज्याच्या वसाहती आफ्रिका, आशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया खंडात निर्माण केल्या. त्यांच्यातील साम्राज्यवादी वसाहतीमुळे युरोपातील राष्ट्रांच्यात दोन तह निर्माण झाले. जग पहिल्या महायुद्धाकडे खेचले गेले. युरोपात १८७० मध्ये जर्मनीचे एकीकरण व फ्रान्सचा पराभव या घटना अत्यंत महत्त्वाच्या ठरल्या, कारण या घटनेमुळेच युरोपात बिस्मार्कने फ्रान्सला एकाकी पाडण्याच्या हेतूने अनेक राष्ट्रांशी युद्ध करार करण्याचा प्रयत्न केला. यातून ऑस्ट्रिया-इटली-जर्मनी त्रिमित्र करार झाला व इंग्लंड-फ्रान्स-रशिया यांच्यात मित्र संघी गट (दोस्त) निर्माण झाला. हे दोन गट पहिल्या महायुद्धाला आमने-सामने उभे ठाकले. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले.

## १.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. राष्ट्र हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दापासून निर्माण झाला आहे?

२. राष्ट्रवादाचे कोणतेही दोन घटक सांगा?

३. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला कोणती तत्त्वे दिली?

४. इटालियन क्रांतीचा प्रणेता कोणाला म्हटले जाते?

५. जर्मनीचा भाग्यविधाता कोणला म्हटले जाते?

६. इंग्लंडने भारतात पहिली वसाहत कोठे सुरू केली?

७. साम्राज्यविस्तार व व्यापार वाढवला नाहीतर इंग्लंडला नष्ट व्हावे लागेल असे कोणी म्हटले होते?

८. चीन-जपान यांच्यात १८९५ साली कोणता तह झाला?

९. रशिया-जपान युद्ध केव्हा झाले?

१०. अमेरिकेचा शोध कोणी लावला?

### ब) योग्य पर्याय निवडा.

१. ............. नी भारतामधील सत्ता राजवटीचा पराभव करून एकहाती व एककेंद्री राजवटीचा अंमल सुरू केला.

*(अ) मुघल* *(ब) फ्रेंच* *(क) इंग्रज* *(ड) पोर्तुगीज.*

२. युरोपियन राष्ट्रांनी अतिरिक्त भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी ........... या मार्गाचा अवलंब केला.

*(अ) बँक बचत* *(क) वसाहतवाद*

*(ब) मालक कामगार यांच्यात वाटप* *(ड) धर्मादाय संस्थाना देणग्या.*

३. कांगो नदी खोऱ्यातील लिओपाल्डच्या ताब्यातील प्रदेशाला ........... म्हणून ओळखले जात असे.

*(अ) बेल्जियम काँगो* *(क) फ्रेंच काँगो*

*(ब) सोनालीलँड* *(ड) ब्रिटीश काँगो.*

४. त्रिराष्ट्र मित्र करारात .............. हे राष्ट्र नव्हते.

*(अ) ऑस्ट्रिया* *(ब) इटली* *(क) जर्मनी* *(ड) इंग्लंड.*

५. राईश स्टॅट करार ............ या दोन राष्ट्रात झाला.

*(अ) इंग्लंड व फ्रान्स* *(क) फ्रान्स व रशिया*

*(ब) रशिया व ऑस्ट्रिया* *(ड) ऑस्ट्रिया व इटली.*

## १.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** १. राष्ट्र हा शब्द 'Natio' या लॅटिन भाषेतील शब्दापासून निर्माण झाला आहे.

२. राष्ट्रवादाचे (१) भौगोलिक एकता व (२) समान ऐतिहासिक पार्श्वभूमी असे दोन घटक सांगता येतील.

३. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही महान तत्त्वे दिली.

४. जोसेफ मॅझिनीला इटालियन क्रांतीचा प्रणेता म्हणतात.

५. जर्मनीचा भाग्यविधाता प्रिन्स बिस्मार्कला म्हटले जाते.

६. सुरत येथे इंग्लंडने भारतातील पहिली वसाहत स्थापन केली.

७. जॉन रस्कीन या विचारवंताने असे म्हटलेले होते.

८. १८९५ साली चीन-जपान मध्ये शिमानोसेकीचा तह झाला.

९. सन १९०४-०५ मध्ये रशिया-जपान युद्ध झाले.

१०. अमेरिकेचा शोध कोलंबस ने लावला.

**ब)** १. *(क) इंग्रज.*

२. *(क) वसाहतवाद.*

३. *(अ) बेल्जियम काँगो.*

४. *(ड) इंग्लंड.*

५. *(ब) रशिया व ऑस्ट्रिया.*

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. राष्ट्रवादाची संकल्पना सांगून राष्ट्रवादाचे मुख्य घटक विशद करा?

२. इटलीच्या एकीकरणाचे टप्पे सांगून जोसेफ मॅझिनीचे योगदान विशद करा?

३. जर्मनीतील राष्ट्रवादाच्या विकासाची माहिती द्या?

४. साम्राज्यवादाची कारणे सांगून युरोपियन राष्ट्रांनी आशिया, आफ्रिका खंडातील केलेल्या साम्राज्यवादी वाटलाचीची माहिती सांगा?

५. बिस्मार्कच्या परराष्ट्रीय धोरणातील ''त्रिमित्र संघ'' करार पध्दतीचे विश्लेषण करा?

**ब) टिपा लिहा.**

१. राष्ट्रवादाचा अर्थ.

२. जोसेफ गॅझिनी.

३. बिस्मार्कचे राष्ट्रवादी धोरण.

४. साम्राज्यवादाचे परिणाम.

५. तीन सम्राटांचा संघ (१८१२).

## १.८ संदर्भ ग्रंथ


१. **वैद्य सुमन** : *''आधुनिक जग (१८१४ ते १९१४)''*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर २०००.

२. **कदम य.ना.** : *''आधुनिक जग (१९०१-२०००)''*, फडके प्रकाशन, २०१५.

३. **कदम य.ना.** : *''विसाव्या शतकातील जगाचा इतिहास''*, फडके प्रकाशन, एप्रिल, २००५.

४. **तांबोळी एन. एस., पवार व्ही.पी.** : *''आधुनिक जग (१७५० ते १९५०)''*, निराली प्रकाशन, जुलै, २००४.

५. **कुलकर्णी अ.रा., देशपांडे प्र.ज., देशपांडे अ.म.** : *''आधुनिक जगाचा इतिहास (१७८९-१८७८)''*, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑगस्ट-२००१.

६. **आचार्य धनंजय** : *''विसाव्या शतकातील जग''*, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट, २००१.

७. **कोलारकर श. गो.** : *''आधुनिक जग (१८७१-१९६५)''*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१.

८. **दिक्षीत नी.सी.** : *''पाश्चिमात्य जग''*, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स कंपनी, नागपूर, जून, २००५.

९. **जाधव हरिदास, जाधव कल्याण** : *''आधुनिक जगाचा इतिहास''.*

१०. **गुप्ता माणिकलाल** : *''युरोप का इतिहास (१४८९ ते १८७०)''.*

११. **शिंदे एस. पी., मासाळ डी. बी.** : *''आधुनिक जग''.*

❑ ❑ ❑

घटक-२

# १९१९ पर्यंतचे जग

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ पहिल्या महायुध्दापूर्वीचे जग

२.२.२ पहिल्या महायुध्दास सहाय्यभूत घटक

२.२.३ पहिल्या महायुध्दाचे स्वरूप

२.२.४ पहिल्या महायुध्दाची वाटचाल

२.२.५ पॅरिस शांतता तह

२.२.६ पहिल्या महायुध्दाचे परिणाम

२.२.७ रशियन राज्यक्रांती

२.२.८ रशियन क्रांतीची कारणे

२.२.९ रशियन क्रांतीची वाटचाल

२.२.१० रशियन क्रांतीचे परिणाम

२.२.११ जागतिक प्रतिसाद व प्रतिक्रिया

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न

२.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला–

- पहिले महायुध्द सुरू होण्यापूर्वीच्या युरोपातील घटनांची माहिती मिळते.
- युरोपीय राजकारणातील वर्षानुवर्षे घडत असलेल्या घटनांचा अभ्यास होईल.
- पहिल्या महायुध्दाच्या कारणांची माहिती मिळेल.
- इ. स. १९१४ ते १९१९ या पहिल्या जागतिक महायुध्दाच्या कालखंडाविषयी माहिती मिळेल.
- अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांची चौदा तत्त्वे समजतील.
- पॅरिस शांतता परिषद व व्हर्सायचा तह याविषयी माहिती मिळेल.
- पहिल्या महायुध्दाच्या परिणामामुळे जगावर पडलेले पडसाद समजतील.
- रशियातील इ. स. १९१७ ची राज्यक्रांती का घडली व कशी घडली याची माहिती मिळेल.
- रशियन क्रांतीचे परिणाम व तत्कालीन कारणे यांची माहिती मिळेल.
- रशियन क्रांतीतील लेनिनचे योगदान याविषयी माहिती मिळेल.
- रशियन राज्यक्रांतीचे जगातील इतर देशावर झालेले परिणाम व त्यांच्या प्रतिक्रिया याची माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक

विसावे शतक हे मानवी जीवनाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे शतक मानले जाते. कारण या शतकात दोन महायुध्दे व रशियन राज्यक्रांती घडून आली. या शतकात अनेक क्रांतिकारी घटनांनी माणसाचे जीवन ढवळून निघाले. राजकारणापासून ते समाजकारणापर्यंत अनेक परिवर्तने झाली. लोकशाही, हुकुमशाही व साम्यवाद या विचारसरणीमध्ये योठ्या प्रमाणावर संघर्ष घडून आला. म्हणून या शतकाला 'संघर्षाचे शतक' असेही संबोधले जाते. या संघर्षामध्ये इ. स. १९१४ ते १९१८ या दरम्यान घडून आलेले 'पहिले महायुध्द' ही घटना अंत्यत महत्त्वाची आहे. मानवी क्रौर्याचे अत्यंत वास्तव दर्शन या युध्दात झाले. युध्द जवळजवळ ४ वर्षे लढले गेले. या महायुध्दात साडेसहा कोटी लोकांनी भाग घेतला. ८० लोक या महायुध्दात ठार झाले. तर अनेक लोक कायमचे पंगू झाले. ज्यांनी प्रत्यक्षात युध्दात भाग घेतला नाही अशा शेकडो लोकांना रोगराई, बॉम्बहल्ले, कत्तली, दुष्काळ इ. ना तोंड द्यावे लागले. युध्दाच्या तडाख्यातून एक ही राष्ट्र सुटले नाही. हे जागतिक महायुध्द जमीन, पाणी, आकाश या तिन्ही ठिकाणी तसेच युरोप, आफ्रिका व आशिया या तिन्ही खंडात लढले गेले. हे महायुध्द एकाएकी उद्‌भवले नाही. युरोपियन राजकारणात ज्या

अनेक घडामोडी वर्षानुवर्षे घडत गेल्या त्या सर्वाचा परिपाक म्हणजे हे जागतिक महायुध्द होय. या युध्दाने घडवून आणलेली मनुष्य व वित्तहानी पाहता अशा सर्वव्यापी युध्दाचा प्रारंभ काही एकाएकी झाला असे म्हणता येणार नाही. त्यासाठी आपल्याला महायुध्दापूर्वीच्या युरोपियन देशांच्या राजकारणाचा अभ्यास करावा लागतो.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ पहिल्या महायुध्दापूर्वीचे जग

- **आंतरराष्ट्रीय संबंधाचे पहिले पर्व (१८७० ते १८९०) :-**

इ. स. १८७१ मध्ये जर्मनीचे एकीकरण होऊन युरोपात एका बलाढ्य राष्ट्राचा उदय झाला व बिस्मार्क हा स्वतंत्र जर्मनीचा चैन्सलर बनला. बिस्मार्कच्या परराष्ट्रीय नीतीमुळे १८७१ पासून पहिल्या महायुध्दापर्यंतच्या काळात अनेक तह आणि कराराची एक मालिकाच निर्माण झाली. फ्रान्सला युरोपीय राष्ट्रांपासून अलग ठेवणे व युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास फ्रान्सविरुध्द संयुक्त कारवाई करणे सुलभ जावे, या उद्देशाने बिस्मार्कने इ.स. १८७१ ते १८९० या काळात युरोपातील सर्व छोट्या मोठ्या राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. या आंतरराष्ट्रीय संबंधाची सुरूवात १८७२ च्या 'तीन सम्राटाच्या संघाने' (Three Emperors League) झाली. या तीन सम्राटांच्या संघामध्ये जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी आणि रशिया या देशांच्या सम्राटांनी युरोपात शांतता टिकविणे व युध्दाचा धोका निर्माण झाल्यास संयुक्त आघाडी उभारणे या उद्दिष्टांकरिता परस्पर सहकार्याची तयारी दर्शविली. हा संघ बर्लिन परिषदेपर्यत टिकून या संघाचा फायदा जर्मनीलाच झाला. १८७६ मध्ये जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्यात 'राईशस्टॅट करार' झाला. या करारानुसार ऑस्ट्रियाने बोस्निया व हर्जेगोव्हीना व्यापावा आणि रशियाने बल्गेरियावर वर्चस्व स्थापावे, असे मान्य करण्यात आले.

इ.स. १८७७-७८ मध्ये रशिया तुर्कस्थान युध्द होऊन रशियाने तुर्कस्थानवर विजय मिळवून सॅन स्टिफॅनोच्या (San Stefano) तहानुसार बाल्कन प्रदेशात वर्चस्व प्रस्थापित केले. हे वर्चस्व इंग्लंड, ऑस्ट्रिया यांना मान्य नव्हते, म्हणून सॅन स्टिफॅनोचा तह रद्द करण्यात यावा अथवा या तहातील अटी इंग्लंड, ऑस्ट्रिया यांना सोईस्कर वाटेल, अशा रितीने बदलण्यात याव्यात अशी संयुक्त मागणी इंग्लंड ऑस्ट्रियाने रशियाकडे केली. ही मागणी मान्य न केल्यास युध्दाची धमकीदेखील त्यांनी रशियाला दिली. अशा अडचणीच्या काळात बिस्मार्कने इ.स. १८७८ ला बर्लिन येथे आंतरराष्ट्रीय परिषद बोलावून मध्यस्ती केली. बिस्मार्कने कितीही प्रामाणिक मध्यस्तीचा प्रयत्न करण्याचा आव आणला तरी प्रत्यक्षात त्याने ऑस्ट्रियाच्या बाजूने झुकते माप टाकले. सॅन स्टिमॅनोच्या तहामुळे रशियाला मिळालेले सर्व फायदे इंग्लंड व ऑस्ट्रिया यांनी या बर्लिन परिषदेच्या निमित्ताने रशियाकडून हिसकावून घेतले. जर्मनीच्या पक्षपाती वागणुकीबद्दल रशियाने

बिस्मार्कवर कडक शब्दांत टीका केली. या सर्व घटनांचा एक सामूहिक परिणाम म्हणजे 'तीन सम्राटांचा संघ' बराच कमकुवत झाला.

## ❁ **ऑस्ट्रिया-जर्मनी मैत्री करार-१८७९** (Austria-Germany Alliance)

बर्लिन परिषदेतील निर्णयामुळे बिस्मार्क अस्वस्थ झाला. विशेषत: फ्रान्स रशियाबरोबर मैत्री करून जर्मनीवर हल्ला करील अशी भीती त्याला वाटू लागली. यासाठी त्याने ऑस्ट्रियाशी मैत्री करण्याचे ठरविले. आणि ऑस्ट्रियालाही जर्मानीशिवाय दुसरा मित्र राहिला नव्हता. म्हणून बिस्मार्कने इ.स. १८७९ मध्ये ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर काऊट आंद्रेसी याच्याबरोबर ऑस्ट्रिया-जर्मन मैत्री करार (Austria-Germany Alliance) केला. हा करार गुप्त असल्याने इ. स. १८८७ पर्यत रशियाला या कराराची माहितीच मिळाली नाही. पण हा करार उघडकीस येताच रशिया-जर्मनी संबंध बिघडले.

## ❁ **तीन सम्राटांच्या संघाचे नूतनीकरण-१८८१**

रशियात दुसऱ्या अलेक्झांडरच्या खुनानंतर तिसरा अलेक्झांडर राजेपदी आला व बिस्मार्कला रशियाशी संबंध सुधारण्यास योग्य संधी लाभली. म्हणून बिस्मार्कने झारची प्रत्यक्ष भेट घेऊन तीन सम्राटांच्या संघास मित्रत्वाच्या दृष्टीने नवा उजाळा देण्याची इच्छा व्यक्त करताच झारने त्यास तत्काळ संमती दिली. अशा प्रकारे या तीन सम्राटांच्या संघाला नवी दिशा मिळाल्यामुळे ऑस्ट्रिया-जर्मनी-रशिया संबंध पूर्ववत झाले व फ्रान्सला रशियापासून दूर ठेवण्याच्या धोरणात बिस्मार्क यशस्वी झाला.

## ❁ **त्रिराष्ट्र मैत्री करार-१८८२** (Triple Alliance)

उत्तर आफ्रिकेतील ट्युनिशियाच्या वर्चस्वाबद्दल फ्रान्स-इटली यांच्यात संघर्ष चालू होता. फ्रान्स-इटली संबंध जास्तीत जास्त बिघडून इटली जर्मनीजवळ आणण्यासाठी इटलीने ट्युनिशियाचा कब्जा घ्यावा, अशी बिस्मार्कने सूचना केली. याउलट, ट्युनिशिया जिंकण्यास काहीच हरकत नाही, असे बिस्मार्कने अप्रत्यक्षपणे फ्रान्सला सुचविले. फ्रान्सने १८८१ मध्ये ट्युनिशिया जिंकून घेतल्यानंतर इटली भयंकर खवळला परंतु फ्रान्सबरोबर लढण्याइतकी ताकत इटलीजवळ नव्हती म्हणून त्यांनी जर्मनीला मदत मागितली. बिस्मार्कनेही मोठ्या खुशीने ऑस्ट्रिया-जर्मनीच्या द्विराष्ट्र मैत्री करारात इटलीला समाविष्ट करून घेतले व अशा प्रकारे इ.स. १८८२ ला जर्मनी-ऑस्ट्रिया व इटली यांचा 'त्रिराष्ट्र मैत्री करार' अस्तित्वात आला. या करारामुळे प्रत्येक राष्ट्राला कोणता ना कोणता फायदा झाला.

## ❁ **पुर्नमैत्रीचा तह-१८८७** (Re-insurance Treaty)

फ्रान्समध्ये जनरल बौलंगर या युध्दमंत्र्याने जर्मनीविरुध्द भडक प्रचार सुरु केला आणि त्यातच इ. स. १८८७ मध्ये ऑस्ट्रिया-जर्मनी यांच्यातील गुप्त मैत्री करार अचानकपणे उघडकीस आला. त्यामुळे रशिया-

जर्मनी संबंध ताणले गेले व रशियातील वृत्तपत्रांमधून जर्मनीचा कडक शब्दांत निषेध करावयास सुरुवात झाली. बिस्मार्कने या कठीण प्रसंगाचे गांभीर्य ओळखून रशियाची मनधरणी केली व परस्परांवर विश्वास व्यक्त करणारा इ. स. १८८७ मध्ये 'पुर्नमैत्रीचा तह' केला. हा तह झाला असला तरी बिस्मार्कने रशियाचा केलेला विश्वासघात रशिया विसरू शकला नाही.

### ❁ **भूमध्य सामुद्रिक करार-१८८७** (Mediterranean Agreement)

बिस्मार्कने रशियाबरोबर पुर्नमैत्रीचा तह केला असला तरी रशियाचे वर्चस्व बाल्कन प्रदेशात आणि काळ्या समुद्रात वाढू नये म्हणून बिस्मार्कने एक नवीन योजना आखली व त्यानुसार त्याने इंग्लंड, ऑस्ट्रिया आणि इटली या तीन राष्ट्रांना 'भूमध्य सामुद्रिक करार' करण्यास उत्तेजन दिले. या कराराचा उद्देश असा होता की, बाल्कन प्रदेशातील स्थिती 'जैसे थे' रहावी तसेच तुर्कस्थानची प्रादेशिक एकता व सार्वभौमत्व टिकून राहून, रशियाला या प्रदेशात ढवळाढवळ करण्यास संधी मिळू नये.

बिस्मार्कने केलेल्या करारामुळे व तहामुळे युरोपात शांतता टिकून राहिली परंतु या शांततेचे स्वरूप हे अल्पकाळ टिकले. कारण बिस्मार्कच्या निवृत्तीनंतर 'त्रिराष्ट्र मैत्री' करारातील राष्ट्रांनी समतोल कायम ठेवण्याची खबरदारी न घेतल्याने आंतरराष्ट्रीय संबंधात अनेक समस्या निर्माण झाल्या व जर्मनीची परराष्ट्र नीती जागतिक संघर्षाला कारणीभूत ठरली.

## ❑ आंतरराष्ट्रीय संबंधाचे दुसरे पर्व (१८९१ ते १९१४)

### ❁ **फ्रान्स-रशिया मैत्री करार-१८९३** (Franco-Russian Alliance)

बिस्मार्कच्या निवृत्तीनंतर जर्मनीचे परराष्ट्रीय धोरण कैसर विल्यम दुसरा याला समर्थपणे सांभाळता आले नाही. जर्मनीच्या रशियाविरोधी धोरणामुळे रशिया संतापला होता. बिस्मार्कने पुर्नमैत्रीच्या तहाचे नूतनीकरण करण्याची १८९० मध्ये सूचना केली, पण झारने ही सूचना साफ धुडकावून लावली. रशिया आंतरराष्ट्रीय संबंधात एकाकी पडला होता. अशी एकाकीपणाची परिस्थिती रशियास धोकादायक वाटत होती, म्हणून रशियाने आपला मोर्चा फ्रान्सकडे वळविला. दरम्यान, फ्रान्सच्या तिसऱ्या प्रजासत्ताकातील गोंधळ संपला होता. फ्रान्स-रशिया मैत्रीसंबंध जुळून येण्याची दोन्ही देशांना आवश्यकता वाटत होती व त्यादृष्टीने दोन्ही देशांनी हालचाली सुरु केल्या. १८८८ मध्ये फ्रान्सने रशियाला आर्थिक व लष्करी मदत केली. यातून फ्रान्स-रशियाचा 'स्नेहपूर्ण करार' (Entente Cordiale) झाला. या करारानुसार, युरोपच्या शांततेला धोका निर्माण झाल्यास तो धोका टाळण्यासाठी परस्परांनी विचार विनिमय करण्याचे ठरविले. या कराराचेच रूपांतर इ.स. १८९३ 'फ्रान्स-रशिया करार' मध्ये झाले.

### ❁ **इंग्लंड-जपान करार-१९०२** (England-Japan Alliance)

इ.स. १८९४-९५ साली चीन व जपान यांच्यात युध्द झाले. या युध्दात चीनचा पराभव करून

जपानने चीनशी 'शिमोनोसेकीचा तह' करून चीनवर प्रभुत्व मिळविले. रशिया, फ्रान्स व जर्मनी ही युरोपच्या राजकारणात परस्परांना शत्रुवत मानणारी राष्ट्रे चीनमधील जपानचे वर्चस्व नष्ट करण्यास मात्र एकत्र आली. या तीन राष्ट्रांनी जपानवर दडपण आणून शिमोनोसेकीच्या तहाने जपानला मिळालेले फायदे जपानकडून हिसकावून घेतले. जपान या परिस्थितीचा सूड घेण्यासाठी युरोपीय मित्र शोधण्याच्या प्रयत्नात राहिला. दरम्यान, युरोपमध्येही इंग्लंड एकाकी पडला होता. शिवाय वसाहतविषयक स्पर्धेमध्ये पाश्चिमात्य राष्ट्रे इंग्लंडला शत्रू मानत होती. अशा वेळी अतिपूर्वेत एकाकी पडलेला जपान व युरोपात एकाकी पडलेला इंग्लंड एकत्र आले आणि ३० जानेवारी १९०२ मध्ये दोहोच्यात 'इंग्लंड  जपान करार' घडून आला. या करारामुळे जपानची प्रतिष्ठा वाढून जपानची बड्या राष्ट्रात गणना होऊ लागली.

फ्रान्स व इटली यांच्यात उत्तर आफ्रिकेतील वसाहतीबाबत समेट घडून इ. स. १९०२ मध्ये 'फ्रँको-इटालियन करार' झाला. १९०२ मध्ये इटलीने असे जाहीर केले की, त्रिराष्ट्र मैत्री करार फ्रान्सविरुध्द नाही. तसेच फ्रान्सवर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राने हल्ला केल्यास इटली तटस्थेची भूमिका घेईल, असे एक गुप्त कलम त्यात घालण्यात आले. अर्थात, हा करार म्हणजे त्रिराष्ट्र मैत्री कराराला गेलेला एक तडा असे समजावे लागेल.

## **इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार-१९०४** (England-France Entente Alliance)

इंग्लंड व फ्रान्स यांचे परंपरागत हाडवैर अनेक शतकांपासून चालत आले होते. इ. स. १८९८ साली झालेल्या फॅशोडा प्रसंगात इंग्लंड व फ्रान्स यांच्यात युध्द होण्याचा धोका निर्माण झाला, पण फॅशोडा घटनेशी संबंधित असलेल्या कॅप्टन मर्चंट व किचनेर यांनी समजूतदारपणा दाखवून अंतिम निर्णय घेण्यासाठी आपापल्या सरकारला आवाहन केले. त्यामुळे फॅशोडाचा युध्द प्रसंग टळला. तसेच फ्रान्स-इंग्लंड संबंध सुधारण्यास मदत झाली. इंग्लंडच्या राजाने फ्रान्सला भेट दिली. फ्रान्सच्या अध्यक्षानेही परराष्ट्रीय मंत्र्यासहित इंग्लंडला भेट दिली. त्यातूनच दोघांच्यात ०८ एप्रिल १९०४ ला इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार घडून आला. या करारामुळे इंग्लंड-फ्रान्स मैत्रीचे एक नवे युग सुरू झाले, असे म्हणता येईल. या कराराने त्रिराष्ट्र मैत्री कराराविरुध्द मजबूत फळी उभारण्यास साहाय्य झाले.

## **इंग्लंड-रशिया मैत्री करार-१९०७** (England -Russia Entente Alliance)

एकोणिसाव्या शतकात रशियाने मध्यपूर्वेत आणि आशियात प्रदेश विस्ताराचा ज्या-ज्या वेळी प्रयत्न केला, त्या-त्या वेळी ब्रिटनने त्यास कसून विरोध केला. विसाव्या शतकात रशियाचा जपानकडून पराभव झाल्याने रशियाची जागतिक प्रतिष्ठा कमी झाली. रशियाला पुन्हा जागतिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी परराष्ट्र धोरणात बदल घडवून आणण्याची रशियाची इच्छा होती. या उद्देशाने तिबेटमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न रशियाने करताच इंग्लंडने आपले तिबेटमधील हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी तिबेटच्या लामाकडे 'यंग हजबंड कमिशन' पाठविले. या कमिशनचा प्रभाव दलाई लामावर पडल्यामुळे दलाई लामाने कोणत्याही

देशास तिबेटच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करण्यास मनाई केली. त्यामुळे रशियाला तिबेटमधून माघार घ्यावी लागली. इंग्लंडमुळे तिबेटमधून माघार घ्यावी लागली असे रशियाला वाटू लागल्यामुळे रशिया-इंग्लंड संबंध बिघडले. याचवेळी बर्लिन-बगदाद रेल्वे योजनेमुळे बाल्कन प्रदेशात जर्मनी हा नवा प्रतिस्पर्धी निर्माण झाला म्हणून जर्मन-रशिया हितसंबंध बिघडत चालले होते. याचवेळी फ्रान्सच्या मदतीने रशिया भारावून गेलेला असल्यामुळे इंग्लंड-रशिया संबंधात फ्रान्सने समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाला यश येऊन इ.स. १९०७ मध्ये इंग्लंड-रशिया मैत्री करार अस्तित्वात आला.

### त्रिराष्ट्र मित्र संघ-१९०७ (Triple Entente)

इंग्लंड-रशिया मैत्री करारामुळे त्रिराष्ट्र मैत्री संघ पूर्ण झाला. १८९३ साली झालेला फ्रान्स-रशिया करार, १९०४ साली झालेला इंग्लंड-फ्रान्स मैत्री करार व १९०७ सालचा इंग्लंड-रशिया मैत्री करार या तिन्ही करारांतील राष्ट्रे सहकाराच्या भावनेने आपोआप एकत्र आली व त्रिराष्ट्र मित्र संघ तयार झाला. अर्थात, त्रिराष्ट्र मैत्री कराराप्रमाणे कोणत्याही अटी वा जबाबदाऱ्या त्रिराष्ट्र मित्र संघावर नव्हत्या, पण त्रिराष्ट्र मैत्री कराराला सामुदायिक विरोध करण्याच्या दृष्टीने इंग्लंड, फ्रान्स व रशिया नैसर्गिकदृष्ट्या एकत्र आले. त्यामुळे त्रिराष्ट्र मैत्री करारास त्रिराष्ट्र मैत्री करारास त्रिराष्ट्र मित्र संघ हा जबरदस्त विरोधी संघ तयार झाला.

### शस्त्रास्त्रवाढीची स्पर्धा :-

त्रिराष्ट्र मैत्री करार व त्रिराष्ट्र मित्र संघ या दोन करारांतील राष्ट्रे समोरासमोर युध्दाच्या पवित्र्यात उभी राहिल्यानंतर शस्त्रास्त्रवाढीच्या स्पर्धेस उधाण आले. शस्त्रास्त्रवाढीबाबतची पहिली योजना १८९८ मध्ये जर्मनीच्या कैसरने जाहीर केली. या योजनेमुळे युरोपीय शांततेला धोका निर्माण होईल, असे काही शांततावादी राष्ट्रांना वाटले. विशेषत: रशियाच्या झार निकोलस दुसरा याने शस्त्रास्त्रवाढीला आळा घालण्यासाठी हेग येथे पहिली आंतरराष्ट्रीय शांतता परिषद इ.स. १८९९ मध्ये बोलाविली. या परिषदेला अमेरिकेसहित २९ राष्ट्रे उपस्थित राहिली. पण आंतरराष्ट्रीय कायदेसंहिता व आंतरराष्ट्रीय न्यायालय निर्माण होण्याशिवाय या शांतता परिषदेतून काहीच निष्पन्न झाले नाही. जर्मनीच्या कैसरने या परिषदेच्या आवाहनाला अजिबात प्रतिसाद दिला नाही. इ.स. १९०७ मध्ये कैसरने आपला नाविक दल वाढीचा दुसरा कार्यक्रम जाहीर केला. त्याचवेळी पुन्हा रशियाच्या दुसऱ्या कैसरने इ.स. १९०७ हेग याच ठिकाणी दुसरी आंतरराष्ट्रीय शांतता परिषद बोलावली. या परिषदेला पूर्वीपेक्षाही जास्त म्हणजेच ४४ राष्ट्रे उपस्थित राहिली. या परिषदेत शत्रास्त्र स्पर्धेला आळा घालण्याचे मुलभूत तत्व मान्य झाले, तरी तपशिलाबाबत एकमत होऊ शकले नाही.

### अमेरिकेचे जागतिक राजकारणात पदार्पण

इ.स. १८८० मध्ये अमेरिकेने जागतिक राजकारणात पदार्पण केले. वॉशिंग्टनप्रणित अलिप्ततावादी परराष्ट्रीय नीतीचा अवलंब केला. अमेरिकेचे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाल्याने निर्यात व्यापार

वाढला व परदेशी बाजारपेठांची आवश्यकता निर्माण झाली. अमेरिकेने 'अखिल अमेरिका संघटना' स्थापन केली. अमेरिकेने इ.स. १८९८ ला प्रशांत महासागरातील हवाई बेटे ताब्यात घेतली. इ.स. १८९९ ला जर्मन-फ्रान्सबरोबर तह करून सामोआ बेटे (प्रशांत महासागर) हस्तगत केली. इ.स. १८९८ ला स्पेनचा पराभव केला. इ. स. १९०० मध्ये मुक्तव्दार नितीची घोषणा करून अमेरिकेने चीनमध्ये आर्थिक व व्यापारी सवलती मिळवल्या. कोलंबियाकडून पनामा कालव्याची भूमी मिळविली. इ.स. १९११ मध्ये मोरोक्को प्रकरणात हस्तक्षेप करून फ्रान्स-जर्मनी तह घडवून आणला. साम्राज्यवादी थिओडोर रूझवेल्ट व महत्वकांक्षी विड्रो विल्सन यांनी परराष्ट्र धोरणाचा अवलंब केला. युध्दजन्य युरोपियन राजकारणात अमेरिका प्रत्यक्ष सहभागी नव्हती. परंतु तिचे जागतिक राजकारणात पदार्पण व युध्दकाळातील परिस्थितीमुळे ती महायुध्दात सहभागी झाली.

## ❁ आंतरराष्ट्रीय घडामोडी :-

इ.स. १९०६ ते १९१४ हा काळ आंतरराष्ट्रीयदृष्ट्या आणीबाणीचा समजला पाहिजे. कारण युरोपची शांतता धोक्यात येऊन युरोपात शस्त्रसज्ज शांतता निर्माण झाली. जर्मनीने त्रिराष्ट्र मित्र संघ मोडण्याच्या दृष्टीने मोरोक्कोतील फ्रान्सच्या वर्चस्वाला हात घातला. मोरोक्कोमध्ये फ्रान्स व स्पेनचे संपूर्ण वर्चस्व असल्यामुळे मोरोक्कोचे संरक्षकपद फ्रान्सला हवे होते. यासाठी फ्रान्सने स्पेन व इटलीशी कराराही केलेले होते. या करारातील कलमे जर्मनीस मान्य होणे शक्य नव्हते म्हणून मोरोक्कोतील जर्मनीचे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने कैसरने टँझीर् मध्ये पाऊल ठेवले. कैसरने मोरोक्कोच्या सुलतानाला फ्रान्सचे वर्चस्व झुगारून देण्याबाबत जाहीर पाठिंबा दिला, पण फ्रान्सला जर्मनीचा हस्तक्षेप सहन होणे शक्य नव्हते. कैसरने मोरोक्को प्रश्नावर आंतरराष्ट्रीय परिषद बोलावण्याची मागणी केली, पण फ्रान्सचा परराष्ट्रमंत्री डेलकासेने ही मागणी धुडकावून लावली. अर्थात, त्याच्या सहकाऱ्यांनी जर्मन मागणी उचलून धरल्यामुळे डेलकासेने आपला राजीनामा सदर केला. त्यामुळे मोरोक्को प्रश्न अधिकच गंभीर होत चालला. सुदैवाने अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट यांच्या मध्यस्तीने मोरोक्को प्रश्न आंतरराष्ट्रीय परिषदेसमोर ठेवण्यास मान्यता दिली. ही परिषद इ. स. १९०६ ला अल्जिसिरास येथे झाली. या परिषदेत घेतलेल्या निर्णयामुळे जर्मनीचा राजनैतिक पराभव झाला व त्रिराष्ट्र मैत्री संघ खंबीर असल्याचे जर्मनीच्या निदर्शनास आले.

'त्रिराष्ट्र मैत्री संघ' अभेद्य आहे असे जर्मनीच्या लक्षात येताच 'त्रिराष्ट्र मित्र करार' (Triple Alliance) मजबूत करण्याची गरज जर्मनीस भासू लागली. म्हणून ऑस्ट्रिया-हंगेरीला सबळ पाठिंबा देऊन घनिष्ठ संबंध जर्मनीने प्रस्थापिले. ऑस्ट्रियाला जर्मनीचा पाठिंबा असल्यामुळे 'त्रिराष्ट्र मैत्री करार' बळकट झाला.

मोरोक्को प्रश्न पुन्हा एकदा १९११ मध्ये उद्भवला. मोरोक्कोतील अंतर्गत यादवीची संधी साधून फ्रान्सने मोरोक्कोत सैन्य आणले. ही घटना १९०९ च्या मोरोक्को कराराविरोधी असल्यामुळे जर्मनीने

फ्रान्सच्या कारवाईस विरोध म्हणून आपली पॅन्थर युध्दनौका ॲगादीर बंदरात आणून उभी केली. तरीही या पेचप्रसंगातून मार्ग निघाल्यामुळे इ. स. १९११ ला फ्रान्स-जर्मनी करार होऊन संघर्ष तात्पुरता मिटला. या संघर्षाने त्रिराष्ट्र मित्र संघाची ताकद किती आहे, हे जर्मनीस कळून चुकले.

आंतरराष्ट्रीय समस्यांना गंभीर स्वरूप देण्यास बाल्कन युध्दांनी हातभार लावला.

१९१२ व १९१३ साली झालेली बाल्कन युध्दे ही एका अर्थी पहिल्या महायुध्दाची रंगीत तालीमच होती, असे म्हणणे रास्त होईल. पहिले महायुध्द प्रत्यक्ष सुरु होण्यापूर्वी युरोप अशांत झाला होता. त्रिराष्ट्र मैत्री करार (Triple Alliance) व त्रिराष्ट्र मित्र संघ (Triple Entente) यांच्यातील सत्तास्पर्धा शिगेला पोहचली होती. याचवेळी युरोपची दोन गटांत विभागणी झाली होती. त्रिराष्ट्र मैत्री करारात (Triple Alliance) सामील असलेली जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी व इटली ही राष्ट्रे एका गटात आणि त्रिराष्ट्र मित्र संघात (Triple Entente) एकत्र आलेली इंग्लंड, फ्रान्स व रशिया ही राष्ट्रे दुसऱ्या गटात परस्परांसमोर उभी ठाकली होती. शेवटी २८ जून १९१४ रोजी घडलेल्या ऑस्ट्रियाचा युवराज आर्चड्यूक फर्डिनांड याच्या खुनाचे निमित्त होऊन पहिल्या महायुध्दाला तोंड फुटले.

## २.२.२ पहिल्या महायुध्दास सहाय्यभूत घटक

### १. आक्रमक राष्ट्रवाद :-

पहिल्या महायुध्दापूर्वी युरोपात राष्ट्रवादाने आत्यंतिक स्वरूप धारण केले होते. राष्ट्रवाद म्हणजे आपल्या राष्ट्राबद्दल व्यक्तीला वाटणारे प्रेम किंवा व्यक्तीची राष्ट्राच्या ठायी असलेली निष्ठा होय. परंतु १९ व्या शतकामध्ये युरोपियन राष्ट्रांमध्ये आपल्या राष्ट्राविषयी प्रेम व दुसऱ्या राष्ट्राविषयी द्वेषाची भावना निर्माण होऊन आक्रमक राष्ट्रवादाचा उदय झाला. याच आक्रमक राष्ट्रवादाने राष्ट्राराष्ट्रांमध्ये द्वेषाची भावना निर्माण झाली. जर्मन नागरिकांची अशी मनोभूमिका निर्माण केली की, जर्मनीच्या एकनिष्ठ नागरिकाने फ्रान्सचा द्वेष केलाच पाहिजे. इंग्लंडशी शत्रुत्व केले पाहिजे याउलट फ्रान्समध्येही अशीच मनोभूमिका लोकांच्यात रुजवली गेली.

फ्रेंच राज्यक्रांतीने प्रखर राष्ट्रवादाला व तत्पूर्वी इ. स. १७७६ च्या अमेरिकन स्वातंत्र्ययुध्दाने राष्ट्रवादाच्या कल्पनेला जन्म दिला. युरोपमध्ये नेपोलियन बोनापार्टच्या आक्रमक युध्दातून आधुनिक राष्ट्रवाद जन्मास आला. फक्त आपणच जगावर राज्य करण्यास लायक आहोत, असे प्रत्येक राष्ट्रांना वाटू लागले. इटली व जर्मनीच्या एकीकरणानंतर आत्यंतिक राष्ट्रवाद वाढीस लागला. जर्मनीने फ्रान्सचे आल्सेस व लॉरेन्स हे प्रदेश आपल्या ताब्यात घेतल्याने जर्मनीविषयी द्वेषाची भावना फ्रेंच जनतेत निर्माण करण्याचे काम गॅबेटासारख्या विचारवंताने केले. आपल्या देशाबद्दलच्या व्यापारी, आरमारी स्पर्धा करून इंग्लंडच्या प्रचंड साम्राज्याचे लचके तोडण्याचा जर्मनी प्रयत्न करू लागले. बाल्कन राष्ट्रातून उदयाला आलेला विशाल सर्बिया

सर्ब (Serbs) लोकांना एकत्र आणण्याची स्वप्ने पाहू लागला. याउलट सर्बियातील चळवळी मोडून काढून वरील दोन्ही प्रांत कायमचे बळकावण्याचे प्रयत्न ऑस्ट्रिया करू लागला. यामुळे अशांतता निर्माण होऊन महायुध्दाचा स्फोट झाला. हेजन या इतिहासकाराच्या मते, प्रत्येक राष्ट्रात स्वार्थाची भावना वाढत चालली होती. एकमेकांबद्दल व्देष वाढला होता की युध्द अनिवार्य झाले होते.

## २. वंशवाद :-

आपलाच वंश श्रेष्ठ अशा भावनेला वंशवाद असे म्हणतात. जर्मन वंश श्रेष्ठ म्हणून जर्मनीचे वर्चस्व सर्वत्र प्रस्थापित झाले पाहिजे असे जर्मन लोकांना वाटू लागले. सर्व्हियाने सर्व स्लाव्ह लोकांना एकत्र आणण्यासाठी सर्व स्लाव्ह आंदोलन (Pan slav Movement) रशियाच्या मदतीने सुरु केले होते कारण रशिया व सर्व्हिया या दोन राष्ट्रांत राहणारे लोक एकाच वंशाचे म्हणजे स्लाव्ह वंशाचे होते. आमचा वंश श्रेष्ठ आहे हे सिध्द करण्यासाठी सर्व्हियन तरुणांनी काही गुप्त संघटना स्थापन केल्या. काळा हात (Black Hand), ऐक्य किंवा मृत्यू (Union or Death) अशी त्यांची नावे होती. त्यांचे चिन्ह म्हणजे माणसाच्या डोक्याची कवटी व एकमेकाला छेदून जाणारी हाडे, त्याखाली सुरा, बॉम्ब व विषाची बाटली. याचा अर्थ असा की, या संघटनेचे सभासद प्राणाचे बलिदान करण्यास तयार होते. जर्मनीनेही अशा गुप्त संघटनांना प्रोत्साहन दिले. आपले वांशिक श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी दोघांपुढे युध्दाशिवाय दुसरा मार्ग नव्हता.

## ३. बिस्मार्कची संघपध्दती :-

पहिल्या महायुध्दाची बीजे बिस्मार्कच्या संघपध्दतीच्या राजकारणात दिसतात. सर्व युरोप परस्परविरोधी दोन गटात विभागला गेला. त्यामुळे स्पर्धा वाढली. स्पर्धासंघर्षातून महायुध्दाचा भडका उडाला. इ. स. १८७१ मध्ये बिस्मार्कने फ्रान्सचा पराभव केला. व अल्शेस-लॉरेनचा प्रदेश हस्तगत करून जर्मन साम्राज्याची उभारणी केली. युरोपच्या राजकारणात परस्परविरोधी करार केले व मित्र मिळविले. जर्मनी, ऑस्ट्रिया, रशिया यांच्यातील बादशहांचा करार, फ्रान्स रशियाविरुध्द जर्मनी, ऑस्ट्रिया यांच्यातील लष्करी करार (१८७९) नंतर इटलीला या करारात ओढून केलेला 'त्रिराष्ट्र मैत्री करार' (१८८२)यांचा बिस्मार्कने आपल्या काळात युरोपात शांतता टिकविण्यासाठी व समतोल राखण्यासाठी चांगला उपयोग करून घेतला. फ्रान्सला मित्र मिळू द्यायचा नाही या जर्मनीच्या भूमिकेमुळे फ्रान्स मित्रांच्या शोधात राहिला. फ्रान्सने अनेक राष्ट्रांशी सहकार्याची भूमिका स्वीकारली. यातून इ. स. १८९४ मध्ये फ्रान्स-रशिया मैत्री करार झाला. अशा प्रकारे बिस्मार्कच्या संघ पध्दतीने संपूर्ण युरोप दोन गटात विभागला जाऊन होणारी स्पर्धा, चुरस पहिल्या महायुध्दास सहाय्यभूत ठरली.

## ४. युरोपचे दोन परस्परविरोधी गटात विभाजन :-

१ सप्टेंबर १८७० रोजी फ्रान्स-प्रशिया युध्द झाले. यात फ्रान्सचा पराभव झाला. फ्रान्सने शरणागती

पत्करली. युरोपियन राजकारणात इंग्लंडने अलिप्तता स्वीकारली होती. ऑस्ट्रिया व रशिया कमकुवत होते. त्यामुळे साहजिकच युरोपचे नेतृत्व जर्मनीकडे आले. फ्रान्सचा सम्राट तिसरा नेपोलियन यास रणांगणावर कैद, पॅरिसच्या रस्त्यावरून जर्मन लष्कराचे विजयी संचलन, जर्मन लष्कराने पॅरिसची केलेली लूट, पॅरिस शहराचे सौंदर्य बिघडवले, व्हर्सायच्या राजवाड्यातील आरसे महालात विल्यम पहिला याचा जर्मनीचा बादशहा म्हणून राज्याभिषेक, फ्रंकफर्टच्या तहानुसार फ्रान्सचे अल्सेस व लॉरेन्स हे प्रांत जर्मनीने हिसकावून घेतले. या विविध घटनांमुळे फ्रान्सच्या मनात जर्मनीबद्दल सुडाची भावना निर्माण झाली. त्यावेळी बिस्मार्क हा जर्मनीचा चॅन्सेलर होता. तो राजकारणी व धूर्त होता.

आपण फ्रान्सला दुखावले आहे हा फ्रान्स आज ना उद्या आपल्यावर सूड घेईल याची त्याला खात्री होती. म्हणून जर्मनीचे रक्षण करणे व युरोपियन राजकारणात फ्रान्सला एकाकी पाडणे हे बिस्मार्कच्या परराष्ट्रीय धोरणाचे प्रमुख सूत्र बनले. त्यामुळे प्रथम इ. स. १८७९ मध्ये ऑस्ट्रिया-जर्मनी मैत्री करार (Dual Alliance) आणि इ. स. १८८२ मध्ये जर्मनी व ऑस्ट्रिया यांच्यामध्ये इटली सामील झाला त्यातून 'त्रिराष्ट्र मैत्री करार' (Triple Alliance) घडून आला.

इ. स. १८९० मध्ये जर्मनीचा चॅन्सेलर बिस्मार्क याने राजीनामा दिल्यानंतर जर्मनीची सर्व सूत्रे सम्राट कैसर विल्यम दुसरा याच्याकडे आली. तो जबरदस्त महत्त्वाकांक्षी होता. जगावर प्रभुत्व गाजवावे अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याचा परिणाम असा झाला की ४ जानेवारी १८९४ रोजी फ्रान्स-रशिया यांच्यात लष्करी करार घडून आला. इ. स. १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स यांच्यातील जुने शत्रुत्व संपून परस्पर मैत्री करार झाला. तसेच त्यातून इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्यात 'त्रिराष्ट्र मित्र करार' घडून आला.

वरील दोन करारामुळे युरोपची विभागणी दोन गटात झाली. कालांतराने जर्मनीच्या गटात हंगेरी, बल्गेरिया व टर्की तर फ्रान्सच्या गटात सर्व्हिया, रुमानिया व ग्रीस सामील झाले. वरील दोन्ही गट एकमेकांच्या शत्रुत्वातून तयार झाले होते. एकमेकांना नष्ट करण्यासाठी दोघांनी युध्दाची तयारी चालविली. त्यांच्यातील शत्रुत्व इतके पराकोटीला गेले होते की, त्यांच्यासमोर युध्दाशिवाय दुसरा मार्ग नव्हता. या परिस्थितीबद्दल इ. स. १८९१ मध्ये बिस्मार्कने भाष्य केले होते की, 'युरोपियन शांतीची अवस्था एखाद्या हृदय विकाराने चिडलेल्या रुग्णासारखी झालेली होती. कदाचित काही काळ तो रोगी जगेलही, परंतु कधी दगावेल याचा नेम मात्र नाही.'

## ५. लष्करवाद :-

युरोपात परस्परविरोधी दोन गट निर्माण झाल्यानंतर या दोन्ही गटांनी युध्दांची तयारी चालविली. जर्मनीने सक्तीने सैन्यभरती सरू केली. जर्मनीच्या पायदळाची सैन्य संख्या आठ लाखांवर गेली. त्यामुळे हे पाहून फ्रान्स व रशियानेसुध्दा लष्करीकरणाला सुरुवात केली. परस्परांबद्दल संशय आणि भीती यामुळे लष्करीकरणावर अधिकाधिक भर देण्यात आला. प्रत्येक राष्ट्रांच्या लष्करी खर्चाचा आकडा दरवर्षी फुगू

लागला. ही युध्दसज्जता केवळ शांततेकरिता व सुरक्षेकरिता आहे असे प्रत्येक राष्ट्राने कितीही सांगितले तरी त्यामुळे अविश्वास व भीती वाढू लागली. त्यामुळे पुन्हा युध्दसज्जता असे दुष्टचक्र सुरूच होते. निरनिराळ्या देशांतील भांडवलदारांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन शस्त्रास्त्रे व दारुगोळा यांचे प्रचंड कारखाने उभारले होते. आर्मस्टॉग, इनेडट व स्कोडा व्हिस्पर या कारखान्यांनी प्रचंड युध्द साहित्याची निर्मिती केली. या कारखान्यांच्या मालकांना आपला माल खपविण्यासाठी युध्दाची आवश्यकता वाटू लागली. आपल्या आर्थिक फायद्यासाठी सर्व भांडवलदारांनी संगनमत केले. व आपापल्या सरकारला युध्दासाठी प्रवृत्त केले. इंग्लंड व जर्मनीत नाविक स्पर्धा सुरु झाली होती, ''जगातील सर्वात मोठ्या नाविक शक्तीशी टक्कर देण्याइतपत जर्मनीचे नौदल समर्थ असावे.'' असे ध्येय जर्मनीने घोषित करताच इंग्लंडही स्व-संरक्षणासाठी आपले नाविक सामर्थ्य वाढवू लागले. इ. स. १९०३ मध्ये रोझिथ येथे इंग्लंडने उत्तम प्रतीचा नाविक तळ उभारण्यास सुरुवात केली. दरवर्षी चार मोठ्या युध्दनौका बांधण्याची योजना आखली. इ. स. १९०८ पासून ड्रेड नॉटस या प्रचंड शक्तिशाली युध्दनौका बांधल्या. या बाबतीत जर्मनीही मागे राहणार नव्हता. जर्मनीने उत्तर समुद्र व बाल्टिक समुद्र यांना जोडणारा किल कालवा तयार केला. आता उत्तर समुद्रामध्ये जर्मनीचे आरमार फिरू लागले. जर्मनीने तर उघडपणे लष्करवादाचा पुरस्कार केला. जर्मनीचा चॅन्सलर व्हॉल बुलाव जर्मनीची भरभराट व तिचा सन्मान प्रबळ लष्कर आरमारावर अवलंबून आहे असे वक्तव्य करू लागला. या लष्करवादाला खतपाणी देण्याचे कार्य विचारवंतांनी केले. जर्मन तत्त्वज्ञ नित्शे म्हणतो, ''मानव समाजाला युध्दाचा विसर पडला तर त्याचा उत्कर्ष होणार नाही.'' जर्मनीचा सेनापती फिल्ड मार्शल मोल्टके याने, ''लष्करी संघर्ष हे मानवी वंशासाठी एक जालीम औषध आहे'' असे सांगण्यास सुरुवात केली. फ्रेंच तत्त्वज्ञ अर्नेस्ट रेनान याने ''युध्दाच्या नांगीमुळेच देश निद्रिस्त होत नाही'' असे विचार मांडले. 'युध्द ही आवश्यक वाईट गोष्ट आहे.' ''युध्द करणे गुन्हा नाही तर युध्दात अपयश येणे हा गुन्हा आहे'' असे तत्त्वज्ञान अनेक तज्ज्ञांनी मांडले त्याचा परिणाम होऊन शेवटी महायुध्द झाले.

### ६. साम्राज्यवाद :-

पहिल्या महायुध्दाला जबाबदार ठरलेला आणखी एक घटक म्हणजे युरोपियन राष्ट्रांचा साम्राज्यवाद. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्या राष्ट्रांचे औद्योगिकीकरण झपाट्याने घडून येऊन फार मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. त्याबरोबर हुकमी बाजारपेठा, मँगनीज, लोखंड, कोळसा, रबर, इत्यादी कच्च्या मालाचा निश्चित पुरवठा, वाढत्या लोकसंख्येमुळे राहायला जागा व अतिरिक्त भांडवलाच्या गुंतवणुकीकरता अनुकूल क्षेत्र, या सर्व दृष्टींनी अविकसित क्षेत्रात वसाहती मिळवून घेण्याची निकड त्या राष्ट्रांना वाटून त्याकरिता साम्राज्य स्पर्धा सुरु झाली. आफ्रिकेसारख्या विशाल खंडात जोपर्यत वसाहती मिळविण्याकरिता भरपूर प्रदेश उपलब्ध होता तोपर्यत या स्पर्धेतून निर्माण होणारे मतभेद सामोपचाराने मिटू शकले. परंतु जसजसे एकामागून एक प्रदेश व्यापले जाऊ लागले तसतसे उरलेल्या व महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रदेशांच्या प्राप्तीकरता युरोपीय राष्ट्रांतील कलह व त्याबरोबर शत्रुत्व विकोपाला जाऊ लागले. सुदानच्या प्राप्तीकरता इंग्लंड व

फ्रान्स यांच्यात युध्द भडकते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली; तर मोरोक्कोच्या कारणावरून फ्रान्स व जर्मनी ही राष्ट्रे वर्दळीवर आली. या साम्राज्यस्पर्धेत इंग्लंड आघाडीवर होते. १९१४ मध्ये जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले ब्रिटीश साम्राज्य क्षेत्रफळाने प्रत्यक्ष ब्रिटीश बेटांपेक्षा ६० पटींनी मोठे होते. आणि त्यामुळे ब्रिटीश साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नाही अशी प्रौढी तेथील लोक मोठ्या दिमाखाने मारीत होते. त्यात ब्रिटीशांची असीम साम्राज्य लालसा, त्यांत त्यांनी मिळविलेले यश व त्यामुळे इतर राष्ट्रांच्या मनात निर्माण झालेली असूया व द्वेष, यांचे स्पष्ट प्रतिबिंब उमटलेले दिसते. जर्मनीचा दुसरा विलियम गादीवर आल्यानंतर ''सूर्यप्रकाशात जागा'' मिळविण्याकरिता त्याही राष्ट्राची धडपड सुरु झाली. वसाहती मिळविण्याची दुर्दम्य ईर्षा व त्याकरता अनिवार्य वाटलेले नाविक सामर्थ्य, यामुळे जर्मनी व इंग्लंड यात संघर्ष अटळ ठरला. साम्राज्यविस्ताराच्या या स्पर्धेमुळे निर्माण झालेल्या शत्रुत्वाचे पर्यवसन महायुध्दात झाले.

### ७. वसाहतवाद :-

युरोपातील प्रत्येक छोट्या-मोठ्या राष्ट्रांनी आफ्रिका व आशिया खंडात वसाहती मिळवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न चालवला. वसाहती मालकीच्या झाल्यास बऱ्याच गोष्टी साध्य करता येत असत. सर्वप्रथम म्हणजे आपल्या देशातील औद्योगिक उत्पादनात कच्च्या मालाचा पुरवठा खात्रीने वसाहतीतून करता येत होता. नंतर आपल्या देशात तयार झालेला पक्क्या मालास निश्चित बाजारपेठ म्हणून उपयोग होता. त्यानंतर आपल्या देशातील वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या साधनसामुग्रीवर पडणारा बोजा वसाहतीत नागरिकांचे स्थलांतर करून कमी करता येत होते. शिवाय वसाहतीतून अतिशय स्वस्त दराने मनुष्यरूपाने श्रमशक्ती उपलब्ध होत असल्याने उत्पादन कमी खर्चात होत असे. त्यावर भरपूर नफा कमावणे कारखानदारांना शक्य होई व वसाहतीमुळे देशाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा सहज साध्य करता येत असे. या फायद्यामुळे फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, रशिया, इटली, जपान, ऑस्ट्रिया, हंगेरी, डेन्मार्क, स्पेन, पोर्तुगाल व अमेरिका इत्यादी राष्ट्रांनी वसाहती मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यातून राष्ट्राराष्ट्रात स्पर्धा वाढली. प्रत्येक राष्ट्राला आर्थिक. प्रादेशिक, राजकीय लाभ होत असल्यामुळे जास्तीत जास्त वसाहती जिंकण्यात स्पर्धा सुरु झाल्या. वसाहती स्थापन करण्याच्या युरोपियन देशाच्या स्पर्धेमुळे पहिले महायुध्द झाले.

### ८. युध्दविषयक तत्त्वज्ञानाचा प्रसार :-

प्रत्येक युध्दविषयक प्रसंगी युध्दाची अपरिहार्यता जनतेच्या मनावर बिंबविण्याकरिता युध्दपिपासू राष्ट्रे आपल्या वृत्तीला तत्त्वज्ञानाचा मुलामा देतात. जर्मनीच्या एकीकरणाचा शिल्पकार बिस्मार्क याचा शांतता व वाटाघाटी या मार्गावर विश्वास नव्हता. बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणाच्या वेळी असे म्हटले होते की, ''आपल्या काळातील समस्या विधिमंडळात भाषणे करून आणि बहुमताने विधेयके पास करून सुटणार नाहीत, तर त्या रक्तपात आणि तलवारीच्या खणखणाटानेच सुटतील.'' (The great questions of the day will not ce resolved cy speeches and majority resolutions, cut cy clood and iron)

त्याचे हे धोरण 'रक्त व लोहनिती' (Blood Iron Policy) म्हणून ओळखले जाते. देशात सर्वत्र युध्दाचेच विचार बोलले जाऊ लागले. त्यामुळे युरोपातील प्रत्येक नागरिक युध्दमय विचारांनी भारून गेला त्यातून युध्द ही एक नैतिक जबाबदारी समजून युध्द प्रसंगाची तो आतूरतेने वाट पाहू लागला.

प्रसिध्द विचारवंत हेगेल म्हणतो की, ''राष्ट्र म्हणजे परमेश्वर ही कल्पना करून राष्ट्रासाठी व्यक्तीने आत्मसमर्पण केले पाहिजे'' अशी शिकवण दिली. त्याची युध्दतत्त्वज्ञानावर मोठी श्रध्दा होती. राष्ट्राचा पुरुषार्थ म्हणजे युध्द. लुडेन डार्फ जर्मन सेनानी जर्मन जनतेला सांगत होते की, ''युध्दामुळेच शौर्य, धैर्य अशा श्रेष्ठ गुणांची जोपासना होते. अकार्यक्षम, दुबळी व जगण्यास लायक अशी माणसे नाहीशी करून केवळ सर्वश्रेष्ठ व पूर्णावस्थेला गेलेल्या मानवाचे अस्तित्व भूतलावर असावे असा विधी संकेत आहे व त्याकरता युध्द हा एकमेव परमेश्वर नियोजित मार्ग आहे.'' इंग्लंडचे तत्त्वज्ञ रस्कील जनतेला युध्दाचा कानमंत्र देताना म्हणत, ''युध्दाने राष्ट्राला जन्म दिला तर शांततेत त्याचा अस्त होईल. म्हणूनच युध्दाशिवाय गत्यंतर नाही अन्यथा इंग्लंडचा सर्वनाश होईल.'' अमेरिकन राष्ट्राध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांनीही लष्करी सामर्थ्य व सामर्थ्यसंपन्न अमेरिकेची निर्मिती या गोष्टींचा आग्रह धरला.

या सर्वांच्या विचारांचा प्रभाव पडून जर्मन तरुणांना वाटू लागले की सर्व जागतिक समस्या या युध्दानेच सोडवल्या जातात. या तत्त्वज्ञानामुळे युध्दप्रवृत्ती वाढून पहिल्या महायुध्दास सुरुवात झाली.

## ९. जर्मनीचे आक्रमक परराष्ट्र धोरण :-

बिस्मार्कने अनेक गुप्त करार व तह करून जर्मनीला युरोपात प्रथम दर्जाच्या सत्तेचे स्थान मिळवून दिले. पण कैसरला बिस्मार्कसारखी कुशल व कुटील परराष्ट्र धोरण समजले नाही. कैसरने प्रत्येक राष्ट्राने जर्मनीचे वर्चस्व पत्करले पाहिजे हा उद्देश समोर ठेवून प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत व परराष्ट्रीय राजकारणात हस्तक्षेप केला. इंग्लंडशी नाविक स्पर्धा केली. कैसरने आपल्या परराष्ट्रीय धोरणात वसाहतवाद, लष्करवाद यांचा समावेश केल्यामुळे प्रत्येक युरोपियन राष्ट्राला कैसरचे धोरण धोक्याचे वाटू लागले. त्यामुळे रशिया, इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे जर्मनीचे आक्रमक धोरण मोडण्यासाठी प्रयत्नशील राहिले यातूनच पहिले महायुध्द झाले.

## १०. कैसर विल्यमची अतिमहत्त्वकांक्षा :-

जर्मनीचा सम्राट कैसर विल्यम दुसरा अतिशय महत्त्वकांक्षी होता. तसेच हट्टी व गर्विष्ठ होता. बिस्मार्कची समझोत्याची भूमिका त्यास मान्य नव्हती. प्रत्येक गोष्ट आपल्या मर्जीप्रमाणे झाली पाहिजे असा त्याचा आग्रह असे. इंग्लंडसारख्या शक्तिशाली राष्ट्रालादेखील वसाहतवादाच्या बाबतीत आव्हान दिले होते. त्यातच त्यांच्यात फार मोठी कटुतेची भावना निर्माण झाली. कैसर विल्यम घमेंडखोर होता. तो नेहमी म्हणत असे, ''एकतर मी जगाचा सत्ताधीश होईन किंवा सर्वनाश पत्करेन. (World Power or downfall).'' अशी टोकाची भूमिका त्याने घेतली होती. तो रागीट स्वभावाचा असल्यामुळे त्याला समजावण्याचे धाडस कोणीही

करत नसे. कैसर विल्यमची अतिमहत्त्वकांक्षा धुळीस मिळवली पाहिजे. तो युरोपखंडावरील फार मोठे संकट आहे अशी भावना सर्व लोकशाही राष्ट्रांत निर्माण झाली. कैसर विल्यमने आपली महत्त्वकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर इंग्लंड व फ्रान्स यांनी त्याची महत्त्वकांक्षा हाणून पाडण्यासाठी हालचाल केली. त्यातून जो संघर्ष झाला त्यामुळे पहिले महायुध्द जवळ येऊन ठेपले.

## ११. युरोपीय वृत्तपत्रांनी केलेला जहरी प्रचार :-

युरोपातील राजकारणात निर्माण झालेल्या तणावाची वृत्ते सर्व देशांतील वृत्तपत्रे भडकपणे देऊ लागली. याकाळात दोन गटात स्पर्धा चालू होती. दुसऱ्या देशाविषयी अपुरी खोटी माहिती पुरवून जनतेला भडकावण्याचे कार्य वृत्तपत्र करत होती. वृत्तपत्रांतून परदेशी वकिलाती, राजदूत, आंतरराष्ट्रीय सभा, बैठकी, चर्चा, मुलाखती, निवदने दिल्यामुळे युरोपातील जनतेच्या मनात व्देषाचे विष भिनू लागले. गटामध्ये तणाव निर्माण झाला असता आपल्याच देशाची भूमिका न्याय आहे, दुसरे राष्ट्र आक्रमक आहे, दुसऱ्यामुळे आपल्या देशास अपमान सहन करावा लागत आहे. यासारखे खरेखोटे पुरावे देवून जनतेला भडकावले जाई. अशा प्रकारच्या प्रचारात सरकारची वर्तमानपत्रेही आघाडीवर होती. अशा प्रकारच्या प्रभावी प्रचारामुळे लोक शत्रू राष्ट्राविषयी संताप, राग, तिरस्कार, व्देष, असंतोष वेगवेगळ्या मार्गाने व्यक्त करत.

फॅसोडा प्रकरणाच्या वेळी फ्रान्स व इंग्लंड यांच्यात वर्तमानपत्रामुळेच तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. इंग्रजी जनतेने फ्रान्सला धडा शिकवण्याची मागणी आपल्या सरकारकडे केली. बोअर युध्दाच्या वेळी इंग्लंड व जर्मनीच्या राज्यकर्त्यात चांगले संबंध असूनही वर्तमानपत्रांनी इंग्लंडविरुध्द प्रचार केला. जर्मन वृत्तपत्रांनी इंग्लंडविरुध्द प्रचार आघाडी उभारली व कैसरवर दबाव आणून त्यास आपली भूमिका बदलावयाला लावली. यानंतरच इ. स. १९०० मध्ये इंग्लंड, जर्मन कट्टर वैरी बनले. जर्मनी फ्रान्समध्ये मोरोक्को संघर्षावेळी वर्तमानपत्रातील प्रचारामुळे शत्रुत्व निर्माण झाले होते. आपले सरकार दुबळलेपणाची भूमिका घेत असल्याचा आरोप जर्मनी व फ्रान्समधील वर्तमानपत्रांनी केला.

अशा प्रकारे वृत्तपत्रांच्या टोकाच्या भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय तणाव वाढत आहे. याची कल्पना युरोपातील राजकीय नेते, मुत्सद्दी, सत्ताधीश यांना होती. पण त्यांनी वर्तमानपत्रांना आळा घालण्याचा प्रयत्न केला नाही. वृत्तपत्रांच्या भडक प्रचारामुळेच पहिले महायुध्द सुरु झाले.

## १२. आंतरराष्ट्रीय संघटनेचा अभाव :-

१९ व्या शतकात अनेक युध्दे झाली, तह घडून आले यासाठी त्या त्या वेळी शांततेचे काही असे प्रयत्न केले गेले. परंतु कायमस्वरूपी एखादी संघटना स्थापन करण्यात आली नाही. प्रत्येक राष्ट्र आपापल्या इच्छेप्रमाणे वागे. जे राष्ट्र सामर्थ्यसंपन्न व बलवान होते व दुसऱ्या देशावर वर्चस्व हुकुमत गाजवी. दोन देशात करार किंवा तह झाला असेल तर त्याचे पालन होते की नाही हे पाहणारी कोणतीही यंत्रणा नव्हती.

कोणत्याही देशाला कोणाचाही धाक नव्हता. प्रत्येक राष्ट्र स्वत:ला श्रेष्ठ समजत होते. युध्दनीतीचे संकेत पाळले जात नव्हते. कोणीही गुप्त तह करावेत व मोडावेत अशी परिस्थिती होती. राष्ट्रांना युध्दापासून परावृत्त करण्यासाठी किंवा युध्द चालू झाल्यास युध्द थांबवण्याकरिता कोणतीच आंतरराष्ट्रीय स्वरुपाची संघटना नव्हती. युध्द टाळण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रभावी सामुदायिक प्रयत्न कोणत्याच संघटनेकडून झाले नाहीत. जे जे प्रयत्न झाले ते अपुरे होते. इ.स. १८६४ मध्ये रेडक्रॉस संघटना स्थापन झाली होती. इ.स. १८९९ व १९०७ मध्ये हेग येथे न्यायालयीन लवाद मंडळ स्थापन झाले होते. परंतु आक्रमक राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद व युध्दप्रवृत्ती यांना आळा घालण्यास या संघटना असमर्थ व अयशस्वी ठरल्या. त्यामुळे महत्त्वाकांक्षी, आक्रमक व सत्तापिपासू, सम्राटावर किंवा देशावर नियंत्रण ठेवणे अशक्य होते. जर पहिल्या महायुध्दापूर्वी राष्ट्रसंघ व युनोसारखी एखादी संघटना असती तर आंतरराष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करणे व युध्दजन्य परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले असते. तसे नसल्याने जग पहिल्या महायुध्दात ओढले गेले.

## १३. राजकारण्यांचा विकृत प्रचार :-

युरोपातील राजकारणी लोकांनी केलेल्या विकृत प्रचारामुळे युरोपियन जनमत प्रक्षुब्ध बनले व त्याचे संतुलन बिघडले. राजकारणात प्रामाणिक व सचोटी नसल्यामुळे सर्व युरोपियन प्रत्येक प्रश्नाकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीनेच पाहू लागले. आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्याही राष्ट्रांनी केलेल्या कोणत्याही हालचालींना विकृत अर्थ दिला जाऊ लागला. मानवी कल्याणाच्या दृष्टीने कोणतेही कृत्य आंतरराष्ट्रीय राजकारणात घडणे शक्यच नाही, सर्व कृत्ये व हालचाली प्रत्येक राष्ट्राच्या स्वार्थातून निर्माण होतात अशी विचित्र धारणा युरोपियन लोकांची बनून गेली. थोडक्यात, युरोपियनांच्या मनात जी विकृती निर्माण झाली त्याचेच पर्यवसान महायुध्दात घडून आले.

## १४. अल्सेस-लॉरेन्स हे दोन प्रांत जर्मनीकडून मिळवण्याची फ्रान्सची महत्त्वकांक्षा :-

इ.स. १८७० मध्ये बिस्मार्कने पाशवी बळाचा उपयोग करून फ्रान्सपासून अल्सेस, लॉरेन्स प्रांत जबरदस्तीने हिसकावले होते. गेलेले प्रांत आपणास परत मिळाले पाहिजेत असे फ्रान्सला वाटत होते. कारण ते दोन्ही प्रांत सुपीक असून खानिजसंपत्तीने समृध्द होते. लॉरेन प्रांतातील लोखंडाच्या खाणी जर्मनीत गेल्याने फ्रान्सच्या औद्योगिक प्रगतीत अडथळे आले होते. तसेच बिस्मार्क व विल्यम दुसरा यांच्या कारवायांनी फ्रेंच जनतेची सूडाची भावना जास्तच बळकट होत गेली तसेच फ्रान्समधील वर्तमानपत्रांनी हा प्रश्न सतत तेवत ठेवून फ्रेंच लोकांची मने भडकावली. जर्मनीचा बदला, सूड घेण्याची संधी फ्रान्स बघत होता. ती संधी जागतिक महायुध्दाच्या रूपाने मिळाली. अनेक फ्रेंच कवी, साहित्यिक हे अल्सेस, लॉरेन प्रांत जर्मनीकडे असणे हा राष्ट्रीय अपमान आहे त्याचा सूड घेतला पाहिजे अशा आशयाचे लिखाण करत होते. फ्रान्सचा हा भावनिक प्रश्न झाल्याने पहिले महायुध्द झाले.

## १५. ट्रिस्ट, ट्रेटिनो इ. प्रदेश परत मिळवण्याची इटलीची इच्छा :-

फ्रान्सला ज्याप्रमाणे अल्सेस व लॉरेन्स हे प्रदेश परत मिळविण्याची महत्त्वकांक्षा होती त्याप्रमाणे इटलीला ट्रिस्ट व ट्रेटिनो इ. प्रदेश ऑस्ट्रियापासून परत मिळवायचे होते. या प्रदेशात इटालियन लोकांची वस्ती होती. परंतु अधिकार मात्र ऑस्ट्रियाचा होता. या प्रदेशाची मुक्ती घडवून आणली पाहिजे व तो आपल्या वर्चस्वाखाली आला पाहिजे, अशी इटलीची तीव्र इच्छा होती. या महत्त्वकांक्षेतून इटली प्रयत्नशील होता. त्यामुळे संघर्ष अटळ होता. त्यामुळे पुढे इटलीने पहिल्या महायुध्दात भाग घेतला.

## १६. इंग्लंड व जर्मनीतील सत्तास्पर्धा :-

प्रथम इंग्लंड हे औद्योगिकदृष्टया पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र होते. इ.स. १८८० नंतर जर्मनीने चांगलीच औद्योगिक प्रगती केली. त्यांचे तंत्रज्ञान प्रगत होते. त्यामुळे सर्व देशातून जर्मनीच्या मालाची मागणी वाढली. व इंग्लंडच्या मालाची मागणी कमी होऊ लागली. खुद्द इंग्लंडमध्ये ही जर्मन मालाची मागणी वाढली. त्यामुळे इंग्लंडला जर्मनी आपला शत्रू वाटू लागला. इ.स. १८८० नंतर हे दोन देश भिन्न लष्करी छावण्याचे नेतृत्व करू लागले. मित्र वाढवू लागले, लष्करी सामर्थ्यात वाढ करण्याची स्पर्धा सुरु झाली. इंग्लंडसारखेच प्रभावी आरमार जर्मनीने उभारले होते. अशा प्रकारे युध्दजन्य परिस्थिती निर्माण होवू लागली. त्यातून पहिले महायुध्द झाले.

## १७. बाल्कन समस्या :-

इ.स. १८७८ मध्ये भरलेल्या बर्लिन परिषदेने बोस्निया व हर्जेगोविना हे बाल्कनमधील दोन प्रांत सांभाळण्यासाठी ऑस्ट्रियाकडे दिले होते. ऑस्ट्रियाने विश्वस्त म्हणून त्यांचा नीट सांभाळ केला, पण इ.स. १९०८ मध्ये टर्कीत तरुण तुर्कक्रांती झाली. त्यातून जो गोंधळ निर्माण झाला त्यामुळे आपल्याकडे टर्कीचे लक्ष नाही हे पाहून ऑस्ट्रियाने बोस्निया व हर्जेगोविना हे दोन प्रांत आपल्या साम्राज्याला जोडून घेतले. (इ.स. १९०८) त्यामुळे सर्बियाने या ऑस्ट्रियाच्या आक्रमक कृतीचा निषेध केला व हे प्रदेश सर्बियात सामील करण्याची मागणी केली. शिवाय ऑस्ट्रियाच्या वर्चस्वापासून बोस्निया व हर्जेगोव्हिना स्वतंत्र होऊ इच्छित होते. त्यामुळे ऑस्ट्रिया व सर्बिया यांचे संबंध ताणले गेले. दरम्यान इ.स. १९१२-१३ मध्ये बाल्कन युध्दे झाली. या युध्दानंतर झालेल्या बुखारेस्टच्या तहान्वये सर्बियाचा विस्तार बराच वाढला. आपल्या वाढलेल्या शक्तीचा उपयोग बाल्कन प्रदेशातील सर्व स्लाव्ह वंशीयांना एकत्र आणण्याचे ठरवून ऑस्ट्रियाकडून बोस्निया व हर्जेगोव्हिना प्रदेश मिळविण्याचा प्रयत्न सुरु केला. ऑस्ट्रिया-हंगेरीदेखील सर्बियाला बाल्कन प्रदेशातील प्रमुख प्रतिस्पर्धी समजत होता. ऑस्ट्रियाच्या साम्राज्यातील स्लाव्ह वंशीय जनता सर्बियाच्या आव्हानाला प्रतिसाद देऊन उठाव करील, या धास्तीने ऑस्ट्रियाने सर्बियाला चिरडून टाकावयाचे ठरविले. यातच सर्बियाच्या कृतीस रशियाने बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्यामुळे बाल्कन समस्या जास्त गंभीर झाली.

रशियाच्या पाठिंब्यामुळे सर्बियाच्या मागणीला जास्त जोर चढला. सर्बियातील वृत्तपत्रांनी व गुप्त संघटनांनी ऑस्ट्रिया-सर्बिया संघर्षात भर घातली.

## १८. तुर्की साम्राज्यातील जर्मन वर्चस्वामुळे बाल्कन प्रदेशातील नवीन समस्या :-

जर्मनीची आर्थिक व लष्करी मदत तुर्कस्थानला मिळू लागल्यामुळे तुर्कस्थान बळकट होऊ लागला. तुर्कस्थानच्या वाढत्या ताकदीमुळे रशियाला चिंता निर्माण झाली. ऑस्ट्रिया-हंगेरी व जर्मनी यांनी सर्बियाला बाल्कन प्रदेशातून वगळून चिरडून टाकण्याचा चंग बांधला. कारण बाल्कन प्रदेशातील रुमानिया व बल्गेरिया राष्ट्रांचे राजे जर्मन घराण्यातील होते व ग्रीसची राणी ही तर जर्मन राजकन्याच होती. म्हणजे बाल्कन प्रदेशात ऑस्ट्रिया-जर्मनी यांना विरोधी एकुलते एक राष्ट्र सर्बिया होते. सर्बियाला माफ केल्यास स्लाव्ह वंशीयांची चळवळही थांबेल आणि कॉन्स्टॅटिनोपल, सॅलोनिका या पूर्वेकडील प्रदेशांत जाण्याचा मार्ग खुला होईल. त्यावेळी सर्बियाला रशियाचा पाठिंबा असला तरी रशियाला चकवून सर्बियाचा धुव्वा उडविण्याची ऑस्ट्रिया-जर्मनीची इच्छा होती व योग्य संधीची ते वाट पाहत होते. अशा रितीने बाल्कन समस्येमुळे युध्दाचा दिवस अगदीच जवळ आणला. ग्रॅन्ट टेम्पर्लेयांच्या शब्दांत इ. स. १९१४ च्या महायुध्दाला बाल्कन युध्दे (१९१२-१३) जितकी कारणीभूत झाली, तितकी इतर कोणतीही एक गोष्ट कारणीभूत झाली नाही. (No single event influenced the outpreak of war in 1914 more than that Balkan Wars of 1912-13).

## १९. मॅसोडोनियाच्या वाटपाबाबतीत मतभेद :-

बाल्कन प्रदेशातील मॅसोडोनियावर नियंत्रण कोणाचे असावे हा स्फोटक प्रश्न होता. बर्लिन तहाने मॅसोडोनिया तुर्कस्थानच्या वर्चस्वाखाली देण्यात आला. तुर्कस्थानने तेथील जनतेवर अन्याय, जुलूम, अत्याचार केले. याला प्रतिकार करणे मॅसोडोनियातील जनतेला जमले नाही. येथील लोक ग्रीक, स्लाव्ह व बल्गर वंशाचे होते. या जनतेच्या मदतीसाठी ग्रीस, सर्बिया व बल्गेरिया या देशांची जाण्याची इच्छा होती. शिवाय रशियाला ही संधी हवीच होती. रशियाने सर्बियाला पाठिंबा दिला. ग्रीस व बल्गेरिया यांनी मॅसोडोनियातील आपला वाटा उचलण्याची तयारी चालवली. यातून तिन्ही बाल्कन राष्ट्रात मॅसोडोनियाच्या वाटपाबाबत मतभेद सुरु झाले. या स्पर्धेत ऑस्ट्रिया, जर्मनी यांनीही हिरीरीने भाग घेतला. त्यामुळे स्वरूप गुंतागुंतीचे बनले. ही परिस्थिती युध्दास साहाय्यभूत ठरली.

## २०. मोरोक्को प्रकरण :-

मोरोक्को हे आफ्रिकेच्या वायव्य टोकाला असलेले स्वतंत्र इस्लामी राज्य होते. जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीजवळ वसलेले स्वतंत्र इस्लामी राज्य होते. जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीजवळ वसलेले असल्याने त्याला भौगोलिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. शिवाय तेथे लोखंड व कोळशाचे समृध्द साठे होते.

अब्दुल अझीझ नावाचा अल्पवयीन सुलतान इ. स. १९०० पासून तेथे राज्य करीत होता. लष्करीदृष्ट्या हा देश दुर्बल असल्यामुळे युरोपियन राष्ट्रांची नजर त्या प्रदेशाकडे वळली. फ्रान्सने सुलतानाला फार मोठ्या रकमा कर्जाऊ देऊन आपला आर्थिक शिरकाव करून घेतला होता. फ्रान्सला बऱ्याच सवलती मिळाल्या. अप्रत्यक्षपणे मोरोक्कोवर फ्रान्सचे राज्य सुरु झाले. इ. स. १९०५ मध्ये जर्मनीच्या पाठिंब्याने मोरोक्कोतील सुलतानाने बंड केले. याचा विचार करण्याकरिता स्पेनमधील अल्जेसिराज येथे युरोपियन देशांची बैठक भरली. यात फ्रान्सच्या मोरोक्कोवरील अधिकाराला मान्यता देण्यात आली. मोरोक्को प्रकरणात युरोपातील दोन राष्ट्रगटांच्या परस्पर सामर्थ्याची पहिली परीक्षा झाली व त्यात फ्रान्सच्या गटाची सरशी झाली.

इ. स. १९११ मध्ये मोरोक्कोत पुन्हा राष्ट्रवादी उठाव झाला. फ्रान्सने मोरोक्कोतील बंडाविरुध्द कडक कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. काही शहरांचा ताबा घेण्यासाठी फौजा पाठविल्या. राजधानी फेझ व राबत बंदर फ्रेंच फौजांनी व्यापले. मोरोक्कोत फौजा पाठविल्यामुळे सुलतानाच्या सार्वभौमत्वावर संकट आले व फ्रान्सने पूर्वीच्या कराराचा भंग केला असा आरोप जर्मनीने फ्रान्सवर केला. जर्मनीचा परराष्ट्र मंत्री किंडरलेनच्या आग्रहावरून सम्राट कैसर विल्यमने पँथर ही जर्मन युध्दनौका १ जुलै १९११ रोजी मोरोक्कोच्या अगादीर बंदरात पाठविली. आता फ्रान्स-जर्मनी युध्द भडकणार की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. इंग्लंड व रशियाला या प्रश्नावरून युध्द नको होते त्यामुळे त्यांनी फ्रान्सच्या कडक धोरणाला पांठिबा दिला नाही. मात्र जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केले तर इंग्लंड फ्रान्सला मदत करील अशी धमकी दिली. इंग्लंडच्या खंबीर धोरणाचा ताबडतोब परिणाम झाला. जर्मनीने आपली युध्दनौका परत घेतली. यावेळी युध्दाचा धोका टळला असला तरी या प्रसंगामुळे जर्मनी व इंग्लंड यांच्यातील शत्रुत्व वाढले. जर्मनीचा कट्टर शत्रू इंग्लंड अशी भावना निर्माण झाली. त्यामुळे युध्दाचा डोंब केव्हा उसळेल हे सांगता येत नव्हते.

## २१. तत्कालिक कारण :-

ऑस्ट्रियन साम्राज्याचा वारसदार राजपुत्र आर्च ड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड याच्या २८ जून १९१४ रोजी झालेल्या खुनामुळे महायुध्दास जबाबदार असलेल्या परिस्थितीला युध्दाचे वळण मिळाले. ऑस्ट्रियातील दक्षिणेतील सर्बियाच्या जवळ असणाऱ्या बोस्तिया प्रदेशात निर्माण झालेल्या स्वातंत्र्य चळवळीतून वरील घटना घडली होती. सर्बियाला विशाल सर्बिया करण्याची महत्त्वकांक्षा होती. तसेच जहाल एकीकरणवादी गुप्त संघटना स्थापन झाल्या होत्या. या संघटनांना सर्बिया गुप्तपणे सर्व प्रकारची मदत करत असल्याचा संशय ऑस्ट्रियन राज्यकर्त्यांना वाटत होता. अशा स्थितीत ऑस्ट्रियन राजपुत्राने बोस्निया प्रदेशाचा दौरा करून तेथील परिस्थिती समजून घेण्याचे ठरवले होते. याची माहिती जहाल गुप्त संघटनांना मिळाल्यावर त्यांनी राजपुत्राला ठार करण्याचा कट रचला. याअगोदर संघटनेने बोस्नियातील ऑस्ट्रियन गव्हर्नर ऑस्कर पोरीओरेक यास ठार करून अराजकता निर्माण करण्याची योजना आखली होती. यावेळी राजपुत्र आर्च ड्यूक बोस्निया प्रांताची राजधानी सेरेजोव्हा येथे गेला होता. तेथील टाऊन हॉलमध्ये त्याच्या सत्काराचा कार्यक्रम

आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी तो निघाला असताना वाटेत त्याच्या गाडीवर बॉम्ब फेकण्यात आला, पण तो बॉम्ब गाडी गेल्यानंतर फुटला त्यामुळे त्याला काही इजा झाली नाही. त्याचे काही सुरक्षारक्षक ठार व घायाळ झाले. या घटनेनंतर राजपुत्राने टाऊन हॉल येथे जाऊन बोस्नियन नेत्यांच्या भेटी घेतल्या. व समारंभ संपल्यानंतर परत निघताना त्यांचा मार्ग चुकला. ही चूक लक्षात आल्यानंतर चालकाने मोटार वळवताना दुसऱ्या जहाल क्रांतीकारकाने केलेल्या गोळीबारात राजपुत्र आर्च ड्यूक फर्डिनांड व त्याची पत्नी मृत्यूमुखी पडले. राजपुत्राचा खून करणारी जहाल गुप्त संघटना 'युनियन ऑर डेथ' (Union or Death) किंवा 'ब्लॅक हँड' (Black Hand). या नावाने स्थापन करण्यात आली होती. ही संघटना जिंकू किंवा मरू या ईर्ष्येने दहशतवादी कार्ये करीत होती.

या संघटनेच्या प्रिन्सेप गॅव्हरिल्लो या सदस्याने आर्च ड्यूक फर्डिनांडचा खून घडवून आणला होता. या खुनाची माहिती सर्व जगभर पसरली. सर्वच राष्ट्रांनी एकमुखाने या घटनेचा निषेध केला. महायुध्द घडवणारी ही एक महत्त्वाची घटना होती.

## २.२.३ पहिल्या महायुध्दाचे स्वरूप

ऑगस्ट १९१४ ला सुरु झालेले पहिले जागतिक युध्द नोव्हेंबर १९१८ पर्यत चालले. इतक्या प्रदीर्घ काळापर्यत चाललेले आणि जवळजवळ सर्व जगाला ग्रासणारे असे हे मानवी इतिहासातील पहिलेच युध्द. त्रिराष्ट्र मैत्री करार संघाच्या फौजा संख्याबळाने तर त्यांच्या शत्रूपेक्षा श्रेष्ठ होत्याच, पण शिवाय ब्रिटीश आरमाराच्या सागरी प्रभुत्वाचाही फार मोठा फायदा दोस्त राष्ट्रांना मिळाला. त्यामुळे मध्यवर्ती सत्तांची रसद तोडली जाऊन दोस्त राष्ट्रांना मात्र आवश्यक शस्त्रास्त्रांचा व साधनसामुग्रीचा अविरत पुरवठा चालू राहू शकला. प्रारंभीच्या काळात जरी नव्हे तरी युध्दाच्या उत्तरार्धात अंतिम यशाच्या दृष्टीने ह्या दोन गोष्टीचे निर्णायक महत्त्व स्पष्टपणे प्रत्ययाला आले. या उलट जर्मनी व ऑस्ट्रिया – हंगेरी या मध्यवर्ती सत्तांना, त्यांच्या भौगोलिक परिस्थितीमुळे, सैन्याच्या हालचाली गरजेनुसार सुलभतेने करता येत होत्या. जर्मन लष्करही, उत्तम प्रशिक्षण, कडक शिस्त, उच्च दर्जाची शस्त्रसज्जता आणि कुशल व एककेंद्री नेतृत्व या दृष्टीने श्रेष्ठ होते. दोस्त फौजा मात्र दूरदूरच्या आघाडीवर विभागल्या गेल्या होत्या. पश्चिम आघाडीवर लढणाऱ्या बेल्जियम, फ्रेंच व इंग्लिश फौजांना यशस्वी लष्करी कार्यवाहीकरिता आवश्यक ते एककेंद्री नेतृत्व नव्हते. पूर्व आघाडीवरील रशियन फौजा संख्याबळाने कनिष्ठ नसल्या तरी पुरेशा दळण–वळणाच्या व अन्य साधनाच्या अभावी त्यांचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. आघाडीवरील रशियन लष्कराजवळ अत्यावश्यक तेवढीही शस्त्रास्त्रे व दारुगोळा नव्हता आणि सागरावर प्रभुत्व असूनही रशियन सैन्याला शस्त्रास्त्रे पुरविणे ग्रेट ब्रिटनला अवघड जात होते. बाल्टिक समुद्रावर प्रभुत्व असलेल्या जर्मन सैन्याने डेन्मार्कच्या सामुद्रधुन्यांचा ताबा मिळविलेला होता. त्यामुळे सुरवातीला तरी परिस्थिती मध्यवर्ती सत्तांना अनुकूल आहे असेच दिसत होते.

## २.२.४ पहिल्या महायुध्दाची वाटचाल

आर्च ड्यूक फ्रान्सिस फर्डिनांडच्या हत्येचे राजकीय भांडवल करून ऑस्ट्रियाने सर्बियाला निर्वाणीचा खलिता पाठविला. सर्बियाने ऑस्ट्रिया-हंगेरीविरोधी प्रचार थांबवावा, ऑस्ट्रिया-हंगेरीविरोधी कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना बडतर्फ करावे व ऑस्ट्रिया-हंगेरीतील मुलूख सर्बियात समाविष्ट करण्यासाठी चाललेली सर्बियातील चळवळ ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सरकारच्या प्रतिनिधींच्या मदतीने सर्बियाने दडपून टाकावी. ऑस्ट्रियाने सर्बियाला २३ जुलै १९१४ ला खलिता पाठवून खलित्याच्या उत्तरासाठी ४८ तासांची मुदत दिली.

इंग्लंडच्या लॉर्ड ग्रेने याने ह्या खलित्याचे एका सरकारने दुसऱ्या सरकारला कधीही पाठविला नसेल असा उर्मट खलिता असे वर्णन केले. सर्बियाला नेहमी सबुरीचा सल्ला देणारा रशियाचा परराष्ट्रमंत्री ह्या खलित्याची भाषा पाहून हबकला आणि म्हणाला, ह्याचा अर्थ युरोपमध्ये युध्द पेटले हाच होय.

२३ जुलै १९१४ सर्बियाला वरील खलिता मिळाला आणि त्यात घालून दिलेली मुदत काटेकोरपणे पाळून २५ जुलै १९१४ रोजी सर्बियाने उत्तरही पाठविले. त्यात १० पैकी ०८ कलमे सर्बियाने मान्य केली परंतु सर्बियन सरकारने करावयाच्या गुन्ह्याच्या तपासात ऑस्ट्रियन अधिकारी येऊ देण्यास त्याने नकार दिला. तसे कबूल केले तर सर्बियाच्या शासनाचे सार्वभौमत्व संपल्यासारखे होते, हे सर्बियाने ऑस्ट्रियाच्या नजरेस आणून दिले. मात्र सर्व विवाद्य मुद्दे (कलमे) हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे वा आंतरराष्ट्रीय परिषदेकडे सोपविण्याची तयारी दाखविली. ऑस्ट्रियन सरकारने हे उत्तर अतिशय असमाधानकारक असल्याचे जाहीर करून २८ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुध्द युध्द पुकारले आणि पहिल्या महायुध्दास तोंड फुटले. बाल्कनमधील एखादे वेडगळ कृत्य साऱ्या युरोपला आग लावील! हे दोन दशकांपूर्वी बिस्मार्कने केलेले भाकित शब्दशः खरे ठरले. ऑगस्ट १९१४ च्या पहिल्या आठवड्यात युरोपातील लक्षावधी सैनिक परस्परांचे गळे घोटण्यासाठी रणांगणात उतरले. ब्रिटीश परराष्ट्रमंत्री एडवर्ड ग्रे विषादाने उद्गारला, युरोपात सर्वत्र दीप मालविले जात आहेत. ते पुन्हा उजळलेले पाहण्याचे भाग्य आपल्या आयुष्यात लाभेल असे वाटत नाही!

### ❑ युध्दमय युरोप :-

२८ जुलै १९१४ रोजी ऑस्ट्रिया - हंगेरीने सर्बियाविरुध्द युध्द पुकारल्याबरोबर २९ जुलै १९१४ रोजी सर्बियाच्या मदतीकरिता रशियन सेनेच्या हालचाली सुरु झाल्या. रशियाने आपल्या फौजा मागे घ्याव्यात म्हणून जर्मनीने रशियाला १२ तासांची मुदत दिली. रशियाने युध्दात पदार्पण केल्यास रशियन हस्तक्षेपामुळे जर्मनीच्या तुर्कस्थानमधील हितसंबंधाला धक्का पोहचला असता, म्हणून जर्मनीने ऑस्ट्रिया - हंगेरीच्या बाजूने १ ऑगस्ट १९१४ ला युध्दात उडी घेतली आणि रशियाविरुध्द युध्द पुकारले. फ्रान्सने रशियाला मदतीचे आश्वासन दिलेले होते, म्हणून ३ ऑगस्ट १९१४ ला जर्मनीने फ्रान्सविरुध्द युध्द पुकारले. जर्मन सेनानी फ्रान्सवर चालून ४ ऑगस्टला पहाटे बेल्जियममध्ये सेना घुसविल्या. बेल्जियमचे स्वातंत्र्य युरोपीय राष्ट्रांनी इ. स. १८३९ मध्ये मान्य केले होते, तेव्हाच त्याच्या तटस्थेची हमी दिली होती. जर्मन आक्रमणामुळे

बेल्जियमची तटस्थता धोक्यात आलेली पाहून ब्रिटनने बेल्जियमच्या मदतीला जाण्याचा निर्णय घेतला. सर्व राजनैतिक उपचार पूर्ण करून ब्रिटनने ४ ऑगस्टला रात्री १२ वाजता जर्मनीविरूध्द युध्दघोषणा केली. अंग्लो-जर्मन करारानुसार २३ ऑगस्टला जपाननेही ब्रिटनच्या बाजूने युध्दात प्रवेश केला. त्यामुळे युध्दाची व्याप्ती केवळ युरोपपुरती मर्यादित न राहता जगभर पसरली. ३ नोव्हेंबर १९१४ रोजी तुर्कस्थानने जर्मनीच्या बाजूने युध्दात उडी घेतली.

बाल्कन राष्ट्रांपैकी मॉटेनिग्रोने ७ ऑगस्टला सर्बियाच्या बाजूने युध्द पुकारले. रुमानिया वस्तुतः जर्मन गटातील राष्ट्र होते, परंतु युध्दाच्या वेळी रुमानियाच्या गादीवर दोस्तराष्ट्रांना अनुकूल असणारा कॅरोल हा राजा आलेला होता. ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्यातून रुमानिया लोकांचा मुलूख मिळविण्याच्या हेतूने रुमानियाने २७ ऑगस्ट १९१६ रोजी ब्रिटनच्या बाजूने युध्दात उडी घेतली. मॅसोडीनियावर डोळा ठेवून बल्गेरियाने ऑक्टोबर १९१५ मध्ये जर्मनीशी हातमिळवणी केली. इ.स. १९१७ पर्यत ग्रीसने जर्मनीविरूध्द युध्द पुकारलेले नसले तरी त्याच्या भूमीचा उपयोग युध्दतळासाठी म्हणून ब्रिटन व त्याचे दोस्त करीत होते.

जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी यांनी पुकारलेले युध्द स्वसंरक्षणासाठी नसून आक्रमणासाठी आहे, या मुद्द्यावर इटली तटस्थ राहिले होते. इ. स. १९०२ मध्ये फ्रान्स व इटली यांच्यात जो गुप्त करार झाला होता त्याच्या आधारे या तटस्थ राष्ट्राची मदत आपल्याला मिळावी या हेतूने ऑस्ट्रिया - हंगेरीतील इटलीला हवा असणारा मुलूख मिळवून देण्याचे आश्वासन दोस्त राष्ट्रांनी इटलीला दिले. याशियाय, आफ्रिका व तुर्कस्थानचे साम्राज्य यातील काही मुलूख व इतर आर्थिक मदतीचे आश्वासनही इटलीला इ. स. १९१५ च्या लंडनच्या गुप्त तहाने देण्यात आले. परिणामी जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरी या आपल्या मित्रांचा विश्वासघात करून २३ मे १९१५ रोजी इटलीने ऑस्ट्रियाविरुध्द युध्द पुकारले. इ. स. १९१६ च्या मार्च महिन्यात पोर्तुगाल ब्रिटनच्या बाजूने युध्दात उतरले. नॉर्वे, स्वीडन, हॉलंड, स्वित्झर्लंड व स्पेन ही राष्ट्रे वगळता बाकी सर्व युरोपीय राष्ट्रे युध्दात गुंतली. जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, बल्गेरिया, व तुर्कस्थान यांचा गट **मध्य राष्ट्रे** (Central Powers) म्हणून ओळखला जाऊ लागला तर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, सर्बिया व बेल्जियम यांचा गट **दोस्त राष्ट्रे** (Allied Powers) म्हणून ओळखला जाऊ लागला.

## ❑ पश्चिम आघाडी :-

### १. जर्मनीचे बेल्जियमवर आक्रमण :-

जर्मनीला एकाच वेळी पश्चिम आघाडीवर फ्रान्सला व पूर्व आघाडीवर रशियाला तोंड देणे क्रमप्राप्त होते. रशियन आक्रमणास लागणारा संभाव्य वेळ लक्षात घेऊन जर्मनीवर रशियन रेटा पडण्यापूर्वीच फ्रान्समध्ये जोरदार मुसंडी मारून फ्रान्सला पराभवाचे पाणी चाखाविल्यानंतर पश्चिम आघाडीवरील विजयी जर्मन सैन्य पूर्व आघाडीवर रशियावर कोसळवावे असा जर्मनीचा युध्दव्यूह होता. प्रशियन सरहद्दीवर फ्रेंच सैन्याला बगल देऊन २ ऑगस्टच्या मध्यरात्री जर्मन फौजा लक्झेंबर्गमध्ये शिरल्या आणि बेल्जियमने जर्मन फौजांना वाट

देण्यास नकार देताच पूर्वनियोजित श्लायफेन योजने नुसार ४ ऑगस्टच्या पहाटे जर्मन सैन्याने बेल्जियमवर चाल केली व युध्द पेटले.

जर्मन सैन्याची प्रचंड संख्या आणि त्यांच्या हल्ल्याचा जबरदस्त वेग पाहून दोस्त राष्ट्रे प्रारंभीच हबकलीच. बेल्जियमसारख्या छोट्या, दुर्बळ राष्ट्राकडून कोणताच प्रतिकार अपेक्षित नव्हता, परंतु बेल्जियनांनी त्यांच्या शक्तीप्रमाणे लीज येथे जर्मन सैन्याला रोखले आणि सर्वांनाच चकित करून सोडले.जर्मनांचे वेळापत्रक दोन दिवसांनी चुकले.

इ. स. १८९० साली जर्मन सेनाप्रमुख बनलेल्या काऊंट आल्फ्रेड फॉन श्लायफेन याच्या योजनेनुसार फ्रँको-जर्मन आघाडीवरील ७/८ जर्मन सेनेने बेल्जियममधून फ्रान्सवर कोसळावयाचे होते. बिनीच्या जर्मन पथकांनी लीजच्या बेल्जियम किल्ल्यातून वाट काढून सुरुवातीस ब्रिटीश खाडीच्या दिशेने वाटचाल करावयाची होती. नंतर या बिनीच्या पथकांनी वाझ नदीच्या खोऱ्यात उतरून पॅरिसला वळसा मारून फ्रँको-जर्मन सीमेवरील फ्रेंच सैन्याला मागून रेटत नेऊन फ्रँको-जर्मन सीमेच्या ऐरणीवर तिच्यावर घणाघाती हल्ला करून तिचा चकणाचूर करावयाचा होता. फ्रँको-जर्मन सीमेवरून जर्मन सैन्यावर तुटून पडणाऱ्या फ्रेंच सैन्याला तोंड देण्यासाठी अवघे १/८ जर्मन सैन्य म्हणजे २ लक्ष सैन्य फ्रँको-जर्मन सीमेवर तैनात होते. या जर्मन सैन्याने फ्रेंच रेट्यासमोर शिस्तबध्द माघार घेऊन फ्रेंच जर्मन प्रदेशात आत घेऊन त्यांची पध्दतशीर कोंडी करावयाची होती. पॅरिसला वळसा घालून येणाऱ्या विशाल जर्मन सैन्याच्या आणि फ्रँको-जर्मन सीमेवरून योजनाबध्द माघार घेणाऱ्या जर्मन सैन्याच्या कात्रीत सापडलेल्या फ्रेंच सैन्याचा फ्रँको-जर्मन सीमेच्या ऐरणीवरच कपाळमोक्ष होणार होता.

लीजचा गढ ही युरोपमधील सर्वात बुलंद तटबंदी मानली जाई. मझ नदीच्या डाव्या तीरावर वसलेल्या लीज शहराभोवती ३० मैलाच्या परिघात ५०० फूट उंचीच्या टेकड्यांवर १२ किल्ल्यांची मालिका बांधण्यात आली होती. प्रत्येक किल्ल्याभोवती ३० फूट खोल खंदक, सर्व किल्ल्यात दारूची भूमिगत कोठारे, भोवतालच्या प्रदेशावर विजेचे प्रखर, प्रचंड झोत टाकण्याची व्यवस्था, छोट्या जलद वेगाने मारा करणाऱ्या तोफा व मशीनगन्स आणि १२ किल्ल्यांत मिळून लांब पल्ल्याच्या ४०० तोफा होत्या.

४ व ५ ऑगस्ट दोन दिवस लीजने चिवट प्रतिकार करून जर्मनांना दाद दिली नाही. ५ तारखेच्या रात्री लीजवर जर्मन ब्रिगेड्सचे हल्ले सुरु झाले. ज. फॉन बुस्साउ ठार झाल्यामुळे त्याच्या १४ व्या ब्रिगेडमध्ये बराच गोंधळ निर्माण झाला. त्या आणीबाणीच्या क्षणी केंद्रीय सेना कचेरीचा संपर्काधिकारी असलेल्या एरिफ लुडेंडॉर्फने स्वत:च सर्व सैनिकांना एकत्र करून १४ व्या ब्रिगेडची सूत्रे हाती घेतली. सैनिकांची हिंमत बांधून त्याने घोषणा दिली, ''उद्या लीजमध्ये!'' फ्लेरॉन व इव्हीनी या किल्ल्यांमधून वाट काढीत लुडेंडॉर्फच्या उत्स्फूर्त नेतृत्वाखाली १४ व्या ब्रिगेडची आगेकूच सुरु झाली. आता लीजचा तट व शहर स्पष्ट दिसू लागले. इतर ब्रिगेड्सचे हल्ले सुरु होतेच. जर्मनांचा निर्धारी मारा असह्य झाल्यामुळे काही बेल्जियन सैन्याने

ब्रसेल्सकडे माघार घेतली. ६ ऑगस्टला सकाळी लीजचा तट आपल्या ताब्यात आला आहे या समजुतीने लुडेंडॉर्फ अवघ्या एका सहकाऱ्यानिशी तटापर्यंत गेला. तटाजवळ एकही जर्मन सैनिक नव्हता. तरीही न डगमगता लुडेंडॉर्फने आपल्या तलवारीच्या टोकाने तटाचे प्रवेशव्दार खडखडाविले आणि दार उघडताच त्याने बेल्जियन सैनिकांना करड्या आवाजात फर्मावले, ''शरण या!'' बेल्जियन सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली. नेपोलियन बोनापार्टने टुलॉन बंदरात घडवून आणलेल्या चमत्काराची पुनरावृत्ती लुडेंडॉर्फने लीजमध्ये केली आणि पहिले महायुध्द गाजविणारा एक श्रेष्ठ जर्मन सेनापती उजेडात आला.

लीजचा पाडाव झाल्यावर इतर किल्ले भुईसपाट करण्यासाठी जर्मनीतील क्रुप्स या कारखान्यात बनविलेल्या महांकाली तोफांना (हेवी हॉविट्झर्स) आणण्यात आले. आतापर्यंत रणभूमीवर सर्वात मोठ्या म्हणजे ११ इंची व्यासाच्या तोफा वापरण्यात आल्या होत्या. काही ब्रिटीश ड्रेडनॉट्स साडेतेरा इंची तोफा बसविण्यात आल्या होत्या. क्रुप्स कारखान्यात बनविण्यात आलेली क्रुप्स तोफ साडे सोळा इंची होती. या तोफेची तिच्या वाहनासह लांबी २४ फूट व वजन ९९ टन असून ती १८०० पौंडी गोळा ९ मैल अंतरावर फेकू शके. एका तोफेची देखभाल करावयास २०० सैनिक लागत आणि विजेच्या फ्यूजच्या सहाय्याने ३०० यार्द अंतरावरून तिला बत्ती देण्यात येई. जिथे तोफगोळा जाऊन पडे, तेथील माती, विटा, दगड हजार फूट उंचीपर्यंत फेकले जात. १२ ऑगस्टला सकाळी साडेसहा वाजता पहिली महांकाली तोफ धडाडली. ज्या किल्ल्यांवर या तोफा डागण्यात आल्यात तेथे त्यांनी दगडाविटांचे ढीग निर्माण केलेत, आगी पेटल्यात आणि आसमंत धुळीने आच्छादित झाला. अगणित मनुष्यहानी झाली. तोफांच्या गडगडाटाने तळघरातील सैनिकांचे कान बधीर होऊन त्यांच्यावर वेड लागण्याची पाळी आली. १६ ऑगस्टपर्यंत लोंकिनखेरीज इतर सर्व किल्ले जर्मनांनी काबीज केलेत. लोंकिनमध्ये ठाण मांडून बसलेल्या जनरल लेमानने जर्मनांनी केलेली शरणागतीची मागणी साफ धुडकावून लावली. जर्मनांनी महांकाली तोफांना बत्ती दिली. दारूच्या कोठारात घुसलेल्या एका तोफगोळ्याने अर्धा किल्ला उध्द्वस्त झाला. जर्मन सैन्य किल्ल्यात घुसले, तेव्हा त्यांना जनरल लेमान दगडाविटांच्या ढिगाऱ्याखाली बेशुध्दावस्थेत पडलेला आढळला. जर्मन सेनापती जनरल एमिखच्या स्वाधीन आपली तलवार करताना लेमान उद्‌गारला, ''मी बेशुध्दावस्थेत होतो ही गोष्ट आपल्या अहवालात नमूद करावयास विसरू नका'' शौर्याची कदर असलेल्या एमिखने 'आपल्या समशेरीने लष्करी सन्मानाचा अनुमात्रही भंग केलेला नाही. आपण तलवार ठेवू शकता' असे म्हणून एमिखने जनरल लेमानला तलवार परत दिली.

१७ ऑगस्टला जर्मन सैन्य एखाद्या लोंढ्याप्रमाणे बेल्जियममध्ये घुसले. लीजच्या प्रतिकारामुळे नियोजित वेळापत्रकास दोन दिवस विलंब झाला. बेल्जियम खेडी, शहरे, शेते, जंगले तुडवीत जर्मन सेनेचा लोंढा पुढे घोंघावू लागला. २० ऑगस्टला जनरल क्लुकच्या फौजांनी ब्रसेल्स शहर काबीज केले तर त्याच दिवशी जनरल ब्युलोचे सैन्य नामूरच्या विख्यात किल्ल्याला भिडले. ज्या महांकाली तोफांनी लीजची दामटी वळविली त्यांनीच अवघ्या चार दिवसात नामूरचा नक्षा उतरविला.

## २. जर्मनीचे फ्रान्सवर आक्रमण :-

फ्रँको-जर्मन सीमेवर जर्मनांच्या शास्त्रशुध्द युध्दतंत्रामुळे फ्रेंचांचे नाट्यपूर्ण हल्ले साफ निकालात निघाले. अल्सेस आणि लॉरेन्समध्ये जर्मन सैन्याने फ्रेंचांना झोडपून काढले. श्लायफेन योजनेनुसार जर्मन सीमेच्या रक्षणार्थ तैनात असलेल्या ६ व ७ क्रमांकाच्या जर्मन सेनादलांचे आधिपत्य बव्हेरियाचा क्राऊन प्रिन्स रुप्रेख्ट याच्याकडे होते. २० ऑगस्टला रुप्रेख्टच्या जर्मन सेनादलांची चढाई सुरु झाली आणि जर्मन सैन्य फ्रेंच हद्दीत शिरले. फ्रेंच चढाई तर थांबलीच उलट तिला माघार घ्यावी लागली. फ्रँको-जर्मन सीमेवरील लढाई फ्रान्सने गमाविली.

जर्मन सैन्याला बेल्जियममध्येच रोखण्याच्या हेतूने जनरल लॅनरेझाकचे पाचवे फ्रेंच सेनादल आणि त्याच्या डाव्या बगलेवर फळी धरण्यासाठी ५ ब्रिटीश डिव्हिजन्स २२ ऑगस्टला मॉन्स कालव्यापाशी येऊन उभ्या राहिल्या. जनरल लॅनरेझाकच्या बगलेवर चालून जाण्यासाठी जर्मन सैन्याने मारलेल्या मुसंडीत ते सैन्य ब्रिटीश सेनेवर येऊन आदळले. ब्रिटीश टॉमींनी शर्थीने झुंज दिली, परंतु सायंकाळी आपल्या घटत्या संख्येकडे पाहून ब्रिटीश सेनेने माघारीचा मार्ग पसंत केला. जनरल लॅनरेझाकच्या फ्रेंच सेनादलाला शार्लब्रा (बेल्जियम) येथे जनरल ब्युलोच्या आधिपत्याखाली दुसरे जर्मन सैन्यदल झोडपून काढीत होते. सायंकाळी जनरल हाउसेनचे तिसरे जर्मन सैन्यदल फ्रेंचावर कोसळताच जनरल लॅनरेझाकच्या फ्रेंच सैन्याचा रणभूमीवर पाय ठरेना.

सांब्र व मझ नदीवर चाललेल्या युध्दात जर्मनांनी टेहाळणीसाठी विमाने वापरली आणि युध्दामध्ये सर्वप्रथम विमानांचा वापर करण्याचे श्रेय जर्मनीच्या नावावर नोंदले गेले. हवाई टेहाळणीमुळे जर्मन तोफा फ्रेंच सैन्यावर अचूक आग ओकत असत. फ्रेंचाना मात्र जर्मन तोफा नेमक्या कोठे आहेत याचा पत्ता लागला नाही. एपिनालपासून मॉन्सपर्यंत सर्वत्र फ्रेंच व ब्रिटीश सेनांची माघार चालू झाली.

चढाईच्या धोरणाचा पुरस्कार करणारा फ्रान्सचा प्लॅन-१७ निकालात निघाला होता आणि फ्रेंच सेनाप्रमुख जनरल झ्योफ्रपुढे फ्रान्स वाचवायचा कसा हा बिकट प्रश्न पडला होता. फ्रेंच सैन्य, फ्रेंच सरकार आणि फ्रेंच जनता सर्वांच्याच नितीधैर्याला जबरदस्त हादरा बसला होता. फ्रेंच सरकारने राजधानी पॅरिसहून हालवून बोर्दोला नेली.

जर्मन सेनेची विजयी घोडदौड चालू होती. १ सप्टेंबरला जनरल ब्युलोने स्वासाँ काबीज केले तर ३ सप्टेंबरला जनरल हाउसेनचे तिसरे जर्मन सेनादल रँस शहरात शिरले. ४ सप्टेंबरला सकाळी जनरल क्लुकच्या पहिल्या जर्मन सेनादलाने मार्न नदी ओलांडली. आणि ५ सप्टेंबरला पेटिट मोरिन व ग्रँड मोरिन या दोन्ही नद्या पार केल्या. क्षितिजावर पॅरिसच्या विश्वविख्यात आयफेल टॉवरचे रम्य दर्शन त्यांना घडले. ६५ पौडांचे ओझे पाठीवर वाहून २००-२२५ मैलांची मजल मारून आलेले जर्मन सैनिक थकले होते, परंतु क्षितिजावर आयफेल टॉवर दिसताच वीज सळसळावी तशी चैतन्याची अपूर्व लहर जर्मन सैन्यात निर्माण झाली. पॅरिसवर

गरुडचिन्हांकित जर्मन ध्वज फडकविण्याच्या निर्धाराने जर्मन सैन्य सिध्द झाले. पॅरिस अवघ्या १५ मैलांवर होते.

५ सप्टेंबरला मोनुरीने मार्नच्या उत्तर काठावर क्लुकच्या बगलेवर हल्ला चढवावा आणि ६ सप्टेंबरला सर्व अँग्लो - फ्रेंच सैन्याने प्रतिचढाई सुरु करावी असे फर्मान फ्रेंच सेनाप्रमुख ज्योफ्रने सोडले. ठरल्याप्रमाणे ५ सप्टेंबरला मोनुरी क्लुकच्या बगलेवर चालून गेला. एका जर्मन कोअरविरुध्द तीन फ्रेंच कोअर्स असा सामना सुरु झाला आणि जर्मन कोअरला फ्रेंचाच्या दणक्यामुळे ७ मैल मागे हटावे लागले. ५ सप्टेंबरच्या मध्यरात्री ६८ वर्षाच्या क्लुकला ही बातमी समजताच पॅरिसच्या बचावासाठी ठेवलेल्या फ्रेंच सैन्याची ही कामगिरी आहे हे ओळखून त्याने गँड मोरिन ओलांडून पुढे चाल करून गेलेल्या दोन कोअर्सना मोनुरीसमोर दाखल होण्याचा आदेश दिला. ९ सप्टेंबरला क्लुकचे सैन्य मोनुरीवर इतक्या दणक्यात कोसळलेत की त्याला माघारीशिवाय पर्याय उरला नाही.

६ सप्टेंबरला अँग्लो-फ्रेंच सेनादलांनी माघार थांबवून आपली तोंडे फिरवून जर्मन आघाडीवर तुटून पडावयाचे होते, परंतु ब्रिटीश सेनेची माघार थांबली नव्हती. जनरल फॉकच्या नेतृत्वाखालील नवव्या फ्रेंच सेनादलाने हाउसेनवर हल्ला चढविला, परंतु सपाटून मार खाल्ला. हाउसेनने फ्रेंच सेनादलाच्या चिंध्याचिंध्या केल्यात.

याचवेळी एक चमत्कार घडला. व्हर्डूनपासून पॅरिसपर्यंतच्या सर्व जर्मन सेनादलांना चढाई थांबवून माघार घेण्याचा अनर्थकारी आदेश मिळाला. वास्तविक पाहता जर्मन सेनाप्रमुख मोल्टकेने उजव्या आघाडीवर स्वत: जाऊन युध्दाची सर्व सूत्रे मजबूतपणे आपल्या हाती घ्यावयास हवी होती. जर्मनीच्या दुर्दैवाने जर्मन सेनाप्रमुख मोल्टके खऱ्या अर्थाने सेनापतीच नव्हता. ज्यावेळी फ्रेंच सेनाप्रमुख ज्योफ्रची युध्दकचेरी आघाडीपासून २०० मैल दूर सुरक्षित अंतरावर असे. मोनुरीने क्लुकच्या बगलेवर हल्ला करताच मोल्टके ढेपाळला. जनरल क्लुकचे पहिले जर्मन सेनादल आणि ब्युलोचे दुसरे जर्मन सेनादल यांच्या दरम्यान अवघ्या ३० मैल रुंदीची पोकळी निर्माण झाली होती आणि याच भागातील ब्रिटीश सेनादलाने उशिरा का होईना, पण ज्योफ्रच्या आदेशाप्रमाणे तोंड फिरवून अत्यंत सावधपणे ग्रँड मोरिन, पेटिट मोरिन ओलांडून उत्तरेकडे मार्नच्या दिशेने हळूहळू पुढे सरकत आगेकूच सुरु केली.

उजव्या आघाडीवरील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून योग्य निर्णय घेण्यासाठी निराशावादी मोल्टकेने अधिकारपत्र देऊन आपल्याप्रमाणेच निराशावादी असलेल्या कर्नल हेंच ह्याची रवानगी केली. ८ सप्टेंबरला रात्री कर्नल हेंच ब्युलोच्या छावणीत पोहोचला. क्लुक आणि ब्युलो यांच्या सेनादलात निर्माण झालेल्या पोकळीत ब्रिटीश सेनादल पाचर ठोकत आहे या बातमीने ब्युलो आधीच अस्वस्थ झाला होता. त्यात कर्मदरिद्री, नतद्रष्ट, निराशावादी कर्नल हेंचचे आगमन. ९ सप्टेंबरला सकाळी ब्रिटीश सैन्याने मार्नच्या उत्तरेस उतार स्थापन केल्याची बातमी मिळताच उजव्या फळीवरील सर्व जर्मन सेनादलांना एन नदीपर्यंत माघार घेण्याचा हुकूम देण्यात आला.

खुद्द चर्चिलने लिहिले आहे की, जर्मनांच्या २०० मैलांच्या विजयी आघाडीत ३० मैलांची पोकळी हा खरे तर ब्रिटीश सेनेच्या दृष्टीने एक उत्कृष्ट सापळा होता. मोनुरीला पिटाळून लावल्यानंतर जर क्लुकने दक्षिणेकडे तोंड फिरविले असते, तर त्याचे सैन्य आणि सेन नदीपर्यंत पोहोचलेल्या जनरल हाउसेनच्या तिसऱ्या जर्मन सेनादलाच्या कात्रीत लाख, दीड लाख सैन्याचा चकणाचूर झाला असता.

मार्न नदीवर न झालेली तथाकथित लढाई जर्मनांच्या माघारीस कारणीभूत ठरली. एक छोटीशी ब्रिटीश सेना विजयी जर्मनांच्या माघारीस कारणीभूत झाली, कारण जर्मनीचा कायर सेनाप्रमुख मोल्टके आणि त्याचा तितकाच गर्भगळीत, निराशावादी प्रतिनिधी कर्नल हेंच. एक परिपूर्ण योजना असलेल्या श्लायफेन योजनेची इतिश्री झाली आणि एका दमात फ्रेंच व ब्रिटीश फौजा गारद करण्याची जर्मन स्वप्ने धुळीस मिळाली. सेन, ग्रँड मोरिन, पेटिट मोरिन आणि मार्न एवढ्या साऱ्या नद्यांवरून माघारी फिरून १७ सप्टेंबरला एन नदीवर जर्मन सेना खंदक खणू लागल्या.

जर्मन माघारीनंतर क्लुक व ब्युलो यांच्या पहिल्या व दुसऱ्या जर्मन सेनादलांनी एन नदीच्या अलीकडे मोर्चेबांधलेत, तर तीन, चार व पाच क्रमांकाच्या जर्मन सेनादलांनी रँस व व्हर्टून यांच्या दरम्यान मोर्चेबांधणी केली. सहावे जर्मन सेनादल अल्सेस-लॉरेनमध्ये स्थिरावले. अँग्लो-फ्रेंच बगलेवर प्रखर हल्ला चढविण्यासाठी बेल्जियमचे अँटवर्प बंदर काबीज करणे आवश्यक होते. लीजप्रमाणेच अँटवर्प शहराभोवती अनेक किल्ल्यांची मालिका होती आणि प्रत्येक किल्ल्याभोवती खोल व रुंद खंदक होते. जर्मनांनी अँटवर्प काबीज केले नसते, तर तेथील १,५०,००० बेल्जियन सैन्याने जर्मनांची पिछाडी झोडपून काढली असती. २७ सप्टेंबरला १७ इंची हॉवित्झर तोफा मोर्च्यावर दाखल झाल्यात. आता या तोफांचा गोळा एका टनाहून अधिक वजनाचा असे. ३० सप्टेंबरपर्यंत या तोफांनी दोन किल्ले भुईसपाट केलेत आणि जर्मन आगेकूच सुरु झाली. जर्मनांच्या विजयी घोडदौडीमुळे ब्रिटीश खाडीसमोरील ऑस्टेंड, डंकर्क, कॅले ह्या बंदरांना धोका निर्माण झाल्यामुळे ब्रिटनने अत्यंत त्वरेने बेल्जियमच्या मदतीस ब्रिटीश सैन्य तोफखाना पाठविला. तथापि जर्मन हॉवित्झर तोफांपुढे ब्रिटीश कुमक कुचकामी ठरली. एकापाठोपाठ एक अँटवर्प किल्ले जर्मन तोफांपुढे माना टाकीत होते. ६ ऑक्टोबरपासून ब्रिटीश व बेल्जियम सैन्याच्या माघारीस प्रारंभ झाला आणि ९ ऑक्टोबरपर्यंत दोन्ही सैन्यदले अँटवर्पबाहेर पडली. अँटवर्पचा पाडाव केल्यानंतर पाठोपाठ जर्मन सैन्याने घेंट, ब्रजेस, झीब्रग आणि ऑस्टेंड ही बंदरे काबीज केली.

इप्रच्या चढाईत मोल्टकेच्या जागी आलेल्या जर्मन सेनाप्रमुख फॉल्केनहाइनने तीन मोठे हल्ले चढविलेत. २० ऑक्टोबरला झालेल्या पहिल्या जर्मन हल्ल्याला ब्रिटीश सेनेने अत्यंत चिवटपणे प्रतिकार केला; अँटवर्पमधून निसटलेल्या थकलेल्या बेल्जियन सैनिकांनी पराक्रमाची शर्थ करून अनेक जर्मन हल्ले परतविले आणि फ्रेंच सैन्याने जर्मनांवर कडवा हल्ला चढविला. तरीही डीक्समुंड जर्मनांनी काबीज केले. यापेक्षाही जर्मनांचा दुसरा मोठा हल्ला इप्रच्या पूर्वेस मेसिन टेकड्या ते घेलुवेल्त या चिंचोळ्या आघाडीवर सुरु झाला. काही दिवस चाललेली ही लढाई जर्मन बच्चे लोकांची लढाई म्हणून इतिहासात अजरामर झाली

आहे. शत्रूच्या नरडीचा घोट घेण्याखेरीज दुसरा कसलाही विचार मनात न आणता डॉयशलांड उबेर आलेस हे राष्ट्रगीत सामुदायिकपणे चढ्या आवाजात गट नव्या जर्मन कोअर्समधील ही कोवळी जर्मन मुले ब्रिटीश आघाडीपर्यंत सरळ चाल करून जात. ब्रिटीश मशिनगन्स, तोफा व बंदुकीच्या भडिमाराला बळी पडल्यानंतर फारच थोडे जर्मन तरुण ब्रिटीश आघाडीपर्यंत पोहोचत, परंतु जर का ते पोहोचलेत तर एवढ्या त्वेषाने हल्ला चढवीत की, संपूर्ण ब्रिटीश बटालियन त्यांनी कापून काढल्याची उदाहरणे आहेत. या कोवळ्या जर्मन मुलांनी ब्रिटीश फौजांच्या नाकात दम आणला. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये इप्रच्या या लढायांमधून ५० हजार ब्रिटीश सैनिक धारातीर्थी पडले, १ लक्ष ८० हजार फ्रेंच सैनिक कामी आलेत, तर जर्मनांचे १ लक्ष ३५ हजार सैनिक ठार वा जायबंदी झालेत. जर्मन हानीत ४१ हजार कोवळ्या मुलांचे बलिदान सामील होते. इप्रच्या लढाईनंतर उघड्या मैदानावरील गतिमान लढाई समाप्त झाली.

जर्मन सैन्य एन नदीवर पोहोचल्यानंतर त्यांनी खंदक खणून मोर्चेबांधावयास प्रारंभ केला. इ.स. १९१४ च्या अखेरीस आल्प्स पर्वतापासून ब्रिटीश खाडीपर्यंत दोन्ही पक्षांनी परस्परांसमोर खंदक खणून ६०० मैलांच्या खंदकांच्या अखंड रांगा निर्माण केल्यात. पश्चिम आघाडीवरील युध्दाची गतिमानता समाप्त होऊन त्याला युध्दाचे स्वरूप आले.

२२ एप्रिलला सकाळी जर्मन हॉविट्झर्सनी इप्र गावावर तुफान मारा केला. सायंकाळी ५ वाजता जर्मन तोफांनी तडाखेबंद गोलंदाजी केली आणि त्यापाठोपाठ पहिल्या महायुध्दात सर्वप्रथम जर्मनांनी विषारी वायूचा वापर केला. या भीषण लढाईत ६० हजार अँग्लो-फ्रेंच आणि ४७ हजार जर्मन ठार वा जायबंदी झाले. ब्रिटीश सेनेच्या कडव्या प्रतिकारामुळे जर्मनांना इप्र गाव जिंकता आले नाही.

इ.स. १९१६ मध्ये जर्मनांनी व्हर्डून येथे फ्रेंचाची फळी भेदून जाण्याचा निकराचा प्रयत्न केला, परंतु तितक्याच शौर्याने फ्रेंचांनी त्यांना रोखून ठेवले. पाठोपाठ दोस्तांनी सॉम नदीच्या प्रदेशात स्वत:च हल्ला सुरु केला. ह्यावेळी युध्दात रणगाड्याचा सर्वप्रथम वापर करण्यात आला. तथापि जर्मनांचा प्रतिकारही लेचापेचा नव्हता. नदी किनाऱ्यावरील ह्या लढाईत प्रत्येक पक्षाचे जवळपास पाच लाख सैन्य कामी आले. जर्मनांनी फील्डमार्शल हिंडेनबुर्गच्या नेतृत्वाखाली आणखी काही नवे पवित्रे घेऊन दोस्तांचा पाडाव करण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु इ. स. १९१७ च्या अखेरीपर्यंत ह्या अटीतटीच्या लढायांतून निर्णायक असे काहीच निष्पन्न झाले नाही.

## ❑ पूर्व आघाडी :-

ऑस्ट्रिया-हंगेरीच्या सर्बियावरील हल्ल्याने २८ जुलै १९१४ रोजी पहिल्या महायुध्दास प्रारंभ झाला. ऑस्ट्रिया-हंगेरीने जोरदार मुसंडी मारून सुरुवातीलाच सर्बियाची राजधानी बेलग्रेड पादाक्रांत करून सर्बियाला हतबल केले. तथापि जर्मनीच्या अपेक्षेच्या मानाने रशियन सेनेने अतिशय वेगवान हालचाली केल्या. तिचे दोन विभाग पूर्व प्रशियात घुसले तर चार विभाग ऑस्ट्रिया-हंगेरीचा समाचार घेण्यासाठी ऑस्ट्रियन

गॅलिशियात घुसले. पूर्व प्रशियातील रशियन मुसंडीमुळे जर्मन सेनाधिकारी हादरलेत, परंतु त्या दोन्ही सेनाविभागात एकसूत्रीपणा नाही, ही गोष्ट जर्मन सेनानींच्या लक्षात येताच त्यांनी त्या परिस्थितीचा अचूक फायदा उठविला. टॅनेनबर्गच्या लढाईत जर्मन सेनापती हिंडेनबर्ग याच्या नेतृत्वाखाली जर्मन सेनेने नव्वद हजार रशियन सेनेची कोंडी करून तिला कैद केले. १५ सप्टेंबर १९१४ पर्यत पूर्व प्रशियाला रशियन सेनेच्या नियंत्रणाखालून पूर्णपणे मुक्त करण्यात आले. गॅलिशियाच्या लढाईत रशियाने ऑस्ट्रियाचे अतोनात नुकसान केले. त्यामुळे सर्बियन सैन्याला जोर चढून त्यांनीही नव्या दमाने ऑस्ट्रियन सेनेशी झुंज घेऊन बेलग्रेड हे राजधानीचे शहर पुन्हा जिंकून घेतले. ऑस्ट्रियन सेनेचा कमकुवतपणा लक्षात घेऊन जर्मनीने पूर्व आघाडीची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. ऑस्ट्रियन सैन्याची पुनर्रचना करण्यात आली आणि २ मे १९१५ रोजी गॅलिशियाची निर्णायक मोहीम सुरु झाली. या मोहिमेत रशियाचे तीन लाख सैनिक मृत्युमुखी पडले. इ. स. १९१४ मधील युध्दपूर्व सरहद्दीपासून रशियाला तीनशे मैल आत माघार घ्यावी लागली. या नामुष्कीजन्य पराभवामुळे रशियन सैन्याचे आणि त्याबरोबरच रशियन नागरिकांचे मनोधैर्य पार ढेपाळले.

इ. स. १९१७ साल उजाडले तेव्हा रशियन फौजा पार थकून गेल्या होत्या. रशियाची शक्ती संपुष्टात आली होती. त्यातच अंतर्गत क्रांतीचा उठाव झाला. झारशाही कोलमडली. नव्या साम्यवादी शासनाला देशात नवी घडी बसवायला उसंत हवी होती. ह्यावेळी त्यांना आपली शक्ती आणि वेळ बाहेर युध्दात वाया घालवीत राहता येण्यासारखे नव्हते. इ. स. १९१७ मध्ये रशियाच्या नव्या साम्यवादी शासनाने जर्मनी - ऑस्ट्रियाशी तह करून युध्दातून आपले अंग काढून घेतले.

### ❑ तुर्कस्थानचा युध्दप्रवेश :-

तुर्कस्थान आणि रशियातील हाडवैर दीर्घकाळापासून चालू असल्यामुळे तुर्कस्थानची राजधानी कॉन्स्टँटिनोपलवरच रशियाचा डोळा आहे अशी तुर्कस्थानला साधार भीती वाटत होती. जर्मनीने तुर्कस्थानला हरप्रकारे साहाय्य देऊ केले. जर्मन भांडवलदार तुर्कस्थानातील उद्योगधंद्यामध्ये पाण्यासारखा पैसा ओतीत होते. जर्मन सरकारने बर्लिन - बगदाद रेल्वेची जबाबदारी उचलली होती. परिणामी नोव्हेंबर १९१४ मध्ये तुर्कस्थानने जर्मनीला आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचे जाहीर करून जर्मनीच्या बाजूने युध्दप्रवेश केला. तुर्कस्थानच्या नियंत्रणाखाली असलेली दार्दानेल्सची सामुद्रधुनी ही युध्दातील डावपेचांच्या दृष्टीने अतिशय मोक्याची बाब होती. त्या सामुद्रधुनीच्या आधारे रशियाला काळ्या समुद्रात जेरबंद करून ठेवावयाचे हा जर्मन गटाचा प्रयत्न होता, तर दार्दानेल्सच्या सामुद्रधुनीतून थेट कॉन्स्टँटिनोपलवरच धडक मारण्याचा दोस्त गटाचा मनोदय होता.

### ❑ गॅलिपोली मोहीम :-

रशियाशी थेट संबंध प्रस्थापित करण्याकरिता इंग्रजांनी लिशियाचे व्दीपकल्प जिंकण्याचा, दार्दानेल्समधून घुसून कॉन्स्टँटिनोपल जिंकून घेण्याचा निकराचा प्रयत्न केला. तथापि पश्चिमेकडील आघाडी कमकुवत होऊ

नये म्हणून या आघाडीवर अधिक कुमक पाठविण्यास लष्करी अधिकारी तयार झाले नाहीत. परिणामी ब्रिटीशांचा हा प्रयत्न फसला. ब्रिटिशांना गॅलिपोली जरी जिंकता आले नाही, तरी मेसोपोटेमिया व पॅलेस्टाईनचा प्रदेश तुर्कांच्या अंमलापासून मुक्त करण्यात त्यांना यश आले.

## ❑ इटलीचा युध्दप्रवेश :-

इटली तीस वर्षेत्रिराष्ट्र संघाचा सभासद होता, तरी त्याने जर्मनी व ऑस्ट्रियाची बाजू न घेता त्यांच्याविरुध्द इ. स. १९१५ च्या सुरुवातीस युध्दात उडी घेतली. याचे खरे कारण जो इटालियन भाषिक प्रदेश अद्यापही ऑस्ट्रियाच्या ताब्यात होता तो परत मिळविणे हा होता. इटालियनांना या युध्दात विशेष यश मिळविता आले नाही, उलट उत्तर इटलीचा प्रदेश ऑस्ट्रियाच्या ताब्यात जाण्याचा धोका निर्माण झाला, परंतु इंग्लंड व फ्रान्सच्या साहाय्यामुळे इटली वाचला. इटलीला युध्दात जरी अपयश आले, तरी इटलीमुळे ऑस्ट्रियाचे फार मोठे सैन्य इटलीच्या आघाडीवर अडकून पडले, ही गोष्ट इंग्लंड व रशियाच्या पथ्यावरच पडली.

## ❑ बाल्कन प्रदेश :-

बाल्कन प्रदेशातील राजकारण असे काही गुंतागुंतीचे होत गेले की, त्यामुळे दोस्त राष्ट्रे अधिकच हवालदील झाली. बाल्कन संघाने वर्षा-दीडवर्षापूर्वी तुर्कस्थानचा पराभव करून त्याचा बराचसा प्रदेश आपल्या कब्जात घेतला होता, परंतु त्यानंतर संघाच्या सदस्यांत वाटणीवरून भांडणे होऊन बल्गेरिया संघातून फुटला. बल्गेरिया आणि इतर काही बाल्कन राष्ट्रांत लढायाही झाल्यात. महायुध्द सुरु झाल्यानंतर बल्गेरिया आपली जुनी भांडणे लक्षात ठेवून इ. स. १९१५ च्या ऑक्टोबरमध्ये सरळ तुर्कस्थानला आणि जर्मन गटाला मिळाला. बाल्कन देशांपैकी सर्बिया आणि मॉटेनिग्रो दोस्त राष्ट्रांच्या बाजूने होते. उत्तरेकडून जर्मन आणि ऑस्टियन सैन्याचे हल्ले आणि पूर्वेकडून बल्गेरियनांच्या स्वाऱ्या जोरात सुरु झाल्या. सर्बियाने प्रारंभी ऑस्टियाचे हल्ले मोठ्या शर्थीने परतवून लावले, परंतु लवकरच सर्बिया व मॉटेनिग्रो ही छोटी राष्ट्रे जर्मनी-ऑस्टियाच्या ताब्यात गेली. बर्लिनपासून कॉन्स्टँटिनोपलपर्यत सरळ आगगाड्या धावू लागल्या. इ. स. १९१६ मध्ये रुमानिया दोस्तांना सामील झाला. रुमानियाच्या सेनादलाने ऑस्टियावर हल्लाही केला, परंतु रुमानियाची ताकद फार काळ टिकणे शक्य नव्हते. ऑस्ट्रियन आणि जर्मन सैन्याने रुमानियात अशी काही जोरदार मुसंडी मारली की, बघता बघता त्या देशाच्या दोन तृतीयांशाहून अधिक प्रदेशावर त्यांचा अंमल प्रस्थापित झाला. रुमानियातील ह्या विजयामुळे जर्मन गटाला बल्गेरिया आणि तुर्कस्थानशी संपर्क ठेवणे फारच सोपे झाले. रुमानियातील विपुल धान्य आणि तेल हाती आल्यामुळे त्यांची स्थिती दोस्तांच्या तुलनेत अतिशय सुधारली. ग्रीस प्रारंभी जरी तटस्थ राहिले होते, तरी शेवटी त्यांचे धोरण काय होईल ही दोस्त राष्ट्रांना काळजी होती, तेव्हा त्यांनी जून १९१७ मध्ये ग्रीसचा राजा कॉन्स्टन्टाइन ह्याला सरळ पदभ्रष्ट केले. ग्रीसचा पंतप्रधान व्हेनिझेलॉस हा दोस्त राष्ट्रांचा चाहता असल्यामुळे ग्रीसमध्ये दोस्तांना चांगलाच दिलासा मिळाला.

## ❑ आफ्रिकेतील आघाडी :-

तुर्कस्थान जर्मनीच्या बाजूने युध्दात उतरल्यामुळे इंग्रजांना तुर्की साम्राज्याला चिकटून असणाऱ्या आपल्या आफ्रिकेतील आणि आशियातील साम्राज्याच्या रक्षणाकडे तातडीने लक्ष पुरविणे भाग पडले. इंग्लंडने इजिप्तच्या खेदिवाला पदभ्रष्ट करून हाकलून लावले आणि इजिप्त हे आपले संरक्षित राष्ट्र आहे, असे जाहीर करून खेदिवाच्या चुलत्याला सुलतान म्हणून इजिप्तच्या तख्तावर बसविले. फेब्रुवारी १९१५ मध्ये तुर्कस्थानने इजिप्तवर स्वारी करून सुवेझ कालव्यावर ताबा बसवून इंग्लंडचा भारताशी संबंध तोडण्याची मोहीम हाती घेतली, परंतु ब्रिटिशांनी कडवा प्रतिकार करून तुर्कस्थानचा प्रयत्न हाणून पाडला. इ. स. १९१५ च्या अखेरीपर्यंत ब्रिटीश आणि फ्रेंच फौजांनी जर्मनीच्या आफ्रिकेतील टोगोलँड आणि कॅमेरून या वसाहती जिंकल्यात. जर्मन नैर्ऋत्य आफ्रिकेवरही हल्ले सुरु झाले मात्र तो भाग संपूर्णपणे ताब्यात येण्यास इ. स. १९१७ साल उजाडावे लागले. आफ्रिकेतील जर्मन साम्राज्याचे काही भाग अगदी इ. स. १९१८ पर्यंतही दोस्तांच्या पूर्णपणे ताब्यात आले नाहीत.

## ❑ आशियातील आघाडी :-

जपान दोस्तांच्या बाजूने युध्दात उतरले होते. ऑगस्ट १९१४ मध्ये जपाननजीकच्या चीनमधील क्याऊचाऊ ह्या जर्मन वसाहतीची जपानने मागणी केली. कैसारचा नकार मिळताच जपानने नोव्हेंबर १९१४ मध्ये क्याऊचाऊ वसाहत अगदी सहजपणे जिंकून घेतली. क्याऊचाऊप्रमाणे पॅसिफिकमधील विषुववृत्ताच्या उत्तरेकडील सर्वच जर्मन बेटे जपानने जिंकलीत, तर दक्षिणेकडील बेटे इंग्लंडबरोबरच युध्दात सामील झालेल्या ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड ह्या ब्रिटीश वसाहतीच्या फौजांनी व्यापली. आशियातील तुर्की साम्राज्यही दोस्तांनी उद्ध्वस्त केले. इ.स. १९१६ मध्ये इंग्रजांनी अरबस्थानात तुर्कीविरुध्द अरबांचा उठाव घडवून आणला. अरबांनी तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील मक्का आणि मदिना ह्या पवित्र स्थळांसह एक स्वतंत्र राज्य स्थापन केले. एका ब्रिटीश तुकडीने मेसोपोटेमिया व्यापले, तर ऑक्टोबर १९१७ मध्ये दुसऱ्या ब्रिटीश तुकडीने पॅलेस्टाईनवर हल्ला चढवून जेरुसलेमवर ताबा मिळविला. जवळपास तेरा शतकानंतर ही ख्रिश्चनांची पवित्र भूमी मुस्लीम सत्तेकडून ख्रिश्चनांनी हिसकावून घेतली. सुवेझ कालवा ब्रिटीशांच्या हाती सुरक्षित राहिला आणि त्यांच्या भारतातील आणि पॅसिफिक महासागरातील साम्राज्याला निर्माण झालेला धोका टळला.

## ❑ आर्थिक नाकेबंदी :-

महायुध्दाच्या प्रारंभापासूनच दोस्तांनी जर्मनी-ऑस्ट्रियाची आर्थिक नाकेबंदी केली होती. इ.स. १९१७ पर्यंत दोस्तांना आपल्या वसाहतीतून किंवा तटस्थ राष्ट्रांकडून अन्नधान्य वा इतर कच्चा माल मिळविण्यास कोणतीही अडचण आली नाही. इ.स. १९१४ मध्ये दोस्तांचे नाविक दल जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थानकडे जाणारे युध्दसाहित्यच तेवढे जप्त करी, परंतु इ. स. १९१५ पासून जर्मनीकडे जाणारा तसेच जर्मनीच्या

सीमांना भिडलेल्या तटस्थ राष्ट्रांकडे जाणाराही अन्नधान्य, कापड आदी जीवनपयोगी मालसुध्दा इंग्लंड ताब्यात घेऊ लागले. ह्या नाकेबंदीमुळे जर्मन गटातील राष्ट्रे अतिशय हैराण झाली.

## ❑ पाणबुडी युध्द :-

जर्मनीने पाणबुड्यांचा उपयोग करून दोस्त राष्ट्रांशी सामना करण्याची योजना आखली. समुद्राच्या तळाकडून टॉर्पेडोंनी बोटी फोडून जर्मनीने दोस्तांना काही काळ चांगलेच जेरीस आणले. जर्मनांनी पाणबुडी युध्दाच्या सुरुवातीस फक्त युध्दनौकांचा नाश करण्याचे धोरण ठेवले होते, परंतु पुढे त्यांनी दोस्त राष्ट्रातील व्यापाऱ्यांची जहाजेही बुडवायला सुरुवात केली. ब्रिटीश बेटांच्या आसपासच जर्मनीने दोस्तांची जहाजे बुडविण्याचा सपाटा धुमधडाक्यात सुरु केल्यामुळे इ. स. १९१६ च्या अखेरीपर्यत दोस्तांचे अतोनात नुकसान झाले.

## ❑ इ. स. १९१७ ची युध्द परिस्थिती :-

इ. स. १९१७ च्या अखेरपर्यत युरोपीय रणभूमीवर जर्मनी, ऑस्ट्रिया आदी जर्मन गटातील राष्ट्रांची निर्विवाद सरशी होती. पश्चिम आघाडीवर लक्झेंबर्ग, बेल्जियम आणि लोखंड व कोळशाच्या खाणींनी समृध्द असलेला उत्तर फ्रान्सचा लांबलचक पट्टा जर्मनीने व्यापला होता. पूर्वेकडील आघाडीवर रशियाचा उद्योगधंद्यात प्रगत व संपन्न असलेला काही भाग जर्मन गटाच्या ताब्यात होता. सर्बिया, मॉटेनिग्रो, उत्तर अल्बानिया आणि जवळपास संपूर्ण रुमानिया ह्यावर त्यांची सत्ता प्रस्थापित झाली होती. व्हेनेशियाचा बराचसा प्रदेश त्यांनी इटलीकडून हिसकावला होता. जर्मन पाणबुड्यांनी दोस्तांच्या आरमाराचे अतोनात नुकसान केले होते. तथापि युरोपबाहेर मात्र दोस्त राष्ट्रे ठिकठिकाणी विजयी झाली होती. आशियातील तुर्कस्थानचे साम्राज्य कोडमडले होते. इंग्रजांनी इजिप्तवरील पकड घट्ट केली होती. जर्मनीचे आफ्रिकेतील बहुतेक सर्व साम्राज्य संपविण्यात आले होते. आशियातील जर्मनीच्या वसाहती जपानने ताब्यात घेतल्या होत्या.

## ❑ अमेरिकेचा युध्दप्रवेश :-

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सनने ह्या युध्दात अमेरिका तटस्थ राहील असे जाहीर केले होते. इंग्लंडने जर्मनीकडे जाणारे अमेरिकन जहाज अडवावे, ते सक्तीने इंग्लंडमधील एखाद्या बंदराला लावणे भाग पाडावे असा प्रकार सुरु होता. विल्सनने इंग्लंडकडे अनेक निषेध खलिते पाठविले तरीही इंग्लंडने आपला क्रम सोडला नाही. मात्र उतरवून घेतलेल्या मालाची पूर्ण किंमत इंग्लंड न चुकता भरीत असे. जर्मनीची पध्दत अधिक दांडगाईची होती. मे १९१५ मध्ये एका जर्मन पाणबुडीने लुसिटानिया नावाची एक ब्रिटीश व्यापारी बोट बुडविली. सुमारे १२०० प्रवाशांना जलसमाधी मिळाली. त्यापैकी सव्वाशेहून अधिक अमेरिकन स्त्री पुरुष व मुले होती. अमेरिकेने जर्मनीकडे कडक निषेध खलिता पाठविला. जर्मनीने थोडी नरमाई दाखवून प्रवाशी बोटी न बुडविण्याचे आणि मालवाहू बोटीसंबंधी खबरदारी घेण्याचे मान्य केले. तथापि इ. स. १९१६

मध्ये दिलेले हे वचन इ. स. १९१७ च्या जानेवारीतच जर्मनीने चक्क मागे घेतले आणि इंग्लंड व फ्रान्सच्या भोवतालचा विस्तृत जलभाग आणि भूमध्य समुद्र हे युध्दक्षेत्र आहे आणि त्यात दिसणारे कोणतेही जहाज दिसताक्षणीच बुडविले जाईल असे अमेरिकेला कळवून टाकले. तत्क्षणी वुड्रो विल्सनने अमेरिकेचे आणि जर्मनीचे राजनैतिक संबंध संपल्याचे जाहीर केले. जर्मनीने दोन आठवड्यांच्या अवधीत अमेरिकेची आठ जहाजे बुडविली. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सनने एप्रिल १९१७ मध्ये जर्मनीविरुध्द आणि डिसेंबर १९१७ मध्ये ऑस्ट्रियाविरुध्द युध्द जाहीर केले. अमेरिकेने अत्यंत त्वरेने युरोपकडे आपले आरमार रवाना केले. जर्मन पाणबुड्या नष्ट करण्यासाठी उत्तर समुद्रात सत्तर हजार सुरुंग पेरण्यात आलेत. दोस्त राष्ट्रांनी अटलांटिक महासागरात अमेरिकेच्या सहकार्याने तीस-चाळीस हजार सुरुंगांचे जाळे पसरून ठेवले.

## ❑ अखेरच्या युध्दकालीन घडामोडी :-

जर्मनीची कोंडी करण्यासाठी ब्रिटीश आरमार समुद्रावर ठिकठिकाणी प्रयत्न करीत होते. जेटलंड येथील ब्रिटीश व जर्मन यांच्यातील आरमारी लढाई निर्णायक ठरली. या लढाईत जर्मनीचा जबरदस्त पराभव झाल्यामुळे उत्तर समुद्रात जर्मनीने पुन्हा आरमारी लढाई केली नाही, परंतु पाणबुड्यांच्या साहाय्याने पाणसुरुंग पेरून युध्दमान व तटस्थ राष्ट्रांच्या बोटी बुडविण्याचे सत्र सुरु केले. इ. स. १९१७ पासून लढाईचा रंग हळूहळू पालटू लागला. युरोपबाहेर दोस्त राष्ट्रांना ठिकठिकाणी विजय मिळू लागले. रशियाने कॉकेशस पर्वताकडून आशिया मायनरपर्यंत मुसंडी मारून तेथे पाय रोवला. इराणच्या आखातातून ब्रिटनने बगदादपर्यंत चढाई केली आणि सुवेझ कालव्यामधून सिरीया व पॅलेस्टाईनवर दबाव आणला. परिणामी तुर्कस्थानचे नीतिधैर्य संपुष्टात आले. तुर्कस्थानच्या सैन्यात बंडाळी झाल्यामुळे तुर्कस्थानचा शक्तिपात झाला. आफ्रिकेमध्ये पूर्व आफ्रिका सोडून जर्मनीच्या इतर सर्व वसाहती फ्रेंच, ब्रिटीश आणि बेल्जियम फौजांनी पादाक्रांत केल्यात. अमेरिकेच्या युध्दप्रवेशाने इ. स. १९१७ मध्ये दोस्तांची बाजू सावरली, बळकट झाली. पाठोपाठ रशियन राज्यक्रांतीमुळे दोस्त राष्ट्रांना जबरदस्त तडाखा बसला. १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यात बोल्शेव्हिक गटाने रशियात क्रांती घडवून आणली आणि ब्रेस्टलिटोव्हस्क येथे जर्मनीशी तह करून १८ मार्च १९१८ रोजी युध्दातून आपले अंग काढून घेतले.

सप्टेंबर १९१८ मध्ये तुर्कस्थानने शरणागती पत्करली. सालोनिका बंदारामधून दोस्त राष्ट्रांनी बल्गेरियावर तुफानी हल्ले चढविल्यामुळे बल्गेरियाचा प्रतिकार साफ कोसळला. बल्गेरियाच्या पतनाचा फायदा उठवून बाल्कन राष्ट्रांनी आपली मुक्तता मोहीम सुरु केली. बल्गेरियाच्या शरणागतीने ऑस्ट्रियाचे धैर्य खचले. ऑस्ट्रियन सैनिकांनी आघाडीवर जाण्यास साफ नकार दिला. याचवेळी इटलीने ऑस्ट्रियावरील हल्ल्याचा जोर वाढविला. ४ नोव्हेंबर १९१८ रोजी ऑस्ट्रियाने शरणागती पत्करली. ऑस्ट्रियाने शरणागती पत्करताच त्या परिस्थितीचा फायदा उठवून ऑस्ट्रियातील झेक व स्लाव्ह लोकांनी झेकोस्लोव्हेकिया या नव्या प्रजासत्ताकाची स्थापना केली. क्रोशियाने ऑस्ट्रियाबरोबरचे आपले संबंध तोडून सर्बियात विलीन होण्याचा निर्णय घेतला.

इस्ट्रिया व टिरोल हे भाग इटलीने स्वत: च्या ताब्यात घेतले. रुमानियाने हंगेरीवर हल्ला चढविला. एकेकाळी युरोपातील बलाढ्य साम्राज्य असलेले ऑस्ट्रिया-हंगेरीचे साम्राज्य पूर्णपणे पोखरले गेले.

इ. स. १९१४ पासून सातत्याने वेगवेगळ्या आघाड्यांवर लढत असलेल्या जर्मनीचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर घटले. दोस्त राष्ट्रांनी सर्व बाजूंनी जर्मनीची आर्थिक नाकेबंदी सुरु केली. जर्मनीच्या तिन्ही मित्रांनी शरणागती पत्करल्यामुळे जर्मन नागरिक युध्द थांबविण्याची मागणी करू लागले. कैसरने बादेनच्या राजपुत्राला राज्यकारभाराची सूत्रे देऊन त्याच्याकरवी दोस्त राष्ट्रांबरोबर तहाची बोलणी सुरु केली. तथापि जर्मनीत असंतोषाचा प्रस्फोट झाल्यामुळे अगतिक होऊन कैसरने हॉलंडमध्ये पलायन केले. जर्मनीमध्ये प्रजासत्ताकाची स्थापना करण्यात आली. या नव्या प्रजासत्ताकाला जर्मनीला सर्वनाशापासून वाचविण्याचा केवळ एकमेव मार्ग उपलब्ध होता. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सनच्या चौदा मुद्यांच्या आधारे शरणागती पत्करणे.

नव्या प्रजासत्ताकाच्या वतीने एर्झबर्गर आणि काऊंट ओबेर्नडॉर्फ या जर्मन प्रतिनिधींची कॉप्येच्या जंगलात फॉकच्या खास रेल्वेगाडीच्या एका डब्यात संपूर्ण बिनशर्त शरणागतीच्या शस्त्रबंदी करारावर अत्यंत हताश, अगतिक अवस्थेत ११ नोव्हेंबर १९१८ रोजी पहाटे ५ वाजता स्वाक्षऱ्या केल्या. शस्त्रबंदी करारानुसार ११ नोव्हेंबर १९१८ रोजी सकाळी ११ वाजता पश्चिम आघाडीवरील शस्त्रास्त्रांचा खणखणाट थांबला, तोपर्यंत दोस्त सैन्य एकाही ठिकाणी जर्मन सीमेपर्यंत पोहोचले नव्हते.

## २.२.५ पॅरिस शांतता तह

दोस्त राष्ट्रांनी जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, बल्गेरिया, तुर्कस्थान यांचा पहिल्या महायुध्दात पराभव केल्यानंतर युध्दोत्तर शांतता स्थापन करण्यासाठी व युरोपचे भवितव्य ठरविण्याकरिता युध्दात भाग घेतलेल्या सर्व राष्ट्रांची शांतता परिषद पॅरिस येथे १८ जानेवारी १९१९ रोजी भरली. शांतता परिषदेच्या जागेची निवड तितकीशी योग्य नव्हती. कारण पॅरिस शहरात व सभोवताली युध्दाच्या खुणा दिसत होत्या.

### ❑ परिषदपूर्व शांततेचे प्रयत्न :-

पॅरिसच्या शांतता परिषदेपूर्वी युध्द थांबवून शांततेचे प्रयत्न केले गेले होते, हे त्या परिषदेच्या पार्श्वभूमीवर लक्षात घेणे अगत्याचे आहे. फेब्रुवारी १९१६ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी तडजोडीसाठी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्याबाबतची सूचना जर्मनीला केली होती. पण जर्मनीने या सूचनेकडे कानाडोळा केला. प्रेसिडेंट विल्सनने शांततेचा शेवटचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने आपली सुप्रसिध्द 'चौदा कलमी योजना' (Fourteen Points) ८ जानेवारी १९१८ रोजी जाहीर केली. या चौदा कलमांमध्ये काही मुलभूत तत्त्वांचा समावेश असल्यामुळे जागतिक शांततेच्या प्रयत्नात या चौदा कलामांना विशेष महत्त्व दिले जाते. ती चौदा कलमे अशी :-

१) आंतरराष्ट्रीय राजकारणात गुप्त राजनीतीचा अवलंब न करता प्रकटपणे शांततेचे तह करण्यात यावेत.

२) युध्दकाळात अथवा शांतता काळात आंतरराष्ट्रीय जलमार्गावर सर्वांना अनिर्बंध संचार - स्वातंत्र्य राहावे.

३) आंतरराष्ट्रीय व्यापारावरील सर्व बंधने काढून टाकावीत.

४) राष्ट्रीय सैन्यात व शस्त्र साहित्यात योग्य अशी कपात करण्यात यावी.

५) वसाहतींची निष्पक्षपातीपणे वाटणी करण्यात येईल. अशी वाटणी करताना वसाहती ज्यांच्या आहेत, त्यांच्याच हक्कांचा फक्त विचार न करता वसाहतीतील जनतेचे हितसंबंध आणि त्यांच्याही भावनांचा विचार करण्यात यावा.

६) रशियन प्रदेशातून शस्त्र-सैन्य मागे घेण्यात यावे आणि रशियाला आपले भवितव्य ठरविण्यासाठी पूर्ण कृतिस्वातंत्र्य देण्यात यावे.

७) बेल्जियममधून शत्रू सैन्य काढून घ्यावे आणि बेल्जियमची तटस्थता पुनर्स्थापित करण्यात यावी.

८) फ्रेंच प्रदेशांतून शत्रू सैन्य काढून घेण्यात यावे आणि फ्रेंच जनतेचे पुनर्वसन करावे, तसेच इ. स. १८७१ साली अल्सेस - लॉरेन प्रदेशासंबंधी फ्रान्सवर झालेला अन्याय दूर करण्यात यावा.

९) राष्ट्रीयतेच्या तत्त्वानुसार इटलीच्या सीमेची पुनर्रचना करण्यात यावी.

१०) ऑस्ट्रिया-हंगेरीच्या जनतेला स्वयंविकासाची संधी देण्यात यावी.

११) सर्बिया, मान्टेनिग्रो व रुमानिया ही राष्ट्रे परकीय आक्रमणापासून मुक्त करण्यात येऊन जनतेला पुनर्विकासास संधी द्यावी. तसेच सर्बियाला सागरी किनारा उपलब्ध करून द्यावा.

१२) ऑटोमन साम्राज्याच्या तुर्कस्थान विभागास सार्वभौमत्व देण्यात यावे आणि या साम्राज्यातील इतरही प्रदेशांना स्वातंत्र्य द्यावे. तसेच डार्डनेल्स व बॉस्फरस या सामुद्रधुनीतून संचार करण्याचे सर्व जहाजांना स्वातंत्र्य राहील.

१३) पोलंडला समुद्रकिनारा उपलब्ध करून देऊन स्वातंत्र्य द्यावे.

१४) जगातील छोट्या-मोठ्या राज्यांचे स्वातंत्र्य व प्रादेशिक एकता सुरक्षित ठेवण्यासाठी एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करण्यात यावी.

## पॅरिस परिषदेतील महत्त्वाच्या व्यक्ती :-

### १. प्रेसिडेंट वुड्रो विल्सन :-

वुड्रो विल्सन हे अमेरिकेचे प्रेसिडेंट होते. ते परिषदेतील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्व होते.

आदर्शवादी, स्वत:च्या न्यायबुध्दीवर पुरेपूर विश्वास असलेला, लोकशाहीचा पुरस्कर्ता विल्सन या परिषदेचे भूषण होते. युध्दात आपल्या बाजूने निर्णय लागूनही अमेरिकेस कोणतीच प्रादेशिक वा इतर हाव नव्हती. त्याचमुळे विल्सनला निष्पक्षपाती मध्यस्थाची भूमिका पार पाडता आली. विल्सनने घडवून आणलेल्या पॅरिसच्या तहास मंजुरी दिली नाही वा जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या राष्ट्रसंघासारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेस मान्यता दिली नाही. हे विल्सनचे पर्यायाने जगाचे दुर्दैव मानले पाहिजे.

### २. लॉईड जॉर्ज :-

इंग्लंडचा पंतप्रधान असलेली ही व्यक्ती म्हणजे लोकशाहीवर प्रेम करणारी, आवेशपूर्ण वक्तृत्व शैलीची मुरब्बी, मुत्सद्दी अशी होती. स्वत: उदारमतवादाचा पुरस्कार करणारा असूनही, जर्मनीविरुध्द सुडाने पेटलेल्या लोकमतापुढे त्याला मान झुकवावी लागली.

### ३. जॉर्जी क्लेमेन्शू :-

यास परिषदेतील अतिशय धूर्त व तीक्ष्ण बुध्दीचा फ्रान्सचा पंतप्रधान म्हणून ओळखले जात होते. आपल्या देशाचे नेमके हित कसे साध्य करावे, हे तो पूर्णपणे जाणत होता.

### ४. ओरलॅन्डो :-

हा इटलीचा पंतप्रधान होता. याने अत्यंत संकुचित वृत्तीने आपल्याच देशाचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला.

### ❑ शांतता परिषदेचे ध्येय :-

पहिल्या महायुध्दात दोस्त राष्ट्रांनी प्राणपणाने लढून लष्करशाही व हुकूमशाहीविरुध्द लोकशाही असा सामना लोकशाहीच्या बाजूने जिंकला. येथून पुढे सर्व प्रकारचे युध्द टाळून जगात लोकशाही नांदावी हे ध्येय समोर ठेवून शांतता परिषद ठरविण्यात आली.

### परिषदेसमोरील प्रश्न :-

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान साम्राज्याच्या पाडावानंतर युरोपची पुर्नरचना करणे.

२) जर्मनी व त्याची मित्रराष्ट्रे यांच्याकडून युध्दखंडणी घेणे.

३) जर्मन वसाहती व तुर्की साम्राज्यातील प्रदेशांचे भवितव्य ठरवणे.

४) शस्त्रमर्यादा घालणे.

५) युरोपच्या राज्यसंघासारखी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करून आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेने व सहकार्याने सोडवणे.

## ❀ आधारभूत तत्त्वे :-

वरील प्रश्न सोडवण्यासाठी शांततेचा पाया म्हणून तीन तत्त्वे स्वीकारण्यात आली. जी विल्सनच्या चौदा कलमी योजनेत अनुस्थूत होती.

१) आंतरराष्ट्रीय समस्यांचा शांततेने व सहकार्याने विचार करून शक्य तर तह किंवा करार घडवून आणून त्या समस्या सुलभपणे सोडण्यासाठी आंतरराष्ट्रीय यंत्रणेच्या स्वरूपाचा राष्ट्रसंघ स्थापन करण्यात यावा.

२) पराभूत राष्ट्रांच्या वसाहती किंवा मागासलेले प्रदेश राष्ट्रसंघ प्रणित विश्वस्त समितीच्या ताब्यात देवून त्या प्रदेशातील लोकांचे कल्याण व विकास साधण्यात यावा.

३) तिसरे मुलभूत तत्त्व राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचे होते.

प्रे. विल्सन राष्ट्रवादाचा पुरस्कर्ता असल्याने युरोपची पुर्नरचना करताना राष्ट्रराज्यांच्या कल्पनेवर त्याने भर देण्याचे ठरवले. प्रादेशिक पुर्नरचना करण्याच्या दृष्टीने या तत्त्वांचा उपयोग झाला. यामुळे अनेक स्वतंत्र राष्ट्रराज्ये उदयास आली.

## ❑ शांतता परिषदेचे कामकाज :-

१८ जानेवारी १९१९ रोजी फ्रान्सचे अध्यक्ष रेमंड पॉइनकेअर यांच्या हस्ते शांतता परिषदेचे उद्घाटन झाले. जॉर्जी क्लेमेंशू यांची परिषदेच्या अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. एप्रिलच्या अखेरपर्यंत परिषदेचे कामकाज चालले. तहाचा कच्चा मसुदा खास निमंत्रणावरून उपस्थित असलेल्या जर्मन शिष्टमंडळाच्या हाती ७ मे ला सोपवला. पुढील सहा आठवडे तहासंबंधी कागदपत्र  देण्याघेण्यात खर्च झाले. तहाच्या मसुद्यावर त्वरित निर्णय घेण्यासंबंधी २४ तासांचा निर्वाणीचा खलिता २२ जून १९१९ रोजी जर्मनीला धाडला. जर्मनीने तहाला कडाक्याचा विरोध केला. पण पुन्हा युध्द करण्याची कुवत अंगी राहिली नसल्यामुळे जर्मनीने २८ जून १९१९ रोजी ज्या ठिकाणी बिस्मार्कने आपला विजय १८७१ साली जाहीर केला होता. त्याच व्हर्सायच्या राजवाड्यातील ऐतिहासिक आरसे महालात तहावर स्वाक्षरी केली. म्हणून या तहास व्हर्सायचा तह असेही म्हटले जाते.

## ❑ इतर तह :-

पॅरिसच्या तहाप्रमाणेच ऑस्ट्रियाशी सेंट जर्मेनचा तह (१० सप्टेंबर १९१९) हंगेरीशी ट्रॉयनॉनचा तह (४ जून १९२०) बल्गेरियाशी नियालीचा तह (२७ नोव्हेंबर १९१९), तुर्कस्थानशी सेव्हर्सचा तह (१० ऑगस्ट १९२०) असे वेगवेगळे तह केले. (सेव्हर्सचा तह तुर्कस्थानने नामंजूर केला व तुर्की जनतेने तो धुडकावून लावला.)

## ❑ व्हर्सायचा तह/पॅरिसचा तह प्रमुख कलमे :-

पॅरिसच्या शांतता परिषदेने अनेक बैठका, अनेक समित्या, उपसमित्यांच्या मदतीने तहाच्या अटी पूर्ण केल्या. या तहाचे स्वरूप लिखित व अतिशय विस्तृत बनले होते. एकूण ८०,००० शब्दांचा, १५ विभाग ४४० कलमे असून २० पेक्षा जास्त परिशिष्ठे जोडलेला हा अभूतपूर्व तह होता.

## ❑ तहातील अटी :-

### अ) प्रादेशिक पुनर्रचना :-

१) फ्रान्सला अल्सेस व लॉरेन्स परत मिळाला.

२) कील कालव्याच्या पट्ट्याचे निर्लष्करीकरण करण्यात येवून तो सर्वांना खुला करण्यात आला.

३) नुकसानभरपाई म्हणून फ्रान्सला १५ वर्षाच्या काळासाठी झार देण्यात आले. झारची शासनव्यवस्था राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली आंतरराष्ट्रीय मंडळ पाहील. १५ वर्षानंतर सार्वमताच्या निर्णयानुसार या भागाचे भवितव्य ठरवण्यात येईल.

४) ऱ्हाईन लँडचे निर्लष्करीकरण केले. व दोस्त राष्ट्रांचे सैन्य या प्रदेशात ठेवण्यास परवानगी देण्यात आली. या प्रदेशात जर्मनीने कोणतीही शिबंदी उभारण्यास मनाई करण्यात आली.

५) आंतरराष्ट्रीय महत्त्वाची जर्मन बंदरे, रेल्वेमार्ग व जलमार्ग यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मंडळ नियुक्त करण्यात आले. तसेच ऱ्हाईन मंडळदेखील स्थापन केले.

६) बेल्जियमला युपेन, मोअसॅनेट, मालमेर्ज हे विभाग मिळाले.

७) लक्झेंबर्गला स्वातंत्र्य देवून बेल्जियम व लक्झेंबर्ग यांना तटस्थ राष्ट्रांचा दर्जा दिला.

८) जर्मनीकडे हॉल्अेन व दक्षिण स्लॅसविग हे प्रांत राहिले. मध्य आणि उत्तर स्लॅसविगमध्ये सार्वमत घेण्यात आले. त्यानुसार मध्य स्लॅसविग जर्मनीला मिळाला व उत्तर स्लॅसविग डेन्मार्कला मिळाला.

९) अठराव्या शतकातील पोलंडची प्रादेशिक एकता टिकविण्याच्या दृष्टीने पोझेन व उत्तर प्रशिया जर्मनीने पोलंडला दिला. ऑस्ट्रियाने गॅलिशिया पोलंडला दिला. सायलेशियाची सार्वमतानुसार पोलंड व जर्मनीमध्ये विभागणी झाली. पोलंडला सागरात प्रवेश करण्यासाठी जर्मनीतून मार्ग देण्यात आला.

१०) विस्तुला नदीच्या मुखावरील डॅझिंग हे मुक्त बंदर करण्यात येवून त्याचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय मंडळाकडे सोपवण्यात आले.

११) आकार व लोकसंख्येच्या दृष्टीने ऑस्ट्रिया फार लहान केला. शिवाय समुद्राकडे जाण्याचा मार्ग ही ऑस्ट्रियास ठेवला नाही. राष्ट्रसंघाची मंजुरी व संमती घेतल्याशिवाय ऑस्ट्रियाला जर्मनीत सामील होण्यास बंदी करण्यात आली.

१२) हंगेरी वेगळा करण्यात आला. पण हंगेरीचा बराचसा प्रदेश युगोस्लाव्हिया व रुमानिया यांच्यात सामील करण्यात आला.

१३) बोहेमिया व मोर्विया या प्रदेशांचे मिळून झेकोस्लोव्हेकिया हे नवे राष्ट्र तयार करण्यात आले. तसेच जर्मन बहुसंख्याक असलेला सुडेनलॅडचा प्रदेश झेकोस्लोव्हेकियास मिळाला.

१४) इटलीस टायरोल देण्यात आला.

१५) हंगेरीकडून ट्रान्सिल्व्हानिया, ऑस्ट्रियाकडून बुकोव्हिना व रशियाकडून बेसारेविया हे प्रदेश घेवून रुमानियाचा विस्तार वाढवण्यात आला.

१६) सर्बिया, मॉन्टेनिगो, बोस्निया, हर्जेगोव्हीना, क्रोशिया व डाल्मेशिया या प्रदेशांचे मिळून युगोस्लाव्हिया हे नवीन राष्ट्र निर्माण करण्यात आले.

१७) नियालीच्या तहान्वये बल्गेरियाने स्ट्रमित्सा युगोस्लाव्हियास दिला व मॅसिडोनिया ग्रीसला दिला.

### ब) जर्मन वसाहती :–

जर्मनीच्या आफ्रिका व आशिया खंडातील वसाहती काढून घेतल्या. तसेच मोरोक्को, सयाम व चीनमध्ये जर्मनीचे आर्थिक हक्क नष्ट केले. देखरेख योजनेनुसार इंग्लंडकडे जर्मन नैऋत्य आफ्रिका, पॅलेस्टाईन, नवरू, मेसापोटेमिया, टांगनिका व गोल्डकोस्ट अर्धा कॅमेरुन देण्यात आले. पॅसिफिक महासागरातील विषुववृत्ताच्या उत्तरेस असलेली मार्शल, केरोलिन पिलिव, लॅड्रोन आणि किवूचाव हे प्रदेश जपानकडे सोपवण्यात आले. ऑस्ट्रियाकडे आर्कीपेलॅगो, जर्मन व्युगिली आणि सालोमन बेटे सोपवण्यात आली. जर्मन सॅमोआ न्यूझीलंडच्या देखरेखीसाठी दिला. बेल्जियमकडे किहू सरोवराभोवतालचा प्रदेश दिला.

### क) युध्दखंडणी :–

युध्दखंडणीची रक्कम व अदा करण्याची पध्दत ठरवण्यासाठी एक मंडळ नेमले. जर्मनीने नागरी मालमत्तेची पुर्नस्थापना करून उध्वस्त प्रदेशाचे पुर्नवसन करावे. तसेच युध्दात कामी आलेल्या वीरांच्या विधवांना निवृत्तीवेतन जर्मनीने द्यावे. पहिल्या महायुध्दास जर्मनीच जबाबदार आहे. असे ठरवून युध्दखंडणी जर्मनीवर लादली.

### ड) शस्त्रास्त्र कपात :–

जर्मन सैन्यसंख्या एक लाखापर्यंत खाली आणली. शस्त्र कमी करण्यात आली. सक्तीचे लष्करी

शिक्षण रद्द करण्यात आले. नौदल कमी करून जर्मनीला पाणबुड्या ठेवण्यास बंदी घालण्यात आली. खड्या सैन्याबाबत ऑस्ट्रियास ३०,००० पर्यंत व बल्गेरियास २०,००० पर्यंत मर्यादा ठेवली. सर्व शत्रू राज्यातील सक्तीचे लष्करी शिक्षण रद्द करण्यात आले.

**इ) सर्वसाधारण :-**

दोस्त राष्ट्रांनी केसरला युध्दास जबाबदार धरून युध्दगुन्हेगार म्हणून त्याच्या चौकशीसाठी डच सरकारकडे त्याची मागणी केली. पण डच सरकारने ही मागणी फेटाळली त्यामुळे हे कलम निरुपयोगी ठरले. तसेच प्रशियातील युध्दखोर सरदार युध्दास प्रोत्साहन देणारे असल्याने त्यांचीही युध्द गुन्हेगार म्हणून चौकशी व्हावी ही दोस्त राष्ट्रांनी मागणी केली.

**फ) राष्ट्रसंघ :-**

या तहाच्या शेवटी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवण्यासाठी राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याविषयीचे एक कलम घालण्यात आले.

**❑ इतिहासकार व मुत्सद्दी यांच्या दृष्टीकोनातून व्हर्साय तह :-**

**१. कार्विन :** बाल्कन राष्ट्रांनी समस्या सोडवण्यासाठी झालेल्या युध्दानंतर बाल्कन समस्या सुटण्याऐवजी युरोपचे तुकडे तुकडे करून सारा युरोप हीच एक समस्या निर्माण झाली.

**२. केनिस :** शांततेच्या राखेखाली दबलेले युध्दाचे धगधगते निखारे. तो शांतता तहास काथेजियन शांतता असे संबोधले.

**३. लॉन्सिंग :** समानता, न्याय या तत्त्वावर तह आधारलेला नसून जेत्याला मलिदा या स्वार्थी पायावर तह करण्यात आला.

**४. स्मटस :** तह समाधानकारक होता म्हणून मी तहावर सही केली. नाहीतर युध्द समाप्त करण्यासाठी तह ही एक आत्यंतिक गरज होती?

**५. ब्रिटीश पंतप्रधान लॉईड जॉर्ज :** जर्मनीला गाय समजून एकाच वेळी तिच्याकडून दुधाची आणि मांसाची अपेक्षा करणे योग्य आहे काय?

**६. एम. व्ही. गुप्ता** 'International Relations Since 1919' या ग्रंथात म्हणतात, "The treaty of Versailles is one of the most controversial document that has been signed by the nations in modern times."

काही टीकाकारांच्या मते, 'Fourteen Points' यातील Points शब्दावर कोटी करून 'Fourteen disappointments' अशा शब्दात तहाची हेटाळणी केली आहे.

- **शांतता तहाचे महत्त्व :-**

पॅरिसच्या शांतता तहावर जरी टीका करण्यात आली असली तरी काही मुलभूत तत्त्वांचा उदय या तहामुळे झाला.

- ☞ या तहामुळे युरोपातील अनेक छोट्या जमातींना 'राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचे तत्त्व' प्रथमच उपयोगात आणल्यामुळे राष्ट्र-राज्ये मिळाली. परकीय जोखडापासून ही जनता स्वतंत्र झाली.
- ☞ या तहामुळे वादग्रस्त प्रदेशात सार्वमत घेणाच्या योजनेमुळे सीमाप्रश्न सोडवण्याचा एक सुलभ मार्ग उपलब्ध झाला.
- ☞ सहजीवन व सहकार्य सामोपचाराने, तडजोडीने शक्य आहे हे जागतिक तत्त्व या संघटनेच्या निमित्ताने उदयास आले. जरी राष्ट्रसंघास अपयश आले असले तरी राष्ट्रसंघातील महान तत्त्वांचे विस्मरण होवू देणे योग्य नाही.
- ☞ अविकसित देशांचा विकास करण्याचे पहिले पाऊल योजनेमुळे टाकले गेले.

## २.२.६ पहिल्या महायुध्दाचे परिणाम

पहिल्या महायुध्दाने मानवाच्या संपूर्ण सामाजिक जीवनात व विचारपध्दतीत आमुलाग्र क्रांती घडवून आणली. मानवी जीवन संपूर्णपणे बदलले. युध्दात भाग घेतलेले व न घेतलेले अशा सर्वांना गंभीर परिणाम सहन करावे लागले. जुन्या श्रध्दा, ध्येये, जीवनमूल्ये पार धुळीला मिळाली. युध्दानंतर बेकारी, वस्तूंची टंचाई, महागाई, रोगराई, आर्थिक मंदी इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागले. जर्मनीत हिटलर तर इटलीत मुसोलिनी या हुकूमशहांचा उदय झाला. उदारमतवाद, संसदीय राज्यपध्दती व लोकशाही याऐवजी जनतेला साम्यवाद, हिंसाचार, हुकूमशाही याबाबत आत्मियता वाटू लागली. इंग्लंड व फ्रान्सच्या सामर्थ्याचे खच्चीकरण झाले तर रशिया व अमेरिका हे दोन देश जगातील महासत्ता म्हणून पुढे आले. युरोपियन साम्राज्यवादास जबरदस्त धक्का बसला. या महायुध्दाचा एक चांगला परिणाम म्हणून इ. स. १९२० मध्ये राष्ट्रसंघाची (League of nations) स्थापना झाली. या महायुध्दानंतर जो व्हर्सायचा तह झाला त्यातच दुसऱ्या महायुध्दाची बीजे होती. पहिल्या महायुध्दाचे परिणाम खालीलप्रमाणे आहेत.

### १. प्रचंड मनुष्यहानी :-

पहिले महायुध्द जवळजवळ ४ वर्षे चालले याकाळात युध्दात सहभागी झालेल्या युरोपातील २८ देशांना मोठ्या मनुष्यहानीला तोंड द्यावे लागले. या युध्दात सर्व देशांचे मिळून ६ कोटी ५० लाख सैनिक सहभागी झाले होते. सुमारे ८० लाख लोक या युध्दात कामी आले. अनेक लोक जखमी झाले. तर

युध्दानंतर पसरलेल्या रोगराईमुळे जवळजवळ अनेक लोक मृत्युमुखी पडले. जवळजवळ ३ कोटी कुटुंबाचे संसार उध्वस्त झाले. एवढी मोठी प्रचंड मनुष्यहानी मानव समाजाच्या इतिहासात आजपर्यंत झाली नव्हती. त्यामुळे जीवनातील सारा उत्साह, साऱ्या आशा आकांक्षाच मावळल्यासारख्या झाल्या. पहिल्या महायुध्दात कोट्यावधी माणसे शरीराने गेली तर मागे राहिल्यापैकी कोट्यावधींची मनेच मेली.

## २. प्रचंड वित्तहानी :-

पहिल्या महायुध्दाच्या काळात मालमत्तेचे झालेले नुकसान प्रचंड होते. युध्दकाळात गिरण्या, उद्योगधंदे, सांस्कृतिक केंद्रे, शेती, धरणे, रस्ते, रेल्वे, खाणी इ. चे फार मोठे नुकसान झाले. युध्दाचा प्रत्यक्ष खर्च व नुकसानभरपाईची रक्कम २७० बिलियन डॉलर्सइतकी प्रचंड होती. युध्दामुळे एवढा अफाट खर्च होवूनही त्यापासून युरोपला व सर्व मानवजातीला कोणताच फायदा झाला नाही. पहिले महायुध्द १५६५ दिवस चालले. २०१४ मध्ये हा खर्च काढावयाचा झाल्यास तो ६८०० अब्ज डॉलर्स होईल. (संदर्भ - लोकसत्ता-२७ जुलै २०१४) जगाच्या इतिहासातील हे पहिलेच महागडे युध्द होय. या युध्दाने सर्व मानव समाजच ढवळून निघाला.

## ३. महायुध्दानंतर आर्थिक प्रश्न गंभीर बनले :-

महायुध्दानंतर सर्वच देशांनी आपल्या लष्करातून अतिरिक्त सैनिकांना निवृत्त केले. हे निवृत्त सैनिक निराश अवस्थेत रस्तोरस्ती बेकार हिंडू लागले. युरोपातील सर्वच देशांत बेकारी, आर्थिक मंदी, महागाई, वस्तूंची टंचाई इ. प्रश्न गंभीर बनले. लोकांवर जबरदस्त कर लावले गेले. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून युरोपातील मानवी जीवनाला एक प्रकारची अवकळा प्राप्त झाली. शेतकरी, कामगार, कर्मचारी, व्यापारी, उद्योगपती या सर्वांनाच या आर्थिक प्रश्नास तोंड द्यावे लागले.

## ४. युरोपमधील साम्राज्यवादाचे उच्चाटन :-

जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, तुर्कस्थान, रशिया या देशांच्या साम्राज्यातील इतर छोट्या राज्यांना स्वातंत्र्य देण्यात आल्याने या देशांची साम्राज्ये नष्ट झाली. तेथील राजकीय परिस्थितीत पूर्ण बदल झाला. दोस्त राष्ट्रांच्या गटात असलेल्या रशियालादेखील आपले साम्राज्य सोडून द्यावे लागले. रशियन राज्यक्रांतीचा शिल्पकार लेनिन यांनी वसाहतवादाला विरोध करून चीनमधील प्रदेश सोडून दिल्याचे जाहीर केले. ही साम्राज्ये नष्ट करताना वुड्रो विल्सनच्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा स्विकार करण्यात आला होता. पण हाच न्याय आपल्या ताब्यातील इतर खंडावरील वसाहतींना नाकारला होता.

## ५. पराभूत राष्ट्रांचे राजकीय महत्त्व कमी झाले :-

व्हर्सायच्या तहाने पराभूत राष्ट्रांना दुर्बल राष्ट्र बनवले त्यांच्यावर अनेक अपमानास्पद अटी लादून

त्यांची भविष्यकाळातील प्रगती रोखण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यांच्यावर जबर युध्द खंडणी लादली तसेच त्या राष्ट्रांचा प्रादेशिक विस्तार, लोकसंख्या, आर्थिक उत्पन्न कमी केले.

### ६. नव्या स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रांचा उदय :-

पहिल्या महायुध्दानंतर युगोस्लाव्हिया, झेकोस्लोव्हेकिया, इस्टोनिया, लॅटेव्हिया ही नवी राष्ट्रे उदयास आली. हंगेरी, पोलंड, फिनलँड व बेल्जियम या देशांना स्वातंत्र्य मिळाले. पहिल्या महायुध्दापूर्वी युरोपात १९ सार्वभौम राष्ट्रे होती. तर युध्दानंतरच्या काळात २६ झाली. अशा प्रकारे युरोपमधील पराभूत राष्ट्रांची साम्राज्ये नष्ट झाल्यामुळे त्यांच्या ताब्यातील प्रदेशांना स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देण्यात आली. ऑस्ट्रिया, हंगेरीच्या साम्राज्यातून हंगेरी स्वतंत्र राष्ट्र बनवण्यात आले. सर्बिया शेजारचे प्रदेश सर्बियाला सोडून युगोस्लाव्हिया हे नवे राष्ट्र म्हणून मान्यता देण्यात आली. तसेच दोस्त राष्ट्रांच्या बाजूने असलेल्या पण पराभूत झालेल्या रुमानियाचा प्रादेशिक फायदा करून देण्यात आला. रशियन साम्राज्यातून फिनलँड, लिथुआनिया, इस्टेनिया, लॅटेव्हिया इ. प्रदेशांना स्वतंत्र-सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे युरोपमध्ये हंगेरी, पोलंड, फिनलँड, लॅटेव्हिया, झेकोस्लोव्हेकिया, इस्टेनिया, लिथुआनिया ही सात नवी राज्ये पहिल्या महायुध्दामुळे उदयास आली.

### ७. इंग्लंड व फ्रान्सचे खच्चीकरण :-

इंग्लंड व फ्रान्स हे देश पहिल्या महायुध्दापर्यंत जगातील पहिल्या एक व दोन क्रमांकाचे होते. पण पहिल्या महायुध्दात त्यांचे झालेले आर्थिक नुकसान व शस्त्रास्त्रांची, मालमत्तेची झालेली हानी फार मोठी होती. त्यामुळे या दोन देशांची जागा रशिया व अमेरिका या देशांनी घेतली.

### ८. अमेरिकेचा जागतिक महासत्ता म्हणून उदय :-

पहिल्या महायुध्दात उशिराने म्हणजे ६ एप्रिल रोजी अमेरिकेने युध्दात भाग घेतला. अमेरिकेच्या युध्दप्रवेशामुळे युध्दाचे चित्र पालटले. यशाची माळ दोस्त राष्ट्रांच्या गळ्यात पडल्याने अमेरिकेचे जागतिक राजकारणातील महत्त्व वाढले. प्रथमतः प्रचंड प्रगती करूनही अमेरिकेला जागतिक राजकारणात फारशी प्रतिष्ठा नव्हती. मात्र महायुध्दाच्या काळात युध्दसाहित्य, अन्नधान्य व इतर वस्तूंच्या बाबत अमेरिकेवर अवलंबून होती. तसेच युरोपियन देशांनी अमेरिकेकडून कर्ज काढल्याने अमेरिका एक श्रीमंत व वैभवशाली राष्ट्र म्हणून पुढे आले. व राजकीय, लष्करी व आर्थिक सत्तेचे केंद्र युरोपातून अमेरिकेकडे गेले.

### ९. रशियन राज्यक्रांतीला हातभार :-

रशिया हे इंग्लंड व फ्रान्सप्रमाणे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्र नव्हते तेथील शासन अनियंत्रित व भ्रष्ट

होते. लष्कर अकार्यक्षम होते. तेथील प्रजा सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांमुळे असंतुष्ट होतीच त्यात भर म्हणून रशियाचा पराभव झाल्यामुळे रशियन सैन्यात असंतोष निर्माण झाला. ही बाब १९१७ ची रशियन क्रांती यशस्वी होण्यास सहाय्यभूत ठरली. झारने पहिल्या महायुध्दात भाग घेवून रशियन क्रांती जवळ आणली असे म्हणावे लागेल.

## १०. दोस्त राष्ट्रांचा अदूरदृष्टीपणा–पक्षपाती व्हर्सायचा तह :–

पहिल्या महायुध्दाअखेर पॅरिस शांतता परिषदेने घडवून आणलेला व्हर्सायचा तह अत्यंत पक्षपाती व पराभूत राष्ट्रांची मानहानी करणारा होता. त्या तहात जर्मनीवर अनेक जाचक अटी लादल्या होत्या. विजेत्या राष्ट्रांनी दाखवलेल्या अदूरदृष्टीपणामुळे पराभूत राष्ट्रांमध्ये अपमानाबरोबरच सूडाची भावना निर्माण झाली. या तहाने शांतता स्थापन होण्याऐवजी पुन्हा गटबाजीला सुरुवात झाली. दुसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी निर्माण झाली. म्हणूनच व्हर्सायच्या तहास दुसऱ्या महायुध्दाचे पहिले मूळ कारण मानले जाते.

## ११. नव्या वैचारिक संघर्षाचा उदय :–

पहिले महायुध्द संपण्यापूर्वी रशियन राज्यक्रांतीमुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एका नवीन तत्त्वज्ञानाचा उदय घडून आला. रशियन राज्यक्रांतीतून उदयास आलेला साम्यवाद, मुक्त अर्थव्यवस्था व व्यक्तीस्वातंत्र्यासह लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या अमेरिका व इतर दोस्त राष्ट्रांना अतिशय धोकादायक वाटत होता. रशियन राज्यकर्तेआपली क्रांतिकारी विचारसरणी जागतिक स्वरुपाची बनवण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे विजेत्या राष्ट्रासमोर नवे वैचारिक आव्हान उभे राहिले. या वैचारिक संघर्षात इटली, जर्मनी व जपानमधील हुकूमशाहीच्या उदयाने नवीन भर पडली.

## १२. हिटलरचा उदय :–

व्हर्सायच्या तहात अनेक जाचक अटी जर्मनीवर लादल्या. जर्मनीचा १/१० प्रदेश जो खनिजसंपत्तीने युक्त व औद्योगिकदृष्ट्या प्रगत होता तो हिरावून घेतला. जर्मनीवर ३३,०००,००० डॉलर्स युध्दखंडणी लादली. जर्मनीच्या लष्करी संख्येवर, युध्दसाहित्याच्या उत्पादनावर निर्बंध लादले होते. त्यामुळे अर्थव्यवस्था कोलमडली. जगात जर्मनीची मोठी अवहेलना झाली. राष्ट्रीय अस्मिता दुखावली. या एकूण पार्श्वभूमीवर जर्मनीत हिटलरचा जन्म झाला. हिटलरच्या आक्रमक धोरणावर जगाला पुन्हा जागतिक महायुध्दाला सामोरे जावे लागले.

## १३. इटलीची निराशा व मुसोलिनीचा उदय :–

पहिल्या महायुध्दात इटलीची ही भरपूर मनुष्यहानी, वित्तहानी झाली. या युध्दात इटलीची १७ लाख माणसे मारली गेली. व्हर्सायच्या तहात इटलीस पराभूत राष्ट्रांनी काहीही दिले नाही. इटलीचे पंतप्रधान

ऑरलॅंडो यांनी पॅरिस शांतता परिषदेत इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका या देशांच्या नेत्यांनी अवहेलना केली होती. दोस्त राष्ट्रांनी आपणास फसवले ही भावना इटलीत निर्माण झाली. त्याच मानसिकतेचा फायदा घेवून मुसोलिनीने आपली हुकूमशाही प्रस्थापित केली. इ. स. १९३६ साली जर्मनी, जपान या देशांशी त्याने मैत्री केली. या सर्वांचा अंतिम परिणाम दुसरे महायुध्द झाले.

## १४. जागतिक महामंदीची लाट :-

युध्दकाळात परस्पर राष्ट्रातील उत्पादन साधने नष्ट करण्याच्या उद्देशाने कारखाने, दळणवळणाचे मार्ग, धरणे व नागरी वस्त्यावर करण्यात आलेल्या बॉम्बफेकीमुळे सर्वच राष्ट्रांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. युध्दकाळात अमेरिकेसारख्या समृध्द देशात दोस्त राष्ट्रांना अन्नधान्य पुरवठा करता यावा म्हणून नियंत्रणपध्दती अंमलात आणण्यात आली होती. सतत घटत्या उत्पादनामुळे जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होत गेला. आंतरराष्ट्रीय व्यापारावर विपरीत परिणाम घडत गेले. पहिल्या महायुध्दामुळेच नंतरच्या काळात जागतिक महामंदीची लाट निर्माण झाली.

## १५. युध्दसाहित्य व युध्दप्रचार तंत्राचा विकास :-

पहिल्या महायुध्दात प्रचंड प्रमाणात मनुष्यसंहार करणारी शस्त्रास्त्रे वापरली गेली. युरोपातील विविध देशातील शास्त्रज्ञ व संशोधकांना अधिकाअधिक मनुष्यसंहार करणारी शस्त्रास्त्रे तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले होते. जर्मनीने तोफखान्यात एवढी प्रगती केली होती की त्यांचे सैनिक ७० मैल अंतरावरून पॅरिसवर हल्ले करत होते. जगाच्या इतिहासात प्रथमच अंतराळात युध्द पेटले. सागरी युध्दात विनाशिका, पाणसुरुंग व पाणबुड्यांचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला.

या युध्दात युध्दप्रचार हे तंत्र म्हणून उदयास आले. या तंत्राचा वापर दोन्ही पक्षांनी बेजबाबदारपणे केला. प्रतिपक्षाला बदनाम करणे, खोटेनाटे वृत्तांत देणे हे या तंत्रानुसार केले जाई.

## १६. सामाजिक व नैतिक मूल्यांचे अध:पतन :-

पहिल्या महायुध्दाने संपूर्ण सामाजिक जीवनात व एकूण विचारपध्दतीमध्ये आमूलाग्र बदल झाला. सामाजिक व नैतिक क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे घडली. जुनी ध्येये, श्रध्दा व जीवनमूल्ये नष्ट झाली. महायुध्दानंतर उदयास आलेली पिढी चैनी, विलासी, बेदरकार, जुन्या ध्येयाचा व जीवनमूल्यांचा तिरस्कार करणारी होती. या पिढीचा ईश्वरावर विश्वास नव्हता. प्रचंड हालअपेष्टा सहन केल्याने ही पिढी काहीशी बंडखोर, क्रूर व आक्रमक बनली. सामाजिक व कौटुंबिक जीवनातील संतुलन फार बिघडले. तरुणपिढीच युध्दात नष्ट झाल्यामुळे समाजात अनाचार वाढला. मानवी प्रगतीवरील विश्वास या विनाशकारी घटनेने कमकुवत झाला. बेकारी, निराशा व नैतिक मूल्याने अध:पतनात वाढ होत राहिली.

## १७. विल्सनचा आंतरराष्ट्रीय आदर्शवाद :-

युध्दकाळात वुड्रो विल्सन हा अमेरिकेचा राष्ट्रपती होता. त्याने युध्दपूर्व काळापासून जागतिक शांततेसाठी प्रयत्न केले. संघर्ष टळावा म्हणून अनेक परिषदा भरवल्या. नंतरची सूडभावना, कटूता टाळण्यासाठी त्याने 'Peace Without Victory' विजयाशिवाय शांतता ही योजना मांडलेली होती. परंतु ती युरोपियन राष्ट्रांनी धुडकावली. त्यानंतर चौदा कलमी योजना जाहीर केली. पण तीही डावलून पराभूत राष्ट्रांवर अन्यायी तह लादला. त्याचा आंतरराष्ट्रीय आदर्शवाद तंतोतंत अंमलात आला असला तर झालेली भीषणता टळली असती. परंतु स्वार्थी व सूडभावनेने पेटलेल्या दोस्त राष्ट्रांनी त्याच्या नितीमूल्यांची टिंगलटवाळी करून त्यालाच बाजूला सारले त्याची जबर किंमत जगाला दुसऱ्या महायुध्दाच्या रूपाने मोजावी लागली. परंतु भविष्यातील आंतरराष्ट्रीय आदर्श नीतीचा पाया विल्सनने घातला. त्याचे महत्त्व जगाला पटल्यामुळे राष्ट्रसंघ व युनोची निर्मिती झाली. त्याचे श्रेय विल्सनला द्यावे लागले.

## १८. जपानला जागतिक महत्त्व :-

इ.स. १८९४-९५ मध्ये चीनचा पराभव, इ. स. १९०२ मध्ये इंग्लंडशी मैत्री, व इ.स. १९०४ - ०५ मध्ये रशियाचा पराभव यामुळे अगोदरच जपानचे महत्त्व वाढले होते. पहिल्या महायुध्दाचा जास्त फायदा जपान या आशियाई राष्ट्राला मिळाला. या महायुध्दात युरोपियन देश युध्दात गुंतल्याचे पाहून जपानने २१ मागण्यांचे एक निवेदन चीनकडे पाठवले. व बऱ्याच मागण्या मान्य करून घेतल्या. महायुध्दानंतर जपानचा समावेश बड्या राष्ट्रात होवू लागला.

## १९. चलनव्यवस्थेवरील परिणाम :-

प्रत्येक राष्ट्रातील सुवर्ण परिणाम ही चलनव्यवस्था नष्ट होवून कागदी चलनव्यवस्था युध्दानंतर स्वीकारली. नियंत्रित कागदी चलनाचा वापर व अवलंब सर्व राष्ट्रांना करावा लागला. पण त्यात त्यांना अपयश आले. चलन फुगवट्यामुळे चलनव्यवस्थेचे अवमूल्यन झाले. पतपेढ्या, बँका यांचे दिवाळे निघाले. आर्थिक मंदी, महागाई, बेकारी यांचे संकट युरोपियन देशावर आल्याने चलन व्यवस्थेवर गंभीर परिणाम झाले.

## २०. उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, संसदीय राज्यपध्दती व लोकशाहीला धक्का :-

पहिल्या महायुध्दानंतर जर्मनी, इटली, स्पेन, रशिया वगैरे देशात हुकूमशहाचा उदय झाल्याने लोकशाहीस फार मोठा धोका निर्माण झाला. संसदीय राज्यपध्दतीला या हुकूमशहांनी आव्हान दिले. व त्या त्या देशातील लोकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध आले. आर्थिक प्रश्नाबाबत योग्य ती परिणामकारक कारवाई न केल्याने लोकशाही शासनव्यवस्था झुगारून देण्याकडे जनतेची प्रवृत्ती निर्माण झाली.

## २१. स्त्रियांच्या स्थितीत बदल :-

पहिल्या महायुध्दात सहभागी झालेल्या देशांतील तरुण युध्दात सहभागी झाल्याने सरकारी कार्यालयांतून स्त्रियांना काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा झाली. परंतु युध्दभूमीवर फार मोठ्या संख्येने तरुण मारले गेले. अनेकजण जखमीही झाले. त्यामुळे तरुण मुलींना पती मिळणे कठीण झाले. समाज जीवनावर त्याचे गंभीर परिणाम झाले. तरुण मुले गमावल्याने वृध्द मातापित्याचे हाल झाले.

## २२. आशियातील साम्राज्यवादास जबरदस्त धक्का :-

पहिल्या महायुध्दात जर्मनी, ऑस्ट्रिया, हंगेरी, तुर्कस्थान या राष्ट्रांचा पराभव झाल्यामुळे आशियावर त्याचे दूरगामी परिणाम झाले. आतापर्यंत युरोपियन राष्ट्रांच्या वर्चस्वाखाली आशियातील साम्राज्यवाद टिकून होता. परंतु युरोपीय राष्ट्रांचाही पराभव होवू शकतो हे आता सिध्द झाले. आशियामध्ये युरोपीय साम्राज्यशाहीविरुध्द निषेधाची व प्रतिकाराची लाट निर्माण झाली. पहिल्या महायुध्दापूर्वी आशियात साम्राज्यवादाला कधीही आव्हान मिळाले नव्हते, ते आता मिळू लागले. आशियात स्वातंत्र्याची एक नवीनच आशा निर्माण झाली.

## २३. लोकशाहीचा विजय :-

पहिल्या महायुध्दात एका अर्थाने लोकशाहीने हुकूमशाहीवर मातच केली होती. या महायुध्दानंतर रशिया, जर्मनी, तुर्कस्थान या देशात काही काळ का होईना लोकशाही सरकारे स्थापन झाली होती. ऑस्ट्रिया व इटली या देशात लोकशाहीचाच विजय झाला. राजांची निरंकुश सत्ता नष्ट होवून लोकशाही प्रस्थापित झाली. ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल.

## २४. वर्ग संघर्षास प्रारंभ :-

पहिल्या महायुध्दानंतर कामगार वर्ग संघटित होत गेला. त्यांनी भांडवलदाराविरुध्द लढा चालू ठेवला. कामगार आपल्या हक्काबद्दल व अधिकाराबद्दल जागरूक झाला. पहिल्या महायुध्दानंतर जगात अनेक ठिकाणी वर्गलढे सुरु झाले.

## २५. आशिया-आफ्रिका खंडातील स्वातंत्र्य चळवळीत उत्साह :-

पहिले महायुध्द अत्यंत भयानक ठरले, पण अन्याय झाल्यास तो खपवून घेऊ नये ही भावना त्याकाळी वाढीस लागली होती. युरोप खंडातील इंग्लंड व फ्रान्ससारख्या राष्ट्रांचे तीन खंडात साम्राज्य पसरले होते. इंग्लंडच्या साम्राज्यावर तर सूर्य कधीही मावळत नव्हता पण आता पहिल्या महायुध्दात इंग्लंड व फ्रान्सचे कंबरडेच मोडले होते. आशिया व आफ्रिका खंडातील आपले साम्राज्य सांभाळणे त्यांना कठीण

झाले होते. त्याशिवाय अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची घोषणा केली होती. याचा फायदा गुलामगिरीत खितपत पडलेल्या देशांनी घेतला. त्यांनी सुरु केलेल्या स्वातंत्र्य चळवळीत एक नवीन उत्साह निर्माण झाला होता. विशेषतः आशियाई देशांतील चळवळींना अधिक जोर चढला होता. त्यांच्यातील उत्साह वाढला होता. पहिल्या महायुध्दामुळे त्यांना एक नवीन दिशा प्राप्त झाली होती.

### २६. ओद्योगिकीकरणास पुन्हा सुरुवात :-

पहिल्या महायुध्दात युरोपातील बरेच कारखाने उध्द्वस्त झाले होते. त्यामुळे काही काळ बेकारी, उपासमार व दारिद्र्य होते, पण बऱ्याच युरोपियन राष्ट्रांनी अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रांची मदत घेऊन पुन्हा नवीन कारखाने उभारले. त्या वेळी मजुरांच्या स्वास्थ्याचाही विचार करण्यात आला. प्रत्येक युरोपियन राष्ट्राने जास्तीत जास्त ओद्योगिकीकरण करून आपल्या राष्ट्रातील बेकारी दूर करण्यात बरेच यश मिळविले.

### २७. राष्ट्रसंघाची स्थापना :-

महायुध्दापर्यत आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्यासाठी विविध संघटनांची निर्मिती करण्यात आली. अनेक तह करण्यात आले. परिषदा भरवल्या. पण त्या फारशा उपयुक्त ठरल्या नाहीत. आंतरराष्ट्रीय प्रश्न, वाटाघाटी विस्तारवादाला पायबंद घालण्यासाठी, परस्परात सहकार्य निर्माण करण्यासाठी, व भविष्यकालीन संकट टाळण्यासाठी वुड्रो विल्सनसारख्या राज्यकर्त्यांच्या प्रयत्नातून १० जानेवारी १९२० रोजी राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संघटना उदयास आली. हे या महायुध्दाचे फलित होते. राष्ट्रसंघाने इ.स. १९३५-३६ पर्यत आंतरराष्ट्रीय प्रश्न हे शांततेच्या वाटाघाटीने सोडवले. पण युरोपातील हुकूमशहांच्या उदयामुळे राष्ट्रसंघ निष्प्रभ ठरला. युनोच्या स्थापनेबरोबर (१९४५) राष्ट्रसंघाचे अस्तित्व संपुष्टात आले.

### २८. दुसऱ्या जागतिक युध्दाचे बीजारोपण :-

पहिल्या महायुध्दानंतर केवळ वीस वर्षांनी (१९३९) दुसऱ्या महायुध्दाला प्रारंभ झाला. महायुध्दानंतरची पॅरिस परिषद, व्हर्साय तह, विजयी राष्ट्रांची स्वार्थीवृत्ती, अमेरिकेची अलिप्तता, दुबळा राष्ट्रसंघ, हुकूमशहाचा उदय, त्यांची साम्राज्यतृष्णा दुसऱ्या महायुध्दाला कारणीभूत ठरली. जगाने इतिहासापासून कोणताही बोध घेतला नाही. पहिल्या महायुध्दातच दुसऱ्या महायुध्दाचे बीजारोपण झाले असे म्हणावे लागेल. अवघ्या २१ वर्षाच्या आत संपूर्ण जग पुन्हा दुसऱ्या महायुध्दाला खाईत लोटले गेले.

## २.२.७ रशियन राज्यक्रांती :-

### ❑ प्रास्ताविक :-

आधुनिक जगाच्या इतिहासात इ. स. १९१७ च्या राज्याक्रांतीला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त

झाले आहे. एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून पश्चिम युरोपातील उदारमतवादी तत्त्वज्ञानाचे आणि फ्रेंच क्रांतीमागील विचार प्रवाहांचे लोण रशियन बुध्दीजीवी वर्गात पसरू लागले. ते विचार दडपून टाकण्याचा झारने प्रयत्न केला. पण तो सफल झाला नाही. नवे विचार साहित्याच्या माध्यमातून मध्यम वर्गातून पोहचू लागले. झारच्या दडपशाहीला आणि प्रतिगामी धोरणाला प्रत्युत्तर म्हणून सळसळत्या रक्ताचा काही तरुणांनी झारशाहीविरुध्द शस्त्र उचलले. रशियात दहशतवादी चळवळ सुरु झाली. परंतु मूठभर अधिकाऱ्यांची अगर झारची हत्या करून रशियाच्या समस्या सुटणार नाहीत ह्याची जाणीव काही विचारवंताना झाली. प्रारंभी काही विचारवंत पश्चिम युरोपात प्रचलित असलेल्या स्वप्नाळू समाजवादाकडे आकृष्ट झाले.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस काही विचारवंतांना स्वप्नाळू समाजवादही तोकडा वाटला आणि ते मार्क्सप्रणीत साम्यवादाच्या आधारे रशियाचे प्रश्न सोडवता येतील; परंतु त्यासाठी रशियातील कामगार व शेतकरी ह्या दोन मोठ्या शोषित वर्गात साम्यवादी विचार रुजवून त्यांना क्रांतीला उद्युक्त करावे लागेल, अशा ठाम मताचे बनले. ह्या वैचारिक जागरणातून रशियन क्रांतीची ज्योत पेटली. रशियातील कामगार वर्गात क्रांतिकारी विचार कसे प्रसृत झाले, त्यातील तरुणांनी कसा लढा दिला ह्याचे मनोज्ञ चित्रण **मॅक्झीम गॉर्की** ह्या रशियन कादंबरीकाराच्या **'मदर'** ह्या जगप्रसिध्द कादंबरीत केलेले दिसते.

## २.२.८ रशियन क्रांतीची कारणे :-

### ❑ इ.स. १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीची कारणे किंवा क्रांतीपूर्व परिस्थिती :-

### १. राजकीय कारणे :

#### (i) झारची निरंकुश सत्ता :-

रशियातील रोमनॉव्ह घराण्यातील राजे स्वत:ला ईश्वराचे प्रतिनिधी समजत. राजाच्या दैवी अधिकाराच्या सिध्दातांवर त्यांचा विश्वास होता व त्या सिध्दांताचा ते पुरस्कार करीत. हे सर्व राजे चैनी, विलासी आणि भ्रष्टाचारी होते. त्यांना प्रजेच्या कल्याणाचे कोणतेच सोयरसुतक नव्हते. त्यांनी रशियात जुलमानेच राज्य केले. त्यांच्या कारकीर्दीत व्यक्ती स्वातंत्र्याचा पूर्णपणे लोप होऊन विरोधकांना स्थानच उरले नाही. इ. स. १६४९ पासून ते इ. स. १९०६ पर्यत तर रशियात विधिमंडळ अस्तित्वातच नव्हते. राजकीय व शासकीय सत्ता सर्वस्वी झारच्या हाती केद्रित झालेली होती. झारची इच्छा म्हणजे सर्व नियम व कायदेकानून यांचे उगमस्थान होते. इ. स. १९०६ मध्ये नाईलाज होऊन झारचे विधिमंडळाचे आयोजन केले खरे, परंतु त्या सदस्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते आणि त्यांनी सुचविलेल्या सुधारणांकडे झारने पूर्ण दुर्लक्ष केले.

यानंतर मात्र निवडणुकांचे नियमच पार बदलून टाकून स्वतंत्र बुध्दीचे विधिमंडळ प्रस्थापितच होऊ नये अशी तरतूद झारने केली. नव्या नियमांनुसार एकंदर मतदारांची विभागणी चार वर्गात करण्यात येऊन, विधिमंडळाच्या एकंदर सदस्य संख्येच्या ६०% प्रतिनिधित्व जमीनदारांना, १५% व्यापाऱ्यांना, २२% शेतकऱ्यांना, तर केवळ ३% कामगारांना अशा प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात आले. इ.स. १९०७ चे जे विधिमंडळ भरले त्यात बहुतांश प्रतिनिधी ही झारची माणसे होती. चर्चचा वरचष्मा, सरंजामशाही आणि धनिक वर्गाचे विशेषाधिकार कायम राखून जैसे थे परिस्थिती त्यांना टिकवून ठेवायची होती. तत्कालीन राजकीय व अर्थव्यवस्थेला विरोध होता तो शेतकरी-कामकरी वर्गाच्या अल्पसंख्य प्रतिनिधीचा.

विरोधी पक्षांपैकी सोशल रेव्होल्युशनरी पक्षाचे नेतृत्व बुध्दिवादी लोकांकडे असून प्रामुख्याने शेतकरी वर्गाचे नेतृत्व तो पक्ष करीत होता. झारशाही उलथून पडल्यानंतर स्थापन झालेल्या हंगामी सरकारचा सदस्य अलेक्झांडर केरेन्स्की हा त्या पक्षाचा नेता होता. विद्यापीठातील विद्यार्थ्यांचाही त्या पक्षाला पाठिंबा होता. दुसरा खंबीर विरोधी पक्ष म्हणजे इ.स. १८९८ मध्ये प्रस्थापित झालेला सोशल डेमोक्रॅटिक पक्ष. त्यात प्रामुख्याने शहरी कामगारांना भरणा होता. इ.स. १९१४ मध्ये या पक्षाची सदस्य संख्या २५ लक्ष होती. रशियासारख्या अफाट देशाच्या मानाचे अर्थात ही संख्या तोकडच होती. परंतु हा पक्ष मार्क्सच्या तत्वज्ञानाने भरलेला होता. त्यांच्या जहाल गटाचा नेता होता व्लादिमिर इलिच लेनिन.

झारशाही राजवट केवळ अनियंत्रित व जुलमीच होती असे नव्हे तर अत्यंत अकार्यक्षम व दुबळीही होती. फ्रान्सच्या १६ व्या लुईप्रमाणे झार निकोलस दुसरा (१८९४-१९१७) हा मनाने सत्प्रवृत्त असला तरी अगदीच कमकुवत मनाचा राज्यकर्ता होता; आणि त्याची त्याला जाणीवही होती. शतकानुशतकांच्या जुलमाने गांजलेल्या व अंतर्मनात असंतोषाची आग पेटलेल्या कोट्यावधी रशियन जनतेवर अनियंत्रित सत्ता गाजविण्याकरिता आवश्यक ते शहाणपण, दूरदृष्टी किंवा धमकही त्याच्या अंगी नव्हती. त्यामुळे त्याच्या भोवती गोळा झालेल्या स्वार्थी व कपटी सल्लागारांच्या हातातील तो एक बाहुले होऊन बसला होता. त्यापैकी विशेष उल्लेखनीय व्यक्ती म्हणजे सैबेरियाचा भिक्षू, ग्रेगरी रासपुटीन. शिक्षण व राजकीय ज्ञान किंवा शहाणपण याच्या नावाने शून्य असलेला आणि बऱ्यावाईटाची तमा न बाळगणारा रासपुटीन अत्यंत धूर्त व संधीसाधू होता. झारिनाच्या, रक्तदोषाने पिडलेल्या मुलीला, बरे करण्याच्या निमित्ताने, त्याने झार व झारिना यांच्यावर विलक्षण पगडा बसविला होता.झारिनाच्या पाठिंब्याने रशियाच्या राज्यकारभारात विशेषतः इ. स. १९१४-१९१६ या काळात, त्याने मन मानेल तसा गोंधळ घातला. मंत्र्याच्या नेमणुका व हकालपट्टीही बरेचदा त्यांच्या लहरीनुसार होई. राष्ट्राचे कल्याण, प्रगती, प्रतिष्ठा यांचा विचारही बाजूला पडून भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि राजकीय व नैतिक अध:पतन यांचा बुजबुजाट रशियन राजकारणात झाला होता. एकामागून एक पत्कराव्या लागलेल्या पराभवात झारशाहीचे लष्करी दुर्बल्य व अवनती स्पष्टपणे प्रतिबिंबीत झाली होती. क्रीमियाच्या युध्दात झालेला पराभव, बर्लिन परिषदेवेळी घ्यावी लागलेली मानहानीकारक राजनैतिक माघार, छोट्याशा जपानकडून झालेला पराभव आणि त्या युध्दात झालेली

अपरिमित हानी व अपमान, यामुळे झारशाहीची प्रतिष्ठा संपुष्टात आली होती. महायुध्दाने निर्माण झालेल्या समस्या आणि त्या बरोबर क्रांतीचा उसळलेला डोंब यांना तोंड देण्यास झारचे भ्रष्ट, दुबळे व क्षमताशून्य शासन असमर्थ ठरले.

### (ii) राज्यकारभारातील भ्रष्टाचार आणि लाचलुचपत :-

रशियाचे सत्ताधीश भ्रष्टाचारी, चैनी आणि विलासी असल्याने त्याचे उदाहरण त्यांच्या हाताखालच्या लोकांनी गिरविणे साहजिकच होते. त्यामुळे झारशाहीतील सर्व राज्यकारभार भ्रष्टाचारी बनला. साध्या कामाकरिता सुध्दा अधिकारी लाच मागू लागले. राजाच्या आणि अधिकाऱ्यांच्या लहरीनुसार राज्यकारभार चालू लागला. देशात समान कायदा आणि समान शिक्षा यांचा अभाव होता. न्यायालयांच्या अधिकारक्षेत्रात गोंधळ होता व सामान्य माणसाला न्याय मिळण्याची शक्यता राहिली नव्हती. मुलकी कारभारातील भ्रष्टाचाराने सैन्यात सुध्दा प्रवेश केला होता. त्यामुळे सैन्यात भोंगळपणा, बेशिस्त, लाचखाऊपणा आणि 'लाल फित' यांचे प्राबल्य होते. अशा भ्रष्टाचारी जीवनाचा सामान्य माणसांना वीट आलेला होता. त्यातूनच ही क्रांती घडून आली.

### (iii) रशिया-जपान युध्दातील रशियाचा पराभव (१९०४-०५) :-

नैतिक दृष्टीने अध:पतीत झालेल्या राष्ट्राला लढाईत विजय मिळणे कठीण होते. तरी सुध्दा इ. स. १९०४ मध्ये रशिया-जपान युध्द उद्भवले. त्यावेळी छोट्याशा जपानसारख्या आशियायी राष्ट्राकडून महाबलाढ्य रशियाचा पराभव होईल अशी कोणीच कल्पना केली नव्हती. परंतु भ्रष्टाचाराने आतून पोखरून गेलेल्या बेशिस्त रशियाचा शिस्तबध्द व निष्ठेने लढणाऱ्या जपानसमोर टिकाव लागला नाही. यामुळे सारे जग चकित होऊन गेले व रशियात ह्या पराभवामुळे झारविरुध्द मोठी प्रक्षोभाची लाट निर्माण झाली. राजाच्या अप्रामाणिकपणामुळे, निष्ठेच्या अभावामुळे आणि कर्तृत्वशून्य नेतृत्वामुळे आपला पराभव झाला याबाबत रशियन लोकांची खात्री पटून त्यांनी झारला पदच्युत करण्याचा दृढनिश्चय केला. रशिया-जपान युध्दातील रशियाच्या पराभवामुळे रशियातील असंतोष पराकोटीला पोहोचला व त्यातून क्रांतीचा उद्भव झाला.

### (iv) पहिल्या महायुध्दातील पराभव :-

पहिल्या महायुध्दात रशियाने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने उडी घेतली. प्रथमतः ह्या महायुध्दात रशियाला एकामागून एक विजय प्राप्त होत गेले. परंतु इ. स. १९१५ नंतर मात्र विजयाचे चित्र बदलून रशियाला सर्वच आघाड्यांवर माघार घेण्याचा प्रसंग आला. ह्यावेळी झारच्या जुलमामुळे रशिया आतून पोखरून निघाला होता. युध्दखर्चाचा भार सहन करणे सामान्य माणसांना असह्य होऊन बसले होते. त्यातच युध्दामुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली होती. भ्रष्टाचारामुळे युध्दसामग्री पोहोचविणे कठीण होऊन

बसले होते. त्यातच जुलमी राजाने आपल्यावर हे महायुध्द लादले अशा प्रकारची रशियन सैनिकांची कल्पना झाल्याने ते जिद्दीने लढण्याला मागेपुढे पाहत होते. त्यातच युध्दावर जाण्याची सक्ती झारने शेतकऱ्यांवर आणि कामगारांवर केल्यामुळे तोही वर्ग नाराज होता. ह्या शेतकऱ्यांना व कामगारांना लढाईचे शास्त्रोक्त प्रशिक्षण न दिल्यामुळे त्यांचा रणक्षेत्रावर विनाकारण बळी जाऊ लागला व त्यामुळे मृत्यूसंख्या वाढू लागली. ह्या सर्व कारणांमुळे रशियात असंतोष निर्माण होऊन त्याची परिणती क्रांतीच घडून आली. ह्या परिणामांचा यथायोग्य उपयोग करून लेनिनने क्रांतीचे नेतृत्व स्वीकारले व योजनाबध्द क्रांती घडवून आणली.

### (v) औद्योगिक क्रांतीनंतर उदयाला आलेल्या समाजाच्या आकांक्षा :-

औद्योगिक क्रांतीमुळे संपूर्ण युरोपात नवीन शहरे उदयाला आली. समाजाचे स्वरूपच ह्या औद्योगिक क्रांतीने बदलून टाकले ही गोष्ट आपण मागे पाहिली. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपच्या विविध देशात जागृत असा मध्यम वर्ग, वकील, डॉक्टर्स, व्यापारी, शिक्षक आदी लोकांचा अंतर्भाव होता. हा वर्ग शिक्षणाने सुसंस्कारित असल्याने तो आपल्या हक्कांबाबत विशेष जागृत होता. झारने रशियात जी सतत दडपशाही चालविली होती ती किती दिवस सहन करावयाची असा ह्या वर्गासमोर प्रश्न होता. त्यांनी सनदशीर मार्गांनी जबाबदार शासनाची मागणी केली. भाषण-स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, कायद्यासमोर समानता इत्यादी मागण्या त्यांनी समोर मांडल्या. बदलत्या समाजाच्या आकांक्षा झार निकोलस याने लक्षात घ्यायला पाहिजे होत्या. दुर्दैवाने मागचा पुढचा विचार न करता राजाने ह्या सर्व मागण्या नाकारल्या व त्यामुळे क्रांतीचा भडका उडाला.

## २. आर्थिक कारणे :-

फ्रेंच राज्यक्रांती ज्याप्रमाणे आर्थिक कारणांमुळे घडून आली त्याप्रमाणे रशियात राज्यक्रांतीस आर्थिक कारणेच प्रामुख्याने कारणीभूत ठरली. रशिया बऱ्याच काळापासून आर्थिकदृष्ट्या मागासलेला होता. रशियात सर्वसाधारण जनतेत कमालीचे दारिद्र्य, दु:ख आणि पिळवणूक होती. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत रशियन जीवन सरंजामशाही पध्दतीचेच होते. रशियात जमीनदार आणि गरीब शेतमजूर असे दोन वर्ग होते व ह्या दोन वर्गांच्या उत्पन्नात कमालीची विषमता होती. जमीनदार वर्ग गब्बर श्रीमंत होता तर शेतमजुरांना दोन वेगळ्या भोजनाची भ्रांत होती. देशातील बहुतांशी जमिनीवर जमीनदारांचा मालकी हक्क होता. शेतीवर राबणाऱ्या कुळांची परिस्थिती मात्र गुलामांप्रमाणे होती; गरीब शेतकरी आणि मजूर यांना समाजात कोणतेही अधिकार नव्हते किंवा कोणतीही प्रतिष्ठा नव्हती. दारिद्र्य, भूक आणि रोगराई यांनी हा समाज ग्रस्त होता. ह्या समाजाची ही करूण परिस्थिती पाहून दुसऱ्या अलेक्झांडरने त्यांची ह्या पिढीजात गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता त्याने एक मुक्ततेचा आदेश (Edict of Emancipation) जारी केला परंतु रशियातील शेतकऱ्यांची परिस्थिती इतकी दारूण होती की ह्या कायद्याचा लाभ शेतकरी घेऊ शकले नाहीत आणि त्यामुळे अलेक्झांडरचा हा प्रयत्न वाया गेला. यानंतर कोणत्याही झारने शेतकऱ्यांची परिस्थिती

सुधारण्याचा प्रयत्न केला नाही. त्यामुळे दिवसेंदिवस शेतकऱ्यांची परिस्थिती अधिकच बिघडत गेली. दारिद्र्यामुळे त्यांना आपली मान वर करता येईना किंवा शेतीतही त्यांना कोणतीही प्रगती करता येईना. जमीनदारांनी मात्र अशाही परिस्थितीत शेतकऱ्यांना पिळल्याशिवाय सोडले नाही. रशियातील शेतकरी ह्याप्रमाणे कर्जात, अज्ञानात आणि गुलामगिरीत सोडले पिचत असताना तिकडे युरोपात मात्र विज्ञानात मोठमोठे शोध लागत होते व शोधांचा उपयोग करून युरोपियन लोकांनी आपली शेती कमालीच्या बाहेर सुधारली होती.

### ३. सामाजिक कारणे :-

१९ व्या शतकात शेवटी शेवटी रशियात औद्योगिकीकरणाला प्रारंभ होऊन पाहता पाहता औद्योगिकीकरणाने रशियाला आमूलाग्र बदलवून टाकले. औद्योगिक क्रांतीने उत्पादनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक बदल होऊन हाताऐवजी आता यंत्राने मालाचे उत्पादन प्रचंड प्रमाणावर होऊ लागले. ठिकठिकाणी गिरण्या स्थापन होऊन त्यात काम करण्याकरिता खेड्यातील मजुरांचा ओघ आता गिरण्यांकडे वळला. त्यामुळे मोठ मोठी शहरे उदयाला आली. पूर्वी समाजात सरंजामदार आणि शेतमजूर हे जे दोन वर्ग होते ते लोप पावून आता भांडवलदार व मजूर असे नवीन दोन वर्ग समाजात उदयाला आले. हे दोन्ही वर्ग परस्परविरोधी असल्याने समाजात मोठी कटुता निर्माण झाली. त्यातच भांडवलदार हा जास्त-जास्त श्रीमंत होत गेल्याने व मजुराला दिवसेंदिवस जास्त-जास्त दारिद्र्य प्राप्त झाल्याने ह्या दोन्ही समाजात स्पर्धा, कटुभावना व द्वेष निर्माण झाला. आपण किती प्रयत्न केले तरी आपली परिस्थिती प्रचलित समाजव्यवस्थेत सुधारू शकणार नाही याची जाणीव झाल्याने मजुरात मोठा निराशावाद निर्माण झाला व त्यातूनच कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान उदयाला आले. पिळले जाणारे सर्व वर्ग कार्ल मार्क्सच्या शास्त्रशुध्द समाजवादाकडे साहजिकच आकृष्ट झाले.

ह्या काळातील समाजात कमालीचे अज्ञान होते. कोणत्याही सुधारणांचा ह्या समाजाला स्पर्शही झालेला नव्हता. इ.स. १९१४ मध्ये सुध्दा रशियात १७ कोटी लोकांकरिता केवळ २०,००० डॉक्टर्स होते. यावरून सामाजिक स्वास्थ्याची आपण कल्पना करू शकतो. ५ वर्षाचे वय गाठण्यापूर्वीच २७% पेक्षा जास्त मुले मृत्यूला बळी पडत होती. २७% लोकांना सही करण्यापुरते ज्ञान होते. यावरून शिक्षण क्षेत्रात सुध्दा रशियात केवढा अंधार होता याची आपण कल्पना करू शकतो. थोडक्यात रशियातील समाज दारिद्र्य, दैन्य व दुःख यांनी ग्रस्त झाला होता. त्यामुळे मजुरांचे कुटुंबजीवन उध्द्वस्त झाले होते. ह्या सर्व परिस्थितीमुळे रशियातील कनिष्ठ वर्गाला वरिष्ठ वर्गाबाबत व्देषाशिवाय आणि तिरस्काराशिवाय बोलताच येत नव्हते.

### ४. वैचारिक जागृती :-

कनिष्ठ वर्गाची ही जी ससेहोलपट चाललेली होती त्याला आपल्या कलात्मक लेखणीने वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य रशियातल्या नामवंत लेखकांनी केले. त्यांनी पायाखाली तुडविल्या जाणाऱ्या ह्या

वर्गाचे दु:ख जगाच्या वेशीवर टांगले व रशियन समाजात जागृती घडवून आणली. ह्या संदर्भात लिओ टॉलस्टॉय, गॉर्की, तुजेर्निव्ह, डोस्कोव्हस्की इत्यादी अभिजात लेखकांनी केलेले कार्य महत्त्वाचे समजायला पाहिजे. त्यांच्या लिखाणानेच क्रांतीकरिता अनुकूल भूमिका तयार झाली.

## ५. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा परिचय :-

संपूर्ण जगाच्या इतिहासात इ. स. १९१७ ची बोल्शेविक राज्यक्रांती ही अभूतपूर्व महत्त्वाची मानली जाते. कारण ह्या क्रांतीमुळे जगाला जे विचार दिले, जी विचारपध्दती दिली आणि भविष्यकाळात सुध्दा मानवी समाजाचे स्वरूप कसे असावे याचे जे दिग्दर्शन केले त्यामुळे जगात आतापर्यंत झालेल्या क्रांती आणि बोल्शेविक क्रांतीला हे जे क्रांतिकारक आणि मूलगामी स्वरूप प्राप्त झाले याचे कारण ह्या क्रांतीमागची प्रेरणा कार्ल मार्क्सची विचारसरणी होती. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानामुळे मानवी विचारविश्वातच क्रांती घडून आली. मानवी समाजाची घडण कशी होती, त्यात अर्थसंबंधाना कसे महत्त्वाचे स्थान असते, त्याचा राजकीय संस्थांवर कसा परिणाम होतो, याचा मूलगामी विचार प्रथमतः मार्क्सच्या तत्त्वज्ञानात करण्यात आला. मानवी सामाजिक संस्था आणि राजकीय संस्था यांचा इतका खोलवर विचार कधीच झाला नव्हता. त्यामुळे कार्ल मार्क्सने जगाला नवीन विचारसरणी दिली ह्याची कबुली सर्वांनाच द्यावी लागते. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानामुळे पाश्चिमात्य संस्कृती, व्यापारी नीतीनियम, शासनाचे मुलभूत नियम, सामाजिक संस्थांच्या मर्यादा, आंतरराष्ट्रीय व्यवहारांचे नियम ह्या सर्वांना एक मुलभूत आव्हानच मिळाले. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानात सांगितलेला विरोध विकासाचा नियम, वर्गयुध्दाची कल्पना, इतिहासाचे आर्थिक पुनर्मुल्यन यामुळे तर जगाला फारच मोठे वैचारिक हादरे बसले.

शोषणरहित वर्गविहीन समाजाची कल्पना कार्ल मार्क्सने समोर ठेवल्यामुळे शतकानुशतके पिळल्या जाणाऱ्या मानव समाजासमोर मोठा आशादायक भविष्यकाळ निर्माण झाला. कार्ल मार्क्सच्या ह्या क्रांतिकारक विचारांचा रशियन क्रांतिकारकांवर मोठा सखोल परिणाम घडून आला व त्यांनी रशियात क्रांती घडवून आणून कार्ल मार्क्सच्या सांगितलेल्या सुविहित योजनाबध्द कार्यक्रमानुसार रशियाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीनुरूप कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानात यथायोग्य फेरबदल करून लेनिनने रशियात ही जी योजनाबध्द बोल्शेविक क्रांती घडवून आणली त्यासारखे उदाहरण जगाच्या इतिहासात क्वचितच आढळेल. अमेरिकन राज्यक्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती ह्यांनीसुध्दा राजकीय व सामाजिक फेरबदल घडवून आणलेत परंतु ते बदल इतके मूलगामी व सर्वव्यापी ठरले नाहीत म्हणूनच बोल्शेविक राज्यक्रांती ही जास्त मुलभूत, सर्वव्यापी व सर्वात वैशिष्ट्यपूर्ण समजली जाते.

अर्थात इ. स. १९१७ मध्ये घडून आलेली ही बोल्शेविक राज्यक्रांती ही काही एकाएकी घडून आलेली राज्यक्रांती नव्हती. ह्या क्रांतीला युरोपातील आणि रशियातील घटनांची ऐतिहासिक पार्श्वभूमी कारणीभूत ठरलेली होती असे दिसून येते.

## ६. कार्ल मार्क्सचा समाजवाद :-

समाजातील भीषण विषमता नष्ट झाली पाहिजे व न्यायचित तत्त्वांवर समाजाची पुर्नघटना झाली पाहिजे ह्याची निकड युरोपातल्या सर्वच विचारवंतांना वाटत होती. ह्या बाबतीत शासनाने निश्चित जबाबदारी स्वीकारली पाहिजे व नुसती तटस्थेची भूमिका घेता कामा नये ह्या कल्पना १७ व्या-१८ व्या शतकातच समोर आल्या होत्या. परंतु समाजवादाच्या ह्या नुसत्या ढोबळ कल्पनांनी प्रश्न सुटणारे नव्हते. तरीसुध्दा ह्या कल्पनांचा प्रभाव पडून बिस्मार्कने ''शासकीय समाजवादाची'' (State Socialism) कल्पना समोर आणून आणि त्याव्दारे कामगारविषयक अनेक कल्याणाचे कायदे आणून औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. (१८७०-९०). परंतु खऱ्या शास्त्रशुध्द समाजवादाचा विचार कार्ल मार्क्स ह्या तत्त्वज्ञानेन केलेला आपल्याला दिसतो. त्याने प्रसिध्द केलेला दास कॅपिटल हा ग्रंथ ऐतिहासिक ठरला. इ. स. १८४८ मध्ये त्याने एंगल्स बरोबर जो ''कम्युनिस्ट जाहीरनामा'' प्रसिध्द केला तो त्यात क्रांतीचा कार्यक्रम व क्रांतीचे तत्त्वज्ञान सांगितल्याने तो समाजवादाचा वेद ठरला. युरोपातल्या सर्वच साम्यवादी विचारवंतांना ह्या जाहीरनाम्याने मोठी स्फूर्ती दिली.

'दास कॅपिटल' ह्या ग्रंथात आणि आपल्या ''कम्युनिस्ट जाहीरनाम्यात'' कार्ल मार्क्सने समाजवादी तत्त्वज्ञानाची आणि कार्यक्रमाची मोठी शास्त्रशुध्द चर्चा केलेली होती. त्याचा टॉलस्टॉय, गॉर्की, लेनिन व ट्रॉटस्कीसारख्या रशियन क्रांतीकारकांवर मोठा सखोल परिणाम घडून आला. कार्ल मार्क्सने प्रतिपादन केलेल्या सिध्दांताचा रशियातील सर्वच क्रांतीकारकांवर मोठा सखोल परिणाम घडून आला.

## २.२.९ रशियन क्रांतीची वाटचाल :-

मार्च १९१७ मध्ये सुरु झालेली रशियन क्रांती म्हणजे अचानक उडालेला भडका नव्हता. इ. स. १८७० पासूनच काही दहशतवाद्यांनी झारच्या जुलमी राजवटीविरुध्द लढ्याला प्रारंभ केला होता. त्यांनी झारच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांचे खून पाडले. खुद्द झार अलेक्झांडरचा इ. स. १८८१ मध्ये खून झाला. त्यानंतर एकापाठोपाठ एक दहशतवादी पकडले गेले. अनेकांना फाशी देण्यात आली. त्यात लेनिनचा २१ वर्षे वयाचा भाऊ अलेक्झांडर उल्यानोव हाही होता. इ. स. १८८३ पासून मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचे प्रकाशन गुप्तपणे रशियात होऊ लागले. इ. स. १८९५ मध्ये लेनिनने ''कामगार विमोचन लढा'' ह्या संघटनेची स्थापना सेंट पिट्सबर्ग येथे केली. त्याकरिता त्याला वयाच्या २७ व्या वर्षी सैबेरियात हद्दपार करण्यात आले. तेथील ५ वर्षाच्या एकांतवासात त्याने मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा सखोल व सूक्ष्म अभ्यास करून ''रशियातील भांडवलशाहीचा विकास'' हा ग्रंथ लिहिला व भावी कार्याची रूपरेषा निश्चित केली. दहशतवादी मार्गाच्या फोलपणाचा प्रत्यय आल्याने त्याने बुध्दीवाद्यांना आवाहन केले व त्या मार्क्सवादी गटाने इ. स. १८९८ मध्ये ''सोशल डेमोक्रॅटिक'' पक्षाची स्थापना केली. हा पक्ष साम्यवादी विचारसरणीने भरलेला होता. जानेवारी १८९८ पासून स्टॅलिनने तिप्लिस येथील कामगारांना मार्क्सवादाची शिकवण

देण्यास प्रारंभ केला. लेनिन व इतर परागंदा क्रांतिकारक यात क्रांतीचे तत्त्वज्ञान व डावपेच यावर नेहमी चर्चा होई. त्यातून निघणारे निष्कर्ष गुप्तपणे रशियात पोहोचवले जात. रशियातील क्रांतिकारकांच्या गुप्त बैठकीत त्या साहित्याचे वाचन होई.

रशियाच्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची दुसरी परिषद इ. स. १९०३ मध्ये लंडन येथे भरली. त्या अधिवेशनात लेनिनच्या नेतृत्वाखालील बोल्शेव्हिक गट व जॉर्जी प्लेखनोव याच्या नेतृत्वाखालील मेन्शेव्हिक गट यात, पक्षाची शिस्त व मार्ग यावर मतभेद होऊन फूट पडली. लेनिनचा गट बहुसंख्य असल्याने त्यांना ''बोल्शेव्हिक'' म्हणजे बहुमतवाले असे संबोधण्यात येऊ लागले. ''मेन्शेव्हिक'' म्हणजे अल्पसंख्य. हा गट मवाळ विचारसरणीचा होता. कामगार वर्गाच्या हाती शासकीय सत्ता येण्यापूर्वी प्रथम मध्यमवर्गीयांची क्रांती घडून येईल अशी त्यांची खात्री होती. त्यामुळे झारशाही विरुध्द घडवून आणावयाच्या क्रांतीत मध्यमवर्गीयांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे, आणि टप्याटप्यानेच कमीतकमी रक्तपात होऊनच समाजवादाची स्थापना व्हावी, असे त्यांचे मत होते. तर साम्यवादी क्रांती व कामगारवर्गाची हुकूमशाही या आदर्शाच्या सिध्दीकरता कामगार वर्गानेच पुढाकार घेतला पाहिजे, सशस्त्र क्रांतीच्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय ते ध्येय साध्य होणे शक्य नाही अशी बोल्शेव्हिकांची खात्री होती.

### ❑ इ.स. १९०५ चा क्रांतीचा प्रयत्न :-

नव्या शतकाच्या प्रारंभी संबंध रशिया असंतोषाने व क्रांतीच्या विचारांनी ढवळून निघत होते. अशातच इ. स. १९०४ चे रशिया-जपान युध्द भडकले. या युध्दात रशियाच्या झालेल्या प्रचंड पराभवाची वार्ता आली, आणि त्याबरोबर तोपर्यंत रशियात धुमसत असलेल्या असंतोषाचा स्फोट सार्वत्रिक संपाच्या रूपाने झाला. जानेवारी १९०५ मध्ये रशियन जनता फार मोठ्या संख्येने झारच्या राजवाड्यासमोर आपल्या मागण्या सरकारपुढे ठेवण्याकरता एकत्रित झाली. आपल्यावर होत असलेल्या जुलुमाची दाद लागावी एवढाच त्यांचा उद्देश होता. परंतु त्यांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याऐवजी त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. त्या निर्घृण अत्याचारात अनेक कामगार बळी पडले. या बातमीने संप घडून आले. इतर प्रांतातही संपाची लाट उसळली. अनेक पोलीस व जुलमी अधिकाऱ्यांचे खून झाले.

इ. स. १९०५ मध्ये रशियात सर्वत्र खळबळ व क्रांतीची लाट उसळली होती. जपानने रशियाच्या केलेल्या पराभवामुळे त्यात चांगलीच भर पडली. मार्क्सवादावर आधारित क्रांतीच्या कार्यक्रमाची पहिली कसोटी इ. स. १९०५ मध्ये लागली. मास्को व पिट्सबर्ग येथील मुद्रक, कामगार व अन्य अनेक गट यांनी संप केले. विद्यार्थी व बुध्दिजीवी वर्गही क्रांतीची चेतावणी देण्याचे कार्य करीत होता. आठ तासांचा दिवस, नागरिक स्वातंत्र्य, घटनात्मक लोकशाही अशा त्यांच्या अगदीच सौम्य स्वरूपाच्या मागण्या होत्या.

याच काळात कामगारांनी कायम स्वरूपाच्या समित्या प्रस्थापित केल्या. यांनाच सोविएत म्हणत.

असे पहिले सोविएत सेंट पिट्सबर्ग येथे स्थापन करण्यात येऊन इंझवेस्तिया हे कामगार वर्गाचे मुखपत्रही लिआँ ट्रॉटस्की याच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आले.

इ. स. १९०५ च्या उठावामुळे जनतेला काही सवलती देण्याचे मान्य करणे झार सरकारला भाग पडले. त्याने केलेल्या ऑक्टोबर घोषणे नुसार जनतेचे मुलभूत अधिकार, विस्तृत मताधिकार, ड्युमाचे कायद्यावरील वर्चस्व व राज्यकारभारावरील देखारेखीचा अधिकार, मुद्रण स्वातंत्र्य, संघ-स्वातंत्र्य या मागण्या तत्वत: मान्य करण्यात आल्या. पुढे प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ड्युमाला ते अधिकार प्राप्त झाले नाहीत. एक सल्लागार समिती एवढेच त्या मंडळाचे स्थान पूर्वीप्रमाणेच राहिले. शिवाय जबाबदार मंत्रिमंडळाला झारने मान्यता दिलेली नव्हतीच.

मात्र ऑक्टोबर घोषणेने पहिले काही दिवस का होईना, सर्वत्र स्वागत करण्यात आले. घटनात्मक लोकशाही आता हळूहळू प्रस्थापित होईल अशी आशा अनेकांना वाटू लागली. त्यामुळे झारशाही विरुध्द उफाळून आलेला प्रक्षोभ आणि त्याचबरोबर सोविएतना मिळणारा जनतेचा पाठिंबाही बराच ओसरला. सार्वत्रिक प्रक्षोभ संप मागे घेण्यात आला. एकट्या साम्यवादी गटाला मात्र घोषणेच्या फोलपणाची जाणीव होती.

इ. स. १९०५ ची क्रांती अपयशी ठरली. परंतु ते अपयश व ऑक्टोबर घोषणा यांचा परिणाम पुढील क्रांतीला एका दृष्टीने पोषकच ठरला. जनतेला आपल्या हक्कांची जाणीव झाली. मुद्रण स्वातंत्र्यामुळे क्रांतीकारी विचार प्रसृत करणारी वृत्तपत्रे आपले कार्य अधिक जोमाने व आत्मविश्वासाने करू लागली. कामगार संघटना सरकारमान्य झाल्याने कामगार वर्ग अधिक सुसंघटित होऊ लागला. गुप्त क्रांतीकारक संस्थांचे कार्य चिकाटीने चालू होतेच. त्याला जोम आला. इ. स. १९०५ चा क्रांतीचा पहिला प्रयत्न फसला असला तरी त्या अपयशी उठावातच पुढील क्रांतीची बीजे रोवली गेली.

रशियन राज्यकर्त्यांनी युध्दपूर्व काळात साम्राज्यवृध्दीचे, अनियंत्रित सत्तावादाचे व अन्यवंशीय गटांना रशियन करून सोडण्याचे धोरण चालू ठेवल्याने रशियातील पोलिश, फिनिश, ज्यू इत्यादी वंशगटांचा झारशाहीला तीव्र विरोध निर्माण झाला होता. बुध्दिजीवी वर्ग व्यक्तीस्वातंत्र्य व लोकशाही यांची मागणी करत होता. मवाळ वर्गाला घटनात्मक राजसत्ता हवी होती, तर शेतकरी-कामकरी वर्गाचा कल निश्चितपणे समाजवादाकडे झुकलेला होता. याप्रमाणे युध्दपूर्व काळात रशियातील अंतर्गत परिस्थिती अत्यंत स्फोटक बनली होती. विरोधी पक्षांपैकी उदार धोरणाच्या ऑक्टोबरिस्ट पक्षाची ऑक्टोबर घोषणेनुसार झार सरकारने सुधारणा आणाव्यात अशी मागणी होती; तर मवाळ मेन्शेव्हिकांना, जहाल बोल्शेव्हिकांना, दहशतवाद्यांना शासनात व कृषीक्षेत्रात आमूलाग्र क्रांतीकारक बदल घडून येण्याची आवश्यकता वाटत होती. झारचा निकटवर्ती अधिकारी वर्ग, मूठभर मोठे अमीर उमराव आणि भांडवलदार सोडले तर बाकी सर्वच स्तरात झारशाहीविरुध्द तीव्र असंतोष धुमसत होता. निरनिराळ्या क्रांतीकारक चळवळी फोफावत होत्या.

## ❑ पहिले महायुध्द व झारशाहीची अखेर :-

इ. स. १९१४ मध्ये युध्दाचा भडका होताच राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन सर्व पक्षांनी झार सरकारच्या युध्द प्रयत्नांना साथ दिली. जर्मनीविरुध्दच्या त्या युध्दाला ड्युमात विरोध होता तो केवळ बोल्शेविकांचा. त्यापैकी जे हाती सापडले तितक्यांना झार सरकारने सैबेरियात हद्दपार केले.

परंतु हे ऐक्य व उत्साह फार दिवस टिकला नाही. मे १९१५ मध्येच जर्मन शस्त्रांचे आघात असह्य होताच झारच्या कमकुवत लष्करी व मुलकी शासनाविरुध्द टीका व तक्रारी ऐकू येऊ लागल्या. रशियन लष्कराला जर्मनीविरूध्द विजय मिळविता आला असता तर कदाचित झारच्या सत्तेचे निर्मूलन इतक्या तडकाफडकी झालेही नसते. पण अकार्यक्षमता, भ्रष्टाचार, लाचलुचपत या रोगांनी झारशाहीला पछाडले होते. इतक्या प्रदीर्घ व भयानक युध्दाला तोंड देण्याची शक्ती व क्षमता त्या राजवटीत नव्हती. तुटपुंजे उत्पादन, साधन सामुग्रीचा तुटवडा, दळणवळणाची अपुरी साधने, निकृष्ट प्रतीचे संचालन, क्षमताशून्य लष्करी नेतृत्व, शासकीय भ्रष्टाचार, वरिष्ठ अधिकाऱ्यांचा राष्ट्रद्रोह, झारिना व मुलकी अधिकाऱ्यांची लष्करी क्षेत्रात निष्कारण ढवळाढवळ आणि पराभवाची मानहानी व दु:ख या सर्व कारणांमुळे परिस्थिती अत्यंत स्फोटक बनली. जानेवारी १९१५ मध्ये रशियाचे एकूण १५ लक्ष सैन्य आघाडीवर होते. परंतु त्यापैकी सुमारे १/३ सैनिकांजवळ सध्या बंदुकाही नव्हत्या. तोफांना दारुगोळ्याचा पुरवठा होत नव्हता. इ. स. १९१४-१५ या काळात आघाडीवर दारूगोळ्यांच्या पुरवठ्यावर नियंत्रण बसविण्यात आले होते. दर दिवसाला एका तोफेला चारच कुलपी गोळे पुरविले जात. ह्या बातम्यांचा लष्कराच्या व राष्ट्राच्या नीतीधैर्यावर अत्यंत विपरीत परिणाम झाला. नोकरीतील जेष्ठत्वाच्या तत्त्वावर बढत्या झालेल्या असल्याने लष्करातही बऱ्याच क्षमताशून्य अधिकाऱ्यांचा भरणा झालेला होता.

इ. स. १९१७ पर्यत धडधाकट पुरुषांपैकी ३७% लोक सैन्यात भरती झालेले होते. परंतु शस्त्रास्त्राअभावी जेमतेम ५० लक्ष सैनिकच लढण्याच्या कामी आले. सुमारे १ कोटी सैनिक व खलाशी, शस्त्राअभावी प्रत्यक्ष आघाडीपर्यत पोचलेच नाहीत. पिछाडीला निरुद्योगी अवस्थेत त्यांना पडून रहावे लागले. राष्ट्राची झालेली सर्वागीण अवनती, लाजिरवाण्या पराभवाची मानहानी, झारशाहीचे दुर्बल्य व भ्रष्टाचार आणि क्रांतीची निकड यावर चर्चा करीत बसण्यापलीकडे त्यांना कामच उरले नाही. क्रांतीचे तत्त्वज्ञान लष्करात प्रसृत होण्यास त्यामुळे चांगलाच अवसर मिळाला. शिवाय फार मोठ्या प्रमाणात पुरुषवर्ग लष्करात सामील झाल्याने औद्योगिक व कृषीक्षेत्रात कामाला माणसे उरली नव्हती व त्यामुळे उत्पादन थंडावून सर्वसाधारण जनतेला तर दूरच, परंतु लष्करालाही आनाधान्य व इतर जीवनाश्यक वस्तूंना पुरवठा होईनासा झाला.

युध्द काळातील आर्थिक बोजा असह्य होताच झार सरकारने कागदी चलन वाढत्या प्रमाणात काढले. त्याबरोबर आवश्यक वस्तूंच्या किंमती बेसुमार वाढल्या. सामान्य माणसाला जीवन दुसह्य झाले. त्यातच

अतिरेकी मद्यपानामुळे क्षमतेवर होणारा विपरीत परिणाम थांबविण्याकरिता युध्दारंभीच झार सरकारने जारी केलेला दारूबंदी कायदा अत्यंत घातक ठरला. या जकातीचे सुमारे ६७ कोटी ८० लक्ष रुबल्सचे उत्पन्न म्हणजे सरकारी उत्पन्नाचा १/३ भाग होता. एकीकडे बेसुमार युध्दखर्च चालू असतानाच हे उत्पन्न थंडावले. इतके करून मद्यपानाच्या अतिरेकाला आळा बसला म्हणावे तर तेही नाही. बेकायदेशीर दारू मोठ्या प्रमाणावर तयार होऊ लागली. त्याचा परिणाम अधिकच घातक ठरला. युध्दकार्याचा ताण व होणारी हानी यामुळे अंतर्गत क्षेत्रात अराजक वाढत होते. सहकार्याचा पूर्ण अभाव सर्वच क्षेत्रात दिसून येत होता.

सप्टेंबर १९१५ मध्ये जर्मनीविरूध्द लागोपाठ पराभव पत्करावे लागल्याने रशियन सरसेनापती ग्रँड ड्यूक निकोलस याला बडतर्फ करून झारने त्याची रवानगी कॉकेशसच्या बाजूला केली व रासपुटीनच्या सल्ल्यानुसार लष्करप्रमुखाची जबाबदारी स्वत:कडे घेतली. परंतु त्यामुळे रशियाच्या होणाऱ्या पराभवाकरिता व हानीकरता खुद्द झारला जबाबदार धरण्यात येऊ लागले आणि झारशाहीविरुध्दचा असंतोष वाढण्यास मदतच झाली.

अशा परिस्थितीत काही घटनात्मक व शासकीय सुधारणा झारने घडवून आणाव्यात, अशी सूचना दूरदर्शी नेत्यांनी केली. परंतु झारने ते मनावर घेतले नाही. डिसेंबर १९१६ मध्ये रासपुटीनचा झालेला खून म्हणजे वेगाने दाटून येत असलेल्या क्रांतीच्या झंझावाताची पूर्वसूचनाच होती. परंतु तरीही झारने घटनात्मक सुधारणांच्या दिशेने पावले उचलण्यास नकार दिला.

इ. स. १९१६ मध्ये रशियातील व आघाडीवरील परिस्थिती फार चिघळली. युध्दकालीन दळणवळणाचा भार पेलण्याइतपत रशियात लोहमार्गाचा विस्तार झालेला नसल्याने शस्त्रास्त्रे व साधनसामुग्री आघाडीचा वेळेवर पोहोचणे कठीण झाले होते. रशियाच्या सैन्याची झालेली प्रचंड हानी, पिछेहाट व पराभव, जखमी व रुग्ण सैनिकांच्या शुश्रुषेची होत असलेली अतोनात आबळ, सैन्याधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार व त्यामुळे सैन्यात निर्माण झालेली बेशिस्त व बेदिली यामुळे लष्कराचे नीतीधैर्य पार खचले. थंडीने कुडकुडणारा, उपासमारीने व हालअपेष्टांनी थकलेला व तळमळणारा सैनिक तो सोशीत असलेल्या यातनांच्या निरर्थकतेमुळे क्षुब्ध झाला होता. शत्रूवर तुटून पडण्याची इच्छा व जोम सैनिकांत उरला नव्हता. त्यांना आता हवे होते ते फक्त शांतता, अन्न आणि जमीन. या असंतोषाचा भडका मार्च १९१७ मध्ये झाला.

## ❑ रशियन क्रांतीचा पहिला टप्पा :-

क्रांतीची पहिली ठिणगी मार्च १९१७ मध्ये पडली. ही क्रांती क्रांतीकारी पक्षांनी घडवून आणलेली नव्हती. त्यावेळी बहुसंख्य क्रांतीकारी नेते हद्दपार होते किंवा तुरुंगात खितपत पडले होते. झारशाही उलथून पडली ती केवळ तिच्या दुर्बल्यामुळे व अकार्यक्षमतेमुळे झारशाहीची शासनयंत्रणाच पूर्णपणे विस्कळीत झालेली होती. इ. स. १९१७ मध्ये पददलित शेतकऱ्यांनी उठाव केले. भुकेलेल्या कामगारांनी

संप पुकारले. मार्च महिन्यातील या संपात सुमारे ९० हजार कामगार सामील झाले होते. त्याचवेळी जगाच्या इतिहासात कधीही झाला नसेल इतक्या मोठ्या प्रमाणात बंडाचा उठाव आघाडीवरील व पिछाडीतीलही सैनिकांनी केला. सुमारे १२ लक्ष सैनिकांनी रणक्षेत्र सोडले. सैनिकांच्या झुंडीच्या झुंडी परत येऊ लागल्या. ११ मार्चला सर्वत्र अन्नाकरता दंगली झाल्या. बंदुका व मशीनगन्स सह परतलेल्या रशियन सैनिकांच्या तुकड्या त्या निदर्शकांना येऊन मिळाल्या. संतप्त प्रक्षुब्ध कामगार, थकलेले जखमी सैनिक, बेसुमार भाववाढीने जगणे अशक्य झालेले सामान्य नागरिक, यांची रस्त्यारस्त्यांतून गर्दी होऊ लागली. झारविरोधी व युध्दविरोधी निदर्शनांना व घोषणांना ऊत आला. पेट्रोग्रॅडमधील व क्रोनस्टाट येथील आरमारी ठाण्यातील खलाशांनी संघटित उठाव केले. रोमन राजघराण्याची सत्ता झपाट्याने संपुष्टात येत होती.

पेट्रोग्रॅडच्या २५००० शिबंदीच्या मदतीने क्रांतीचा लोंढा थोपवून धरण्याचा दुबळा प्रयत्न झारने केला. परंतु निदर्शकांवर गोळीबार करण्याचे साफ नाकारून शिबंदीचे सैनिक उलट उठावात सामील झाले. इतर अनेक लष्करी गटांनीही हाच धडा गिरविला. कामगारांनी आपापल्या कारखान्यातून कामावर रुजू व्हावे व ड्युमा बरखास्त करण्यात आली असून ड्युमा सदस्यांनीही आपापल्या घरी जावे, असे हुकूम ११ मार्च रोजी झार सरकारने जारी केले होते. परंतु त्यांना कोणी भीक घातली नाही. अशा वेळी बाहेरून लष्कर मागवून कणखरपणे प्रक्षुब्ध जामावांना व ड्युमा सदस्यांनाही पांगवून जबाबदार मंत्रिमंडळ व लोकशाही घटना या मागण्या मान्य केल्याचे झारने जाहीर केले असते तर काही गटांचे तरी समाधान होऊन संकट तेवढ्या पुरते का होईना, टळले असते. परंतु दुबळ्या मनाच्या निकोलसने दोन्ही मार्ग पत्करले नाहीत. प्रसंगानुसार चटकन योग्य तो निर्णय घेऊन तो खंबीरपणाने अमलात आणण्याचे शहाणपण किंवा तडफ त्याच्या अंगी नव्हती.

ड्युमा बरखास्त केल्याचा झारचा हुकूम सदस्यांनी धाब्यावर बसविला. एवढेच नव्हे, तर १६ मार्च रोजी मिखाईल रोडझिॲको या ड्युमा अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली जुलमी राजसत्तेविरुध्द क्रांतीचे नेतृत्व करण्याकरता एक खास समिती नेमण्यात आली. झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीकडे समाजवाद्यांचेही बारीक लक्ष होतेच. त्यांनी सैनिक व कामगार यांच्या प्रतिनिधींचे मंडळ, पेट्रोग्रॅड सोविएत व त्या सोविएतची एक कार्यकारी समिती नियुक्त करून स्थानिक कारभार आपल्या हाती घेतला. सोशल रेव्होल्युशनरी पक्षाचा सर्वात जहाल सदस्य अलेक्झांडर केरेन्स्की त्या सोविएतचा उपाध्यक्ष होता. ड्युमा समितीच्या आवाहनामुळे पेट्रोग्रॅड सोविएत त्या समितीला जाऊन मिळाले. त्यावेळी लष्करी छावणीत राहत असलेल्या झारने पेट्रोग्रॅडला येण्याचा प्रयत्न केला परंतु कामगारांनी मधील लोहमार्ग निकामी करून टाकण्याने त्याला ते जमले नाही. परिस्थितीचे गांभीर्य आता त्याच्या लक्षात आले. त्यामुळे घटनात्मक व शासकीय सवलती देण्याची तयारी त्याने दर्शविली. परंतु तोपर्यंत वेळ निघून होती.

१४ मार्च रोजी ड्युमा समितीने सार्वभौम अधिकार आपल्या हाती घेऊन प्रिन्स जॉर्जी ल्वोव याच्या नेतृत्वाखाली उदारमतवादी व मवाळ समाजवादी यांचे हंगामी सरकार प्रस्थापित केले. आपले स्थान टिकवून

धरण्याचा शेवटचा दुबळा व केविलवाणा प्रयत्न झारने केला. त्याने हंगामी सरकारला मान्यता दिल्याचे जाहीर केले. परंतु त्यामुळे त्या सरकारला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले आणि प्रतिगामी गटाला त्याविरुध्द काहीही कार्यवाही करणे अशक्य झाले. ड्युमा समितीला अध्यक्ष रोडझिॲको व अन्य लष्करी व मुलकी अधिकारी झारला राज्य त्यागाकरता उद्युक्त करीत होतेच. शेवटी १५ मार्च १९१७ रोजी आपला बंधू ग्रॅंड ड्यूक मायकेल याच्या हाती अधिकाराची सूत्रे सोपवून झार निकोलसने राज्यत्याग केला. लोकनियुक्त प्रतिनिधींच्या विधीमंडळाकडून भावी सरकारचे स्वरूप निश्चित होईपर्यत राज्यसूत्रे हाती घेण्याचे ग्रॅंड ड्यूक मायकेलनेही नाकारले. रशियातील शतकानुशतकांची राजसत्ता अशा रीतीने कोलमडली. त्यानंतर ६ च दिवसांनी झार निकोलस व त्याचे कुटुंबीय यांना अटक करण्यात आली. पुढे त्यांना सैबेरियात तोबोल्स्क येथे पाठविण्यात आले.

## ❑ प्रिन्स ल्वोवच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार :-

मार्च १९१७ मध्ये प्रिन्स ल्वोवच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकार हे मध्यमवर्गीयांचे प्रातिनिधिक सरकार होते. परंतु सोशल रेव्होल्युशनरी पक्षाच्या जहाल मताच्या केरेन्स्कीचीही त्या सरकारशी हातमिळवणी करण्याची पूर्ण तयारी होती. इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांच्या शासन प्रणालीच्या धर्तीवर उदारमतवादी जबाबदार सरकार स्थापन करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते. रशियाच्या सर्व समस्यांची सनदशीर मार्गांनी उकल करणे, इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांशी पूर्ण सहकार्य करून युध्द चालू ठेवणे, असे हंगामी सरकारचे धोरण होते. मात्र पेट्रोग्रॅड सोविएतच्या अट्टाहासामुळे भाषण, मुद्रण, संघ व धार्मिक स्वातंत्र्य सर्व राजबंद्यांची मुक्तता, फिनलँड व पोलंड यांना स्वायत्त शासन यासंबंधीचे आदेश हंगामी सरकारने जारी केले. झारशाहीने हद्दपार केलेल्या सर्व देशभक्तांना देशात परतण्याचे आवाहन करण्यात येऊन सार्वत्रिक मताधिकाराव्दारा घटना समिती प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले गेले.

कमीत कमी अत्याचार व रक्तपात होऊन रशियातील राज्यक्रांती फलद्रूप झाली असेच त्यावेळी सर्व जगाला वाटले. या घटनात्मक बदलाच्या संक्रमणावस्थेत केवळ ५६ लोक मृत्युमुखी पडले होते. सर्वप्रथम अमेरिकेने रशियाच्या या हंगामी सरकारला मान्यता दिली. पाठोपाठ इंग्लंड व फ्रान्स ह्यांचीही मान्यता आली. क्रांतीचे हे पहिले पर्व रक्तापाताशिवाय पार पडले; एवढेच नव्हे तर क्रांतीकारक नेतृत्व किंवा निश्चित योजना याशिवायच हा बदल घडून आला. जनतेला हवे होते ते शांतता, अन्न व जमीन. झार निकोलस ते देण्यास असमर्थ ठरल्याने जनतेने स्वयंस्फूर्तीने उठाव करून झार सरकार उलथून पाडले. क्रांतीचा भडका झाला त्यावेळी लेनिन स्वित्झर्लंडमध्ये, ट्रॉट्स्की न्यूयार्कमध्ये तर स्टॅलिन सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगत होता. क्रांतीच्या वेळी पेट्रोग्रॅडमध्ये मेंन्शेव्हिक किंवा बोल्शेव्हिक गटाचा एकही नामांकित समाजवादी पुढारी हजर नव्हता.

मात्र क्रांतीची बातमी कळताच हे नेते घाईघाईने पेट्रोग्रॅड येथे परत आले. जर्मनी व स्वीडन या मार्गे

१६ एप्रिलला लेनिन रशियाच्या राजधानीत येऊन पोहोचला. लेनिनसारखा प्रभावी क्रांतीकारक नेता रशियात गेल्यास क्रांतीचा भडका आणि त्याबरोबर तेथील गोंधळ व अराजक अधिकच वाढेल व मग रशियाला युध्द चालू ठेवणे अशक्य होईल, असा जर्मनीचा अंदाज होता. तसे होऊन जर्मनीची पूर्व आघाडी शांत झाली तरच विजयाची थोडीफार आशा जर्मनीला होती. त्यामुळे चिलखती गाडीतून लेनिनला रशियात आणून सोडण्यात जर्मन सरकारने मदत केली. न्यूयार्कमधून निघालेल्या ट्रॉट्स्कीला न्यूफौडलंड येथे ब्रिटिशांनी अडविले होते. परंतु केरेन्स्कीच्या मध्यस्थीने त्याची सुटका झाली. तो मे मध्ये रशियात आला. हंगामी सरकारच्या राजबंद्याच्या मुक्ततेच्या आदेशानुसार सैबेरियात हद्दपारी भोगीत असलेला स्टॅलिन मार्च मध्येच पेट्रोग्रॅडला आला होता.

ड्युमाने नियुक्त केलेल्या हंगामी सरकारला लष्करासह रशियन जनतेचा सामान्यपणे पाठिंबा होता. फक्त पेट्रोग्राडमधील कामगार व सैनिक यांच्या सोव्हिएटने सवतासुभा मांडला. हंगामी सरकारने युध्द जोमाने पुढे चालविण्याचा निर्णय घेतला, तर सोव्हिएटने त्वरित शांततेचे नारे सुरु केले. सोव्हिएटच्या या तिरप्या चालीला सेनाधिकाऱ्यांचा व उजव्या गटांचा तर पाठिंबा नव्हताच, पण बहुतेक समाजवादी नेतेही युध्द चालू ठेवावे याच मताचे होते. तथापि रशियातील परिस्थितीचा अंदाज हंगामी सरकारपेक्षा सोव्हिएटला अधिक अचूक आला होता, कारण त्यामागे लेनिनची प्रज्ञा होती. तीन वर्षातील सतत पराभव, मृत व जखमी सैनिकांची २५ लक्षांपर्यत पोहोचलेली संख्या, अन्नापासून तोफगोळ्यांपर्यत प्रत्येक वस्तूंची तीव्र टंचाई, यामुळे सामान्य सैनिक युध्दाला विटले होते. त्यांच्या मनात सोव्हिएटच्या शांततेच्या प्रचाराने स्वाभाविकच मूळ धरले. युध्दआघाडीवर बचावाचा पवित्रा घेऊन आणि कठोरपणे सोव्हिएटचे बंड मोडून हंगामी सरकारला आपले आसन स्थिर करता आले असते. तसे झाले नाही.

बोल्शेव्हिकांचा शांततेचा प्रचार आणि हंगामी सरकारची विजयाची इच्छा यांचे व्दंव्द जोरात सुरु झाले. हंगामी सरकारात अलेक्झांडर केरेन्स्की नावाचा एक बुध्दिमान तरुण न्यायमंत्री होता. हळूहळू हंगामी सरकारचे व ड्युमाचे नेतृत्व त्याच्या हाती केंद्रीत झाले. ड्युमामध्ये त्याच्यासारख्या प्रागतिक समाजवाद्यांचे मताधिक्य होते, तरीही पेट्रोग्राडमध्ये प्रबळ झालेल्या कामगार व किसानांच्या सोव्हिएटला तो धाब्यावर बसवू शकला नाही. पेट्रोग्राड सोव्हिएटने सैनिकांच्या हक्कांची एक सनद घोषित करून प्रत्येक सेनादलात, प्रत्येक डिव्हिजनमध्ये, प्रत्येक रेजिमेंटमध्ये, एवढेच नव्हे तर त्याहूनही लहान गटात सैनिक समित्या स्थापन करण्याचा आदेश दिला. या समित्यांचे हाती शस्त्रास्त्रे राहावीत आणि त्यांनी फक्त सोव्हिएटचे आदेश पाळावेत, अशीही चेतावणी पेट्रोग्राड सोव्हिएटने दिली. अलेक्झांडर केरेन्स्कीने या सैनिक समित्यांना हरकत घेतली नाही आणि शांततेची आवश्यकताही तत्त्वतः मान्य केली. तथापि जर्मनी आणि ऑस्ट्रियाने रशियाचे जे प्रदेश व्यापले होते ते परत घेणे आवश्यक आहे, असे त्याने ठामपणे प्रतिपादन केले.

केरेन्स्कीने जनरल ब्रुसिलॉव याला सरसेनापतीपद देऊन लेनबर्गमध्ये चढाई करण्याचा हुकूम दिला. १ जुलैला जनरल लौरस कॉर्निलॉव याच्या नेतृत्वाखाली आघाडीच्या दक्षिण भागात ऑस्ट्रियन

सैन्याविरुध्द ४० रशियन डिव्हिजन्सनी चढाई सुरु केली. रशियन सैन्याला प्रारंभी यश मिळाले. पहिल्या तडाख्यातच आघाडीला भगदाड पडल्यामुळे ऑस्ट्रियन सैन्य पळू लागले. तथापि पेट्रोग्राड सोव्हिएटच्या आदेशानुसार निर्माण झालेल्या सैनिक समित्यांमुळे अधिकाऱ्यांचा पूर्वीचा दबदबा नाहीसा झाला होता; लष्करी शिस्त रसातळाला गेली होती; सैनिक युध्दाला विटले होते. ऑस्ट्रियन सैन्याचा पाठलाग करण्याचे साफ नाकारून हजारो सैनिक रणांगण सोडून घरोघर परतले. जर्मन सेनापती मॅकेन्सनने ऑगस्टमध्ये प्रतिचढाई सुरु केली आणि रशियन व रुमानियम सैन्याने जिंकलेला सर्व प्रदेश अल्पावधीत काबीज केला. यावेळी कर्नल ब्रुखम्युलर या जर्मन तोफखान्याच्या जादुगाराने रशियन सैन्यावर एवढी प्रखर गोलंदाजी केली की, पहिल्या काही तासांतच ते सैन्य पळू लागले. ब्रुखम्युलरच्या तोफखान्याच्या अवघ्या ५ तासांच्या आकस्मिक मारगिरीनंतर जनरल हुटियरच्या फौजांनी डिवना नदी ओलांडली आणि बाल्टिक सागरावरील रिगा बंदर काबीज केले. रशियन सैन्याचे लढण्यात मन नाही, ही गोष्ट याही चढाईने स्पष्ट केली.

## ❑ लेनिनचा जुलै उठाव :-

पेट्रोग्राड सोव्हिएटने आपली केंद्रीय संघटना शिस्तबध्द व बलशाही केली आणि आपले शेकडो कार्यकर्तेरशियाभर सोव्हिएटच्या शाखा उघडून प्रचारकार्य करण्यास पाठविले. कामगार, शेतकरी, लष्करी व नाविक सैनिकांचे प्रतिनिधी पेट्रोग्राडच्या मुख्य सोव्हिएटवर पाठविण्याचे आवाहन करून बहुसंख्य जनतेचा ठोस पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सामान्य भूमिहीन शेतकऱ्यांना जर्मनीच्या पराभवापेक्षा जमीनदार व अमीर उमराव वर्गाची सत्ता नष्ट होण्याची गरज जास्त वाटत होती. कारखान्यांचा ताबा मिळण्याच्या कल्पनेने कामगारवर्ग आकर्षित झाला, तर तीन वर्षाच्या निष्फळ युध्दप्रयत्नांनी व हालअपेष्टांनी हतबल, हताश झालेल्या सैनिकांना शांतता प्रस्थापित होण्याच्या कल्पनेने हायसे वाटले आणि जमिनीच्या फेरवाटपात स्वत:चा जास्तीत जास्त फायदा करून घेण्यासाठी ते बोल्शेव्हिकांना सामील झाले. पेट्रोग्राडमध्ये मोठ्या प्रमाणावर सामुहिक निदर्शने नित्यनेमाने होऊ लागलीत. बोल्शेव्हिकांच्या घोषणा युध्दाने रशियाची राजधानी पेट्रोग्राड दुमदुमू लागली.

''सर्व अधिकार सोव्हिएटना मिळाले पाहिजेत'' अशी गर्जना लेनिन करू लागला. एप्रिल १९१७ मध्ये लेनिनने युध्दपीडित रशियन जनतेपुढे बोल्शेव्हिक पक्षाचा जाहीरनामा ठेवला.

१) त्वरित युध्दबंदी करणे.

२) सर्व जमीनदार व अमीर उमराव यांच्याकडून जमिनी काढून घेऊन रितसर कायदा होण्याची वाट न पाहता गरजू शेतकऱ्यांमध्ये त्या जमिनींचे वाटप करणे.

३) कामगारांना कारखान्यांच्या कामकाजात सहभाग व अधिकार देणे.

४) उत्पादन व वितरण यावर राष्ट्रीय नियंत्रण प्रस्थापित करणे.

५) तत्कालीन स्थानिक सरकारांऐवजी कामगार, शेतकरी व सैनिक यांची सोव्हिएटस प्रस्थापित करणे.

६) धनिक वर्गाचे सर्व राजकीय अधिकार काढून घेणे.

जून १९१७ मध्ये पेट्रोग्राट सोव्हिएटच्या नेतृत्वाखाली पहिली अखिल रशियन काँग्रेस आयोजित करण्यात येऊन एक केंद्रीय कार्यकारी समिती नियुक्त करण्यात आली. या अधिवेशनात कोणीही कोणाचा प्रदेश हिरावून न घेता आणि युध्ददंड न लादता शांतता प्रस्थापित करावी, असा ठराव संमत करण्यात आला.

'सर्वासाठी शांतता, भुकेलेल्यांना अन्न आणि कसेल त्याची जमीन' या बोल्शेव्हिकांच्या पकड घेणाऱ्या चित्ताकर्षक घोषणांनी जनमानसाचा ठाव घेतला. स्वार्थापोटी रंजलेल्या गांजलेल्या, पिडलेल्या, नडलेल्या शेतकऱ्यांचा, शेतमजुरांचा, कामगारांचा, संत्रस्त नागरिकांचा उत्स्फूर्त व जोमदार पाठिंबा सोव्हिएटस्ना मिळू लागला. लेनिनला हेच हवे होते.

सोव्हिएटची ताकद पेट्रोग्राडबाहेर कोठेही नव्हती, परंतु पेट्रोग्राड सोव्हिएटने आपले पत्रकी युध्द जोरात चालविले होते. एकामागोमाग एक पत्रके काढून ते शांततेची मागणी करीत होते. आपापल्या पथकात सैनिकांनी प्रातिनिधिक समित्या स्थापन कराव्यात आणि फक्त सोव्हिएटचे हुकूम मानावेत, अशी चिथावणी सोव्हिएट देत होते. या प्रतिसरकारला वेळीच ठेचून काढण्याऐवजी केरेन्स्कीने सोव्हिएटच्या काही मागण्या मान्य केल्यामुळे स्वाभाविकच सोव्हिएटची लोकप्रियता वाढली.

१६-१७ जुलै १९१७ ला पेट्रोग्राडमधील काही नौसैनिक व पायदळ पलटणी यांना हाताशी धरून लेनिनने उठाव केला. आता केरेन्स्की जागा झाला. जनरल कॉर्निलॉव केरेन्स्कीच्या पाठीशी उभा राहिल्यामुळे लेनिनचे बंड बारगळले. सरकारला पदच्युत करण्याचा लेनिनचा प्रयत्न फसला. आपले बंड मोडायला येणाऱ्या पलटणी आपल्यालाच येऊन मिळतील, अशी लेनिन-ट्रॉटस्कीची कल्पना होती, परंतु तसे झाले नाही. सरकारने पेट्रोग्राडला आणलेल्या घोडदळ पलटणीने उठाव मोडून काढला. खुद्द लेनिनला फिनलंडमध्ये पळून जावे लागले. जर्मनीचे हस्तक असल्याच्या आरोपाखाली ट्रॉटस्कीसह अनेक बोल्शेव्हिक नेत्यांना अटक काण्यात आली. प्रावदा या बोल्शेव्हिकांच्या मुखपत्रावर बंदी घालण्यात आली.

## ❑ केरेन्स्की-कॉर्निलॉव संघर्ष :-

जुलै १९१७ च्या चढाईत रशियन सैन्याच्या शिस्तीचे धिंडवडे अनुभवल्यानंतर जनरल कॉर्निलॉव संतापला आणि त्याने केरेन्स्की सरकारला एक कडक संदेश पाठविला. आघाडी सोडून पळून गेलेल्या सैनिकांना फासावर लटकविले पाहिजे; सैन्यात पुन्हा शिस्त निर्माण केली पाहिजे, अशी कॉर्निलॉवने मागणी केली. रशियातील कोट्यवधी नागरिकांचीही हीच अपेक्षा असल्यामुळे रातोरात कॉर्निलॉव राष्ट्रपुरुष ठरला.

जनतेच्या प्रतिक्रियेचा खुद्द केरेन्स्कीवरही एवढा परिणाम झाला की, ३० जुलैला त्याने ब्रुसिलॉवच्या जागी कॉर्निलॉवची सेनाप्रमुख म्हणून नियुक्ती केली.

जनरल कॉर्निलॉवने जुलै १९१७ मधील बोल्शेव्हिकांचे बंड मोडून काढून सैन्यात शिस्त निर्माण केल्यामुळे रशियात तो अल्पावधीत लोकप्रिय झाला. कॉर्निलॉवच्या लोकप्रियतेचा धोका आणि बोल्शेव्हिकांचा धोका यामधून निवड करण्यात केरेन्स्कीच्या दूरदृष्टीची कसोटी होती. कॉर्निलॉवने काही काळ जनतेची मने जिंकली असली, तरी रशियन सैन्याची केवळ त्याच्यावरच निष्ठा होती, अशातला भाग नव्हता. याउलट, लेनिन व ट्रॉटस्कीच्या नेतृत्वाखाली बोल्शेव्हिक अत्यंत कडवे आणि एका विशिष्ट तत्त्वज्ञानाने पेटलेले आहेत ही गोष्ट केरेन्स्कीसारख्या अनुभवी राजकारण्याच्या लक्षात यावयास हवी होती. निवड करण्यात केरेन्स्कीने घोडचूक केली.

वास्तविक पाहता निखळ राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून कॉर्निलॉव व केरेन्स्की यांचे सहकार्य वाढावयास हरकत नव्हती. सैन्यामध्ये पुन्हा शिस्त निर्माण करण्यासाठी सरकारने सर्वतोपरी मदत केली पाहिजे, अशी कॉर्निलॉवची रास्त मागणी होती. कॉर्निलॉवची मागणी पूर्ण करण्यासाठी बोल्शेव्हिक पक्ष बेकायदेशीर ठरवून त्या पक्षाची शक्तिस्थाने नष्ट करणे आवश्यक होते. सैन्यामधील समित्याही त्वरित विसर्जित कराव्या लागल्या असत्या. तथापि केरेन्स्कीने हे उपाय योजले नाहीत; उलट कॉर्निलॉवच्या वाढत्या लोकप्रियतेची भीती वाटून ९ सप्टेंबरला त्याने कॉर्निलॉवलाच पदच्युत केले.

स्वत:चेच दोर कापून टाकण्याचा हा वेडेपणा होता. संपप्त होऊन कॉर्निलॉवने लष्करी बंड पुकारले, तेव्हा तर केरेन्स्कीने पेट्रोग्राडचे सोव्हिएट आणि राजधानी पेट्रोग्राडमधील बोल्शेव्हिक तत्त्वज्ञानाने मंत्रमुग्ध झालेल्या सेनापथकांशी हातमिळवणी केली. कॉर्निलॉवचे बंड मोडून पडले खरे, पण केरेन्स्कीच्या पाठीशी आपल्याखेरीज अन्य कोणताही संघटित गट नाही ही वस्तुस्थिती लेनिन – ट्रॉटस्कीच्या ध्यानात आली. त्यांचा क्रांतीचा मार्ग मोकळा झाला.

## ❑ ऑक्टोबर क्रांती :–

जनरल कॉर्निलॉवला पदच्युत करून त्याच्या लष्करी उठावाचा बिमोड करण्यात केरेन्स्कीला जरी यश आले, तरी त्याची अत्यंत कडू फळे थोड्याच दिवसात केरेन्स्कीला भोगावी लागली. त्याला सैन्याचा पाठिंबा उरला नाही. आपल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे त्याला अशक्य होऊ लागले. याचा फायदा घेऊन बोल्शेव्हिकांनी नोव्हेबरमध्ये पुन्हा उठाव केला.

ट्रॉटस्की हा पेट्रोग्राड सोव्हिएटचा अध्यक्ष असून सोव्हिएटच्या लष्करी समितीव्दारे पेट्रोग्राडमधील लष्करावर बोल्शेव्हिकांचे नियंत्रण होते. ऑक्टोबर १९१७ मध्ये बोल्शेव्हिकांनी पेट्रोग्राड सोव्हिएटमध्ये हंगामी सरकारविरुध्द सशस्त्र उठाव करून सत्ता काबीज करण्याचा ठराव पास केला. ७ नोव्हेबर १९१७ ला

बोल्शेव्हिक नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली सशस्त्र कामगार व सैनिकांनी उठाव करून झारचा 'विंटर पॅलेस', रेल्वे स्थानके, टपाल व तारायंत्र केंद्रे, बँका, लष्करी व शासकीय केंद्रे आणि इतर सर्व महत्त्वाच्या सरकारी इमारतींचा ताबा घेतला. हंगामी सरकारच्या मंत्र्यांना अटक करण्यात आली. त्याच रात्री 'ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएटस्'चे अधिवेशन घेण्यात येऊन त्यात केंद्रीय कार्यकारी समिती आणि मंत्रिमंडळ नियुक्त करण्यात आले. अध्यक्ष म्हणून लेनिनची निवड झाली. परराष्ट्र व युध्दखाते ट्रॉटस्कीकडे देण्यात आले, तर गृहमंत्री म्हणून स्टॅलिनची नियुक्ती झाली. रशियाच्या नानाविध समस्यांचे निराकरण करण्याकरिता लेनिनने आखलेल्या कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली. प्रतिगामी व स्थितीप्रिय गटांची मोठ्या प्रमाणावर धरपकड झाली. कमीतकमी रक्तपात होऊन सत्ता बोल्शेव्हिकांच्या हाती आली. ८ नोव्हेबर १९१७ ला लेनिनने केरेन्स्कीचे सरकार कोसळवून कामगार-किसानांच्या नावाने बोल्शेव्हिक/कम्युनिस्ट सरकारची स्थापना केली.

स्वत:चा जीव वाचविण्यासाठी केरेन्स्कीला केवळ पेट्रोग्राडमधूनच नव्हे तर रशियातूनही पळून जावे लागले. कट्टर बोल्शेव्हिक आणि उजवे पण राष्ट्रवादी यांच्यात निवड करण्याची वेळ आली तेव्हा समाजवाद व राष्ट्रवाद मानणाऱ्या केरेन्स्कीने बोल्शेव्हिकांची निवड केली. त्याच्या या घोडचुकीचे त्याला त्वरित प्रायश्चित्त मिळाले. केरेन्स्कीची राजवट खरोखरच औट घटकेची ठरली. लेनिन-ट्रॉटस्कीसमोर त्याला स्वत:च्या मातृभूमीलाही पारखे व्हावे लागले.

७ नोव्हेबर १९१७ रोजी लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेव्हिकांनी पेट्रोग्राडमधील सरकारी इमारती ताब्यात घेतल्या. त्यांना फक्त सैन्यच रोखू शकले असते. परंतु केरेन्स्कीने स्वत:च सैन्य हतबल करून ठेवल्यामुळे, केवळ राजधानीतील सत्ता हाती आल्याबरोबर सर्व रशियात बोल्शेव्हिकांच्या सत्तेची द्वाही फिरल्याचा चमत्कार जगास पाहावयास मिळाला. लेनिनची प्रज्ञा, आत्मविश्वास, त्याची अचाट इच्छाशक्ती, जनतेची नाडी ओळखण्याचे त्याचे अप्रतिम कौशल्य आणि विरोधकांना ठेचून काढण्यासाठी सूक्तासूक्ततेचा विचार न करण्याची त्याची बेडर, कठोर प्रवृत्ती यामुळे कम्युनिस्ट शासन रशियात अल्पावधीतच स्थिर झाले.

## ❑ व्लादिमिर इल्यिच लेनिन (१८७०-१९२४) :-

जागतिक इतिहासावर दूरगामी, खोलवर ठसा उमटविणाऱ्या विश्वविख्यात रशियन राज्यक्रांतीचा व्लादिमिर इल्यिच लेनिन हा निर्माता होय. प्रभावी व्यक्तिमत्त्व, असामान्य कर्तृत्व आणि उच्च दर्जाचे संघटनचातुर्य अंगी असलेल्या लेनिनचा जन्म २२ एप्रिल १८७० रोजी सीमब्रिक्स येथे एका जहालमतवादी उच्चकुलीन कुटुंबात झाला. इ. स. १८८६ मध्ये झार अलेक्झांडरच्या खुनाच्या कारस्थानात सामील असल्याच्या आरोपावरून लेनिनच्या मोठ्या भावाला फाशी देण्यात आली होती. लेनिनने अत्यंत कष्टाने शिक्षण घेऊन सेंट पीटर्सबर्ग विश्वविद्यालयातून कायद्याची पदवी घेतली.

लेनिनने विद्यार्थीदशेतच मार्क्सच्या दास कॅपिटल या ग्रंथाचा सूक्ष्म अभ्यास केला. साम्यवादी क्रांतीची आवश्यकता व अपरिहार्यता त्याला मनोमन पटली होती. लेनिनच्या पूर्वायुष्याचा बराचसा काळ हद्दपारीचे वा तुरुंगाचे हाल सोसण्यात गेला. इ. स. १९०३ मध्ये सोशल डेमोक्रॅटिक पक्षात बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक अशी फूट पडल्यानंतर बोल्शेव्हिक गटाचे नेतृत्व लेनिनकडे आले. कुशल नेतृत्व, अमोघ वक्तृत्व, असामान्य बुध्दिमत्ता, पोलादासारखी कणखर इच्छाशक्ती, अविचलित ध्येयनिष्ठा, चिकाटी हे गुण अंगी असलेला आणि ध्येयसिध्दीसाठी वा विरोधकांना ठेचून काढण्यासाठी साधनांच्या सुक्तासुक्ततेचा विधिनिषेध न बाळगणारा लेनिनसारखा अव्वल दर्जाचा नेता बोल्शेव्हिकांना लाभला म्हणूनच इ. स. १९१७ ची रशियन राज्यक्रांती घडून आली.

ज्या वेळी भांडवलशाही राष्ट्रांतील काही मुत्सद्दी व वृत्तपत्रे लेनिनला पिसाळलेला कुत्रा, 'निरर्थक वटवट करणारा ढोंगी पुढारी', 'रक्तपिपासू सैतान' अशा शब्दांत लाखोली वाहत होते त्याच वेळी रशियन जनता त्याच्यावर अपर प्रेमाचा व निष्ठेचा वर्षाव करीत होती. जॉन रीड हा अमेरिकन पत्रकार क्रांतिकाळात पेट्रोग्राडमध्ये मुक्कामाला होता. त्यावेळी त्याने लेनिनला अगदी जवळून पाहिले होते. 'टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड' ह्या रशियन क्रांतीवरील आपल्या पुस्तकात क्रांतिकालीन घटनांचे व विशेषतः लेनिनचे मोठे मार्मिक शब्दचित्र रेखाटले आहे. तो लिहितो, ''जमावाचे दैवत व्हायला त्याच्यापाशी प्रभावी व्यक्तिमत्त्व नव्हते, तरीही त्याच्यावर जनतेने जेवढे प्रेम केले आणि त्याच्याबद्दल तिच्या मनात जेवढा आदर होता, तसे भाग्य इतिहासात फारच थोड्या पुढाऱ्यांच्या वाटेस आले असावे.'' लेनिनच्या क्रांतिकार्याची मौलिकता प्रतिपादित करताना त्याचा सहकारी लिओ ट्रॉट्स्की ह्याने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, लेनिनने एकही ग्रंथ लिहिला नसता तरी, कामगार क्रांतीचा नेता म्हणून त्याचे नाव जगाच्या इतिहासात अजरामर झाले असते. डेव्हिड थॉम्पसन नावाच्या इतिहासकाराने शेतकऱ्यांना जमिनी, उपाशी लोकांना अन्न, बोल्शेव्हिक सदस्यांना सत्ता आणि जर्मनीशी शांततेचा तह अशाच शब्दात लेनिनच्या धोरणाचे वर्णन केलेले आढळते. (According to Thompson, Programme formulated was fourfold, land to the peasants, food to the starving, power to the Soviet and peace with Germany) इ. एच. कार ह्या इतिहासकाराने लेनिनच्या प्रतिभासंपन्न नेतृत्वाची प्रशंसा करताना, राजकीय डावपेचातील कौशल्य, राजकीय दूरदृष्टी, योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याची व तो अमलात आणण्याची क्षमता, इत्यादी गुणांचा आवर्जून उल्लेख केला आहे. जगातील एक लोकोत्तर मुत्सद्दी म्हणून त्याचा गौरव केला आहे.

लेनिनने समाजवादी क्रांती केवळ घडवून आणली असे नाही, तर त्याने क्रांतीला आकार दिला आणि तिचे पाय रशियाच्या भूमीत पक्के रोवण्याचे मौलिक कार्यही त्याने केले. म्हणून रशियाच्या इतिहासात त्याचे स्थान अढळ आहे. त्याच्या निधनानंतर त्याच्या स्मरणार्थ पेट्रोग्राड शहराचे नामकरण 'लेनिनग्राड' असे करण्यात आले. तसेच त्याच्या प्रेरक नेतृत्वाची स्मृती जनतेच्या मनात अखंड ताजी राहावी म्हणून रासायनिक प्रक्रिया केलेला त्याचा पार्थिव देह मॉस्कोच्या लाल चौकातील लेनिन स्मारकात ठेवण्यात

आला आहे. हे स्मारक रशियन लोकांसाठी एक पवित्र श्रध्दास्थान बनले आहे. एक महान क्रांतिकारक व जगातील पहिल्या समाजवादी राज्याचा संस्थापक म्हणून लेनिनने केलेले कार्य जगाच्या इतिहासात निश्चितच नेत्रदीपक व अतुलनीय आहे.

## २.२.१० रशियन क्रांतीचे परिणाम

रशियन क्रांतीचा रशियाच्याच नव्हे तर संपूर्ण जगाच्याच इतिहासावर दूरगामी आणि क्रांतिकारी परिणाम घडून आला. ह्या बोल्शेव्हिक क्रांतीमुळे सर्व जगात जो वैचारिक आणि राजकीय संघर्ष निर्माण झाला तो अजूनही मिटलेला आपल्याला आढळून येत नाही. भांडवलशाहीविरुध्द साम्यवाद हा संघर्ष अजूनही चालूच आहे व तो मिटण्याची चिन्हे अजिबात नाहीत. बोल्शेव्हिक क्रांतीचे महत्त्व लक्षात घेऊन तिचे जे परिणाम घडून आलेत ते पुढीलप्रमाणे :-

### १. फॅसिझम विरुध्द कम्युनिझम ह्या संघर्षाचा उदय :-

कार्ल मार्क्स आणि लेनिन ह्यांनी जे साम्यवादाचे नवीन तत्त्वज्ञान मांडले त्यामुळे जगातील निरनिराळ्या राजकीय विचारप्रणालीत संघर्ष निर्माण होऊन त्याचे आंतरराष्ट्रीय संबंधावर दूरगामी परिणाम घडून आले. भांडवलदार वर्गाला आता आपल्या हितसंबंधाला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला असे वाटू लागले व त्यांनी भांडवलशाहीच्या संरक्षणाकरिता साम्यवादी राष्ट्राभोवती हुकूमशाही फॅसिस्ट राष्ट्रांची साखळी  तयार करण्याचा प्रयत्न केला. ह्यातून जगात फॅसिझमविरुध्द कम्युनिझम असा संघर्ष निर्माण झाला.

### २. वसाहतीतील स्वातंत्र्यलढ्याला व्यापकता प्राप्त झाली :-

भांडवलशाहीची शेवटची अवस्था म्हणजे साम्राज्यवाद अशा प्रकारची साम्यवादाची शिकवण असल्याने वसाहतीत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याला आता केवळ राजकीय संघर्षाचे स्वरूप राहिले नाही. वसाहतीत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याला सामाजिक आणि आर्थिक न्यायाकरिता चाललेला लढा असेही महत्त्व प्राप्त झाले. कम्युनिस्ट पक्षाने ठिकठिकाणच्या वसाहतीतील स्वातंत्र्यलढ्यास आपला पाठिंबा दिला. त्यामुळे वसाहतींच्या स्वातंत्र्यलढ्याला जागतिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले.

### ३. पाश्चात्य राष्ट्रांनी पुरस्कारलेल्या उदारमतवादी कल्पनांना जबरदस्त आव्हान :-

रशियन राज्यक्रांतीत पुरस्कारिलेल्या साम्यवादाने उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय राज्यपध्दती इत्यादी पाश्चात्य राष्ट्रांनी पुरस्कारिलेल्या कल्पनांना जबरदस्त आव्हान दिले. जगातील सुसंस्कृत बुध्दिमान वर्गाने आतापर्यंत पाश्चिमात्य संस्कृतीत निर्माण झालेल्या ज्या कल्पना उराशी बाळगलेल्या होत्या त्या निरुपयोगी आहेत असे त्यांना आढळून आल्याने त्यांना चांगलाच वैचारिक धक्का बसला.

### ४. क्रांतीने नवीन समाज निर्माण केला :-

रशियन राज्यक्रांतीनंतर विषमता लयाला गेली आणि प्रत्येकाने आपल्या शक्तीनुरूप आणि गुणानुरूप काम करावे ह्या आधारावर नवीन समाज उदयाला आला. ह्या समाजात गरीब-श्रीमंत, भांडवलदार, जमीनदार, व्यापारी, धर्मगुरु ह्या सर्वांना काही काम करावे लागणार होते. कामानुरुप वेतन सर्वांनाच मिळणार होते. अशा रीतीने क्रांतीनंतर रशियात शोषणरहित समाज उदयाला आला व त्याने जगात फार मोठी क्रांती घडवून आणली.

### ५. नवीन समाजात कामगाराला अग्रक्रम :-

रशियन राज्यक्रांतीनंतर रशियात श्रमणाऱ्याच्या (Proletariate) हातात सत्ता आली. समाजात कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची पुनर्घटना करण्यात आली. अशा प्रकारे समाजातील सर्वात खालचा थर म्हणजे कामगार त्याला सत्ता मिळाल्याने जगातील सर्व कामगारात समाधान निर्माण झाले.

### ६. रशियन साम्राज्यवादाचा अंत :-

बोल्शेव्हिक राज्यक्रांतीमुळे रशियन साम्राज्यशाहीचा सुध्दा अंत घडून आला. पोलंड, फिनलंड, जॉर्जिया यात रशियन साम्राज्यवादामुळे मोठ्या प्रमाणात दडपशाही चाललेली होती. रशियन राज्यक्रांतीने ह्या दडपशाहीचा शेवट केला व ह्या राष्ट्रांना स्वायत्तता मिळाली.

### ७. रशियाला जागतिक राष्ट्रात स्थान मिळाले :-

क्रांतीपूर्वी रशिया एक मागासलेले राष्ट्र होते. सुधारणांचा त्याला स्पर्शही झालेला नव्हता. परंतु इ. स. १९१७ मध्ये बोल्शेव्हिक क्रांती घडून आल्यानंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा जागतिक राजकारणात उदय झाला. जगातील लक्षावधी श्रमिक रशियाकडे नेतृत्वाच्या आशेने पाहू लागले. एक बलशाली राष्ट्र ह्या नात्याने रशियाला जागतिक राजकारणात मानाचे स्थान प्राप्त झाले.

## २.२.११ जागतिक प्रतिसाद व प्रतिक्रिया

क्रांती स्थिर करणे आणि नवसमाज निर्मितीसाठी शांतता मिळविणे, ही उद्दिष्टे बाह्य जगाशी संबंध प्रस्थापित करताना सोविएट सरकारने आपल्या डोळ्यासमोर ठेवली. परंतु सोविएट सरकार इ. स. १९१९ साली स्थापित केलेल्या कोमिन्टर्न संघटनेमार्फत जगभर समाजवादी क्रांती घडवून आणेल, ह्या विचाराने धास्तावलेली भांडवलशाही राष्ट्रे सोविएट सरकारशी संबंध ठेवू इच्छित नव्हती, त्यामुळे युरोपीय राजनैतिक क्षेत्रात रशिया वाळीत पडले होते.

रशियात क्रांती होऊन अधिकारसूत्रे बोल्शेव्हिकांच्या हाती आली खरी. परंतु ती क्रांती चिरस्थायी होण्याकरिता रशियाच्या अर्थव्यवस्थेची इमारत समाजवादी तत्त्वप्रणालीच्या पायावर भक्कमपणे उभारण्याकरिता आणि राष्ट्राचे राजकीय व सामाजिक जीवन स्थिरावून सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याकरता लेनिनला शांततेची आत्यंतिक गरज वाटत होती. त्यामुळे शासनाची सूत्रे हाती येताच लेनिनने युध्दबंदीकरता जर्मनीशी बोलणे लावले. ३ डिसेंबर १९१७ ला सुरु झालेल्या वाटाघाटींची फलश्रुती १५ डिसेंबर १९१७ ला युध्दबंदी करारावर सह्या होऊन रशिया युध्दातून निवृत्त झाला.

तहाची कलमे ठरविण्याकरता २२ डिसेंबर १९१७ ला रशिया व जर्मनी यात वाटाघाटीना प्रारंभ झाला. त्या जवळजवळ ३ महिने रेंगाळल्या. तहाच्या कठोर कलमांमुळे बोल्शेव्हिकांनी तह निश्चित करण्यात दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला. परंतु १८ फेब्रुवारी १९१८ रोजी जर्मन सैन्याने पुन्हा रशियावर चढाई करताच नाईलाजाने लेनिनने तहाला मान्यता दिली. शेवटी ३ मार्च १९१८ रोजी ब्रेस्ट लिटोव्हस्क करारावर सह्या झाल्या. त्यातील तरतुदीनुसार पूर्व पोलंड, लिथुआनिया, लाटविया, एस्टोनिया, कार्स, अर्दाहन व बाटुम ह्या प्रदेशावर रशियाला पाणी सोडावे लागले.

जर्मनीशी ब्रेस्ट लिटोव्हस्कचा तह करून लेनिनने त्याच्याकडून युध्दसमाप्ती केली खरी, परंतु त्यापाठोपाठ रशियात यादवी युध्द पेटले. बोल्शेव्हिकांना रेड्स तर प्रतीक्रांतिकारकांना व्हाईटस् म्हणत. झारकालीन अनेक लष्करी अधिकारी आणि अमीरउमराव त्यांना सामील झाले होते. साम्यवादाबद्दल जबरदस्त धास्ती, भीती, तिरस्कार वाटत असल्यामुळे त्यांचा बोल्शेव्हिक राजवटीला कडाडून विरोध झाला. प्रतिक्रांतिकारकांना दोस्त फौजांचा उस्फूर्त सक्रीय पाठिंबा मिळत होता. पेट्रोग्राडच्या रोखाने एक ब्रिटीश फौज ६००० अमेरिकन सैनिकांसह उत्तरेकडून चालून येत होती. एका फ्रेंच फौजेने ओडेसा व त्याच्या आसमंतातील प्रदेश ताब्यात घेतला होता, तर दुसऱ्या एका ब्रिटीश तुकडीने बाकू व त्या सभोवतालचा खनिज तेलाने समृध्द असलेला प्रदेश स्वतःच्या नियंत्रणाखाली आणला होता. पूर्व रशियात सप्टेंबर १९१९ पर्यत ८५०० अमेरिकन, ६०००० जपानी, १४००० इटालियन आणि १०७३ फ्रेंच सैनिक नव्या साम्यवादी सरकारला मुळापासून उखडून टाकण्याकरिता लढत होते, तर ट्रान्स – सैबेरियन लोहमार्गावर ४०००० झेक शत्रूसैन्य पसरलेले होते.

पाश्चिमात्य राष्ट्रांच्या सोव्हिएट रशियाविरोधी भूमिकेला अनेक कारणे होती. झार सरकारने उभारलेल्या ८०० कोटी डॉलर्सच्या राष्ट्रीय कर्जाची जबाबदारी बोल्शेव्हिक सरकारने झुगारून दिली होती. दोस्तांना त्या कर्जाची परतफेड हवी होती. रशियातील दोस्तांच्या लष्करी हस्तक्षेपाचे मुलभूत कारण होते त्यांचा साम्यवादास असलेला तीव्र विरोध. रशियात यशस्वी झालेली साम्यवादी क्रांती म्हणजे पाश्चिमात्यांना एक गंभीर धोक्याचा इशारा वाटत होता. तेथे समाजवाद स्थिरावू न देता तेथील नुकतेच प्रस्थापित झालेले साम्यवादी सरकार नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न त्यांनी चालविला. इ. स. १९१७ ते १९२१ पर्यत दोस्त

राष्ट्रांनी सर्व दिशांनी रशियाची कोंडी करून श्वेत रशियनांच्या/प्रतीक्रांतिकारकांच्या सहकार्याने लेनिनने साम्यवादी राजवट समूळ नष्ट करण्याचा जंगजंग प्रयत्न केला.

लेनिनचा उजवा हात असलेल्या युध्दमंत्री लिआँ ट्रॉटस्कीने अल्पावधीतच अत्यंत कार्यक्षम, शिस्तबध्द, प्रशिक्षित १० लक्ष लाल सेना उभारून स्वत:च्या प्रभावी वक्तृत्वाने लाल सैन्यात स्फूर्ती, आत्मविश्वास व दृढनिश्चय ओतून रशियन पितृभूमीवरून दोस्त राष्ट्रांच्या सेनांना सरहद्दीबाहेर पिटाळून लावण्यासाठी उद्युक्त केले. ट्रॉटस्कीने लाल सैन्यात आपला जीव ओतला. ट्रॉटस्कीच्या असाधारण युध्द नेतृत्वाखाली इ. स. १९१८ ते १९२१ या कालखंडात लाल सैन्याची पथके एकाच वेळी निरनिराळ्या २१ आघाड्यांवर श्वेत रशियनांना व परकीय आक्रमणांना निर्धाराने तोंड देत होती. इंग्लंड, फ्रान्स, जपान या शत्रूराष्ट्रांच्या आणि शत्रूराष्ट्रांशी हातमिळवणी केलेल्या प्रतिक्रांतिकारक श्वेत रशियनांच्या संयुक्त फौजापुढे सर्व आघाड्यांवर ट्रॉटस्कीचे लाल सैन्य संख्याबळात अगदीच तोडके असूनही उज्ज्वल ध्येयनिष्ठेने आणि नैतिक धैर्याने भारलेले असल्यामुळे ट्रॉटस्कीच्या विजीगीषु नेतृत्वाखाली जीव तोडून लढले आणि शेवटी विजयी झाले.

लेनिन-ट्रॉटस्कीने आपली सर्व शक्ती पणास लावून यादवी युध्दास आणि परकीय आक्रमणास नेटाने तोंड दिले. बहुसंख्य जनतेचा पाठिंबाही यावेळी बोल्शेव्हिकांनाच मिळाला. प्रतिक्रांतिकारकांच्या राष्ट्रद्रोही चळवळी चिरडण्यासाठी एका असाधारण समितीची चेका नेमणूक करण्यात आली. केवळ संशयावरून कोणत्याही व्यक्तीला अटक करण्याचा आणि प्रसंगी विनाचौकशी प्राणदंडाची शिक्षा देण्याचा अधिकार या समितीला देण्यात आला होता. लेनिन-ट्रॉटस्कीने चेका ह्या आसूरी हत्याराचा पुरेपूर वापर केला. इ. स. १९२० मध्ये पोलंडने रशियावर एकाएकी आक्रमण केले. पोलंडने थोड्याच कालावधीत कीव्ह व युक्रेन यांचा ताबा घेतला. तथापि पोलंडची ही सरशी अल्पजीवी ठरली. जनरल ब्रुसीलॉव याच्या नेतृत्वाखाली रशियनांनी पोलिश लष्कराला रशियाबाहेर पिटाळून तर लावलेच पण पोलिश लष्कराचा पाठलाग करत थेट पोलंडची राजधानी वॉर्सा गाठली. लाल सैन्यापुढे पोलंडचा निभाव लागत नाही असे दिसताच इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्रे पोलंडच्या मदतीस धावली. दोस्तांच्या संयुक्त फौजांपुढे रशियाला माघार घ्यावी लागली. २१ मार्च १९२१ रोजी रीगाचा तह होऊन पोलंड-रशिया युध्द समाप्त झाले.

इ. स. १९२० च्या अखेरीस लाल सैन्याचा वरचष्मा निर्विवादपणे प्रस्थापित झाला. लष्करी कारवाईच्या जोरावर रशियातील साम्यवादी क्रांती उखडून टाकण्याचे दोस्तांचे स्पप्न भंगले. शेवटी इ. स. १९२१ च्या प्रारंभी रशियाची कोंडी उठवून दोस्त राष्ट्रांनी आपापल्या फौजा परत बोलावल्या. १९२२ मध्ये जपानच्या मदतीच्या जोरावर चालणाऱ्या उरल्यासुरल्या श्वेत रशियन सेनांचा प्रतिकार संपला व बोल्शेव्हिक क्रांतीला जणू जीवदानच मिळाले. इ. स. १९२२ मध्येच युक्रेन, व्हाईट रशिया, ट्रान्सकॉकेशिया व सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिक्स ऑफ रशिया यांचा एक संघ स्थापन होऊन युनियन ऑफ सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक्सची (U.S.S.R.) घोषणा करण्यात आली.

## २.२.१० रशियन क्रांती आणि पश्चिम आशिया

पश्चिम आशियातील देशही क्रांतीने प्रभावित झाले. १९२१ साली रशिया – अफगाणिस्थान यांच्यात एक करार झाला. तसाच करार क्रांतिकारी सरकारने इराणशीही केला. त्यानंतर तेथे समाजवादी विचार काही अंशी रुजत गेले. रशियन क्रांतीने प्रभावित झालेला दुसरा मोठा पश्चिम आशियायी देश म्हणजे तुर्कस्थान. तुर्कस्थानच्या केमाल पाशाला साम्राज्यशाहीविरोधी लढ्यात क्रांतिकारी रशियाने साहाय्य केले. याखेरीज रशियाने अरबांच्या राष्ट्रवादी लढ्यांनाही पाठिंबा दिला. इराकच्या स्वातंत्र्यप्राप्तीला हातभार लावला, येमेनच्या स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा दिली.

### ❑ रशियन क्रांती व पूर्व व आग्नेय आशिया :–

पूर्व रशियात प्रामुख्याने चीन, जपान, मंगोलिया, कोरिया आणि आग्नेय आशियात इंडोचीन, इंडोनेशिया, ब्रम्हदेश, मलाया आदींचा समावेश होतो. चीन हा साम्राज्यवादाला बळी पडलेला मोठा देश होता. मंगोलिया चीनचा मांडलिक होता. चीनमधील बुध्दिवंत कार्ल मार्क्सच्या विचारांनी भारावले होतेच. पेकिंग विद्यापीठ हे साम्राज्यवाद विरोधाचे केंद्र बनले होते. तेथे रशियन क्रांतीचा प्रभाव अधिक पडला. चीनला रशियाने मदतीचा हात पुढे केला. मंगोलियातील १९२१ ला झालेली गणराज्याची स्थापना हा रशियन क्रांतीचाच प्रभाव होता.

### ❑ रशियन क्रांती आणि भारत :–

रशियन क्रांतीच्या वसाहतवादविरोधी पवित्र्यामुळे भारतातील ब्रिटीश लोक धास्तावले होते. त्यांनी रशियन क्रांतीच्या बातम्या भारतात पोहचू न देण्याची खबरदारी घेतली. तरीही क्रांतीने पंडित जवाहरलाल नेहरू प्रभावित झाले होते. लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल, लाला लजपतराय या मंडळींनाही क्रांतीबद्दल कुतूहल होते. इ. स. १९१७ च्या रशियातील क्रांतीनंतर भारतात मार्क्सवाद आला आणि त्याचा प्रसार होऊ लागला. त्या काळातील कामगारांमधील अंसंतोषाने साम्यवादी विचारसरणीस खतपाणी मिळाले. परिणामी मुंबई, कलकत्ता, लाहोर, मद्रास अशा उद्योगप्रधान नगरांमध्ये साम्यवादी संघटना स्थापन झाल्या. मानवेंद्रनाथ रॉय व ताश्कंद मध्ये असलेल्या इतर भारतीय निर्वासितांनी १९२० मध्ये भारतीय साम्यवादी पक्ष स्थापन केल्याची घोषणा केली. पुढे १९२४ मध्ये सत्यभक्तने भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना करीत असल्याची घोषणा केली व ते स्वत: सचिव बनले.

जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले आहे की, सोव्हिएत क्रांतीमुळे मानव समाजाला मोठ्या उडीने उन्नत केले आहे आणि एक तेजस्वी ज्वाला प्रकाशित केली आहे ज्याला त्रास होऊ शकत नाही आणि त्या नवीन सभ्यतेचा पाया त्यांनी जगाला दिला आहे.

## २.३ सारांश

इ. स. १९१४ ते १९१८ हा पहिल्या जागतिक महायुध्दाचा कालखंड होय. हे युध्द सर्व आघाड्यावर

लढले गेले. हे महायुध्द एकाएकी उद्भवले नसून युरोपियन राजकारणात ज्या अनेक घडामोडी वर्षानुवर्षेघडत गेल्या होत्या. त्या सर्वांचा परिपाक म्हणजे पहिले जागतिक महायुध्द. युध्दात प्रचंड वित्तहानी व मनुष्यहानी झाली. या युध्दात बहुतेक सर्व युरोपियन राष्ट्र, आफ्रिका, आशिया खंडातील त्यांच्या वसाहती, अमेरिका, जपान, चीन इ. सुमारे २८ राष्ट्रांनी भाग घेतला. हे युध्द युरोप, आफ्रिका व आशिया या तिन्ही खंडात जमीन, आकाश व पाणी या तिन्ही ठिकाणी लढले गेले. आतापर्यत जगामध्ये झालेल्या लढायांचा विचार करता प्रादेशिक व्याप्ती, दीर्घ कालखंड या दृष्टीने हे युध्द मोठे ठरले.

पहिल्या महायुध्दामुळे जगातील एक बलाढ्य सत्ता म्हणून अमेरिकेचा उदय झाला. जुन्या युगाचा अंत होवून नवीन युगास प्रारंभ झाला. युध्दातून जीतच नव्हे तर जेत्या राष्ट्रांचाही पुनर्जन्म व्हावा एवढे मोठे स्थित्यंतर झाले. पाश्चात्यांच्या तत्त्वांना, आदर्शांना सामाजिक, आर्थिक, राजकीय मूल्यांना आव्हान दिले. आशिया, आफ्रिका खंडातील लोकांत आत्मविश्वास व राष्ट्रीयत्वाची भावना चेतावली. व यातूनच स्वतांत्र्यलढ्यास प्रारंभ झाला.

सर्व प्रकारची युध्दे टाळून जगात लोकशाही नांदावी हे ध्येय समोर ठेवून शांतता परिषद ठरवली. व तह घडवून आणला. या तहामुळे मुलभूत तत्त्वांचा उदय झाला. अत्यंत महत्त्वाचा फायदा म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता स्थापन करण्यासाठी अधिकृत आंतरराष्ट्रीय संघटनेच्या रुपात राष्ट्रसंघाचा जन्म या शांतता तहामुळे झाला. जरी राष्ट्रसंघास पूर्णपणे यश आले नसले तरी राष्ट्रसंघातील महान तत्त्वांचे विस्मरण होवू देणे योग्य नाही.

रशियाच्याच नव्हे, तर जागतिक इतिहासाला कलाटणी देणारी क्रांती रशियात इ. स. १९१७ साली घडली. ओद्योगिक क्रांतीने माल उत्पादनाच्या क्षेत्रात आमूलाग्र बदल तर घडवून आणलाच पण पाश्चिमात्य संस्कृती व जीवनमूल्ये, शासनप्रणाली, राजकीय व सामाजिक संस्था या सर्वाना जबरदस्त आव्हान दिले. या क्रांतीने अद्यापही आपले वेगळेपण टिकविले आहे. फक्त राजकीय हक्क व मुलभूत स्वातंत्र्य देऊन जनतेची दु:खे नष्ट होणार नाहीत तर खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित झाली पाहिजे असा नवा दृष्टीकोन या क्रांतीने निर्माण केला. लेनिनच्या अथक परिश्रमाने व स्टॅलिनच्या पंचवार्षिक योजनांनी रशियाचा क्रांतीनंतर कायापालट घडून आला. रशियामध्ये साम्यवादाचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे अनेक राष्ट्रांनी समाजवादी विचारसरणीचा स्विकार केला.

## २.४ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

- ☞ संहार - विनाश.
- ☞ संपुष्टात येणे - नाहीसे होणे, समाप्त होणे.
- ☞ कुटनीती - युध्दाचे धोरण.
- ☞ मुक्तव्दार नीती - सर्वासाठी खुले धोरण.

- ☞ औद्योगिकीकरण - कारखान्यांचा उदय.
- ☞ करार - वाटाघाटी, तह.
- ☞ त्रिराष्ट्र संघ - तीन देशांचा संघ.
- ☞ लष्करीकरण - शस्त्रसज्जता.
- ☞ द्वेष - तिरस्कार.
- ☞ महायुध्द - विनाशकारी, संहारक युध्द.
- ☞ परिषद - अधिवेशन.
- ☞ हटवादी भूमिका - हेकेखोर वृत्तीने, आपलेच खरे करणारा.
- ☞ परगणे - प्रांत.
- ☞ अजिंक्य - विजेता.
- ☞ नाकेबंदी - मार्ग रोखणे.
- ☞ जागतिक महासत्ता - जगावर राज्य करणारी, वर्चस्व ठेवणारी सत्ता.
- ☞ कलम - विभाग.
- ☞ कौन्सिल - समिती.

## २.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### अ) योग्य पर्याय निवडा.

१) ............ मध्ये इंग्लंड, ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्यात भूमध्य सामुद्रिक करार करण्यात आला?

*(अ) इ. स. १८८५* *(क) इ. स. १८८९*

*(ब) इ. स. १८८७* *(ड) इ. स. १८९१.*

२) इ.स. १८७० मध्ये बिस्मार्कने कोणत्या देशाकडून अल्सेस व लॉरेन्स प्रांत हिसकावून घेतले?

*(अ) इंग्लंड* *(ब) इटली* *(क) रशिया* *(ड) फ्रान्स.*

३) दुसरे बाल्कन युध्द .............. साली झाले?

*(अ) इ. स. १९००* *(क) इ. स. १९१३*

*(ब) इ.स. १९११* *(ड) इ. स. १९१५.*

४) आर्च ड्यूक फर्डिनांडची हत्या .............. रोजी करण्यात आली ?

*(अ) २८ जून १९१४* *(क) २८ ऑगस्ट १९१४*

*(ब) २८ जुलै १९१४* *(ड) २८ सप्टेंबर १९१४.*

५) खालीलपैकी कोणता देश दोस्त राष्ट्रांमध्ये (Allied Powers) मध्ये समाविष्ट नव्हता?

*(अ) इंग्लंड* *(ब) बेल्जियम* *(क) फ्रान्स* *(ड) बल्गेरिया.*

६) .............. या साली रुमानिया दोस्त राष्ट्रामध्ये सामील झाला?

*(अ) इ. स. १९१४* *(क) इ. स. १९१६*

*(ब) इ. स. १९१५* *(ड) इ. स. १९१७.*

७) पहिल्या महायुध्दात सहभागी झालेल्या राष्ट्रांची शांतता परिषद १८ जानेवारी १९१९ मध्ये .............. येथे भरली?

*(अ) लंडन* *(ब) पॅरिस* *(क) सॅनफ्रान्सिस्को* *(ड) शांघाय.*

८) व्हर्सायच्या तहानुसार बोहेमिया व मोर्विया या प्रदेशाचे मिळून ............. हे नवे राष्ट्र निर्माण झाले?

*(अ) झेकोस्लोव्हेकिया* *(ब) रुमानिया* *(क) क्रोशिया* *(ड) युगोस्लाव्हिया.*

९) रशियातील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना .............. यावर्षी झाली?

*(अ) इ. स. १८९६* *(क) इ. स. १८९८*

*(ब) इ. स. १८९७* *(ड) इ. स. १८९९.*

१०) इंझवेस्तिया हे कामगार वर्गाचे मुखपत्र कोणाच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आले?

*(अ) लेनिन* *(ब) स्टॅलिन* *(क) वुड्रो विल्सन* *(ड) लिऑ ट्रॉटस्की.*

**(ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) कोणाच्या पुढाकाराने शस्त्रास्त्राला आळा घालण्यासाठी हेग येथे पहिली आंतरराष्ट्रीय शांतता परिषद बोलाविण्यात आली?

२) एकतर मी जगाचा सत्ताधीश होईन किंवा सर्वनाश पत्करेन अशी भूमिका कोणाची होती?

३) इ. स. १९१४ च्या महायुध्दाला बाल्कन युध्दे (१९१२-१३) जितकी कारणीभूत झाली, तितकी इतर कोणतीही एक गोष्ट कारणीभूत झाली नाही असे कोणी म्हटले आहे?

४) इ. स. १९०५ मध्ये कोणत्या देशाच्या पाठिंब्याने मोरोक्कोतील सुलतानाने बंड केले?

५) चौदा कलमी योजनेचे जनक कोण?

६) १८ जानेवारी १९१९ च्या पॅरिस शांतता परिषदेचे उद्घाटन कोणाच्या हस्ते झाले ?

७) समानता, न्याय या तत्त्वावर तह आधारलेला नसून जेत्याला मलिदा या स्वार्थी पायावर तह करण्यात आला अशी मत व्हर्सायच्या तहाबाबत कोणी मांडले ?

८) राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संघटना कोणत्या वर्षी उदयास आली ?

९) दास कॅपिटल ग्रंथाचा लेखक कोण ?

१०) टेन डेज दॅट शुक द वर्ल्ड ह्या रशियन क्रांतीवरील पुस्तकाचे लेखक कोण ?

## २.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** *१) (ब) इ. स. १८८७.*

*२) (ड) फ्रान्स.*

*३) (क) इ.स. १९१३.*

*४) (अ) २८ जून १९१४.*

*५) (ड) बल्गेरिया.*

*६) (क) इ.स. १९१६.*

*७) (ब) पॅरिस.*

*८) (अ) झेकोस्लोव्हेकिया.*

*९) (क) इ. स. १८९८.*

*१०) (ड) लिऑ ट्रॉटस्की.*

**ब)** *१) झार निकोलस दुसरा.*

*२) कैसर विल्यम दुसरा.*

*३) ग्रॅन्ट टेम्पले.*

*४) जर्मनी.*

*५) वुड्रो विल्सन.*

*६) रेमंड पॉइनकेअर.*

*७) लॉन्सिंग.*

*८) १० जानेवारी १९२०.*

*९) कार्ल मार्क्स.*

*१०) जॉन रीड.*

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१) पहिल्या महायुध्दास कारणीभूत झालेल्या कारणांची चर्चा करा ?

२) पहिल्या महायुध्दात १९०५ ते १९१४ या कालखंडात घडलेल्या राजकीय घटनांची परिणती याची चर्चा करा ?

३) पहिल्या महायुध्दाच्या परिणामाची चर्चा करा ?

४) व्हर्सायच्या तहातील प्रमुख तरतुदी सांगा ?

५) वुड्रो विल्सनच्या १४ तत्त्वांची माहिती दया ?

६) रशियन राज्यक्रांतीस कारणीभूत ठरलेल्या घटकांची चर्चा करा ?

७) रशियन राज्यक्रांतीचा जगावर कसा प्रभाव पडला याची चर्चा करा ?

### ब) टिपा लिहा.

१) युध्दपूर्व जग.

२) पहिल्या महायुध्दाची कारणे.

३) वुड्रो विल्सनची चौदा तत्त्वे.

४) व्हर्सायचा तह.

५) ऑक्टोबर क्रांती.

६) व्लादिमिर इल्यिच लेनिन.

## २.८ संदर्भ ग्रंथ

१) Sen Sailendra Nath, 'Europe and the World', New Central Book Agency, Kolkata, 2015.

२) डॉ. कोलारकर श. गो., युरोप (१७८९ ते १८७०), आधुनिक जग (१८७१ ते १९६५), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१ .

३) डॉ. वैद्य सुमन, आधुनिक जग, पायल प्रकाशन, नागपूर, १९७६.

४) कदम य. ना., आधुनिक जग(१९०१ - २०००), फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१५.

५) डॉ. गाठाळ एस. एस. आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

६) प्रा. जाधव हरिदास, प्रा. जाधव कल्याण, आधुनिक जगाचा इतिहास, अक्षरलेखा प्रकाशन.

७) गाडगीळ पां. बा., रशियन राज्यक्रांती, पुणे, १९६१.

८) आपटे लीला, रशियातील समाजवादी राज्यक्रांती, मुंबई, १९६७.

९) डॉ. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

❑ ❑ ❑

घटक–३

# दोन युद्धामधील जग

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ राष्ट्रसंघ : यश आणि अपयश

३.२.२ आर्थिक महामंदी : कारणे आणि परिणाम

**३.२.३ युरोपातील हुकूमशाहीचा उदय : इटली व जर्मनी**

३.३ सारांश

३.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. प्रे. विल्सनची चौदा तत्त्वे समजतील.

२. राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पार्श्वभूमी समजेल.

३. आर्थिक महामंदीची पार्श्वभूमी समजेल.

४. महामंदीची कारणे समजतात.

५. आर्थिक महामंदीचे परिणाम समजतात.

६. युरोपमधील हुकूमशाहीच्या उदयाची पार्श्वभूमी समजते.

७. इटलीतील फॅसिझमची माहिती मिळते.

८. जर्मनीतील नाझीझम्‌ची माहिती मिळते.

## ३.१ प्रास्ताविक

पहिल्या महायुध्दानंतर जगाची घडी बसविण्यासाठी राष्ट्रसंघाचा जन्म झाला. राष्ट्रसंघाच्या निर्मितीला विड्रो विल्सन यांनी चालना दिली. राष्ट्रसंघाने अत्यंत प्रामाणिकपणे काम करून पहिली १० वर्षे चांगला दबदबा निर्माण केला. तरी १९३१ नंतर जर्मनी-इटलीतील हुकूमशाहने राष्ट्रसंघाचे आदेश धुडकावून लावण्यास सुरुवात केली. पहिल्या महायुध्दात आर्थिक संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे जागतिक मंदी निर्माण झाली. पहिल्या महायुध्दाचे भयंकर परिणाम जागतिक राजकारणावर झाले होते. यातूनच इटली व जर्मनी या दोन राष्ट्रांमध्ये हुकूमशाहीचा उदय झाला. पहिल्या महायुद्धानंतर मुसोलिनीने इटलीत हुकूमशाही निर्माण केली. जर्मनीचा पहिल्या महायुध्दात पराभव झाला होता व व्हर्सायच्या तहामुळे जर्मनीचे मोठ्या प्रमाणावर विघटन झाले. अशा परिस्थितीत हिटलरने जर्मनीची जबाबदारी घेतली त्यातून हिटलरची हुकूमशाही जर्मनीत निर्माण झाली. दोन महायुध्दामधील २० वर्षाच्या काळात राष्ट्रसंघाची निर्मिती, जागतिक मंदी आणि इटली व जर्मनीत झालेल्या उठाव या घटना महत्त्वपूर्ण असल्यामुळे या घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ राष्ट्रसंघ : यश आणि अपयश

पहिल्या महायुध्दाच्या घटनाक्रमातून राष्ट्रसंघाचा उदय झाला. ज्या कारणांमधून पहिले महायुध्द उद्‌भवले त्यांचा विचार करता राष्ट्रसंघाचा उदय म्हणजे आश्चर्यकारक घटना होय. अमेरिकेमुळेच पहिल्या महायुध्दातील विजयाचे पारडे दोस्तराष्ट्रगटाकडे झुकले होते. त्यामुळे अमेरिकेच्या शांतता निर्मितीच्या प्रयत्नांना विशेष वजन प्राप्त झाले. दोस्तगटाचा विजय दृष्टीपथात येताच पराभूत राष्ट्रांशी कोणत्या तत्वावर अटींनुसार तह करावेत व युद्ध थांबवावे असा विचार सुरु असतानाच वृड्रो विल्सनने अमेरिकन काँग्रेससमोर बोलताना (जानेवारी १९१८) आपली सुप्रसिध्द '१४ तत्त्वे' मांडलीत. त्यात स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, स्वयंनिर्णयाचा हक्क, शांतता वगैरे उदात्त तत्वांचा समावेश होता. ह्या १४ तत्वापैकी शेवटचे तत्त्व आंतरराष्ट्रीय संघटनेबाबतचे होते.

#### राष्ट्रसंघाची स्थापना

पॅरिस येथे (१९१९) आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात आली. त्यात वेगवेगळ्या पराभूत राष्ट्रांशी तह करताना विल्सनची १४ तत्त्वे आधारभूत मानली गेलीत. एवढेच नव्हे तर जर्मनीबराबेर जो व्हर्सायचा तह करण्यात आला, त्यात राष्ट्रसंघाबाबतचे कलम अंतर्भूत होते. अशाप्रकारे पॅरिस परिषदेत सर्वच राष्ट्रांनी विल्सनच्या १४ तत्त्वांना मान्यता दिली व त्यानुसार १० जानेवारी १९२० रोजी राष्ट्रसंघ (League of

Nations) अस्तित्वात आला. त्यावेळी २९ राष्ट्रांनी त्याचे सदस्यत्व पत्करले. स्वित्झर्लंडमधील जिनेवा हे राष्ट्रसंघाचे मुख्य केंद्र होते.

## ❍ उद्दिष्ट्ये

१) जागतिक शांतता टिकविण्यासाठी परस्पर संघर्षाचा त्याग करणे.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याची भावना निर्माण करून त्याची जोपासना करणे.

३) आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडविण्यासाठी युद्धाचा अवलंब न करता शांततेचा मार्ग अवलंबिणे.

४) राष्ट्राराष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा व एकात्मतेचा आदर राखणे.

५) राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप नाही.

६) आपसातील प्रश्न सामोपचाराने सोडविणे, ते शक्य न झाल्यास राष्ट्रसंघाकडे सोपविणे.

७) सर्व राष्ट्रांनी राष्ट्रसंघाला सहकार्य देणे.

८) आंतरराष्ट्रीय व्यवहारात गुप्तता सोडून देणे.

९) आंतरराष्ट्रीय करार परस्पर तह करतात ते राष्ट्रसंघाशी विसंगत होऊ नये.

१०) नवीन करार करताना राष्ट्रसंघाची संमती घेणे.

११) शस्त्रकपातीच्या मार्गाचा अवलंब करणे.

१२) वसाहतींच्या बाबतीत तेथील जनतेशी न्याय व्यवहार करणे.

## ❍ राष्ट्रसंघाची रचना

### १. आमसभा (Assembly)

राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्यराष्ट्रांची मिळून आमसभा बनली होती. प्रत्येक राष्ट्राला तीन प्रतिनिधी पाठविता येत होते. मात्र मत एकच होते. वर्षातून किमान एकदा आमसभेची बैठक भरून त्यात आंतरराष्ट्रीय विषयांवर प्रश्नांवर चर्चा करण्यात येईल. निर्णय एकमताने घेतला जाईल. राष्ट्रसंघाच्या स्थापनेवेळी त्याचे एकूण २९ सदस्य होते. महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या अमेरिकेने राष्ट्रसंघाच्या स्थापनेत पुढाकार घेतला ती अमेरिकाच सदस्य बनली नाही. राष्ट्रसंघाची जास्तीत जास्त सदस्यसंख्या ६२ होती आणि ती १९३५ मध्ये होती. त्यानंतर मात्र पुन:श्च जागतिक युद्धाचे वारे सुरू झाले व राष्ट्रसंघाला ओहोटी लागली.

## २. समिती (Council)

ही राष्ट्रसंघाची कार्यकारिणी होती. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, इटली व जपान ह्या बड्या राष्ट्रांना समितीत कायम सदस्यत्व होते. मात्र अमेरिकेने सदस्यत्व पत्करले नव्हते. इतर राष्ट्रांमधून चार प्रतिनिधी घेतले जात. ते अर्थातच बदलणारे होते. समितीच्या बैठकी वेळोवेळी होत आणि त्यात जागतिक शांततेबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होई. राष्ट्रसंघाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही विषयावर समितीत चर्चा, विचारविनिमय चालत असे. सदस्य राष्ट्रांमध्ये संघर्ष झाल्यास जागतिक शांतता धोक्यात आल्यास समितीची बैठक होऊन निर्णय घेतला जाई.

## ३. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना

प्रामुख्याने युरोपातील सर्वच देशांचे औद्योगिकरण झाल्याने तेथे मजूरांचे विविध स्वरूपाचे प्रश्न होते. जागतिक शांतता टिकविण्याच्या अनुषंगाने ते प्रश्न सोडवून मजूर क्षेत्रात स्वास्थ्यपूर्ण वातावरण निर्माण करणे. राष्ट्रसंघाला आवश्यक वाटले. त्यासाठीच आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची (The International Labour Organization) स्थापना करण्यात आली. ह्या संघटनेमार्फत परिषदा भरवून मजूरविषयक प्रश्नांबाबत विचारविनिमय केला जाई.

## ४. सचिवालय

राष्ट्रसंघाच्या सनदेच्या सहाव्या कलमामध्ये राष्ट्रसंघाच्या प्रशासनासाठी कायम स्वरूपाच्या सचिवालयाची सोय करण्यात आली होती. त्यानुसार एका सरचिटणीसाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रसंघाचे कायम स्वरूपाचे सचिवालय स्वित्झर्लंडमध्ये जिनिव्हा या ठिकाणी स्थापन करण्यात आले होते. सरचिटणीसाची नेमणूक आमसभेच्या पाठिंब्याने समिती करीत असे. सरचिटणीसाच्या हाताखाली दोन सहचिटणीस व दोन उपचिटणीस यांची नेमणूक स्वत: सरचिटणीस करीत असे. जगातील निरनिराळ्या देशांतून गुणवत्तेच्या आधारावर या सर्व अधिकाऱ्यांची निवड होत असे. सरचिटणीसाने केलेल्या नेमणूकांना समितीच्या मान्यतेची आवश्यकता होती. राष्ट्रसंघाच्या सचिवालयात एकूण १० विभाग होते. निरनिराळ्या राष्ट्रांतील प्रशासनकुशल, कार्यक्षम व तज्ज्ञ असे एकूण ७५० कर्मचारी या चिटणीसांच्या हाताखाली सचिवालयात कार्यरत होते.

## ५. आंतरराष्ट्रीय न्यायालय

आंतरराष्ट्रीय मतभेदांचे व संघर्षाचे निराकरण शांततापूर्ण मार्गाने करून जागतिक शांतता व सुरक्षितता टिकविणे हे राष्ट्रसंघाचे प्रमुख उद्दिष्ट असल्यामुळे १५ फेब्रुवारी १९२२ रोजी हेग येथे कायमस्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात आली. जगातील प्रमुख न्यायपध्दतींचे प्रतिनिधीत्व करण्यास पात्र असलेल्या कायदेपंडितांमधून व विविध राष्ट्रांच्या उच्च न्यायालयातील न्यायाधिशांमधून आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड आमसभा आणि समिती संयुक्तरित्या करीत असे. सुरुवातीला या

न्यायालयात ११ न्यायाधीश व ४ उपन्यायाधीश होते. १९३० मध्ये न्यायाधीशांची संख्या १५ करण्यात येवून उपन्यायाधीशांची पदे रद्द करण्यात आली. न्यायाधीशांची निवड ९ वर्षांसाठी होत असे. न्यायाधीशांच्या ९ वर्षांच्या कार्यकाळात न्यायालयातील इतर सर्व न्यायाधीशांनी त्या न्यायाधीशाला बडतर्फ करण्यात यावे असा निर्णय एकमताने दिल्याखेरीज न्यायाधीशाला त्याच्या पदावरून पदच्युत करता येत नसे.

## ६. आंतरराष्ट्रीय मजूर संघटना :-

राष्ट्रसंघाचे एक उपांग म्हणून स्थापन करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेला व्यापक प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली होती. या संघटनेच्या सदस्यत्वासाठी राष्ट्रसंघाचे सदस्यत्व अनिवार्य मानण्यात आले नव्हते. कालांतराने राष्ट्रसंघाची सदस्यसंख्या घटली परंतु या संघटनेची सदस्यसंख्या मात्र वाढत गेली. १९३५ साली अमेरिकेने या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले, परंतु राष्ट्रसंघाचे सदस्यत्व मात्र अमेरिकेने कधीच स्वीकारले नाही. ब्राझील, जपानसाख्या राष्ट्रांनी राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा त्याग केला, तरी या संघटनेचे सदस्यत्व मात्र चालू ठेवले. १९३९ मध्ये जगातील ६० राष्ट्रे या संघटनेची सदस्य होती.

मजूरांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे व्यासपीठ या नात्याने आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने महनीय कामगिरी बजावली आहे. बेकारी नाहीशी करणे, कामगारांचे कामाचे तास नियंत्रित करणे, सुट्ट्या, विमा, वैद्यकीय व इतर सोयी, निवृत्ती वेतन, स्त्रिया आणि मुले यांचे पिळवणूकीविरुध्द संरक्षण, कामगारांचा संघटनेचा हक्क आदी बाबतीत आदर्श कायद्यांचे मसुदे तयार करून आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आपल्या सभासद राष्ट्रांना मार्गदर्शन केले. सभासद राष्ट्रांनीही या संघटनेने केलेल्या बहुतेक शिफारशी स्विकारल्या.

## ❍ राष्ट्रसंघाचे कार्य :

### १. युपेन आणि माल्मेडी

व्हर्सायच्या तहान्वये युपेन आणि माल्मेडी हे प्रदेश बेल्जियमला देण्यात आले होते. या निर्णयाविरुध्द जर्मनीने १९२० मध्ये राष्ट्रसंघाच्या समितीकडे वारंवार निषेधात्मक तक्रारी केल्या. २० सप्टेंबर १९२० रोजी राष्ट्रसंघाच्या समितीने जर्मनीने उपस्थित केलेल्या यूपेन आणि माल्मेडीच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करून दोन्ही प्रदेश बेल्जियमला देण्याचा निर्णय योग्य व अंतिम स्वरूपाचा आहे असे जर्मनीला कळविले.

### २. ऑलंड बेटांचा प्रश्न

व्हर्सायच्या तहान्वये ऑलंड बेटे फिनलंडला देण्यात आली होती. स्वीडन आणि फिनलंड या देशांच्या

दरम्यान बोधनियाच्या सामुद्रधुनीच्या तोंडाशी असलेल्या ऑलंड बेटांच्या मालकीवरून १९२० मध्ये त्या देशात वाद निर्माण झाला. बेटांवर मालकी फिनलंडची असली, तरी तेथील बहुसंख्य जनता स्वीडिश असल्यामुळे स्वीडनबरोबर आपले एकीकरण व्हावे अशी त्यांची मागणी होती. स्वीडिश सरकारने ही मागणी उचलून धरली आणि जनतेच्या मागणीला आपला पाठिंबा जाहीर करून तेथील जनतेला उघड उघड फूस दिली. प्रश्न चिघळला, ऑलंड बेटांवरील स्वीडिश जनतेने स्वीडनमध्ये सामील होण्यासाठी उग्र चळवळ सुरू केली. चळवळ चिरडण्यासाठी फिनलंडने खड्गवळाचा वापर केला. स्वीडन आणि फिनलंडमध्ये ऑलंड बेटांच्या प्रश्नावरून युध्दाची शक्यता निर्माण झालेली दिसताच राष्ट्रसंघाच्या सनदेच्या ११ व्या कलमानुसार इंग्लंडने या प्रश्नाकडे राष्ट्रसंघाच्या समितीचे लक्ष वेधले.

### ३. ग्रीस–इटली वाद

ग्रीस आणि इटली या दोन देशांतर्गत सीमारेषा निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या मंडळातील चार इटालियन आणि एक अल्वानियन सदस्यांचा ग्रीसच्या भूमीवर २३ ऑगस्ट १९२३ रोजी खून झाला. या गुन्ह्याबाबत ग्रीसने इटलीची माफी मागून नुकसानभरपाई द्यावी अशी आग्रही व ठाम मागणी इटलीने केली. ग्रीसने इटलीच्या मागण्या अंशत: मान्य केल्यामुळे ग्रीसला सरळ करण्याच्या उद्देशाने इटालियन सरकारच्या आदेशानुसार इटालियन नौदलाने ॲड्रियॅटिक समुद्राच्या मुखाशी असलेले कोर्फ्यू ह्या बेटावर कब्जा प्रस्थापित केला. ग्रीसकडून नुकसानभरपाईच्या रकमेची वसुली करण्यासाठी इटलीने हा दडपशाहीचा मार्ग अवलंबिला होता. ग्रीसने राष्ट्रसंघाच्या समितीकडे धाव घेतली. समितीच्या नेतृत्वाखाली राजनैतिक वाटाघाटी होऊन उभयपक्षी मान्य होईल असा तोडगा निश्चित करण्यात आला. त्याप्रमाणे नुकसानभरपाई म्हणून ग्रीसने इटलीला ५ कोटी लिरा देण्याचे मान्य केल्यानंतर इटालियन नौदलाने व्यापलेले कोर्फ्यू बेट मुक्त करण्यात आले.

### ४. अप्पर सायलेशियाचा प्रश्न

व्हर्सायच्या तहानुनासर अप्पर सायलेशिया हा प्रदेश पोलंडमध्ये विलीन करावयाचा की जर्मनीत राहू द्यावयाचा याबाबत निर्णय घेण्यासाठी संबंधित वादग्रस्त प्रदेशात २० मार्च १९२० रोजी सार्वमत घेण्यात आले आणि त्यानुसार अप्पर सायलेशिया पोलंडमध्ये विलीन करण्यात आला. या वादग्रस्त प्रदेशाच्या सीमा निश्चित करण्याचे कार्य राष्ट्रसंघाच्या समितीने पार पाडले.

### ५. चीन – जपान संघर्ष

जगाला दुसऱ्या महायुध्दाच्या खाईत नेणाऱ्या घटनांमध्ये आग्रस्थान द्यावे लागेल ते १९३१–३२ मधील जपानच्या मांचूरियावरील आक्रमणाला–बहुसंख्य पाश्चिमात्य राष्ट्रे जागतिक मंदीच्या फेऱ्यात सापडली असताना मांचूरियावरील आपली पकड दृढ करण्यासाठी ती उत्तम संधी असल्याचे जपानच्या

लष्करी अधिकाऱ्यांनी अचूक हेरले. चीनने मुकडेनजवळील आपल्या दक्षिण मांचूरियन रेल्वेच्या एका भागाची नासधूस केली असा जाहीर आरोप करून जपानने पध्दतशीरपणे व अत्यंत त्वरेने १८ सप्टेंबर १९३१ रोजी मध्य मांचूरियावर आपली सत्ता प्रस्थापित केली. जिनिव्हा येथील चीनच्या प्रतिनिधींनी राष्ट्रसंघाच्या सनदेच्या १०व्या कलमाचा आधार घेऊन जपानच्या मांचूरीयावरील आक्रमणाविरुध्द राष्ट्रसंघाकडे दाद मागितली. २१ सप्टेंबर रोजी राष्ट्रसंघाच्या समितीने ठराव संमत करून चीन व जपान या दोन्ही राष्ट्रांनी वादग्रस्त प्रदेशातून आपापल्या सेना मागे घ्याव्यात असे आवाहन केले. जपानने या आवाहनाकडे संपूर्ण दुर्लक्ष करून मांचूरियातील आपली विजयी घोडदौड पुढे चालू ठेवली.

### ६. पोलंड – जर्मनी सीमा प्रश्न

पॅरिसच्या शांतता तहाने केलेल्या प्रादेशिक पुनर्रचनेत अप्पर मलेशियात सार्वमत घेतले. तरी पोलंड व जर्मनीचे समाधान झाले नाही. राष्ट्रसंघाने या प्रश्चात हस्तक्षेप करून काहीसा पक्षपाती निर्णय पोलंडच्या बाजूने दिला.

### ७. कोर्फ्यू घटना

१९२३ ग्रीसमध्ये इटलीचा एक सेनापती व इतर चार लष्करी अधिकारी यांचा खून झाला. याविरुध्द इटलीने गुन्ह्याबद्दल ग्रीसला जबाबदार धरून ग्रीसकडे माफीची व पूर्ण नुकसानभरपाईची मागणी केली. ग्रीसने ही मागणी धुडकावून लावताच इटलीने कोर्फ्यू बेटावर हल्ला केला व कोर्फ्यूचा कब्जा घेतला. ग्रीसने इटलीच्या या कारवाईबद्दल राष्ट्रसंघाकडे तक्रार केली. राष्ट्रसंघाने इंग्लंड व फ्रान्सच्या मदतीने कोर्फ्यूतून इटलीस माघार घेण्यासभाग पाडले.

### ८. ॲग्लो – फ्रेंच तंटा

ट्युनिस मोरोक्कोमधील फ्रेंच नागरिकत्वाच्या फ्रान्सने काढलेल्या नव्या आदेशामुळे ब्रिटिश नागरिकत्वाच्या नियमात विसंगती निर्माण झाली. म्हणून इंग्लंडने हा प्रश्न आंतरराष्ट्रीय लवाद मंडळाकडे सोपविण्याची सूचना केली. फ्रान्सने हा प्रश्न अंतर्गत आहे असे मानून ब्रिटनच्या सूचनेला नकार दिला. शेवटी आंतरराष्ट्रीय न्यायालयाने सर्वस्वी अंतर्गत नसल्याचे मत व्यक्त केले. ह्यामुळे दोन्ही राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी हा प्रश्न वाटाघाटींनी सोडविला.

## ❍ राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे :

### (अ) जपानचे मांचूरियावरील आक्रमण

१९३१ मध्ये जपानने मांचूरियावर आक्रमण केले व राजधानी मुकडेन आपल्या ताब्यात घेतली त्याविरुध्द चीनने राष्ट्रसंघात तक्रार केली. तेव्हा ह्या घटनेची चौकशी करण्यासाठी राष्ट्रसंघाने लिटन

आयोगाची नियुक्ती केली. आयोगाने आपला अहवाल १९३३ मध्ये सादर केला. तो जपानने नाकारला आणि राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा त्याग केला. ह्या प्रकरणी राष्ट्रसंघ काहीही करू शकला नाही. परिणामी राष्ट्रसंघाच्या प्रतिष्ठेला जबरदस्त धक्का बसून त्याच्या पतनास प्रारंभ झाला.

### (ब) इटलीचे ॲबिसिनियावरील आक्रमण

उत्तर आफ्रिकेतील ॲबिसिनियावर (इथिओपिया) १९३५ मध्ये मुसोलिनीच्या नेतृत्वाखालील फॅसिस्ट इटलीने जोरदार आक्रमण केले. ह्यावेळी राष्ट्रसंघाने इटलीला 'आक्रमक' घोषित केले, एवढेच नव्हे तर इटलीवर आर्थिक बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. परंतु इंग्लंड फ्रान्ससारख्या बड्या राष्ट्रांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी न केल्याने राष्ट्रसंघाच्या आर्थिक बहिष्काराच्या मार्गाला काहीच अर्थ राहिला नाही. ह्या घटनेमुळे राष्ट्रसंघ पूर्णत: कोलमडून पडला.

### (क) हिटलरची आक्रमणे

हिटलरने ह्या परिस्थितीचा पूर्ण फायदा घेतला. १९३३ मध्ये जर्मनीने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व सोडले व त्यानंतर व्हर्सायच्या तहाचे एकेक कलम मोडण्यास सुरुवात केली. राष्ट्रसंघ व्हर्साय तहाचा संरक्षक असल्याने आपल्या कृत्याद्वारे जणू काही हिटलर राष्ट्रसंघाचाच एकेक लचका तोडीत होता. १९३५ मध्ये लष्करी सेवा आवश्यक बनवून हिटलरने व्हर्सायचा तह मोडण्यास सुरूवात केली. त्यानंतर पुढच्याच वर्षी म्हणजे १९३६ मध्ये त्याने निर्लष्करी म्हणून घोषित केलेल्या ऱ्हाईन प्रदेशात सैन्य घुसविले. केवळ नाराजी व्यक्त करण्याव्यतिरिक्त राष्ट्रसंघ काहीच करू शकला नाही.

## २. नि:शास्त्रीकरणाचे प्रयत्न :-

परस्पर संघर्ष टाळून जागतिक शांतता कायम ठेवण्यासाठी युध्दोत्तर काळात लहान-लहान करार नौदलाची व भूदलाची सैन्यशक्ती कमी करणे, मोठमोठ्या राष्ट्रांनी आपसात करार करणे अशा विविध मार्गाचा अवलंब करण्यात आला. जर्मनी ऑस्ट्रियासारख्या पराभूत राष्ट्रांच्या सैन्यशक्तीवर बरीच बंधने आलेली होती. जागतिक शांततेसाठी व ताणतणाव कमी करण्यासाठी जेत्या राष्ट्रांनीही स्वत:वर अशी बंधने घालणे आवश्यक होते आणि ते योग्य ठरले असते. परंतु सुरक्षिततेच्या नावाखाली कोणीही त्याला तयार नव्हते.

### (अ) नाविक नि:शस्त्रीकरण

नि:शस्त्रीकरणाच्या प्रयत्नांचा प्रारंभ नाविक क्षेत्रापासून आणि तोही अमेरिकेकडून झाला. पहिले महायुद्ध समाप्त झाल्यानंतर जगातील प्रमुख आरमारी शक्ति असलेल्या इंग्लंड व जपानबरोबर स्पर्धा करण्याची अमेरिकेची इच्छा होती. तरीही जागतिक शांततेची आपल्याला काळजी आहे हे दाखविण्यासाठी अमेरिकेने राष्ट्रसंघाच्या सदस्य नसतानाही नि:शस्त्रीकरणात पुढाकार घेतला. त्यादृष्टीने १९२१ मध्ये वॉशिंग्टन

येथे एक आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविली. त्यात अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जपान, इटली ह्या प्रमुख राष्ट्रांशिवाय चीन, हॉलंड, बेल्जियम, पोर्तुगाल ही राष्ट्रे होती. परिषदेत फक्त लढाऊ जहाजांबाबत निर्णय झाला. १९३० मध्ये झालेल्या लंडन परिषदेतही विशेष निष्पन्न झाले नाही. उलट १९३४ मध्ये जपानने अमेरिका व इंग्लंडला त्यांच्या बरोबरीने आरमारी शक्तीचे अधिकार मिळण्याची मागणी केली. ह्यावेळेपावेतो आरमारी स्पर्धेत जर्मनी व रशिया कुठेही नव्हता. परंतु १९३५ पासून त्यांचीही नाविक शक्ती वाढू लागल्याने आतापर्यंतचे आरमारी नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न वाया गेलेत.

### (ब) भूदल नि:शस्त्रीकरण

ह्या प्रश्नावर अभ्यास करण्यासाठी राष्ट्रसंघाने १९२५ मध्ये एका आयोगाची नियुक्ती केली. आयोगाच्या शिफारशींच्या आधारे बोलाविल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेत विचारविनिमय व्हावयाचा होता. ह्या मंडळाच्या कार्यकक्षेतून आरमार नि:शस्त्रीकरण वगळण्यात आले. फक्त भूदलाच्या शक्तीबाबत आयोगाला कार्य करावयाचे होते; परंतु अनेक देशांजवळ अप्रत्यक्ष सैन्य होते. (Second Line and Defence) त्यांची संख्या सांगणे मात्र कठीण होते. राष्ट्रसंघाला वेळोवळी माहिती पुरविण्यासाठी एक स्थायी मंडळ असावे. ह्या शिफारशींवर विचारविनिमय करण्यासाठी १९३२ मध्ये जिनेवा येथे एक नि:शस्त्रीकरण परिषद भरविण्यात आली. त्यात राष्ट्रसंघाच्या सदस्यांबरोबरच अमेरिका व रशियाचेही प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाल्यावर भिन्न-भिन्न विचार समोर येऊन वादावादी होऊ लागली व मूळ विचार बाजूला पडू लागला. दरम्यान जर्मनीची सत्ता हिटलरच्या हाती आली आणि त्याने राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा त्याग करून (१९३३) घोषणा केली की जर्मनी व्हर्सायचा तह मोडेल व आपले सैन्यसामर्थ्य शस्त्रसामर्थ्य वाढवेल. हिटलरच्या ह्या गर्जनेमुळे नि:शस्त्रीकरणाच्या सर्व प्रयत्नांवर पाणी पडले.

## ❍ राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे :-

### १) राष्ट्रभावनेचे प्राबल्य

पहिल्या महायुध्दाला राष्ट्रवाद कारणीभूत ठरला पण युध्दानंतरही त्याची प्रखरता कमी झाली नाही. मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीने राष्ट्रवादाच्या वर येऊन राष्ट्रसंघाच्या उदात्त कल्पनांना सहकार्य करणे अपेक्षित होते. पण राष्ट्रवाद वंशवाद पिढ्यान्‌पिढ्या अंगात भिनलेल्यांना ते सहजासहजी जमले नाही. राष्ट्रवाद आणि राष्ट्रसंघ ह्यात जेव्हा जेव्हा संघर्ष आला तेव्हा तेव्हा राष्ट्रवादाने बाजी मारली. परिणामी राष्ट्रसंघ दुय्यम महत्त्वाचा ठरत गेला.

### २) सर्वांचा समावेश नाही

पहिले महायुध्द समाप्त करण्यासाठी विल्सनने आपली '१४ तत्त्वे' जाहीर केली त्यात राष्ट्रसंघाचा समावेश होता. युध्द समाप्तीनंतर सर्व राष्ट्रांवर राष्ट्रसंघाचे सदस्यत्व पत्करण्याचे बंधन होते. मात्र स्वत:

विल्सनला आपल्या देशात वेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले. युरोपचा राजकारणात आपल्याला पडावयाचे नाही. युध्दाची भूक असलेल्या युरोपच्या शांततेवर विश्वास नाही अशी भूमिका घेऊन अमेरिकन काँग्रेसने राष्ट्रसंघात सहभागी होण्यास नकार दिला. अमेरिकेमुळेच महायुध्दात दोस्तराष्ट्रांना विजय मिळाल्याने व शांतता निर्मितीच्या कार्यातही अमेरिकेचा पुढाकार असल्याने अमेरिका जागतिक शक्ती बनली होती. तिच्या अनुपस्थितीमुळे राष्ट्रसंघ जन्मत:च दुर्बल बनला. जपानने व त्यानंतर इटलीने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व सोडले. इंग्लंड व फ्रान्स हे राष्ट्रसंघाचे महत्वपूर्ण सदस्य होते. पण इंग्लंडला युरोपबाहेरील आपल्या वसाहतींच्या सुरक्षिततेची जास्त चिंता होती. फ्रान्स सुध्दा सुरक्षिततेचे एक माध्यम म्हणून राष्ट्रसंघाकडे पहात होता. सारांश राष्ट्रसंघाच्या आदर्शावरील श्रध्देमुळे नव्हे तर आपल्या राष्ट्रीय स्वार्थासाठी राजकारणाच्या सोयीसाठी युरोपीय राष्ट्रे राष्ट्रसंघाचे सदस्य बनत किंवा त्याचा त्याग करीत.

### ३) स्वत:चे सैन्यसामर्थ्य नाही

जागतिक शांततेला बाधा आणणाऱ्या युध्दाच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या युध्दखोर राष्ट्राविरुध्द कारवाई करण्याची तरतूद राष्ट्रसंघाच्या घटनेत होती. त्यानुसार राष्ट्रसंघाचा आदेश न पाळणाऱ्या राष्ट्राविरुध्द आर्थिक बहिष्कार घालणे किंवा सामुदायिक सशस्त्र कृती करणे हे मार्ग राष्ट्रसंघाला वापरता येत होते. परंतु अशा निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी राष्ट्रसंघाजवळ स्वत:चे असे सैन्य नव्हते. राष्ट्रसंघाच्या स्थापनेच्या वेळी तशी सूचना फ्रान्सने केली होती. पण त्यातील धोका लक्षात घेऊन लॉईड जॉर्ज व विल्सनने त्या सुचनेस विरोध केला. परिणामी, राष्ट्रसंघाने अशा स्वरूपाचा आदेश दिला तर तो पाळणे अथवा नाही हे सदस्य राष्ट्राच्या मर्जीवर अवलंबून होते.

### ४) हुकूमशाही प्रवृत्तींचा उदय

पहिल्या महायुध्दानंतर युरोपातील इटली व जर्मनी आणि आशियातील जपान ह्या राष्ट्रांमध्ये हुकूमशाही जन्म झाला. ही हुकूमशाही प्रवृत्ती म्हणजे जागतिक शांततेला पर्यायाने राष्ट्रसंघाला जबरदस्त आव्हान ठरले. १९३१ मध्ये जपानने मांचूरियावर आक्रमण केले. त्यानंतर १९३५ मध्ये इटलीने उत्तर आफ्रिकेतील ॲबिसिनियावर हल्ला चढविला. ताबडतोब राष्ट्रसंघाने इटलीला आक्रमक घोषित करून त्याच्यावर आर्थिक बहिष्कार घालण्याचा सदस्य राष्ट्रांना आदेश दिला. परंतु त्या आदेशाचे पालन झाले नाही. ह्याच सुमारास हिटलर जर्मनीत सत्ताधारी बनला. तो साम्यवादाचा कट्टर विरोधक असल्याने इंग्लंड फ्रान्ससारख्या लोकशाही राष्ट्रांनी त्याची ताकद सपाटून वाढू लागली. त्याने नंतर व्हर्सायचा तह मोडण्यास सुरूवात केली.

### ❍ आक्रमक जर्मनीचे आव्हान :-

जागतिक शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या उद्दात्त हेतूने स्थापन झालेल्या राष्ट्रसंघाला

सर्वाधिक गंभीर आव्हान मिळाले ते हिटलरच्या नाझी जर्मनीकडून, हिटलर जर्मनीत सत्तारूढ झाला त्यावेळी जिनिव्हा येथे जागतिक नि:शस्त्रीकरण परिषद चालू होती. शस्त्रास्त्र कपातीच्या प्रश्नावर फ्रान्स व जर्मनीत बेबनाव निर्माण झाल्यामुळे हिटलरने जागतिक नि:शस्त्रीकरण परिषदेतून जर्मनीचे अंग काढून घेतले आणि व्हर्सायच्या तहाला न जुमानता जर्मनीचे सैन्यबळ वाढविण्याचे धोरण उघडपणे जाहीर केले.

### ❍ व्हर्सायच्या तहाशी असलेला दुर्दैवी संबंध :-

व्हर्सायच्या तहामध्ये आणि अन्य पॅरिस शांतता करारांमध्ये राष्ट्रसंघाच्या सनदेचा समावेश करण्यात आल्यामुळे व्हर्सायच्या तहाचे दोष आपोआपच राष्ट्रसंघाला अप्रत्यक्षरित्या चिकटले. दोस्त राष्ट्रांच्या मनामध्ये मध्य युरोपीय सत्तांबाबत खदखदत असलेली सूडभावना व्हर्सायच्या तहात व अन्य शांतता करारांमध्ये पुरेपूर व्यक्त झाली होती. शांतता तहाची कलमे ठरवितांना ज्याप्रमाणे पराभूत राष्ट्रांना चर्चेत व वाटाघाटीत सामील करून घेण्यात आले नव्हते, त्याचप्रमाणे राष्ट्रसंघाच्या सनदेच्या निर्मितीमध्येही त्यांचा समावेश नव्हता. शांतता तह आपल्यावर एकतर्फी लादण्यात आले आहेत अशी पराभूत राष्ट्रांची जशी भावना होती; त्याचप्रमाणे राष्ट्रसंघ ही जेत्या राष्ट्रांनी स्वत:च्या हितसंबंधाच्या रक्षणार्थ उभारलेली जेत्या राष्ट्राची संघटना आहे अशी त्यांची दृढ कल्पना झाली.

### ❍ अमेरिकेचा असहकार :-

पॅरिस शांतता परिषदेमध्ये अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुड्रोविल्सन यांनी राष्ट्रसंघाच्या उभारणीमध्ये सर्वात महत्वाची भूमिका पार पडल्यामुळे राष्ट्रसंघाच्या निर्मितीचे बहुतांश श्रेय वुड्रोविल्सनला जाते. तथा पुढे व्हर्सायच्या तहाला आणि त्याचबरोबर राष्ट्रसंघाच्या सनदेला अमेरिकेच्या सिनेटने मान्यता नाकारल्यामुळे अमेरिका राष्ट्रसंघाचे सदस्य कधीच बनले नाही. जन्मदात्या अमेरिकेच्या असहकारामुळे राष्ट्रसंघ मुळातच कमकुवत बनला.

### ❍ सनदेतील दोष :-

राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार महत्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत आमसभा आणि समिती यांच्यामध्ये निर्णयाबाबत एकमत झाल्याशिवाय निर्णय होऊच शकत नसे. राष्ट्रसंघाच्या सर्व सभासद राष्ट्रांचे नकाराधिकार असल्यामुळे कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाच्या बाबतीत सर्व सभासद राष्ट्रांचे एकमत होणे शक्य नव्हते. जपानच्या बाबतीत 'लिटनअहवाल' जपान वगळता अन्य सर्व राष्ट्रांनी मान्य केला; जपानची मांचूरियावरील आक्रमणाबाबत उघड उघड निर्भर्त्सना केली. प्रत्युत्तर म्हणून जपानने राष्ट्रसंघाचाच त्याग केला. जपानच्या मांचूरियावरील आक्रमणाबाबत राष्ट्रसंघामध्ये एकमत होऊनही जपानने राष्ट्रसंघाचा त्याग केल्यानंतरही जपानविरुध्द आर्थिक राजनैतिक आणि लष्करी कारवाई करण्यास राष्ट्रसंघ घाबरला नाही.

## ❍ मूल्यमापन :-

जागतिक शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करून ती टिकविण्याचे महत्त्वाचे कार्य करण्यात राष्ट्रसंघाला अपयश आले यात शंका नाही; परंतु तो दोष राष्ट्रसंघाचा नसून राष्ट्रसंघाच्या प्रमुख सदस्य राष्ट्रांचा होता. जागतिक पातळीवर राजकीय आणि सामाजिक व्यवस्था स्थापन करण्याचा हा पहिला प्रयत्न होता. आक्रमक युध्द हा मानवता विरोधी गुन्हा आहे, याची जाणीव होऊन असे युध्द टाळण्यासाठी सर्वांनी एकत्र यावयास हवे, ही अभिनव भावना राष्ट्रसंघामुळे वाढीस लागली. आर्थिक, सामाजिक आणि मानवतावादी क्षेत्रात राष्ट्रसंघाने महनीय कामगिरी करून आंतरराष्ट्रीय सहकार्याचा पाया घातला. राजकीय क्षेत्रात जरी राष्ट्रसंघाला मर्यादित यश लाभले असले, तरी त्या मर्यादित यशाच्या आधारावरच झालेल्या चुका दुरुस्त करून संयुक्त राष्ट्रसंघटनेचा नवा अध्याय सुरू झाला.

## ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

### अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. राष्ट्रसंघाची स्थापना कधी झाली?

२. राष्ट्रसंघाची मुख्य कचेरी कोठे होती?

३. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे कार्यालय कोठे आहे?

४. राष्ट्रसंघाने एकूण किती वर्षे कार्य केले?

५. राष्ट्रसंघ कशामुळे दुबळा राहिला?

### ब) योग्य पर्याय लिहा.

१. विल्सनच्या १४ कलमी योजनेतील शेवटचे कलम ............. संबंधी होते.

*(अ) आंतरराष्ट्रीय संघटन* *(क) समिती*

*(ब) सभा* *(ड) सचिवालय*

२. राष्ट्रसंघाची प्रारंभी सदस्य संख्या ............. होती.

*(अ) ४२* *(ब) ४३* *(क) ४५* *(ड) ४६.*

३. राष्ट्रसंघाच्या समितीत कायम सदस्य म्हणून जर्मनीला ............. साली घेतले.

*(अ) १९२५* *(ब) १९२६* *(क) १९२७* *(ड) १९२८.*

४. राष्ट्रसंघाच्या सचिवालयात एकूण ............. विभाग होते.

*(अ) ८* *(ब) ९* *(क) १०* *(ड) १२.*

५. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना .............. साली झाली.

*(अ) १९२०* *(ब) १९२२* *(क) १९२५* *(ड) १९२९.*

## ३.२.२ आर्थिक महामंदी : कारणे आणि परिणाम

### ❍ प्रस्तावना

पहिल्या महायुध्दानंतर सन १९२१ ते १९२९ या दरम्यानचा कालखंड अमेरिकेच्या आर्थिकदृष्ट्या सर्वोच्च भरभराटीचा, संपन्नतेचा व भौतिक सुखसमृध्दीचा काळ होता. या काळात अनेक वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने अत्यंत भरभराटीला आले होते. आघाडीवर होता मोटारीचा व्यवसाय हेन्री फोर्ड याने अमेरिकन बाजारपेठेत कमी किंमतीला मोटार उपलब्ध करून देऊन अमेरिकन नागरिकांना मोटार खरेदी करण्यास प्रवृत्त केले. त्यामुळे सन १९१९ साली असलेली मोटार गाड्यांची संख्या सन १९२९ पर्यंत तिप्पट झाली. फोर्डच्या पाठोपाठ 'जनरल मोटर्स' सारख्या काही मोटार कंपन्या मोटार व्यवसायात आगेकूच करू लागल्या. मोटार व्यवसायाला जोडून असलेले टायर, ट्यूब, रंगद्रव्ये आदी व्यवसायसुध्दा भरभराटीला आले. सन १९२१ ते १९२९ या दरम्यान अमेरिकेत रेडिओची विक्रीसुध्दा मोठ्या प्रमाणात झाली. अमेरिकेतील शहरातून व मोठ्या गावातून विजेचा वापर वाढला. विजेवर चालणाऱ्या अनेक लहान-मोठ्या उपकरणांचा वापर घराघरातून होऊ लागला. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व रशिया या चार राष्ट्रांच्या एकत्रित वीज उत्पादनापेक्षाही अधिक वीजनिर्मिती एकट्या अमेरिकेत होऊ लागली. बांधकामाला प्रचंड वेग आला. निरनिराळ्या उद्योगधंद्यांना आणि व्यवसायांना लागणारे भांडवल बँकांनी पुरवले. अमेरिकन नागरिकांनी महायुध्दोत्तर दशकात मोटारी, रेडिओ, पंखे यासारख्या वस्तूंसाठी बँकांकडून कर्जे घ्यावयास सुरुवात केली. त्याचबरोबर कारखानदारांनी आणि विक्रेत्यांनी हप्तेवारी अभिनव विक्री पध्दतीमुळे अमेरिकन बहुजन समाजाचे राहणीमान भौतिक जीवन सुखी झाले आणि त्या प्रमाणात शारीरिक कष्ट कमी झाले.

### ❍ भांडवलाचे आत्यंतिक केंद्रीकरण

काही ठराविक उद्योगपतींनी केवळ स्वत:च्या बुध्दिमत्तेच्या व संघटन कौशल्याच्या जोरावर आपल्या उद्योगधंद्यात स्वत:चा विशेष भांडवल व गुंतवता शेअरची विक्री करून सर्वसामान्य नागरिकांकडून भांडवल गोळा केले आणि बँकांकडून कर्जरूपाने भांडवल मिळवून स्वत:चे प्रचंड उद्योगसमूह उभारले. संघटित झालेल्या बड्या उद्योगपतींच्या व विक्रेत्यांच्या जीवघेण्या स्पर्धेत छोट्या उद्योगपतींचा व विक्रेत्यांचा निभाव लागला नाही.

### ❍ शेतकरी व कामगारांची हलाखीची परिस्थिती

पहिल्या महायुध्दाच्या काळात अमेरिकन धान्याला युरोपात असलेली प्रचंड मागणी लक्षात घेऊन

अनेक अमेरिकनांनी कर्जे काढून शेतजमिनी विकत घेतल्या, नवी अत्याधुनिक अवजारे व यंत्रसामुग्री विकत घेऊन धान्योत्पादनास जोरदार सुरुवात केली. युध्दसमाप्तीनंतर अमेरिकन धान्याला असलेली मागणी उत्तरोत्तर कमी होत गेली. मागणीपेक्षा उत्पादन प्रचंड प्रमाणावर होत असल्यामुळे धान्याचे भाव गडगडू लागले. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची पाळी आली.

अमेरिकन सरकारने उद्योगपतींची बाजू उचलून धरल्याने कामगारांना आपल्या हक्कांसाटी संपाखेरीज अन्य मार्ग उरला नाही. अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने कामगारांचा संपाचा मार्गही रोखला. त्यामुळे सन १९२० च्या सुमारास प्रबळ असलेल्या कामगार संघटना सन १९२८ च्या सुमारास अगदी नाममात्र बनल्या. शेतकरी व कामगार या दोन मोठ्या घटकांच्या परिस्थितीकडे उद्योगपतींचे राज्यकर्त्यांचे व सर्वसाधारण अमेरिकन नागरिकांचे संपूर्ण दुर्लक्ष सुरू होते.

### ❍ जकात कायदा

हर्बर्ट हूबरने सन १९२९ मध्ये राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर अमेरिकन कृषी व्यवसायाला सावरण्याच्या उद्देशाने आयात धान्यावरील जकात दर वाढवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार खनिजद्रव्ये, रंगद्रव्ये, रसायने, कापड इ. वस्तूवर जकात वाढवण्याचे विधेयक अमेरिकन सिनेटने मंजूर केले. परिणामी अन्य राष्ट्रांनीही अमेरिकन मालावर अशाच प्रकारचे जकात दरात वृध्दी केल्यामुळे अमेरिकेची निर्यात झपाट्याने घसरू लागली.

### ❍ आर्थिक मंदीची सुरूवात

सप्टेंबर १९२९ मध्ये अमेरिकेच्या शेअर बाजारात अस्थिरता जाणवू लागली आणि शेअरचे भाव घसरू लागले. मंगळवार दि. २९ ऑक्टोबर १९२९ या दिवशी १ कोटी ६५ लाख डॉलरचे शेअर बाजारात विक्रीस आले आणि ५० बड्या कंपन्याच्या शेअरचे दर ४० टक्क्यांनी घसरले. या दिवशी हजारो अमेरिकन नागरिकांची आयुष्यभर गोळा केलेली पूंजी श्रीमंतीच्या हव्यासापोटी सुरू झालेल्या सट्टेबाजीत नष्ट झाली. अमेरिकन शेअर बाजाराची घसरगुंडी सुरू असताना युरोपीय देशांमध्येही मंदीची स्पष्ट लक्षणे दिसू लागली. सन १९२९ मध्ये अमेरिकेत आलेल्या आर्थिक मंदीच्या अभूतपूर्व तुफानी लाटेच्या जबरदस्त तडाख्याने पुढील तीन वर्षात अमेरिकेच्या समृध्द अर्थव्यवस्थेचा डोलारा भुईसपाट झाला.

### ❍ मंदीची कारणे :-

### १) विदेशात अडकून पडलेले अमेरिकन भांडवल

युरोपीय राष्ट्रांची बिघडलेली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी अमेरिकेने युरोपीय राष्ट्रांना प्रचंड प्रमाणावर

कर्जाऊ रकमा दिल्या. अमेरिकन माल खरेदी करण्यासाठी युरोपियन जनतेची ग्राहकशक्ती टिकून रहावी. या मूलभूत हेतूने अमेरिकेने युरोपीय राष्ट्रांना द्रव्यसहाय्य केले. ठराविक मुदतीत आपल्या कर्जाऊ रकमा आपल्याला वापस मिळतील ही अमेरिकेची अपेक्षा फोल ठरली. त्यामुळे प्रचंड प्रमाणात अमेरिकन भांडवल युरोपात अडकून पडले.

### २) संरक्षक जकातीचे दुष्परिणाम

अमेरिकन सरकारने अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर जकात वाढवण्याचे धोरण राबवल्यामुळे अमेरिकन बाजारपेठातील विदेशी मालाला उठाव उत्तरोत्तर कमी होत गेला. परिणामी युरोपीय राष्ट्रांचा अमेरिकेतील व्यापार घसरला आणि त्यांच्या उत्पन्नाचा स्रोत आटला. विदेशी व्यापाराद्वारे होणारे उत्पन्न घटत गेल्यामुळे कर्जबाजारी राष्ट्रांना अमेरिकेची कर्जफेड करणे जवळपास अशक्य झाले. यामुळे युरोपीय राष्ट्रांनीसुध्दा अमेरिकन मालावर जबरदस्ती संरक्षक जकाती बसवल्या.

### ३) असंतुलित आर्थिक भरभराट

अमेरिकेत ज्यावेळी मोटारी, विमाने, रेडिओ यासारख्या व्यवसायात विलक्षण तेजी होती. त्याचवेळी कोळसा सुती कापड यासारख्या काही व्यवसायात सातत्याने मंदी होती. काही व्यवसायात विलक्षण तेजी तर काही व्यवसायात सातत्याने मंदी हे अस्थिर हे असंतुलित अर्थ व्यवस्थेचे लक्षण होय.

### ४) राष्ट्रीय उत्पन्नाचे विषम वाटप

औद्योगिक क्षेत्रात उद्योगांना लागणारे भांडवल शेअरच्या रूपाने सर्वसामान्य जनतेकडून गोळा केले जाईल. मात्र व्यवसायात मिळणारा प्रचंड नफा सामान्य भागधारकांना योग्य प्रमाणात वाटून न देता संचालक मंडळ नफ्यातील घसघशीत रक्कम औद्योगिक विस्तारासाठी वापरून स्वत: भरपूर श्रीमंत झाले. मूठभर उद्योगपती राष्ट्रीय उत्पन्नातील सिंहाचा वाटा गिळंकृत करून उत्तरोत्तर धनाढ्य बनत गेले, त्याचवेळी सामान्य भागधारकांना नफ्याचा न्याय वाटा न मिळाल्याने त्यांची ग्राहकशक्ती उत्तरोत्तर क्षीण होत गेली.

### ५) ठराविक वस्तूंची अतिरिक्त उत्पादनात वाढ

मोटारी, रेडिओ व अन्य महागड्या चैनीच्या वस्तूंच्या खरेदीला सीमा असते, ही गोष्ट लक्षात न घेता कारखानदारांनी अशा वस्तूंचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन चालू ठेवल्यामुळे काही वस्तूंच्या बाबतीत मागणीपेक्षा उत्पादने किती तरी अधिक प्रमाणात वाढले. अशावेळी किमती उतरवून उत्पादन विकण्याऐवजी किंमती कायम ठेवण्यासाठी उत्पादकांनी अधूनमधून कारखाने बंद ठेवून उत्पादन घटवले. परिणामी हजारो मजूरांच्या मानेवर बेकारीची टांगती तलवार सतत लटकू लागली.

## ६) समाजातील कर्जबाजारीपणाचा रोग

खरेदी केलेल्या वस्तूंची किंमत हप्त्याने फेडावयाची असल्यामुळे आर्थिक कुवत नसलेल्या सर्वसामान्य अमेरिकन नागरिकांनी अनेक वस्तू विकत घेतल्या, परंतु त्याचे हप्ते फेडताना त्यांची धावपळ उडू लागली. हव्यासापोटी अमेरिकन नागरिकांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर वाढतच गेला. कर्जाच्या प्रचंड ओझ्याखाली दडपल्या गेलेल्या सामान्य नागरिकांची ग्राहकशक्ती क्षीण होत गेली.

## ७) कामगार वर्गाची व शेतकऱ्यांची दैन्यावस्था

अधूनमधून कारखाने बंद ठेवण्यात येत असल्यामुळे कामगारांना बेकारीचे भय कायम भेडसावीत असे. जीवनावश्यक वस्तूंचे दर तिपटीने वाढल्यामुळे कामगार वर्ग मेटाकुटीला आला होता. अशा परिस्थितीत कामगार वर्गाची कार्यशक्ती ओसरत जाणे स्वाभाविक होते. शेतमालाची निर्यात घटल्यामुळे, धान्योत्पादनाच्या किंमती सतत घसरत असल्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांमध्ये कर्जबाजारीपणा वाढीस लागला.

## ८) बेसुमार सट्टेबाजी

उद्योग धंद्यात भांडवली गुंतवणूक केल्यास एकाचे दहा डॉलर होतात या आशेने सामान्य नागरिकांनी शेअर खरेदी करण्यास सुरूवात केली. कित्येकांनी तर आयुष्यभर काटकसर करून साठवलेली सर्व माया शेअर खरेदी करण्यासाठी खर्च केली. शेअरची खरेदी वाढत जाताच शेअर बाजारात सट्टेबाजी सुरू झाली. २९ ऑक्टोबर १९२९ रोजी सुरू झालेली शेअरची घसरण आणि मंदीची अस्मानी लाट अमेरिकेतील बड्या लोकांनाही रोखणे अशक्य झाले.

## ❍ आर्थिक मंदीचे परिणाम :-

## १) अर्थव्यवस्थेचा पाया डळमळीत झाला

अमेरिकन अर्थव्यवस्थेचा पाया डळमळीत झाला आणि भरभराटीचा व समृध्दीचा डोलारा कोलमडून अमेरिका आर्थिक मंदीच्या भोवऱ्यात सापडून गटांगळ्या खाऊ लागली. हुबर शासनाने अंमलात आणलेल्या सर्व योजना मंदीची लाट परतवून लावण्यास असमर्थ ठरल्या.

## २) शेअर्सचे भाव गडगडले

शेअरचे भाव गडगडल्यामुळे लक्षावधी आयुष्याची कमाई मातीत मिळाली. कर्ज काढून शेअर खरेदी केलेले अमेरिकन नागरिक कर्जबाजारी झाले.

### ३) मालमत्ता गहाण

खरेदी केलेल्या चैनीच्या व सुखसोयींच्या वस्तूंच्या किमतीचे हप्ते वेळेवर देणे अशक्य झाल्यामुळे हजारो अमेरिकन खाजगी कर्जाच्या डोंगराखाली चिरडले गेले घरे आणि मालमत्ता गहाण टाकण्याचे प्रमाण बेसुमार वाढले.

### ४) बँका बंद पडल्या

त्रस्त झालेल्या अमेरिकन ठेवीदारांनी बँकातील ठेवी काढून घेतल्यामुळे आणि सट्टेबाजीत आलेल्या तोट्यामुळे शेकडो बँका बंद पडल्या. बँका बंद पडू लागल्यामुळे उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल मिळेनासे झाले.

### ५) कारखानदारी बंद पडली

अमेरिकन नागरिकांची क्रयशक्ती घटल्यामुळे हजारो लहान कारखाने बंद पडले आणि मोठ्या कारखानदारांनी आपले उत्पन्न घटवले. परिणामी लक्षावधी मजुरांवर बेकारीची व उपासमारीची कुऱ्हाड कोसळली.

### ६) सांपत्तिक स्थिती ढासळली

शेतकऱ्यांचे उत्पन्न झपाट्याने घटत गेल्यामुळे शेतकरी वर्गात वस्तू खरेदी करण्याची ताकत उरली नाही. केवळ कामगार व शेतकरीच नव्हे तर डॉक्टर, लेखक, चित्रकार, संगीतकार, इंजिनियर, नाटककार आदी लोकांची सांपत्तिक स्थिती कमालीची ढासळली.

### ७) बेकारी वाढली

रस्त्यारस्त्यातून निरूद्देश भटकणाऱ्या बेकारांचे थवे आढळू लागले. सुरुवातीला खाजगी धर्म संस्था आणि सामाजिक संस्थांनी बेकारांना अन्नवाटप करण्याचे कार्य सुरू केले.

### ८) बेकारी समस्या जैसे थे

स्थानिक शासनांनी व राज्य शासनांनी बेकारी निवारणार्थ सार्वजनिक कल्याणाची कामे हाती घेतली. परंतु दरसाल ५० कोटी डॉलर खर्च करूनही बेकारीची समस्या आटोक्यात आली नाही.

### ९) राष्ट्रीय कर्ज वाढले

अंतर्गत व विदेशी व्यापार मंदावल्यामुळे आणि उत्पन्नाचे मार्ग मर्यादित झाल्यामुळे संघसरकारचे व

राज्यसरकारचे उत्पन्न झपाट्याने घटले. सन १९३० साली १६ अब्ज डॉलर असलेले राष्ट्रीय कर्ज सन १९३३ पर्यंत २२ अब्ज डॉलरवर गेले.

### १०) फ्रान्समध्ये आर्थिक आणीबाणी

मंदीच्या काळात पर्यटन व्यवसायामुळे फ्रेंच सरकारला मिळणारे भरीव उत्पन्नही लक्षणीयरित्या घसरले. उद्योगधंदे, कारखाने आणि देशांतर्गत व विदेशी व्यापारात आलेली मंदीची लाट, धडधड बंद पडणारे कारखाने त्यातून उद्भवणारी बेकारी या सर्व प्रकारांना तोंड देता देता सन १९३३ मध्ये जागतिक महामंदीशी झगडताना फ्रान्सच्या चार पंतप्रधानांचे पतन झाले.

### ११) इंग्लंडची अर्थव्यवस्था ढासळली

सन १९२९ च्या जागतिक महामंदीने इंग्लंडला जबरदस्त तडाखा हाणला. मंदीच्या संकटाचा परिहार करणे, इंग्लंडमधील मॅकडोनाल्ड सरकारच्या शक्तीबाहेरचे काम ठरले. विदेशी व्यापार युध्दपूर्व पातळीपेक्षा खालावलेला होता. अशा नाजूक आर्थिक परिस्थितीत मंदीचे संकट कोसळल्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली.

### १२) जागतिक महामंदी आणि जर्मनी

महामंदीचे सर्वव्यापी परिणाम सर्वच राष्ट्रांना भयानक स्वरूपात सोसावे लागले, कारण त्यांचे आर्थिक व व्यापारी व्यवहार परस्परांशी निगडीत झालेले होते. जर्मनीमध्ये ६० लक्ष कामगार बेकार झाले. जर्मनीची राष्ट्रीय बँक बंद करणे भाग पडले कारण बँका बुडण्याच्या धास्तीने जर्मनीतील लोक आपापल्या ठेवी बँकातून काढून घेऊ लागले होते. जून १९३२ मध्ये महामंदीतून निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीवर तोडगा सुचवण्याकरिता लॉसेन येथे इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम व इटली या राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद भरली. ह्यावेळी जो करार झाला तो 'लॉसेन करार' म्हणून ओळखला जातो. आर्थिक समस्येची जबाबदारी लॉसेन कराराने युरोपीय राष्ट्रे अमेरिकेच्या शिरावर ढकलू पाहत आहेत ही गोष्ट अमेरिकेला नामंजूर होती. अमेरिकेच्या नकारामुळे लॉसेन करार बासनात गुंडाळला गेला. सन १९३२ पर्यंत जर्मनीने एकूण ५५० कोटी डॉलर्स नुकसान भरपाई दाखल भरले होते. सन १९३२ नंतर जर्मनीने नुकसान भरपाई दाखल एक दमडादेखील भरला नाही.

## ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

### अ) एका वाक्यात उत्तरे द्या.

१. १९२९ मध्ये अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष कोण होते?

२. शेअरची घसरण कधी सुरू झाली?

३. १९३३ साली राष्ट्रीय कर्ज कितीपर्यंत वाढले?

४. कोणकोणत्या लोकांच्या सांपत्तिक स्थिती कमालीची ढासळली?

५. लॉसेन येथे परिषद कधी झाली?

**ब) योग्य पर्याय लिहा.**

१. कामगार संघटना सन ............ च्या सुमारास नाममात्र बनल्या.
*(अ) १९२७ (ब) १९२८ (क) १९३० (ड) १९३१.*

२. २९ ऑक्टोबर १९२९ या दिवशी ............ डॉलरचे शेअर बाजारात विक्रीस आले.
*(अ) १ कोटी ६५ लाख डॉलर (क) १ कोटी ८० डॉलर*
*(ब) १ कोटी ७५ हजार (ड) २ कोटी.*

३. ............ बंद पडू लागल्यामुळे उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल मिळेनासे झाले.
*(अ) बँका (ब) कारखाना (क) शाळा (ड) शेअर.*

४. आर्थिक महामंदीमुळे जर्मनीमध्ये ............ लक्ष कामगार बेकार झाले.
*(अ) ५० लक्ष (ब) ६० लक्ष (क) ७० लक्ष (ड) ८० लक्ष.*

## ३.२.३ युरोपातील हुकूमशाहीचा उदय : इटली व जर्मनी

## अ) इटलीतील हुकूमशाह : मुसोलिनी

❍ **प्रस्तावना :-**

पहिल्या महायुध्दामध्ये इटली सुरूवातीला तटस्थ राहिल्यानंतर मात्र तो दोस्त राष्ट्रांच्या बाजूने म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, रशियाच्या बाजूने युद्धात उतरला. अर्थात इटलीने आपल्या बाजूला यावे म्हणून दोस्त राष्ट्रांनी त्याला प्रादेशिक लाभाचे आमिष दाखवले होते. ह्या आमिषाला बळी पडून सन १९१५ साली पहिल्या महायुद्धात इटलीने भाग घेतला. प्रत्यक्ष युद्धात मात्र इटलीचा ऑस्ट्रीयन सैन्याने जबरदस्त पराभव केला. पहिले महायुद्ध संपल्यावर झालेल्या पॅरीसच्या शांतता परिषदेने जेत्या राष्ट्रांनी जित राष्ट्रांचा बराच प्रदेश व सर्व वसाहती बळकावून त्याची आपसात वाटणी करून घेतली. इटलीला मात्र अगदी थोडाच भाग देण्यात आला. इटलीला आफ्रिकेत तसेच बाल्कन प्रदेशात आपला राज्यविस्तार होईल असे वाटत होते पण इटलीची ही आकांक्षा धुळीस मिळाली. शिवाय युद्धामध्ये इटलीची बरीच प्राणहानी झाली होती. अशा अवस्थेत इटली निराश झाला तसेच अपमानित झाला. ह्या सर्व वस्तुस्थितीमुळे दोस्त राष्ट्रांनी इटलीला धोका दिला अशीच सर्वसामान्य इटालीयन जनतेची भावना बनली. युध्दानंतर देशातील आर्थिक तूट भरून काढण्यासाठी

जनतेवरील करांचे प्रमाण वाढल्याने असंतोषाचे वातावरण तयार झाले. चलनची किंमत घसरू लागली त्यामुळे सर्वत्र बेकारी फोफावली. आर्थिकदृष्ट्या इटली उद्‌ध्वस्त होऊन गेला. इटलीतील ही स्फोटक स्थिती साम्यवादाच्या उदयाला पोषक अशीच होती. साम्यवाद्यांनी कारखान्यातील मजुरांना चिथावणी देऊन ठिकठिकाणी हरताळ करण्यास सुरुवात केली. तसेच साम्यवाद्यांनी शेतकऱ्यांना भडकवून त्यांना जमिनदारांपासून जमिनी हिसकावून घेण्याची चिथावणी दिली.

इटलीतील तत्कालीन राजकीय परिस्थिती फारशी चांगली नव्हती. इटलीतील सर्वच राजकीय पक्ष प्रजासत्ताकवादी व घटनात्मक मार्गाने चालणारे होते. परंतु सत्तारूढ पक्ष जनतेचे प्रश्न सोडवण्यात असमर्थ ठरला. म्हणजेच इटलीला ज्या खंबीर व धाडसी नेतृत्वाची गरज होती त्याच्या अगदी विरुध्द तेथील परिस्थिती होती. अशातच दुष्काळ, दारिद्र्य, बेकारी, चलनाची किंमत घसरणे ह्या समस्येतून राष्ट्राला सावरून धण्यात इटलीचे प्रजासत्ताक सरकार अपयशी ठरले. शासन यंत्रणा अकार्यक्षम व भ्रष्टाचारी होती. देशात सर्वत्र उपद्रवखोरांनी गोंधळ माजविला होता. अशा परिस्थितीत मुसोलिनीचा उदय झाला.

## ❍ बेनेटो मुसोलिनीचा उदय

बेनिटो मुसोलिनीचा जन्म सन १८८३ मध्ये रेमिग्नर प्रांतात झाला. त्याचा पिता लोहार होता आणि आई शाळेत शिक्षिका होती. मुसोलिनीने प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून जीवनाचा प्रारंभ केला. डावे लोक घटनात्मक मार्गावर विश्वास न ठेवता क्रांतीचा मार्ग पसंत करीत त्यांच्याशी मुसोलिनीचा संपर्क प्रस्थापित झाला. इटलीने आवश्यक लष्करी सेवा सुरू केल्याने मुसोलिनी स्वित्झर्लंडमध्ये निघून गेला. परंतु त्याच्या क्रांतीकारी विचारसरणीमुळे स्वित्झर्लंडच्या सरकारने त्याला देश सोडावयास लावले. त्यानंतर त्याने इटलीमध्ये परतून पत्रकारितेस सुरूवात केली व सन १९१२ मध्ये 'अवान्ती' ह्या समाजवादी वृत्तपत्राच्या संपादन कार्यास प्रारंभ केला.

सन १९१५ मध्ये इटलीने युध्दात भाग घेतला तेव्हा देशासाठी लढण्याकरिता मुसोलिनी एक सामान्य सैनिक म्हणून लष्करात भरती झाला. ह्याच सुमारास सन १९१७ मध्ये रशियात साम्यवादी क्रांती झाली. इटलीत सुध्दा साम्यवादी क्रांती करण्याचा प्रयत्न झाला पण साम्यवाद इटलीला पोषक नाही आणि राष्ट्रीय हिताच्या विरोधात आहे अशी भूमिका मुसोलिनीने घेतली व वृत्तपत्राद्वारे साम्यवादाचा विरोध चालू केला. पॅरिसच्या शांतता परिषदेत इटलीवर अन्याय झाला होता. म्हणून त्याने फॅसिस्ट पक्षाचे संघटन करून 'काळे डगलेवाले' नावाचे सशस्त्र सैनिकांचे एक दल तयार केले. ह्या दलाचा मुसोलिनी स्वत:प्रमुख होता. आपल्या दमदार भाषणाद्वारा मुसोलिनीने लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घ्यायला सुरूवात केली. देशाचे साम्यवादापासून रक्षण करणे व देशाचे पुनर्निमाण करून त्याला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानाचे स्थान प्राप्त करून देणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य फॅसिस्टच करू शकतील असा मुसोलिनीचा दावा होता. त्याच्या ह्या

विचारसरणीमुळे फॅसिस्टवादाचा अल्पावधीतच संपूर्ण देशभरात प्रसार झाला. प्रत्येक शहरात व राज्यात ह्या पक्षाच्या शाखा निघाल्या. संपूर्ण जनजीवनावर त्यामुळे मुलोलिनीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. फॅसिस्ट पक्षाने कायदा हातात घेऊन इटलीतून साम्यवादाचे उच्चाटन केले. इटालियन सरकारने यावेळी मुसोलिनीला आवर घातली नाही. त्याचाच परिणाम म्हणजे शेवटी मुसोलिनीने सरकारचाच घास घेतला.

ऑक्टोबर १९२२ मध्ये फॅसिस्ट पक्षाचे संमेलन नेपल्स येथे भरले. या संमेलनात इटलीची सत्ता आपल्या हाती सोपवावी अन्यथा रोमवर आक्रमण करण्याची धमकी राजाला दिली. त्यानुसार फॅसिस्ट पक्षाचे सैन्यदल रोमच्या दिशेने चालू लागले. मुसोलिनीने सैन्यदल रोममध्ये येऊन पोहोचल्याने यादवी युध्दाची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे मुसोलिनीला प्रधानमंत्रीपद देण्याशिवाय राजा व्हिक्टर ईमॅन्युअल तिसरा ह्याच्यासमोर दुसरा पर्याय राहिला नाही. राजाने मुसोलिनीला मंत्रीमंडळ बनवण्यास पाचारण केले. अशा रितीने ३० ऑक्टोबर १९२२ रोजी मुसोलिनी इटलीचा प्रधानमंत्री बनला.

## ❍ फॅसिझमची प्रगती

पहिल्या महायुध्दानंतर निर्माण झालेल्या वेगवेगळ्या संकटांचा सामना करण्यासाठी सरकार काहीच करत नाही हे पाहून इटालियन देशभक्तांनी वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून परिस्थितीला तोंड देण्याचे ठरविले. ह्या वेगवेगळ्या संघटना फॅसिओ म्हणून ओळखल्या जात. मुसोलिनीने ह्याच संघटनांना एकत्र करून शक्तिशाली रूप द्यावयास सुरूवात केली. ह्यातूनच फॅसिस्ट पक्ष उदयास आला. प्राचीन वैभवशाली रोमन साम्राज्याच्या पुनर्निमितीचे ध्येय ह्या पक्षाने समोर ठेवले होते. त्यासाठी आत्यंतिक राष्ट्रवादाचा अवलंब करण्यात आला. सन १९१९ मध्ये इटलीतील मिलान शहरी मुसोलिनीने कायदेशीरपणे पक्ष स्थापनेची घोषणा केली व ह्या पक्षाचा कार्यक्रम जाहीर केला. फॅसिस्ट पक्षाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे :-

१) देशासासाठी नवे संविधान तयार करणे.

२) शस्त्रस्त्रांच्या कारखान्यांचे राष्ट्रीयकरण करणे.

३) कामाचा अवधी दिवसातून जास्तीत जास्त आठ तास करणे.

सत्ता हाती येताच मुलोलिनीने विरोधकांना मार्गातून हटवणे सुरू केले. अनेक नवीन कायदे लागू करण्यात आले. हरताळावर बंदी घालण्यात आली. वृत्तपत्रांवर कडक निर्बंध लादण्यात आले. कित्येकांनी आपला जीव वाचवण्यासाठी देश सोडून दिला. संपूर्ण फॅसिस्ट पक्षसंघटनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती तयार करण्यात आली होती. तिचा अध्यक्ष स्वत: मुसोलिनी होता. सन १९२८ मध्ये एक निवडणूक कायदा तयार करण्यात आला. त्यानुसार लोकसभेच्या सर्व सदस्यांची यादी फॅसिस्ट पक्ष तयार करील असे ठरले. अशा प्रकारे इटलीतील लोकशाही प्रणाली संपुष्टात आली.

## ❍ मुसोलिनीचे अंतर्गत धोरण :-

### १) साम्यवादाचे उच्चाटन :-

रशियाच्या बोल्शेव्हिक क्रांतीनंतर युरोपातील सर्वच देशातील साम्यवादी गट आपापल्या देशात साम्यवादी सरकार सत्तेत आणण्याच्या प्रयत्नाला लागले. इटलीतील स्थितीसुद्धा साम्यवादाला पोषकच होती. परंतु इटलीतील कट्टरराष्ट्रवाद्यांना साम्यवाद अजिबात पसंत नव्हता. राष्ट्रवादी तरुण हळूहळू मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षात दाखल झाले. स्वत: मुसोलिनी साम्यवादाचा विरोधक होता. म्हणूनच सत्ता हाती आल्याबरोबर मुसोलिनीने इटलीतून साम्यवादाचे उच्चाटन करण्याचे कार्य हाती घेतले. त्याने साम्यवादी पक्ष व त्याचे लिखाण बेकायदेशीर ठरवून अनेक साम्यवादी पुढाऱ्यांचा खून करविला. अनेकांना हद्दपार केले तर साम्यवादी विचारसरणीच्या हजारो लोकांना तुरुंगात डांबले.

### २) आर्थिक सुधारणा :-

प्राचीन रोमन साम्राज्याच्या पुनर्निमितीचे स्वप्न मुसोलिनीने जनतेसमोर ठेवले होते. त्याच्या परिपूर्तीसाठी काही आर्थिक सुधारणा करणे जरूरीचे होते. देशाचे उत्पादन वाढावे आणि औद्योगिक क्षेत्रातील अशांतता नष्ट व्हावी म्हणून हरताळावर बंदी घालण्यात आली तर कारखान्यांची टाळेबंदी अवैध घोषित करण्यात आली. मालक मजुरामधील तंटे सोडविण्यासाठी खास न्यायालये सुरू झाली. मजुरांनाही काही अधिकार देण्यात आले. रविवारची सुट्टी, त्यांच्यासाठी विमा, मनोरंजनाची व्यवस्था करण्यात आली. आर्थिक तूट भरून काढण्यासाठी मुसोलिनीने प्रशासन खर्चात बरीच कपात केली व नवीन कर लागू केले. देशाच्या आर्थिक विकासातील दळणवळणाचे महत्त्व लक्षात घेऊन रेल्वेत बरीच प्रगती करण्यात आली. औद्योगिकीकरणाला आवश्यक कोळसा लोखंड वगैरे इटलीत कमी मिळत होते. कोळशाला पर्याय म्हणून जलविद्युत केंद्रे उभारण्यात आली. देशात मोठमोठे उद्योग सुरू करण्यात आले. शेतीचीही बरीच प्रगती करण्यात आली. जंगले कापून दलदल सुकवून शेतीयोग्य जागा निर्माण केली व अन्नधान्याचे उत्पादन जास्त वाढवण्याचा प्रयत्न सुरू केला. मुसोलिनीच्या ह्या कार्यामुळे इटलीची आर्थिक स्थिती मजबूत बनली. बंदरांची निर्मिती, नद्यांवर बांध, निवास व्यवस्था, रस्ते व शाळा बांधणे ह्या कार्यात हजारो मजूर लागल्याने बेकारीचे प्रमाण कमी झाले.

### ३) इटलीचे लष्करीकरण :-

इटली म्हणावा तितका शक्तीशाली नव्हता म्हणूनच पॅरिसच्या शांतता परिषदेत त्याला अपमान स्वीकारावा लागला. प्राचीन काळात ज्युलियस सीझरच्या ताब्यात असलेले किंवा त्याहीपेक्षा जास्त सम्राट ऑगस्टसच्या ताब्यात असलेले रोमन साम्राज्य म्हणजे इटालियनांसाठी एक अभिमानाची गोष्ट होती. ह्या रोमन साम्राज्याच्या पुनर्निर्मितीचे स्वप्न मुसोलिनीने देशासमोर ठेवले. मुसोलिनी युद्धाचा पुरस्कर्ता होता.

म्हणूनच लष्करी शिक्षण सक्तीचे करण्यात आले. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचे कारखाने सुरू करण्यात आले. हवाई दल व नौदलाचा विकास करण्यात आला. अशाप्रकारे मुसोलिनीने इटलीला लष्करीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न बनवले.

### ४) शैक्षणिक सुधारणा :-

राष्ट्राची उन्नती होण्यासाठी मुसोलिनीने शिक्षणाचा प्रचंड प्रसार केला. नवीन अभ्यासक्रम व नवीन पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली. त्यामागील उद्देश हा की विद्यार्थ्याला फॅसिस्टवादाचे शिक्षण मिळावे. शाळांमधून अतीव राष्ट्रवादाचे व फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचे बाळकडू पाजण्यात येई. शिक्षण संस्थामधून बाहेर पडणारी नवी पिढी अतीव राष्ट्रवादी फॅसिस्ट व मुसोलिनीची समर्थक राहील याची पूर्ण काळजी घेतली जाई. एक राष्ट्र, एक पक्ष, एक नेता हे तत्त्वज्ञान त्यांच्या अंगी पुरेपूर बाणवण्यात येईल.

### ५) मुसोलिनी व पोप :-

रोममधील व्हॅटिकन भाग म्हणजे पोपचे स्वतंत्र सार्वभौम राज्य होते. जगातील कोट्यावधी रोमन कॅथालिकांचा तो धर्मगुरू होता. बऱ्याच वर्षापासून इटलीतील राजसत्ता आणि पोपची धार्मिक सत्ता ह्यांचे संबंध हे वरवरचे होते. म्हणूनच मुसोलिनीने पोप पायस अकरावा ह्याच्याशी चर्चा सुरू केली. शेवटी मुसोलिनी व पोप ह्यांच्यात सन १९२९ साली एक करार झाला. तो 'लॅटरेन करार' म्हणून ओळखला जातो. त्यानुसार 'व्हॅटिकन' भाग म्हणजे पोपचे स्वतंत्र सार्वभौम राज्य होय ह्यास इटालियन सरकारने मान्यता दिली. लॅटरेन करारामुळे इटलीतील सरकार धर्मसत्तेतील संघर्ष समाप्त झाला. मात्र तो कायमचा समाप्त झाला नाही. शिक्षण घेताना विद्यार्थ्याला मुसोलिनीशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत होती, त्याला पोपने विरोध दर्शविल्याने काही प्रमाणात मतभेद निर्माण झाले.

## ❍ मुसोलिनीचे परराष्ट्र धोरण

राष्ट्र लष्करीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न नसल्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याच्या वाट्याला मानभंग येतो याची जाणीव इटलीला झाली होती. म्हणूनच मुसोलिनीने आपल्या परराष्ट्र धोरणाची तीन उद्दिष्ट्ये ठरविली.

१) राष्ट्र लष्करीदृष्ट्या सामर्थ्यसंपन्न बनवून त्याला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात मानाचे स्थान मिळवून देणे.

२) वैभवशाली रोमन साम्राज्याच्या पुनर्निर्माणाचे कार्य हाती घेणे.

३) दोस्त राष्ट्रांनी दिलेल्या धोक्याबद्दल त्यांचा समाचार घेणे.

मुसोलिनीच्या कारकिर्दीत परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत पुढील घटनाक्रम महत्वाचा ठरतो.

## १) डॉडेकनीस विजित :-

आपल्याही देशाचा साम्राज्यविस्तार व्हावा अशी बऱ्याच वर्षांची इटलीची इच्छा होती. मुसोलिनीच्या हाती सत्ता आल्यावर त्याने भूमध्य क्षेत्रावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचे ठरविले. त्यादृष्टीने त्याने भूमध्य सागरातील डॉडेकनीझ बेटांवर हल्ला चढवून त्यावर इटलीचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्याची नाकेबंदी करून तेथे नाविक तळ उभारण्यात आला. सिसिली व ट्रिपोलीतही मुसोलिनीने नाविक तळ व विमानतळ उभारले. यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात स्वत:चा दरारा निर्माण करण्याच्या प्रयत्नात तो बऱ्याच अंशी यशस्वी ठरला.

## २) मैत्रीचे धोरण :-

इटलीला नाविक तळ तयार करण्यासाठी व लष्करी जहाजे बनविण्यासाठी बराचसा आवश्यक माल बाहेरून मागवावा लागत होता. युध्दकाळात इटलीची नाकेबंदी झाल्यास इटलीला पुढे युध्द चालवणे कठिण जाणार होते म्हणून ही गोष्ट इटलीच्या दृष्टीने धोक्याची होती. ह्यावर उपाय म्हणून मुसोलिनीने मित्र मिळविण्यास सुरूवात केली. इटलीचा प्रादेशिक विस्तार व्हावा या मुसोलिनीच्या मताशी ऑस्ट्रिया, हंगेरी, वल्गेरिया सारखी लहान राष्ट्रे सहमत होती. रशियाचेही असेच मत होते. म्हणूनच मुसोलिनीने रशियातील साम्यवादी सरकारला मान्यदा देऊन त्याच्याशी व्यापारी तह केला. इटली व फ्रान्समध्ये चांगले संबंध नव्हते. तरीही त्यांच्यातील संबंधात खूप तणाव निर्माण झाला नाही. हिटलरबद्दल मुसोलिनीलाही शंका होती, म्हणूनच मुसोलिनीने इंग्लंड, फ्रान्सबरोबर संबंध सुधारण्याचे ठरविले. हिटलरची आक्रमकता पाहून फ्रान्सने इटलीला काही प्रदेश देऊन त्याच्याशी समझोता केला.

## ३) ॲबिसिनियावर आक्रमण :-

वाढत्या लोकसंख्येसाठी तसेच कच्च्या मालासाठी व पक्का माल खपवण्यासाठी नवीन प्रदेश इटलीला उपयोगी ठरणार होता. ह्याशिवाय लष्करी डावपेचाच्या दृष्टीने ॲबिसिनीया इटलीकरिता अत्यंत महत्त्वाचा होता. ॲबिसिनियातील परिस्थिती जाणून घेण्यासाठी मुसोलिनीने काही गुप्तहेर तेथे पाठवले होते. गुप्तहेरांनी ॲबिसिनियाची राजकीय स्थिती चांगली नाही असा अहवाल दिल्यानंतर मुसोलिनीने आक्रमणाची तयारी केली. डिसेंबर १९३४ मध्ये ॲबिसिनिया व इटलीमध्ये थोडीशी चकमक झाली. ऑक्टोबर १९३५ मध्ये मुसोलिनीने ॲबिसिनियावर हल्ला चढविला. इटालियन लष्करासमोर ॲबिसियन लष्कर फार काळ टिकाव धरू शकले नाही अशा रितीने ॲबिसिनियावर इटलीचा अधिकार प्रस्थापित झाला.

## ४) जनरल फ्रँकोला मदत :-

पहिल्या महायुध्दानंतर स्पेनमध्ये बेकारी वाढून असंतोष वाढला होता. राजाने जनरल रिव्हेरा याच्या मदतीने स्पेनमधील साम्यवाद्यांचे दमन करण्याचा प्रयत्न केला. पण तरीही स्पेनमधील वातावरण अधिक

बिघडून राजाचा प्रधानमंत्री सामोरा याने स्पेन प्रजासत्ताक जाहिर केले. यावेळी राजा अल्फान्झो फ्रान्समध्ये निघून गेला. परंतु प्रजासत्ताकात स्पेनमध्ये साम्यवाद्यांचे बळ वाढत गेले. साम्यवादाविरोधात स्पेनमध्ये राष्ट्रवादी व अनेक सैन्याधिकारी होते. त्यांचा नेता जनरल फ्रँको होता. स्वत: फ्रँको हुकूमशाही प्रवृत्तीचा होता. मुसोलिनी व हिटलरने जनरल फ्रँकोला आपला पाठिंबा व्यक्त केला. जर्मनी व इटलीच्या मदतीने जनरल फ्रँकोने प्रजासत्ताक नष्ट केले व तो स्पेनचा हुकूमशाह बनला.

## ब) जर्मनीचा हुकूमशाह : हिटलर

### ❍ प्रस्तावना :-

पहिल्या महायुध्दात जर्मनीला सुरूवातीला पश्चिम व पूर्व अशा दोन्ही आघाड्यांवर यश मिळत गेले. दोस्त राष्ट्रांच्याकडे अफाट साधनसामग्री असूनसुध्दा सुरूवातीला जर्मनीने युध्द आपल्या बाजूला खेचून आणले होते. मात्र अमेरिकेच्या प्रवेशाने युध्दाचे स्वरूप बदलले आणि जर्मनीचा पराभव निश्चित झाला. यामुळे जर्मनीत सम्राट कैसर विलियम द्वितीय याच्याविरोधी वातावरण बनू लागले. ठिकठिकाणी उठाव सुरू झाले, तेव्हा राजपदाचा त्याग करून सम्राट हॉलंडमध्ये निघून गेला व जर्मनीतील होएन झोलर्न घराण्याची राजवट समाप्त झाली.

### ❍ समाजवादी पक्ष सत्तेवर

समाजवादी पक्षाने जर्मनीत अस्थायी सरकार स्थापन केले व त्या पक्षाचा नेता एबर्ट प्रधानमंत्री बनला. या अस्थायी सरकारनेच युध्दबंदी करारावर स्वाक्षरी करून युद्ध थांबवले. पण या पक्षात एकमत नव्हते.

### ❍ वायमर प्रजासत्ताक

जर्मनीमध्ये सन १९१९ मध्ये नवी घटना तयार करण्यासाठी निवडणूका झाल्या. पण कोणत्याही पक्षाला बहुमत मिळू शकले नाही. वायमर येथे घटना समितीचे अधिवेशन भरले होते म्हणून जर्मनीच्या नव प्रजासत्ताकाला वायमर प्रजासत्ताक असे नांव पडले. जुलै १९१९ मध्ये नवी घटना तयार झाली व ती ऑगस्ट १९१९ पासून जर्मनीमध्ये लागू करण्यात आली. त्यानुसार जर्मनीने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केला.

### ❍ जर्मनीची आर्थिक कमकुवतता

जर्मनीची आर्थिक स्थिती अतिशय चिंताजनक होती. जर्मनीने कागदी चलनाचे प्रमाण वाढवले, परंतु त्यामुळे जर्मन चलनाची मार्कची किंमत एकदम घसरली. युध्द नुकसान भरपाई कशी करावी हा एक मोठा प्रश्न जर्मनीसमोर उभा राहिला. त्यासाठी हा प्रश्न अर्थतज्ञांकडे सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला. जर्मनीला

उद्योगधंद्यासाठी बाहेरील देशाकडून कर्ज मिळू लागले व त्यामुळे जर्मनीची आर्थिक स्थिती सुधारायला मदत झाली.

पण याचवेळी संपूर्ण जगात सन १९२९ साली आर्थिक मंदीला सुरूवात झाली आणि जर्मनीची आर्थिक स्थिती घसरायला सुरूवात झाली. कारण त्याला कोणीही कर्ज द्यायला तयार नव्हते. बेरोजगारांच्या संख्येत लाखोंनी वाढ झाली. त्यामुळे तेथील प्रजासत्ताकाची लोकप्रियता कमी झाली आणि ह्याच पार्श्वभूमीवर हिटलरचा उदय झाला.

## ❍ हिटलर व नाझी पक्ष

ॲडॉल्फ हिटलरचा जन्म सन १८८९ मध्ये ऑस्ट्रियात झाला. गरीबीमुळे सुरूवातीला त्याला बांधकाम रंगकाम अशी कामे करावी लागली. नंतरच्या काळात वृत्तपत्रांच्या वाचनातून त्याचे विचार आकारास येऊ लागले. जर्मनांनी एक झाले पाहिजे व ऑस्ट्रीया जर्मनीत सामील होणे आवश्यक आहे असे हिटलरचे मत होते. म्हणूनच हिटलरने ऑस्ट्रीयन नागरिकत्वाचा त्याग केला आणि तो जर्मन नागरिक बनला. नंतरच्या काळात हिटलरच्या साथीदारांची संख्या वाढली. त्यामुळे ह्या गटाला नाव देणे, त्याचे व्यवस्थित संघटित करणे ह्या गोष्टी आवश्यक झाल्या. यातूनच सन १९२० मध्ये हिटलरने नाझी पक्षाची स्थापना केली.

## ❍ नाझी पक्षाचा कार्यक्रम :–

१. व्हर्सायच्या तहाचा निषेध करून तहाचे पालन न करणे.

२. जर्मनीची लष्करी ताकत वाढवून जर्मनीच्या अपमानाचा बदला घेणे.

३. युरोपातील सर्व जर्मनांचे एकत्रीकरण करून विशाल जर्मनी निर्माण करणे.

४. सर्व जर्मन वसाहती परत जिंकून घेणे.

५. प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार.

६. जर्मनीतून साम्यवादाचे उच्चाटन.

७. जर्मनीतून ज्यूंची हकालपट्टी.

नाझी पक्षाचे चिन्ह स्वस्तिक होते. हिटलरने जर्मनीतील प्रजासत्ताक उलथविण्याचा प्रयत्न केला. पण त्याला त्यात यश मिळाले नाही व या प्रयत्नासाठी हिटलरला ५ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली. हिटलरने आपले विचार 'माझा संघर्ष' (Main Kampf) ह्या आत्मचरित्रात लिहून ठेवले. आत्मचरित्रात हिटलरने विशाल जर्मनीच्या निर्मितीसाठी स्वयंनिर्णयाचे तत्व उचलून धरले. सन १९२९ च्या जागतिक मंदीचा फायदा उचलून हिटलरने जनतेला जर्मन प्रजासत्ताकाविरुध्द चिथवले. परिणामी जर्मनीतील सर्वच स्तरावरील लोक विविध कारणांनी नाझी पक्षात येऊ लागले. सन १९३० च्या निवडणुकीत हिटलर पराभूत झाला होता. सन

१९३३ मध्ये हिटलर जर्मनीचा चॅन्सेलर बनला. सन १९३४ मध्ये राष्ट्राध्यक्ष हिंडेनबुर्ग यांचा मृत्यू झाला. तेव्हा राष्ट्राध्यक्ष व चॅन्सेलर हे एकच पद असावे यासाठी हिटलरने जनतेचे मत अजमावले. जनतेने हिटलरची मागणी मान्य केली. परिणामी हिटलर जर्मनीचा हुकूमशहा बनला. हिटलरने नाझी वगळता इतर सर्व राजकीय पक्षावर बंदी आणली. जर्मनीतून संसदीय प्रणाली जवळजवळ समाप्त करण्यात आली. कायदेविभाग आणि कार्यकारी विभाग पूर्णतः हिटलरच्या हाती केंद्रीत झाले.

## ❍ हिटलरचे अंतर्गत धोरण :-

### १. ज्यू द्वेष आणि साम्यवाद विरोध :-

पहिल्या महायुध्दामध्ये ज्यूंनी जर्मनीची लष्करी गुपिते मित्रराष्ट्रांना कळवली म्हणून जर्मनीचा युद्धात पराभव झाला अशी सर्वसाधारण जर्मन जनतेची समजूत होती. त्याचा फायदा हिटलरने घेतला. ज्यूंच्या ताब्यात मोठमोठे उद्योग, कारखाने असल्याने जनता त्यांना शोषक मानीत असे म्हणूनच हजारोंच्या संख्येने ज्यूंना पकडले. जे सापडले त्यांना अक्षरशः यमयातना सहन कराव्या लागल्या.

जर्मनीत साम्यवादाला पोषक असे वातावरण होते. पण जनता भावी साम्यवादी क्रांतीच्या आशंकेने भयभीत झाली होती. म्हणून हिटलर साम्यवाद विरोधी भाषा बोलू लागला. त्यामुळे जर्मन उद्योगपतीकडून, भांडवलदारांकडून, श्रीमंत वर्गाकडून हिटलरला समर्थन आणि पैसा या दोन्ही गोष्टी मिळाल्या. जर्मन राष्ट्रवादाच्या भूमिकेतून साम्यवादी विचारसरणी अत्यंत धोक्याची व घातक होती. म्हणून साम्यवादी पक्षांच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना पकडण्यात आले.

### २. नागरी स्वातंत्र्याची गळचेपी :-

हिटलरने जर्मनीच्या नाझीकरणास प्रांरभ केला, त्याला जनतेने विरोध करू नये म्हणून त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालणे आवश्यक ठरले. त्यानुसार वर्तमानपत्र, आकाशवाणी, चित्रपट ह्यासारख्या प्रसार माध्यमांवर निर्बंध घालण्यात आले. शाळा महाविद्यालयांचे स्वातंत्र्य काढून घेण्यात आले. मजूरांच्या संघटना रद्द करण्यात आल्या. मजूरांची संपत्ती जप्त करण्यात आली. अधिक धोक्याच्या व्यक्तींना ताबडतोब ठार केले जाई. नागरी स्वातंत्र्याच्या गळचेपीची बाजू हिटलरचा प्रख्यात प्रचारमंत्री गोबेल्स सांभाळत होता.

### ३. कॅथालिकांवर नियंत्रण :-

नाझींचे शैक्षणिक विचार आणि कॅथॉलिकांचे चर्चप्रधान शिक्षणविषयक विचार एकमेकांपासून मिळत होते. म्हणजे दोघांचे विचार एकमेकांशी जुळत नव्हते. साम्यवादाप्रमाणे रोमन कॅथॉलिकांची निष्ठाही बाहेर होती. म्हणूनच जर्मनीत रोमन कॅथॉलिक व प्रोटेस्टंट पंथीयांचाही छळ करण्यात आला. मात्र यातून विशेष काही निष्पन्न झाले नाही.

## ४. प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार :-

प्रखर राष्ट्रभक्ती मुळातूनच निर्माण होण्यासाठी शिक्षणावर सरकारचे कडक नियंत्रण प्रस्थापित करून पाठयपुस्तकांची नवीन रचना करण्यात आली. त्यातून विद्यार्थ्यांना जर्मन राष्ट्र, नाझी तत्त्वज्ञान व हिटलर यांच्यासंबंधी माहिती दिली जाऊ लागली. व्हर्सायचा तह म्हणजे आपला राष्ट्रीय अपमान होय. त्यासाठी आपली लष्करी शक्ती वाढली पाहिजे तरच व्हर्सायचा बदला घेता येईल असे वारंवार बोलून हिटलर जर्मनांची राष्ट्रभावना चेतवित असे.

## ५. जर्मन वंशियांचे श्रेष्ठत्व :-

हिटलरच्या मते, जर्मन लोक शुद्ध 'आर्यवंशीय' आहेत. त्याच्या मते आर्य जगातील मूळ वंश असल्याने जर्मन शुद्धरक्ताचे आहेत आणि म्हणूनच आर्य जगात सर्वश्रेष्ठ आहेत असे हिटलरचे मत होते. जर्मन वंश शुद्ध रक्ताचा व म्हणून श्रेष्ठ असल्याने जगावर राज्य करण्यासाठीच तो आहे असा विचार मांडला जाऊ लागला. परिणामी जर्मनेतरांना नागरिकत्वाच्या अधिकारांपासून दूर ठेवले गेले.

## ६. सत्तेचे केंद्रीकरण :-

सर्व सत्ता आपल्या हाती घेणे हे हिटलरच्या अंतर्गत धोरणाचे एक उद्दिष्ट होते. त्यासाठी त्याने प्रखर राष्ट्रवाद, एक वंश, एक भाषा, एक संस्कृती, एक नेता असा तत्त्वज्ञानाचा वापर केला. नाझी पक्षातील काही लोकांनी आर्थिक सुधारणावर भर देण्याची मागणी केली. त्यांचा नेता रोहम होता. ताबडतोब त्याला अटक करून ठार करण्यात आले. संशय असलेल्या शेकडो लोकांना ठार मारण्यात आले.

## ७. औद्योगिक विकास :-

जर्मनीत भरपूर लोक बेकार होते. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी काम देण्यात आले. काहींना लष्करात घेण्यात आले. ज्यू, साम्यवादी व इतर नाझी विरोधकांना देशाबाहेर काढल्याने रिकाम्या झालेल्या जागांवर पुष्कळांची नियुक्ती करण्यात आली. युद्धोपयोगी जहाजे बांधणे, विमाने तयार करणे, किल्ले तटबंदी बांधणे अशी कामे जर्मनीत सुरू झाल्याने हजारो बेकार उदरनिर्वाहाच्या मार्गाला लागले. औद्योगिक क्षेत्रात बऱ्याचवेळा होणाऱ्या संपामुळेही उत्पादनास खीळ बसते. म्हणून हिटलरने संप बेकायदेशीर ठरवून मालक मजूर संबंध चांगले रहावेत ह्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवले.

## ❍ हिटलरचे परराष्ट्र धोरण :-

जर्मनीची सत्ता हिटलरच्या हाती येण्यापूर्वी जर्मनीला राष्ट्रसंघाने सदस्यत्व देण्यात आलेले होते. तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजकीय तणावाचे वातावरण बरेच शांत होऊन जर्मनीवरील युध्द नुकसान भरपाईचा

भारसुध्दा कमी करण्यात आलेला होता. पण व्हर्सायचा तह नामंजूर करून जर्मनीला पुन्हा बलशाली बनवणे हे हिटलरचे ध्येय होते. सत्तेवर येताच हिटलरने नि:शस्त्रीकरण परिषदेतून तसेच राष्ट्रसंघातून जर्मनीला काढून घेतले. आपल्या भाषणातून हिटलर युरोपची शांतता टिकली पाहिजे असे सांगत असे. ऑस्ट्रीया जर्मनीत समाविष्ट व्हावा ही हिटलरची तीव्र इच्छा होती. त्यासाठी हिटलरने ऑस्ट्रीयातील नाझींना उठावाची चिथावणी दिली. ऑस्ट्रीयामध्ये उठाव झाला पण तेथील नाझींना सफलता मिळाली नाही.

राष्ट्रसंघाच्या निर्णयानुसार कोळसा क्षेत्र असलेल्या सार ह्या जर्मन प्रदेशात सार्वमत घेतले गेले आणि तेथील जनतेने जर्मनीत सामील हाण्याबाबत कौल दिला. त्यानुसार सार हा प्रदेश जर्मनीत सामील करण्यात आला. त्यामुळे उत्साहीत होऊन हिटलरने जर्मनीबाहेरील जर्मन जनतेत नाझीवादाचा प्रसार करण्यास जोराने सुरूवात केली.

## १. ऱ्हाईन प्रदेशाचे लष्करीकरण :-

जर्मनीने नौदल व वायुदल वाढविण्यास सुरूवात करताच युरोपमध्ये खळबळ माजली. ह्याचवेळी सन १९२५ मध्ये इटलीने ॲबिसिनियावर आक्रमण केले. यावेळी हिटलरने युद्धसामग्री पुरवून इटलीला पाठिंबा व्यक्त केला. ॲबिसिनिया प्रकरणात राष्ट्रसंघ काही करू शकला नाही. व्हर्सायच्या तहाने ऱ्हाईन प्रदेश निमलष्करी घोषित केला होता. त्यात सैन्य घुसवून हिटलरने उघडउघड व्हर्साय तहाचा भंग केला. राष्ट्रसंघाच्या समितीने ह्या घटनेचा निषेध केला. जर्मनीविरुध्द लष्करी कारवाई करावी असेही काही राष्ट्रांनी बोलून दाखविले पण प्रत्यक्षात काहीच घडले नाही. ॲबिसिनिया व ऱ्हाईन प्रकरणी राष्ट्रसंघाची दुर्बलता सिध्द झाली. साहजिकच युरोपच्या शांततेस धोका निर्माण झाला.

## २. रोम-बर्लिन-टोकियो अक्ष :-

फ्रान्स, रशिया तसेच झेकोस्लोव्हाकिया सारखी राष्ट्रे परस्पर करार करीत होती. हिटलरला हे आपल्या विरुध्द संघटन वाटले म्हणून त्यानेही मित्र मिळवण्यास सुरूवात केली. भूमध्य सागरावर वर्चस्व असावे असे इटलीचे स्वप्न होते. पण त्यामार्गात प्रमुख अडथळा फ्रान्सचा होता. फ्रान्सवर दबाव टाकू शकणारा एखादा मित्र इटलीला पाहिजे होता. ॲबिसिनियावरील आक्रमणावेळी जर्मनीने इटलीला मदत केली होती. तसेच ही दोन्ही राष्ट्रे इंग्लंड, फ्रान्स यांच्या विरोधात होती. साहजिकच दोघांच्यात मैत्री तह झाला. जर्मनी व जपान या दोघांचाही रशिया हा सामान्य प्रतिस्पर्धी होता. चीनच्या दिशेने जपानची घौडदौड सुरू होती आणि त्याला रशियाचा मुख्य अडथळा वाटत होता. जर्मनी रशियावर दबाव आणू शकेल असे जपानला वाटत होते. त्यातूनच जर्मनी व जपानमध्ये रशियाविरोधी करार अस्तित्वात आला. त्यात सन १९३७ मध्ये इटली सामील झाल्याने रोम-बर्लिन-टोकियो अक्ष तयार होऊन जगात जर्मनी इटली व जपान ह्या राष्ट्रांचा एक शक्तिशाली गट तयार झाला.

## ३. ऑस्ट्रीया जिंकला :-

ऑस्ट्रीयामध्ये नाझींची ताकद वाढली होती. संरक्षणमंत्री म्हणून एका नाझीची नियुक्ती झाल्याने ऑस्ट्रीयावर हिटलरचे पाश आवळत गेले. पूर्वी इटली ऑस्ट्रीयाच्या पाठीशी होता. पण जर्मनी व इटली मित्रराष्ट्रे झाल्यामुळे अनुकूल परिस्थिती पाहून ऑस्ट्रीया हिटलरने जिंकून घेतला.

## ४. झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत :-

झेकोस्लोव्हाकिया या देशात जर्मनांची संख्या अधिक होती. जर्मन बहुसंख्य असलेला सुडेटन प्रदेश आपणास देऊन टाकावा. अशी तेथील नाझींची मागणी होती. त्यांना अर्थातच जर्मनीचे प्रोत्साहन होते. झेक सरकारवर जर्मनांवरील अत्याचाराचा आरोप लावून हिटलरने तेथे विषारी प्रचारकार्य सुरू केले. जर सुडेटनचा प्रदेश नाझींना दिला नाही तर हिटलर युध्द सुरू करेल अशी भिती इंग्लंड व फ्रान्सला वाटत होती.

सन १९३८ साली इंग्लंड, जर्मनी, इटली व फ्रान्स यांच्यात 'म्युनिक करार' झाला. त्यानुसार सुडेटन प्रदेश जर्मनीला मिळाला. ह्यावेळी हिटलरने आपणास ह्यापुढे युरोपात कोणताही प्रदेश जिंकण्याची इच्छा नाही असे जाहिर केले. पण म्युनिक करारानंतर हिटलरने झेकोस्लोव्हाकियात अंतर्गत संघर्षाचे बीज पेरले. त्यामुळे त्यानंतर तेथे सुरू झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन हिटलरने झेकोस्लोव्हाकियावर आक्रमण केले व तो देश जिंकून जर्मनीत विलीन करण्यात आला.

## ५. जर्मनी-रशिया अनाक्रमण करार :-

इंग्लंड व फ्रान्स रशियाबरोबर तह करण्याचे प्रयत्न करीत होते. तेव्हा रशियाचा नेता स्टॅलिन हिटलरबरोबर तह करण्याचा प्रयत्न करीत होता. रशिया व जर्मनीत तह झाला तर पोलंडमध्ये आपल्याला हिस्सा मिळेल असे स्टॅलिनला वाटत होते. सन १९३९ साली जर्मनी-रशिया अनाक्रमणाचा करार झाला. ह्या तहानुसार परस्पर आक्रमण न करण्याचे मान्य करण्यात आले. तसेच रशियाने जर्मनीला अन्नधान्य, पेट्रोल व युध्दोपयोगी सामग्री देण्याचे आश्वासन दिले.

## ६. पोलंडवर आक्रमण :-

पोलंडवर हिटलरने आरोप केला की, पोलंड जर्मन अल्पसंख्यांकावर अत्याचार करीत आहे. तसेच हिटलरने पोलंडकडे डॅन्झिंग बंदराची मागणी केली. पोलंडने ही मागणी फेटाळून लावली. हिटलरने डॅन्झिंगमधील जर्मनांना आंदोलन करण्यास चिथावणी दिली. त्यातूनच मग इंग्लंड, फ्रांन्स व पोलंडमध्ये तह होऊन त्यात परस्परांच्या स्वातंत्र्याची हमी घेण्यात आली. १ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने कोणत्याही प्रकारची युद्धघोषणा न करता पोलंडवर आक्रमण केले. इंग्लंड व फ्रान्स यांनी पोलंडसोबत तह केला असल्याने या दोघांनी ३ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीविरुध्द युद्धाची घोषणा केली आणि द्वितीय महायुद्ध सुरू झाले.

### ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

**अ) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. इटलीने कोणत्या साली पहिल्या महायुध्दात भाग घेतला?

२. बेनिटो मुसोलिनीचा जन्म कोणत्या प्रांतात झाला?

३. मुसोलिनी इटलीचा प्रधानमंत्री कधी बनला?

४. जर्मनीच्या नवप्रजासत्ताकाला वायमर प्रजासत्ताक असे नाव का पडले?

५. हिटलरच्या आत्मचरित्राचे नाव काय?

६. हिटलर जर्मनीचा चॅन्सेलर केव्हा बनला?

**ब) योग्य पर्याय लिहा.**

१. मुसोलिनी ............. या समाजवादी वृत्तपत्राचे संपादन केले?

*(अ) अवान्ती* *(ब) दर्पण* *(क) दिग्दर्शन* *(ड) मराठा.*

२. ............. साली फॅसिस्ट पक्षाचे संमेलन नेपल्स येथे भरले?

*(अ) १९२१* *(ब) १९२२* *(क) १९२४* *(ड) १९२५.*

३. इटलीतील ............. शहरी मुसोलिनीने कायदेशीरपणे पक्ष स्थापनेची घोषणा केली?

*(अ) मिलान* *(ब) दर्पण* *(क) दिग्दर्शन* *(ड) मराठा.*

४. हिटलरचा जन्म ............. मध्ये झाला.

*(अ) १८८७* *(ब) १८८८* *(क) १८८९* *(ड) १८९०.*

५. हिटलरने नाझी पक्षाची स्थापना ............ साली केली?

*(अ) १९१७* *(ब) १९१८* *(क) १९१९* *(ड) १९२०.*

## ३.३ सारांश

पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांततेची स्थापना करण्यासाठी, आपापसातील प्रश्न सोडविण्यासाठी, युध्दाऐवजी सहकार्यावर भर देण्यासाठी राष्ट्रसंघाची निर्मिती केली.

राष्ट्रसंघाची निर्मिती व्हर्सायच्या तहात अंतर्भूत केल्यामुळे राष्ट्रसंघाने विजयी राष्ट्रांना मिळालेले फायदे जोपासण्याचे कार्य केले. म्हणून राष्ट्रसंघाची एक निष्पक्षपाती संख्या अशी प्रतिमा होऊ शकली नाही. अनेक राष्ट्रे यातून बाहेर पडल्यामुळे ही संघटना अपयशी ठरली.

जागतिक महामंदी ही जगाच्या इतिहासातील महत्वाच्या घटनेमुळे अर्थव्यवस्थेत दोष समोर आले. भांडवलशाहीचे महत्व वाढले. इंग्लंड, फ्रान्स, जपान अशा बड्या राष्ट्रांचा पाठिंबा अमेरिकेला मिळाल्यामुळे मंदीनंतर अमेरिका जागतिक सत्ता म्हणून उदयास आली.

पहिल्या महायुध्दानंतर जगासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या, त्या सोडविण्यात अनेक लोकशाही सरकार अपयशी ठरली. त्यामुळे युरोपमधील विविध राष्ट्रांमध्ये हुकूमशाहांचा उदय झाला. यापैकी इदालीत मुसोलिनी व जर्मनीचा हुकूमशहा-हिटलरच्या हातात सत्ता केंद्रित झाली. या देशात सत्ताधिश हुकूमशहा असल्यामुळे जनता सत्तेपासून दूरच राहिली.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ३.४.१ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** १. *१० जानेवारी १९२०.*

२. *वॉशिंग्टन.*

३. *टोकिओ.*

४. *१५.*

५. *स्वत:चे सैन्य नसल्यामुळे.*

**ब)** १. *(अ) आंतरराष्ट्रीय संघटन.*

२. *(ब) ४३.*

३. *(ब) १९२६.*

४. *(क) १०.*

५. *(ब) १९२२.*

### ३.४.२ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

**अ)** १. *हर्बर्ट हरबर.*

२. *२६ ऑक्टोबर १९२९.*

३. *२२ अब्ज डॉलर.*

४. *कामगार, शेतकरी, डॉक्टर, लेखक, चित्रकार, इंजिनियर, नाटककार.*

५. *१९३२.*

ब) १. *(ब) १९२८.*

२. *(अ) १ कोटी ६५ लाख डॉलर.*

३. *(अ) बँका.*

४. *(ब) ६० लक्ष.*

### ३.४.३ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

अ) १. *१९१५.*

२. *वेसिग्नर प्रांत.*

३. *३० ऑक्टोबर १९२२.*

४. *विमर तेथे घटना समितीचे अधिवेशन भरले होते.*

५. *माझा संघर्ष (Mein Kamf)*

६. *१९३०.*

ब) १. *(अ) अवान्ती.*

२. *(ब) १९२२.*

३. *(अ) मिलान.*

४. *(क) १८८९.*

५. *(ड) १९२०.*

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

### ३.५.१ टीपा लिहा.

१. राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये.

२. राष्ट्रसंघाची रचना.

३. राष्ट्रसंघाची अपयशाची कारणे.

४. आर्थिक महामंदीची सुरूवात.

५. आर्थिक महामंदीची कारणे.

६. आर्थिक महामंदीचे परिणाम.

७. मुसोलिनी.

८. फॅसिझम.

९. हिटलर.

१०. हिटलरचे परराष्ट्र धोरण.

### ३.५.२ खालील प्रश्नांची उत्तरे सविस्तर लिहा.

१. राष्ट्रसंघाच्या स्थापना व उद्दिष्टांबद्दल सविस्तर माहिती लिहा.

२. राष्ट्रसंघाच्या अपयशाची पार्श्वभूमी सांगा.

३. आर्थिक महामंदीच्या कारणांचा आढावा घ्या.

४. मुसोलिनीच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घ्या.

५. हिटलरच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घ्या.

## ३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. आधुनिक जग : डॉ. सुमन वैद्य.

२. आधुनिक युरोप : फडके, कुलकर्णी.

३. आधुनिक युरोप : गायकवाड, कदम, सुर्यवंशी.

४. आुधनिक युरोपचा इतिहास : कदम, सुतार.

५. समकालीन आधुनिक जग : य. ना. कदम.

६. विसाव्या शतकातील जगाचा इतिहास : य. ना. कदम.

७. आुधनिक जगाचा इतिहास : शिरसीकर व.मं.

८. आधुनिक जगाचा इतिहास : ओतूरकर व पोतनीस.

९. अमेरिकेचा इतिहास : गोरे ना. ग.

१०. अर्वाचीन युरोप : प्रा. सदाशिव आठवले.

११. World HISTORY : R. S. Chaurasia.

१२. History of Modern Europe : G. P. Gooach.

१३. Modern Europe upto 1945 : C. D. Hazew.

१४. Europe in the 19th and 21th Century : Grant and Teuperley.

१५. Modern Europe : Hazen C.Z.

१६. History of Modern Europe, Since 1989 : V. D. Mahajan.

❑ ❑ ❑

घटक–४

# दुसरे महायुध्द आणि युध्दोत्तर जग

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ दुसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी : कारणे, स्वरुप, परिणाम

४.२.१.१ दुसऱ्या महायुद्धाची कारणे

४.२.१.२ दुसऱ्या महायुद्धाचे स्वरुप

४.२.१.३ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

४.२.२ संयुक्त राष्ट्रसंघटना (युनो) आणि जागतिक शांततेची संकल्पना

४.२.२.१ प्रास्ताविक

४.२.२.२ संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना

४.२.२.३ संयुक्त राष्ट्रसंघटनेची उद्दिष्ट्ये

४.२.२.४ संयुक्त राष्ट्रसंघटनेची रचना/घटक संस्था

४.२.२.५ संयुक्त राष्ट्रसंघटनेचे कार्य/जागतिक शांततेसाठीचे योगदान

४.२.३ शीत युध्दाचा उदय

४.२.३.१ 'शीतयुध्द' म्हणजे काय?

४.२.३.२ शीतयुध्दाचा उगम

४.२.३.३ शीतयुध्दाची कारणे

४.२.४ चीनमधील साम्यवादी क्रांती व तिचे जागतिक राजकारणावरील परिणाम

४.२.४.१ चीनची राजकीय पार्श्वभूमी

४.२.४.२ डॉ. सन्-यत्-सेन यांचे योगदान

४.२.४.३ चँग-कै-शेकची राजवट

४.२.४.४ माओ-त्से-तुंग

४.२.४.५ चीनमधील साम्यवादी पक्षाची स्थापना

४.२.४.६ कॉमिंगटाँग पक्षाच्या राष्ट्रीय व साम्यवादी गटातील मतभेद व चँग-कै-शेकची भूमिका

४.२.४.७ चीनमधील साम्यवादी क्रांती

४.२.४.८ जपानचे चीनवरील आक्रमण

४.२.४.९ दुसरे महायुद्ध आणि चीनमधील साम्यवादी क्रांती

४.२.४.१० चीनमधील साम्यवादी क्रांतीचा जागतिक राजकारणावर झालेला परिणाम.

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणाला,

- ❍ दुसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी व कारणे सांगता येतील.
- ❍ दुसऱ्या महायुध्दाचे स्वरूप आणि परिणाम विशद करता येतील.
- ❍ युनोचा अर्थ व स्थापनेची कारणे स्पष्ट करता येतील.
- ❍ युनोच्या कार्याचे मूल्यमापन स्पष्ट करता येईल.
- ❍ युनोच्या उद्दिष्टानुमार जागतिक शांततेची संकल्पना समजून घेता येईल.
- ❍ शीतयुद्धाची पार्श्वभूमी व कारणे सांगता येतील.
- ❍ शीतयुद्धाचे स्वरूप व परिणाम यांची चर्चा करता येईल.
- ❍ चीनची राजकीय पार्श्वभूमी व साम्यवादी क्रांतीची कारणे व स्वरूप सांगता येईल.

❍ साम्यवादी क्रांतीचे जागतिक राजकारणावरील परिणाम सांगता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

१९१४-१९१८ या काळात सुरू असलेल्या १ल्या महायुद्धकाळात व त्यानंतर जागतिक शांतता भंग पावली. सर्वत्र असंतोषाचे वातावरण पसरले. त्यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी १ल्या महायुद्धानंतर १० जानेवारी १९२० रोजी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. मागील प्रकरणात आपण राष्ट्रसंघ, राष्ट्रसंघाचे यश, अपयश, १९२९ ची जागतिक महामंदी, मंदीची कारणे व परिणाम, इटली व जर्मनीतील हुकूमशहांचा उदय इ. मुद्यांचा अभ्यास केला.

या प्रकरणात आपण दुसरे महायुद्ध आणि युद्धोत्तर जग या विषयावर सांगोपांग चर्चा करणार आहोत. यामध्ये १९३९ ते १९४५ या कालावधीत झालेल्या दुसऱ्या महायुद्धाच्या कारणांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत. तसेच दुसऱ्या महायुद्धाचे स्वरूप व परिणाम यांची सविस्तर चर्चा करणार आहोत. दुसऱ्या महायुद्धानंतर २६ जून १९४५ रोजी झालेली संयुक्त राष्ट्रसंघाची (युनो) स्थापना, युनोचे स्वरूप व कार्य, जागतिक शांततेची संकल्पना व स्वरूप इ.चे विस्तृत विवेचन करणार आहोत. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक स्तरावर दोन महासत्रांचा उदय झाला व त्यातूनच शीतयुद्धाचा प्रारंभ झाला. या शीतयुद्धाच्या उगमांची कारणे, शीतयुद्धाचे स्वरूप व परिणाम इत्यादीवरही या प्रकरणात प्रकाश टाकणार आहोत. त्याचबरोबर दुसऱ्या महायुद्धानंतर चीनमध्ये झालेली साम्यवादी क्रांती, कारणे, स्वरूप आणि जागतिक राजकारणावर झालेले त्याचे परिणाम या सर्वांची सविस्तर चर्चा करणे अपेक्षित आहे.

थोडक्यात, या प्रकरणात आपण दुसरे महायुद्ध आणि त्यानंतर जागतिक राजकारणात झालेले महत्वाचे बदल यांचा अतिशय सखोलपणे आढावा घेणार आहोत, जेणेकरून विद्यार्थ्यांना या सर्व बदलांचे आकलन होण्यास मदत होईल. दुसऱ्या महायुद्धाने संपूर्ण जगात राजकीय व आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणात उलथापालथ झाली असली तरीही आपण या प्रकरणात केवळ १९५० पर्यंतच्याच जागतिक घडामोडींचा अभ्यास करणार आहोत, ही गोष्ट विद्यार्थ्यांनी प्रकर्षाने ध्यानात ठेवली पाहिजे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ दुसऱ्या महायुध्दाची पार्श्वभूमी : कारणे, स्वरुप, परिणाम

#### ४.२.१.१ दुसऱ्या महायुद्धाची कारणे

या प्रकरणात आपल्याला दुसऱ्या महायुदधाचे स्वरूप व परिणाम यांची सविस्तर चर्चा करावयाची

असल्याने दुसऱ्या महायुद्धाची कारणे आपण थोडक्यात अभ्यासणार आहोत, कारण दुसऱ्या महायुद्धाच्या कारणांची चर्चा केल्यानंतरच त्याचे स्वरूप व परिणाम आपल्या नीट लक्षात येतील.

### १. व्हर्सायचा तह (२८ जून, १९१९) –

१ल्या महायुद्धानंतर २८ जून १९१९ रोजी झालेला व्हर्सायचा तह म्हणजे जर्मनीला जमीनदोस्त करण्याचा दोस्त राष्ट्रांचा कट होता. दोस्त राष्ट्रांनी पूर्वनियोजितपणे तहाच्या अटी अगोदरच ठरविल्या होत्या. या तहाद्वारे जर्मनीवर अपमानास्पद अटी लादल्याने हा तह जर्मनीला नेहमीच तिरस्करणीय वाटत होता. ३३ हजार कोटी डॉलर्स एवढी जबरदस्त युद्धखंडणी जर्मनीवर लादली, जर्मन लष्कर व आरमारावर कडक निर्बंध लादले गेले. जर्मनीला युद्ध गुन्हेगार ठरवून दोस्त राष्ट्रांनी जर्मनीवर हा तह लादल्याने जर्मनीचे म्हणणे ऐकून घेण्याची तयारीही कुणी दाखविली नाही. त्यामुळे व्हर्सायच्या तहाने बेचिराख झालेल्या जर्मनीने अल्पावधीतच हा तह झिडकारून लावला आणि दोस्त राष्ट्रांचा सूड घेण्याच्या भावनेने संपूर्ण जगालाच दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत खेचले. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाची विषबीजे आपणास या तहातच दिसून येतात.

### २. दोस्त राष्ट्रांची (इंग्लंड, फ्रान्स, अमेरिकेची) स्वार्थी भूमिका –

व्हर्सायच्या तहातील जाचक तरतुदींमुळे जर्मनीची अवस्था अतिशय बिकट झाली होती, आर्थिक संकट कोसळले, लष्करी सामर्थ्य संपले, लोकांचा राष्ट्राभिमान दुखावला, तेथील लोकशाही सरकारला युद्धोत्तर समस्या सोडवणे अवघड झाले, तेथे साम्यवाद पसरण्याची भीती निर्माण झाली. या सर्व गोंधळाच्या व अस्थिरतेच्या वातावरणातच जर्मनीत हिटलरचा उदय झाला.

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन केलेल्या राष्ट्रसंघाच्या सनदेत कलम १९ मधील तरतुदीनुसार इंग्लंड व फ्रान्सला स्वत:हून जर्मनीशी तहात आवश्यक ते फेरबदल करता येवू शकत होते. तसे झाले असते तर त्यांना जर्मनीला अधिक सवलती देता आल्या असत्या. पण जर्मनीने तहाचा वारंवार भंग करूनही इंग्लंडने स्वार्थापोटी त्याकडे दुर्लक्ष केले. तर जर्मनीविरुध्द असलेल्या सूडभावनेपोटी फ्रान्सनेही तहातील एकही अट शिथील करण्यास नेहमीच नकार दिला. जर्मनी सतत आक्रमण करीत असतानाही अमेरिकेने आपला अलिप्ततावाद सोडला नाही. परिणामी इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेच्या या स्वार्थी भूमिकांमुळे जर्मनी अधिक आक्रमक झाला व सूडबुद्धीने पेटला. त्यामुळे जर्मनीएवढेच तिनही देशांना दुसऱ्या महायुद्धासाठी कारणीभूत धरले पाहिजे.

### ३. दोस्त राष्ट्रांमधील फुटीरता –

१ल्या महायुद्धाच्या काळात आणि त्यानंतर पॅरिसचा शांतता करार होईपर्यंत दोस्त राष्ट्रांमध्ये (इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका) जे सहकार्य होते, ते त्यानंतर संपुष्टात आले. अमेरिकन सिनेट वुड्रो विल्सनच्या

धोरणाच्या बाजूने नसल्याने अमेरिकने अलिप्तता स्वीकारावी लागली. इंग्लंडने फ्रान्सला युद्धोत्तर सहकार्य देण्यास नकार दिला. इंग्लंड व फ्रान्सने आधीपासूनचे शत्रू असल्याने फ्रान्स वरचढ होवू नये म्हणून इंग्लंडची जर्मनीच्या बाजूने होते. जेते आणि जीत राष्ट्रे यांच्या सत्तेचा समतोल राखण्याची इंग्लंडला महत्वाकांक्षा होती. त्यामुळे युरोपात दोन गट पडले. त्याचा फायदा जर्मनीने घेवून व्हर्सायचा तह भंग केला. दिवसेंदिवस जर्मनी प्रबळ बनत गेला व शेवटी जग दुसऱ्या महायुद्धास बळी पडले.

## ४. आर्थिक प्रश्न –

पहिल्या महायुद्धानंतर अपरिमित जीवित व वित्त हानी झाल्यामुळे सर्वच राष्ट्रांची आर्थिक परिस्थिती अतिशय गंभीर झाली होती. विजेत्या राष्ट्रांसमोर बेकारी, पुनर्वसन, परराष्ट्र व्यापार, नुकसान भरपाईवरून पराजित राष्ट्रांशी होत असलेले वाद, इ.समस्या होत्या. जर्मनी अन्यायकारक व्हर्साय तहाने पूर्णपणे दबला होता. इटलीला दिलेला शब्द दोस्त राष्ट्रांनी पाळला नाही. त्यामुळे या राष्ट्रांत असंतोष होता. १९१९ च्या आर्थिक महामंदीने जपान, जर्मनी, इटली यांच्यात भयंकर परिणाम झाला. त्यांच्यावर कोसळलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी ती एकमेकांवर आक्रमणे करू लागली. जपानने मांचुरियावर, इटलीने ॲबिसिनियावर तर जर्मनीने अनेक प्रदेशांवर हल्ले करून प्रादेशिक विस्तारास प्रारंभ केला. त्यातूनच दुसरे महायुद्ध उद्‌भवले.

## ५. अल्पसंख्यांकाबद्दलचे धोरण –

मध्य युरोपात विविध प्रकारचे वंशगट एकत्र राहत होते. काहींना त्यांच्या स्वत:च्या देशाबाहेर राहणे अपरिहार्य होते. परिणामी त्यांच्यात असंतोष धुमसत होता. ऑस्ट्रियाला जर्मनीत विलीन होण्याची इच्छा असतानाही दोस्त राष्ट्रांनी त्यावर बंदी घातली. हिटलरने परिकीय अंमलाखाली असलेले जर्मन लोकवस्तीचे प्रदेश जर्मनीच्या छत्राखाली आणण्याचा प्रयत्न केला. त्याला अल्पसंख्य जर्मनवंशीय गटांनीही पाठिंबा दिला. त्यातूनच जर्मनीने ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया व पोलंडवर आक्रमणे केली. याचाच अर्थ असा की, जागतिक राजकारणात सूडभावना व वैमनस्य वाढविण्यास दोस्त राष्ट्रांचे व जर्मनीचे अल्पसंख्यांकांबद्दलचे धोरण कारणीभूत ठरले.

## ६. आक्रमक राष्ट्रवाद –

१ल्या महायुद्धानंतरच्या काळात युरोपियन राष्ट्रात आक्रमक/आत्यंतिक राष्ट्रवादाचा उदय झाला. जर्मनीत हिटलर व इटलीत मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली आत्यंतिक राष्ट्रवाद उफाळला. त्यातून राष्ट्राराष्ट्रात आक्रमकता वाढली, संघर्ष वाढला. प्रत्येकाने विजय मिळविण्याच्या हव्यासापोटी मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रनिर्मिती चालू केली. परिणामी, दुसरे महायुद्ध घडून आले.

## ७. राष्ट्रसंघाचे अपयश –

पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता टिकविण्यासाठी १९१९ मध्ये राष्ट्रसंघाची स्थापना केली गेली. पण तो व्हर्सायच्या तहाचाच १ भाग असल्याने तो तह टिकविण्यासाठीच विजयी राष्ट्रांनी संघ स्थापन केला आहे असे त्याचे स्वरूप दिसत होते. त्याची रचना, कार्यपध्दती सदोष होती. त्यामुळे त्याला मूळ हेतूला न्याय देणे शक्य झाले नाही. अमेरिका त्यापासून अलिप्त होता. परस्परांवर होणारी आक्रमणे थोपवणे राष्ट्रसंघाला जमले नाही. काही काळात जपानने राष्ट्रसंघाकडे पाठ फिरवली. मांचुरिया व ॲबिसिनियाच्या प्रश्नावरही राष्ट्रसंघाला तोडगा काढता आला नाही. त्यामुळे युरोपीयन राष्ट्रांचा राष्ट्रसंघावर विश्वास उरला नाही. त्यामुळे राष्ट्रसंघ निष्क्रीय झाला. परिणामी, जर्मनीच्या वाढत्या प्रभावावर कोणीही आळा घालू शकले नाही. म्हणूनच राष्ट्रसंघाचे अपयश हे दुसऱ्या महायुद्धाचे १ महत्वपूर्ण कारण समजले जाते.

## ८. जपानचा साम्राज्यवाद –

पहिल्या महायुद्धामुळे जपानला बऱ्याच मोठ्या प्रदेशाशी प्राप्ती झाली. चीनमुळे त्याला बऱ्याच सवलती मिळाल्या. १९३१ मध्ये जपानने मांचुरिया ताब्यात घेतला. पण राष्ट्रसंघाने त्याविरोधात काही केले नाही. १९३७ मध्ये जपानने चीनविरुद्ध अघोषित युद्ध पुकारून पेकिंग, नानकिंग इ. महत्वाची ठिकाणे ताब्यात घेतली. १९३९ मध्ये म्हणजेच दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीस चीन–जपान युद्ध चालूच होते. १९४१ मध्ये जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केला. अशाप्रकारे जपान–अमेरिका युद्धास तोंड द्यावे लागले. पण त्याअगोदरच जपान–जर्मनीच्या बाजूने युद्धात उतरला होता.

## ९. तात्कालिक कारण –

२५ ऑगस्ट १९३९ रोजी इंग्लंडने पोलंडशी ५ वर्षाचा मदतीचा करार केला. त्यापाठोपाठ २६ ऑगस्ट रोजी फ्रान्सनेही पोलंडला मदत देण्याची तयारी दाखविली. तर २९ ऑगस्ट रोजी जर्मनीने अशी मागणी केली की, जर्मनी–पोलंड करारावर सह्या करण्याचे अधिकार असलेला वकील बर्लिनला ताबडतोब पाठवून द्यावा. पोलंडने ती मागणी नाकारली. पण बर्लिनमध्ये असणारे पोलंडचे एक वकील आवश्यक ती बोलणी करतील असे जर्मनीस कळविले. तरीही ३१ ऑगस्टच्या संध्याकाळपर्यंत त्या वकिलांना जर्मनीने भेटीची वेळ दिली नाही. शेवटी त्याच रोजी रात्री पोलंडचे राजदूत जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप यांना भेटले. डॅन्झींग बंदर, पोलिश कॉरिडॉर इत्यादीच्या मागणीसह एकूण १६ मागण्या जर्मनीने पुढे केल्या. मान्यतेसाठी पोलंडला फक्त २४ तासांचा काळ दिला. दोन्ही देशातील दूरध्वनीच्या तारा जर्मनीने तोडल्यामुळे पोलंडच्या राजदूतांना आपल्या सरकारशी बोलणी करणे शक्य झाले नाही. जर्मनीने पोलंडला दिलेली मुदत संपण्याआधीच १ सप्टेंबर १९३९ रोजी पहाटे पोलंडवर आक्रमण केले. तात्काळ इंग्लंड व

फ्रान्सने जर्मनीच्या विरोधात पोलंडला मदत करण्याचा निरोप हिटलरकडे पाठविला. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. परिणामी ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने आणि लगेचच फ्रान्सनेही जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धास प्रारंभ झाला.

## ४.२.१.२ दुसऱ्या महायुद्धाचे स्वरुप

पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्थापन झालेला राष्ट्रसंघ शांतता टिकविण्यासाठी अपयशी ठरला. १९१९ नंतर दोस्त राष्ट्रांमध्ये मतभेद वाढत राहिले. १९२३ नंतर हिटलरने जाणीवपूर्वक व पदध्दतशीरपणे व्हर्सायचा तह धुडकावून लावला. युरोपात राष्ट्रवाद व लष्करवाद उफाळला. आर्थिक संकट कोसळल्याने प्रत्येक राष्ट्राला एकाकीपणा जाणवू लागला. परिणामी सर्वत्र असंतोष पसरला व त्याची परिणीती दुसऱ्या महायुद्धात झाली.

दुसऱ्या महायुद्धाचे स्वरूप अभ्यासत असताना असे लक्षात येते की, दुसरे महायुद्ध हे लष्करीदृष्ट्या पाच भागात/टप्प्यात विभागलेले दिसते.

१) १ सप्टेंबर १९३९-२२ जून १९४१ - १ ला टप्पा - हिटलरचा आक्रमकवाद/साम्राज्यवाद.

२) २२ जून १९४१-७ डिसेंबर १९४१ - २ रा टप्पा - जर्मनी व मित्र राष्ट्राचा आफ्रिकेवर तर जपानचा पर्ल हार्बरवर हल्ला.

३) ७ डिसेंबर १९४१-८ नोव्हेंबर १९४२ - ३ रा टप्पा - जपान-जर्मनीकडून मलेशिया, नेदरलँड, इस्ट इंडिज, कॉकेशस काबीज.

४) ८ नोव्हेंबर १९४१-७ मे १९४५ - ४ था टप्पा - अमेरिकेचा फ्रेंच उत्तर-आफ्रिकेवर हल्ला, जर्मनीची शरणागती.

५) ७ मे १९४५-२ सप्टेंबर १९४५ - ५ वा टप्पा - जपानची शरणागती व युद्धाची सांगता.

❍ **१ ला टप्पा -**

**१. पोलंड -**

१ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडने जर्मनीसमोर शरणागती घेण्याचे नाकारल्याने हिटलरच्या नाझी फौजा पोलंडवर तुटून पडल्या. केवळ ८ दिवसात २४० मैलांची मजल मारत त्यांनी आपला मोर्चा राजधानी वॉर्साकडे वळवला. जर्मन रणगाडादल, पायदल व हवाईदल यांचे परस्परांशी सहकार्य आदर्शवत होते. जर्मन सेना कार्यालयही सतत फिरते होते. त्यांचा चढाईचा वेग कल्पनातीत होता. जर्मनीच्या या नव्या युद्धतंत्राचे ब्लिट्झक्रीगचे विद्युत चढाईचे जगाला घडलेले हे पहिले रौद्ररूप होते. १७ सप्टेंबरला पोलंडवर घणाघाती

हल्ला केला. २३ ऑगस्ट १९३९ मध्ये हिटलर-स्टॅलिन मैत्री कराराने स्टॅलिनने पोलंडवर आक्रमण केले. २७ सप्टेंबरला वॉर्साने शरणागती पत्करली. परिणामी, जर्मनी-रशियाने पोलंडची फाळणी केली. वॉर्सा शहर व कारखान्याचा प्रदेश जर्मनीने घेतला तर ७७ हजार चौरस मैलाचा प्रदेश रशियाकडे गेला. पोलंड-इंग्लंड मदतीच्या करारामुळे पोलंडचे निर्वासित सरकार इंग्लंडमध्ये आश्रयास होते.

## २. फिनलंड –

जर्मनीच्या मैत्री करारावर विश्वास नसल्याने लेनिनग्राडच्या (पेट्रोग्राड-सेंट पीटर्सबर्ग) संरक्षणासाठी भविष्यात स्टॅलिनला फिनलंडची काही बेटे आरमारी तळासाठी गरजेची वाटत होती. त्यामुळे ३० नोव्हेंबर १९३९ रोजी रशियाने फिनलंडवर हल्ला चढवला, त्यानंतर १२ मार्च १९४० रोजी फिनलंडने शरणागती पत्करून पुढे फिनलंड-रशिया शांतता करार झाला. पुढे जून १९४० मध्ये लिथुआनिया, एस्टोनिया व लॅटव्हिया रशियाने काबीज केले.

## ३. नॉर्वे व डेन्मार्क –

दूध व दूधजन्य पदार्थ व अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी हिटलरला डेन्मार्क तर नॉर्वेतून ब्रिटीशावर हल्ले चढवण्यासाठी जर्मनीला डेन्मार्क व नॉर्वे पाहिजे होते. ९ एप्रिल १९४० रोजी नॉर्वे व त्यापाठोपाठ लगेच जर्मन फौजांनी गिळंकृत केला.

## ४. हॉलंड, बेल्जियम, लक्झबर्ग –

१० मे १९४० मध्ये जर्मनीने हॉलंड, बेल्जियमवर हल्ला केला, त्यावेळी इंग्लंडचे पंतप्रधान नेव्हिल चेंबरलेनने राजीनामा दिला व पंतप्रधानपद विन्स्टन स्पेन्सर चर्चिल यांच्याकडे आले.

जर्मनीच्या हॉलंडवरील हल्ल्याला तेथील नागरिकांनी प्रतिकार न करता तेथून पळ काढावा हा हेतू होता आणि तो साध्यही झाला. क्षेत्रफळाने छोटे असणारे लक्झेबर्ग काही वेळातच शरण आले. बेल्जियममधील एबेन एमेल हा अभेद्य किल्ला जर्मनांनी काबीज केला. यावेळी बेल्जियमच्या मदतीला फ्रान्स-बेल्जियम सीमेवरील ब्रिटीश व फ्रेंच सैन्य मदतीला आले. १४ मे रोजी हॉलंड व २७ मे रोजी बेल्जियमने शरणागती पत्करली.

## ५. फ्रान्स –

फ्रेंच सीमेवरील आर्देन्स या खडकात टेकड्यांकडून जर्मनीचा हल्ला होणे शक्यच नाही, अशी दोस्त राष्ट्रांची खात्री होती. पण १४ मे १९४० रोजी त्याच प्रेरणेतून जर्मन रणगाडे फ्रान्समध्ये घुसताच फ्रान्सचे

धाबे दणाणले. यावेळी पॉल रेनॉं हे फ्रान्सचे पंतप्रधान तर मार्शल पेनॉ उपपंतप्रधान होते. ५ जूनला मॅजिनो तटबंदीपासून जर्मन सैन्याने फ्रान्सवर हल्ला चढवला. अतिशय केविलवाण्या अवस्थेत फ्रान्सने २२ जून १९४० रोजी शरणागती स्वीकारली. यावेळी जनरल द गॉल हा तिथून निसटला. त्याने इंग्लंडमध्ये तेथील सरकारच्या परवानगीने स्वतंत्र फ्रान्सचे हंगामी सरकार स्थापन करून जर्मनीविरुध्दचे युद्ध पुढेही सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला.

### ६. इंग्लंड –

२ जुलै पासून जर्मनीच्या विमानदलाने इंग्लंडवर जोराचे हल्ले चालू ठेवले. ते २३ दिवस चालू राहिले. यावेळी ब्रिटिशांची आग ओकणारी विमाने–'स्पिटफायर' हवाई युद्धात जर्मनीपेक्षा सरस ठरली. ब्रिटिशांना रडार यंत्राची माहिती होती तर जर्मनीला ती नव्हती. त्यामुळे जर्मन विमान येत असल्याची कल्पना आधीच ब्रिटिशांना मिळेल. परिणामी जर्मनीचे मोठे नुकसान झाले.

### ७. ग्रीस व क्रीट –

१० जून १९४० रोजी मुसोलिनीने फ्रान्सविरुध्द युद्ध जाहीर केले. त्यानंतर आपले शक्तीप्रदर्शन करण्यासाठी त्यांनी २८ ऑक्टोबर रोजी ॲबिनियामधून ग्रीसवर हल्ला केला. पण यामध्ये इटलीच्या हाती फार काही लागले नाही. काही काळाने ग्रीस–इंग्लंड मदतीचा करार होवून ७ मार्च १९४१ रोजी ब्रिटीश ग्रीसच्या मदतीला गेले. त्यावेळी जर्मनीला हे रुचण्यासारखे नव्हते. त्यामुळे जर्मनी ग्रीस व इंग्लंडविरोधात शस्त्र उचलले. ग्रीसला इंग्लंडची मदत मिळूनही २१ एप्रिलला त्याला जर्मनीपुढे शरणागती पत्करावी लागली. तर ब्रिटीशांनी तेथून पळ काढला.

ग्रीसमधून परतल्यानंतर ब्रिटीश सैन्य क्रीटमध्ये गेले. त्यामुळे २० मे १९४१ मध्ये जर्मनीने क्रीटवर हल्ला करून ते ताब्यात घेतले. ब्रिटीशांनी तेथून माघार घेतली, याचा परिणाम म्हणजे सुवेझ कालवा, इजिप्त आणि मध्य पूर्वेतील महत्वाचा ब्रिटिश भाग धोक्यात आला.

### ८. रशिया –

ऑगस्ट १९३९ मध्ये जर्मनी व रशिया मैत्री करार होवून १९४१ पर्यंत तो टिकला. पण दिवसेंदिवस त्याच्यातील मतभेद वाढत गेले. परिणामी २२ जून १९४१ मध्ये जर्मनीने रशियावर आक्रमण केले. रशियातील युक्रेन व क्रॉकेशस भागात तेल व अन्नधान्याचे साठे असल्याने ते ताब्यात घेण्याच्या हव्यासापोटी जर्मनीने युक्रेनवर हल्ला करून तो जिंकला. नंतर त्यांनी मॉस्कोला वेढा दिला. पण रशियन सैन्यांनी माघार घेताना स्वत:चा प्रदेश जाणीवपूर्वक बेचिराख केला. परिणामी जर्मन सैन्याला धान्य व इतर युद्धसाहित्य मिळू शकले नाही.

## ❍ २ रा टप्पा –

### १. जपानचा पर्ल हार्बरवरील हल्ला व प्रदेश प्राप्तीची घोडदौड –

रशियामध्ये स्टॅलिनने बाझीं सैन्यावर बोईने प्रतिहल्ला केला नाही. परिणामी नोव्हेंबरमध्ये जर्मन सैन्याला तेथील कडक हिवाळ्याला तोंड द्यावे लागले. हिटलरने नियोजन पूर्णपणे बिघडले. ६ डिसेंबरपर्यंत त्यांना मॉस्को हाती लागले नाही. दरम्यान याचा फायदा घेवून कोणत्याही पूर्वकल्पनेशिवाय ७ डिसेंबर १९४१ रोजी जपानने पॅसिफिक महासागरातील अमेरिकेचे नाविक तळ पर्ल हार्बरवर हल्ला केला. अलिप्ततावादी अमेरिकेने नाइलाजास्तव मित्र राष्ट्रांच्या बाजूने युद्धात भाग घेतला. १० डिसेंबरला अमेरिकेची छोटी बेटे ग्वाम व वेक, मोठे बेट फिलीपाईन्स २४ डिसेंबरला हॉंगकॉंग, २ जानेवारी १९४२ ला फिनिपाईन्सची राजधानी मॅनिला, मलाया, जोहान्सबर्ग, १५ फेब्रुवारी १९४२ ला सिंगापूर जपानने जिंकले. ९ मार्च १९४२ रोजी ब्रम्हदेशातील रंगून घेवून २९ एप्रिलला जपानी सैन्य चिंदविन नदीच्या खोऱ्यात भारताच्या सीमेवर पोहोचले. याचाच अर्थ असा की, केवळ ४।। महिन्यात जपानी सैन्याने विस्तृत प्रदेश काबीज केला. तर दुसरीकडे भारत व ऑस्ट्रेलियास धोका निर्माण केला.

अशाप्रकारे १९४२ पर्यंत जर्मनी-जपान-इटली यांची विजयी घोडदौड सुरू होती तर इंग्लंड-अमेरिका-रशिया याना बहुतेक ठिकाणी माघार घ्यावी लागली. १९४२ च्या उत्तरार्धात मात्र चित्र बदलू लागले. पॅसिफिक महासागरात जनरल मॅकऑर्थर तर आग्नेय आशियात लॉड माउंटबॅटन यांना युद्धप्रमुख म्हणून नेमण्यात आले. त्यानी जपानचा प्रतिकार करण्याचा चंग बांधला. जनरल मॅकऑर्थरने फिलिपाईन्स परत मिळवले तर लॉर्ड माऊंटबॅटनने ब्रम्हदेशातून जपानी सैन्याला हाकलले.

### २. आफ्रिकेवरील हल्ला –

आफ्रिकेत १९४१-१९४३ मध्ये युद्धास जोर आला. दोस्त राष्ट्रांनी ॲबिसिनिया, इटालियन, सोमालीलॅंड, ट्रिपोली, ट्युनिशिया यांचा ताबा घेवून १९४२ पर्यंत लिबियातून जर्मन सैन्याची हकालपट्टी केली. प्रारंभी इटली (मुसोलिनी) आफ्रिकेवर चढाई करून विजय मिळविला असला तरी हिटलरनी त्याच्यावर विश्वास न ठेवता स्वत:चे सैन्य (आफ्रिका कोअर) जनरल रोमेलच्या नेतृत्वाखाली तेथे पाठवले. 'आफ्रिका कोअर'च्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीने जनरल रोमेला 'डेझर्ट फॉक्स' नावाने विख्यात झाला. तसेच त्याला हिटलरनी 'फील्ड मार्शल' हा किताब देवून त्याचा सन्मान केला. त्यांनी आफ्रिकेत जर्मन सैन्याच्या शौर्याच अलौकिक प्रदर्शन केले.

## ❍ ३ रा टप्पा –

### १. रशिया –

या टप्प्यामध्ये जर्मनीची रशियावरील दुसरी चढाई नेटाने सुरू झाली. युक्रेन भागात उत्तरेस व्होरोनेझ,

मध्य भागात रोस्टॉव व दक्षिणेत क्रिमियातील सेबॅस्टपल ही तीन प्रमुख ध्येये ठरविण्यात आली. त्यानुसार ३ जुलैला सेबॅस्टपल बंदर, २३ जुलैला रोस्टॉव नाझी सैन्याने काबीज केले. पण व्होरोनेझ भागात रशियन सैन्याच्या तीव्र प्रतिकारामुळे नाझींचा निभाव लागला नाही. परिणामी, त्यांनी आपला मोर्चा स्टॅलिनग्राडकडे वळविला. २२ ऑगस्ट १९४२ रोजी जर्मन फौजांनी स्टॅलिनग्राडवर हल्ला केला. नोव्हेंबरमध्ये सेनापती 'जनरल विंटर' च्या नेतृत्वाखाली आपले शौर्य दाखविण्यास प्रारंभ केला. मार्शल झुकॉव्हच्या फौजांनी जर्मन सैन्याला अडचणीत आणणे सुरू केले. थंडीमुळे जर्मन सैन्याला विभागाद्वारे मिळणारी रसद थांबली. आवश्यक वस्तूंचे साठे संपले. वेढ्यातील नाझी फौजा अडचणीत आल्या. परिणामी ३१ जानेवारी १९४३ रोजी जर्मनीने शरणागती स्वीकारली आणि हिटलरने माघार घेतली.

## ❍ ४ था टप्पा –

### १. अमेरिकेचा युद्‌ध प्रवेश व पॅसिफिक महासागरातील बेटे काबीज –

जपानच्या प्रखर आक्रमणामुळे व वेगवान प्रदेश विस्तारामुळे ऑस्ट्रेलियाला आणि पॅसिफिक महासागरातील दोस्तांच्या सागरी दळणवळणाला अडचण निर्माण झाली. त्यामुळे जपानविरुध्द तात्काळ कारवाई करणे अमेरिकेला आवश्यक बनले. ऑगस्ट १९४२ मध्ये अमेरिकेने ग्वॉडालकनॉल बेटावर १ला हल्ला केला. हे बेट जपानला गमवावे लागले तरी बेटावरून आपले सर्व सैन्य काढून घेण्यात जपानला यश आले. १९४३ च्या उत्तरार्धात अमेरिकन हल्ल्यांची तीव्रता वाढली. जुलैमध्ये सॉलोमन, ५ ऑगस्टला न्यू जॉर्जिया, ३ सप्टेंबरला सालामाऊ ही महत्वाची बेटे अमेरिकेने ताब्यात घेतली. अशाप्रकारे दीड वर्षात अमेरिकन सैन्याने पॅसिफिक महासागरातील ३ हजार मैल लांबीच्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यामुळे जपानला अमेरिकेच्या हल्ल्याचा धोका जास्त वाढला.

### २. इटली –

१९४३ मध्ये दोस्त राष्ट्रांनी फ्रान्सऐवजी इटलीवर स्वारी केली. प्रथमत: त्यांनी ऑगस्ट १९४३ मध्ये सिसिली बेट ताब्यात घेतले. त्यानंतर दोस्त राष्ट्रांनी इटलीच्या मुख्य प्रदेशावर/भूमीवर हल्ला केला. मुसोलिनीच्या सततच्या पराभवामुळे इटालियन जनता त्यांच्यावर नाराज झाली आणि मुसोलिनीविरुद्‌ध क्रांती घडून आली. २४ जुलै १९४३ रोजी मुसोलिनींना कैद झाली. पण नंतर त्यांनी स्वत:च युक्तीने सुटका करून घेतली व जर्मन सैन्याचा आश्रय घेतला. शेवटी सप्टेंबर १९४३ मध्ये इटलीने दोस्त राष्ट्रांसमोर शरणागती घेतली. ४ जून १९४४ ला रोम जिंकले. १९४५ मध्ये मुसोलिनीला पकडून इटालियन लोकांनीच त्याचा खून केला.

रोम ताब्यात आल्यानंतर दोस्त राष्ट्रांनी फ्रान्सकडे लक्ष केंद्रित केले. अमेरिकन व ब्रिटीश सैन्य नॉर्मडीत उतरले. दोन महिन्याच्या संघर्षानंतर फ्रान्सला पॅरिस शहर, तसेच स्वत:च बराच मोठा प्रदेश

गमवावा लागला. त्यामुळे फ्रान्समधून जर्मनांची हकालपट्टी झाली. ऱ्हाईन नदीकाठी दोन्ही गटातील सैन्य एकत्र आले. जर्मनीत अव्यवस्था पसरली. दोस्त राष्ट्रांचे सैन्य ऱ्हाईन नदी ओलांडून एल्ब नदीकडे जावू लागले. त्याचवेळी रशियानेही पूर्व बाजूने जर्मनीवर आक्रमण केले. अशा अवस्थेत जर्मनीला दोन्ही आघाड्यांवर युद्ध सुरू ठेवणे शक्य नव्हते. रशियाने रूमानिया, हंगेरी, पोलंड, झेकोस्लाव्हाकिया, युगोस्लाव्हिया जिंकून घेतले. जर्मनी पूर्णपणे हतबल झाले. एप्रिल १९४५ मध्ये हिटलरने आत्महत्या केली. परिणामी मे १९४५ मध्ये जर्मनीच्या शरणागतीनंतर दोस्त राष्ट्रांनी बर्लिन शहर ताब्यात घेतले. त्याचे ४ भाग करून तो रशिया, इंग्लंड, फ्रान्स व अमेरिका यांच्यात विभागला गेला. अशाप्रकारे दोस्त राष्ट्रांनी युरोपमध्ये पूर्ण यश/विजय संपादन केला.

### ❍ ५ वा टप्पा –

### १. हिरोशिमा–नागासाकी –

युरोपमधील पूर्ण यशानंतर आता मैदानात फक्त जपान राहिले. त्यामुळे इंग्लंड–अमेरिकेने आपले लक्ष जपानकडे वळवले. यावेळी ॲटम–बॉम्बसारखे अतिविनाशकारी शस्त्राची अमेरिकेला ओळख झाली होती. आता अमेरिकेने त्या शस्त्राचा वापर करून ६ ऑगस्ट १९४५ अमेरिकेने हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकला. त्यामुळे जपानचे फार मोठे नुकसान झाले. प्रचंड जीवित व वित्त हानी झाली. लगेचच ९ ऑगस्ट १९४५ रोजी नागासाकी शहरावर टाकण्यात आला. त्यातही महाभयानक हानीला जपानला तोंड द्यावे लागले. त्या प्रचंड हानीमुळे जपानने शरणागती पत्करली.

अशाप्रकारे १४ ऑगस्ट १९४५ रोजी हे अतिभयंकर असे दुसरे महायुद्ध संपले आणि जागतिक पातळीवर होणारा विध्वंस थांबला.

## ४.२.१.३ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

### ❀ १ ल्या महायुद्धाच्या तुलनेत दुसरे महायुद्ध जास्त संहारक –

१९१४–१९१८ च्या १ल्या महायुद्धाच्या तुलनेत दुसरे महायुद्ध (१९३९–१९४५) जगाच्या दृष्टीने जास्त हानीकारक ठरले. १ल्या महायुद्धात १३० लक्ष तर दुसऱ्या महायुद्धात १४० लक्ष लोक मृत्यूमुखी पडले. १ल्या महायुद्धात २४० लक्ष तर दुसऱ्या महायुद्धात जवळजवळ ४५० लक्ष लोक जखमी व जायबंदी झाले. दुसऱ्या महायुद्धात १.५ कोटी नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले. यावरून २ऱ्या महायुद्धात झालेल्या प्रचंड जीवित हानीची कल्पना येते. जर्मनीच्या हल्ल्यामुळे इंग्लंड आणि रशिया यांच्या राष्ट्रीय साधनसंपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सार्वजनिक ठिकाणे, इमारती व कलाकृती नष्ट झाल्या. अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धात झालेला विनाश हा पुढील कित्येक पिढ्यांपर्यंत भरून न निघणारा होता.

### १. सामान्य मानवी जीवन विस्कळीत झाले -

दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामस्वरूप सामान्य माणसाचे जीवन पूर्णपणे विस्कळीत झाले. मानवाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर या महायुद्धाचा दूरगामी परिणाम दिसून येतो. शेती, कारखाने, धरणे, दवाखाने, बागबगीचे इ.चे नुकसान झाल्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. दुष्काळ व काळाबाजार वाढला. महागाई वाढली. चलनवाढ झाली. तसेच मोठ्या प्रमाणात झालेल्या जीवितहानीमुळे सर्वत्र रोगराई पसरली. जीवनोपयोगी वस्तू-अन्नधान्य, कपडे, औषधे, इंधन इ. वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर सामान्य मानवी जीवनाची घडी विस्कटली.

### २. जागतिक शांततेचे महत्त्व वाढले व संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना -

१ल्या महायुद्धानंतर जागतिक शांतता व सुव्यवस्थेसाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पण उचित कार्यभार संपल्यावर मित्र राष्ट्रांनी एकमेकांना अपेक्षित सहकार्य न केल्याने राष्ट्रसंघ अपयशी ठरला. काही काळाने जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या संकटाने घेरले. या युद्धात अमेरिकेने वापरलेल्या अणुबॉम्बमुळे काही सेकंदातच लाखो लोक मृत्युमुखी पडले. अणुबाँम्बच्या भयावह शक्तीची सामान्य लोकांना व त्याचबरोबर जागतिक पातळीवरील राजकारणी लोकांना क्षणार्धात कल्पना आली. म्हणूनच यापुढील पिढीला अशा युद्धाची झळ पोहचू नये व जागतिक शांतता टिकून रहावी यासाठी युद्धमार्ग टाळणे व शांतता प्रस्थापित करणे यासाठी प्रयत्न केले जावू लागले. त्यातून जागतिक शांततेचे महत्त्व वाढले. परिणामी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी 'जागतिक शांतता प्रस्थापित करणे' हा हेतू ठेवून संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली.

### ३. साम्राज्यवाद व वसाहतवादावरील परिणाम -

दुसऱ्या महायुद्धात संपूर्ण जग होरपळले असतानाच यापूर्वी सर्वत्र फोफावलेला साम्राज्यवाद व वसाहतवाद यांना महायुद्धानंतर जबरदस्त धक्का बसला. या महायुद्धानंतर इटली, जर्मनी व जपान यांची साम्राज्ये संपली. बदलत्या परस्थितीमुळे इंग्लंडला भारतातील आपले साम्राज्य टिकवून ठेवणे कठिण झाले. परिणामी इंग्लंडला भारतातील साम्राज्य गमवावे लागले/विसर्जित करावे लागले. थोडक्यात, दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ हा राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनास अनुकूल ठरला. पूर्वीप्रमाणे लष्कराच्या जोरावर आशिया व आफ्रिका खंडातील साम्राज्ये टिकवून ठेवणे अशक्य झाले.

### ४. इंग्लंड-फ्रान्सच्या हातून जागतिक राजकारणाचे नेतृत्व निसटले -

दुसऱ्या महायुद्धापर्यंत जागतिक राजकारणाचे नेतृत्व हे इंग्लंड व फ्रान्स या देशाकडे होते. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र इंग्लंड व फ्रान्स या दोन देशाची परिस्थिती इतकी वाईट झाली की, त्यांना स्वत:च्या

देशातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रश्न सोडवणे अवघड झाले. त्यामुळे हळूहळू त्यांच्या हातून जागतिक राजकारणाचे नेतृत्व निसटून ते अमेरिका व रशिया या देशांकडे गेले.

### ५. आशिया व आफ्रिका खंडात जागृती घडून आली -

दुसऱ्या महायुद्धाचा महत्वाचा परिणाम म्हणजे पश्चिम आशियात फार मोठी जागृती निर्माण झाली. त्याच प्रदेशातून आतापर्यंत संपूर्ण जगाला खनिज तेलाचा पुरवठा होत होता. त्यामुळे इंग्लंड व फ्रान्सचे या प्रदेशावर कायम वर्चस्व राहिले. दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम आशियात राष्ट्रवाद जागृत झाला. त्यातूनच 'अरब संघ' स्थापन झाला. तसेच आता सुवेझ कालव्यावरही इजिप्तचेच वर्चस्व असल्याचे दिसून येते. आतापर्यंत मागास समजल्या जाणाऱ्या आफ्रिकेत दुसऱ्या महायुद्धानंतर मोठी जागृती घडून आली. इजिप्त, भूदान स्वतंत्र झाले, मोरोक्को, ट्युनिशिया, लिबिया, गोल्डकोस्ट व टोगोलँड हे स्वतंत्र झाले. अशाप्रकारे दुसऱ्या महायुद्धानंतर आफ्रिकेतील प्रत्येक राज्य स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न करू लागले.

### ६. जागतिक राजकारणात दोन महासत्तांचा उदय -

दुसऱ्या महायुद्धानंतर जग हे साम्यवादी व लोकशाही राष्ट्रे अशा दोन गटात विभागले. सोव्हिएत रशिया व कम्युनिस्ट चीन आणि अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स ही लोकशाही राष्ट्रे यांच्यात सत्तेसाठी रस्सीखेच सुरू झाली.

### ७. शीतयुद्धाला प्रारंभ -

दुसऱ्या महायुद्धानंतर जग साम्यवादी रशिया व लोकशाहीवादी अमेरिका अशा परस्परविरोधी गटात विभागले गेले. महासत्ता म्हणून या दोन राष्ट्रांचा उदय झाला. त्यानंतर त्यांच्यात पराकोटीचे वैचारिक मतभेद निर्माण झाले. जगाची विभागणी साम्यवादी व लोकशाहीवादी राष्ट्रांचा गट अशी झाल्याने त्यांच्यात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली, अवकाश संशोधन, अण्वस्त्र निर्मिती स्पर्धा सुरू झाली. त्यामुळे सर्वत्र अस्थिर व भीतीदायक वातावरण पसरले. युद्धजन्य परिस्थिती निर्माण होवून संपूर्ण जग तणावाखाली आले. या दोन गटातील वैचारिक संघर्षामुळे जागतिक स्तरावर अमेरिका व रशिया या दोन गटात कमालीचा ताण निर्माण झाला. त्यालाच 'शीतयुद्ध' (Cold War) असे म्हटले जावू लागले.

अशा प्रकारे १९३९-१९४५ या काळात सुरू असलेल्या दुसऱ्या महायुद्धामुळे जगातील जवळजवळ सर्व राष्ट्रे कोणत्या ना कोणत्या कारणाने युद्धात ओढली गेली. त्यामुळे त्यांना या महायुद्धाची झळ सोसावी लागली. महायुद्धामुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी झाली, सर्व मानवी जीवन विस्कळीत झाले, सर्वत्र अशांतता पसरल्याने जागतिक शांततेची आवश्यकता वाटू लागली, त्यातून युनोची स्थापना झाली. साम्राज्यवादी आणि वसाहतवादी राष्ट्रांना या महायुद्धामुळे जबरदस्त धक्का बसला, त्यांना आपल्या काही ठिकाणच्या वसाहती गमवाव्या लागल्या. परिणामी हा युद्धोत्तर काळ राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनास

पोषक ठरला, प.आशियात आणि आफ्रिकेत जागृती घडून आली आणि त्यांच्या राष्ट्रवादातून 'अरब संघ' स्थापन झाला. दुसऱ्या महायुद्धाचा सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे या युद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर रशिया आणि अमेरिका या दोन महासत्तांचा उदय झाला आणि त्यांच्यातील वैचारिक सत्ता-संघर्षातून शीतयुद्ध सुरू झाले.

### ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

१. व्हर्सायचा तह ................ रोजी करण्यात आला.

*(अ) २८ जून १९१८ (ब) २८ जून १९१९ (क) २८ जून १९२० (ड) २८ जून १९२९.*

२. फॅसिस्ट पक्षाची स्थापना ............ ने केली.

*(अ) हिटलर (ब) मॅकियाव्हॅली (क) हेगेल (ड) मुसोलिनी.*

३. ........... या काळात दुसरे महायुद्ध सुरू होते.

*(अ) १९१४-१९१८ (ब) १९२९-१९३५ (क) १९३९-१९४५ (ड) १९१९-१९४२.*

४. दुसऱ्या महायुद्धात लोकशाहीचा लढा ............. शी होता.

*(अ) हुकूमशाही (ब) भांडवलशाही (क) साम्यवाद (ड) समाजवाद.*

५. दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात ........... रोजी झाली.

*(अ) २ सप्टेंबर १९३९ (क) ४ सप्टेंबर १९३९*

*(ब) १ सप्टेंबर १९३९ (ड) ३ सप्टेंबर १९३९.*

## ४.२.२ संयुक्त राष्ट्रसंघटना (युनो) आणि जागतिक शांततेची संकल्पना

### ४.२.२.१ प्रास्ताविक

१९३९-१९४५ पर्यंत चालू असलेल्या दुसऱ्या महायुद्धाचे जगातील जवळजवळ सर्वच देशांवर भयंकर परिणाम झालेले दिसून येतात. जर्मनीच्या एकापाठोपाठ एक अशा विजयी घोडदौडीमुळे लोकशाही राष्ट्रांना धोका निर्माण झाल्याची जाणीव होवू लागली. जर्मनीचा विजय होणे म्हणजे हुकूमशाहीचाच विजय होता. त्यामुळे या हुकूमशाहीविरुध्द सर्व लोकशाही राष्ट्रांनी एकत्र येणे, जर्मनीची हुकूमशाही मोडीत काढणे, जगात शांतता व सहकार्य प्रस्थापित करणे, दुसऱ्या महायुद्धासारख्या विध्वंसक संकटापासून भविष्यातील पिढीला दूर ठेवणे अतिशय गरजेचे बनले. त्यातूनच संयुक्त राष्ट्रसंघटनेची कल्पना पुढे आली व अमेरिका, रशिया, इंग्लंड व चीन या देशांच्या पुढाकाराने ती वास्तवात उतरवली गेली. संयुक्त राष्ट्रसंघामार्फत जगात शांतता व सहकार्याचा आदर्श जगापुढे ठेवण्यात आला.

### ४.२.२.२ संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना (United Nations Organization)

दुसऱ्या महायुद्धात प्रारंभी अमेरिकेने अलिप्ततेचे धोरण स्वीकारले, पण जर्मनीची युद्धातील मुसंडी व जपानची वेगवान प्रदेशप्राप्ती यामुळे अमेरिकेला युद्धप्रवेश करावा लागला. तत्पूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट व इंग्लंडचे पंतप्रधान विन्स्टन चर्लिल यांनी अटलांटिक महासागरातील फाऊंडलंड बेटाजवळ एका जहाजावर ९ ते १२ ऑगस्ट १९४१ पर्यंत बैठक झाली. त्यानुसार युद्धात विजय मिळविण्यासाठी जास्तीत जास्त राष्ट्राचा पाठिंबा, सहकार्य व सहानुभूती मिळविणे, युद्धोत्तर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'अटलांटिक चार्टर' (१४ ऑगस्ट १९४१) घोषित करण्यात आली.

❍ **अटलांटिक चार्टरमधील कलमे :-**

१. युद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता प्रस्थापित करणे.

२. प्रत्येक राष्ट्राला स्वयंनिर्णयाचा हक्क.

३. प्रादेशिक बदल करताना जनतेची संमत्ती आवश्यक.

४. लोकांना स्वत:चे सरकार स्वत: निवडण्याचा हक्क.

५. आंतरराष्ट्रीय व्यापार व कच्च्या मालावर सर्व राष्ट्रांचा समान हक्क.

६. प्रत्येक राज्याच्या सुरक्षिततेसाठी स्थायी स्वरूपाची योजना आखणे.

७. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष शांततेने सोडवणे.

या चार्टरमुळे संयुक्त राष्ट्रसंघाची वैचारिक भूमिका तयार झाली असली तरी या चार्टरमधील मुख्य दोष म्हणजे ती केवळ पश्चिमेकडील राष्ट्रांना उद्देशूनच काढण्यात आली होती. पण खऱ्या अर्थाने संयुक्त राष्ट्रसंघटना स्थापन करण्याच्या दृष्टीने १ले पाऊल उचलले गेले, ते म्हणजे १ जानेवारी १९४५ रोजी. या दिवशी वॉशिंग्टन परिषदेत ५६ राष्ट्रांनी अटलांटिक चार्टरला (सनद) पाठिंबा दिला. त्यानंतर फ्रँकलिन रूझवेल्ट, चर्चिल व स्टॅलिन यांची १९४४ मध्ये तेहरान येथे चर्चा घडून आली व संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा ठराव पास करण्यात आला. त्यानंतर झालेल्या अनेक बैठकांमध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेचे स्वरूप निश्चित करण्यात आले. शेवटी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी ५० राष्ट्रांच्या परिषदेत सॅनफ्रॅन्सिको येथे संयुक्त राष्ट्रसंघटनेची (युनो) स्थापना केली गेली. युनोची सनद १९ भागात विभागणी असून त्यामध्ये १११ कलमे आहेत. युनोची सभासद संख्या १९५९ पर्यंत ५० ते ८० पर्यंत गेलेली दिसते.

### ४.२.२.३ संयुक्त राष्ट्रसंघटनेची उद्दिष्ट्ये (Objectives)

युद्धोत्तर जगात शांतता प्रस्थापित करणे हे प्रमुख उद्दिष्ट ठेवून स्थापन झालेल्या युनोने संघटनेच्या

सनदेत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांना मान्यता व पाठिंबा देणाऱ्या आणि शांतताप्रेमी अशा कोणत्याही राष्ट्राला राष्ट्रसंघाचे सभासदत्व मिळत असे. तसेच त्यासाठी त्यांना महासभा व सुरक्षा समितीची मान्यता आवश्यक असे. त्यानुसार या सर्व सभासद राष्ट्रांना खालील उद्दिष्टांप्रती आपली निष्ठा ठेवून ती अंमलात आणणे आवश्यक होते. युनोची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.

१) आंतरराष्ट्रीय शांततेस धोका निर्माण करणाऱ्या आक्रमक राष्ट्रांवर सामुदायिकरित्या, शांततेच्या मार्गाने व परिणामकारकपणे योग्य ती कारवाई करून जागतिक प्रश्न शांततेने व न्याय तत्वावर आधारित सोडवून आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवणे.

२) परस्परांचे समान हक्क व न्याय तत्वे विचाराधीन ठेवून परस्परांमधील वाद मिटवून त्यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे.

३) मानवी हक्क व मुलभूत स्वातंत्र्य याबद्दलचा आदर वाढवून, माणसामाणसातील सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करून प्रत्येक राष्ट्रामधील मानवी हिताच्या समस्या व सामाजिक, आर्थिक समस्या सोडविणे.

४) ही सर्व उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात सुसंवाद निर्माण करून आंतरराष्ट्रीय संघटना या नात्याने सतत कार्यरत राहणे.

## ४.२.२.४ संयुक्त राष्ट्रसंघटनेची रचना/घटक संस्था

संयुक्त राष्ट्रसंघाच्या तत्वांची अंमलबजावणी करून, त्याच्या उद्दिष्टांची पूर्तता करून जागतिक शांतता प्रस्थापित करून ती टिकविण्यासाठी एकूण सहा घटक संस्था निर्माण करण्यात आल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत.

### १. **महासभा** (General Assembly)

युनोच्या प्रत्येक सभासद राष्ट्राला महासभेचे सदस्यत्व मिळते. ते आपले कमीतकमी ५ प्रतिनिधी महासभेत पाठवू शकतात. वर्षातून एकदा महासभेची बैठक बोलाविली जाते. जागतिक स्तरावर सामाजिक व आर्थिक सहकार्य वाढवण्याकरिता मार्गदर्शन करणे, जागतिक शांतता व सुरक्षितता कायम राखण्यासाठी योग्य ती उपाययोजना करणे, युनोच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणे, आंतरराष्ट्रीय कायद्यात विकास घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन देणे, युनोच्या सनदेत दुरुस्ती करणे, एखाद्या राष्ट्राला सदस्यत्व देणे, ते रद्द करणे किंवा निलंबित करणे इ. अनेक अधिकार महासभेला आहेत.

### २. **सुरक्षा समिती** (Security Council)

या समितीत ११ सदस्य असून सुरक्षा समिती म्हणजे युनोची कार्यकारी समिती होय. या समितीच्या

न्यूयॉर्कमध्ये वारंवार बैठका होतात. यामध्ये कायमस्वरूपी सदस्यत्व असणारी राष्ट्रे म्हणजे इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका व राष्ट्रवादी चीन (फार्मोसा), तर बाकीच्या सहा सभासदांसाठी महासभा दर दोन वर्षांनी निवडणूक घेते. या समितीचा निर्णय मान्य करणे ही सदस्य राष्ट्रांची नैतिक जबाबदारी असते. तसेच या समितीतील प्रत्येक स्थायी सदस्याला नकाराधिकार (veto) आहे.

सुरक्षा समितीचे सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकवून ठेवणे. याबाबतचे वार्षिक अहवाल महासभेला पाठवणे आवश्यक आहे. राष्ट्राराष्ट्रातील शस्त्रास्त्र स्पर्धा व लष्करी संघर्ष कमी करणे व ते संपवून त्यावर ठोस उपाय सुचविणे आणि त्याद्वारे जागतिक शांतता कायम राखणे इ. महत्वपूर्ण कार्ये सुरक्षा समितीला करावी लागत असल्याने निश्चितच महासभेच्या तुलनेत सुरक्षा समितीचे महत्व अधिक आहे.

### ३. **विश्वस्त समिती** (Trusteeship Council)

१ ल्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या राष्ट्रसंघातील मँडेट पद्धतीच्या धर्तीवर आधारित विश्वस्त समितीची योजना होती. यामध्ये एकूण १४ सभासद असतात, विश्वस्त समितीचे कार्य पाहण्यासाठी विश्वस्त प्रदेश म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. विश्वस्त प्रदेश म्हणजे पूर्वीच्या मँडेट पद्धतीखालील प्रदेश, दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी, जपान व इटली यांच्या सार्वभौमत्वाखालून मुक्त झालेले अविकसित प्रदेश, तसेच स्वच्छेने युनोच्या नियंत्रणाखाली दिले गेलेले प्रदेश होत. येथील जनतेच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास घडवून आणून त्यांची प्रगती करणे, आणि कालांतराने त्यांना स्वातंत्र्य व स्वयंशासन बहाल करणे हे विश्वस्त समितीचे प्रमुख कार्य होय. या प्रदेशांवर देखरेख ठेवून तेथील परिस्थितीचा अहवाल वेळोवेळी युनोकडे पाठवावा लागतो. या योजनेनुसार बड्या देशांनी तेथील कारभार केवळ विश्वस्त या नात्याने पहावयाचा आहे.

### ४. **सचिवालय** (Secretariate)

युनोचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी सचिवालयाची तरतूद आहे. त्याचे मुख्य कार्यालय न्यूयॉर्कमध्ये आहे. सचिवालयाच्या दैनंदिन कामकाजासाठी सुरक्षा समिती सरचिटणीसाची निवड करते तर सरचिटणीस सचिवालयातील इतर नोकरवर्गाची नेमणूक करतात. आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण झाल्यास अशा घटनांची माहिती तात्काळ सुरक्षा समितीला पाठवणे हे सचिवालयाचे काम आहे. महासभा, सुरक्षा समिती, विश्वस्त समिती व आर्थिक व सामाजिक समितीच्या बैठकांना सरचिटणीसाने हजर रहावे लागते.

### ५. **आर्थिक आणि सामाजिक समिती** (Economic & Social Council)

आर्थिक व सामाजिक प्रगती करणे, आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक व शैक्षणिक सलोखा वाढवणे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवणे इ. उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून या समितीची

योजना करण्यात आली. यामध्ये एकूण १८ सदस्य असून त्यांची निवडणूक दर तीन वर्षांनी महासभा करते. यातील १/३ सदस्य दर ३ वर्षांनी निवृत्त होवून त्याठिकाणी नवनिर्वाचित सदस्य येतात. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्नांचा अभ्यास करून त्याबद्दलचा सविस्तर अहवाल योग्य त्या कारवाईसाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेकडे पाठवणे. जगातील आर्थिक व सामाजिक विषमतेचा नायनाट केला तरच जगात शांतता टिकणे शक्य आहे, अशी युनोची खात्री झाल्याने या समितीची योजना केली गेली.

### ६. **आंतरराष्ट्रीय न्यायालय** (International Court of Justice)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना केली असून यातील न्यायधिशांची निवड महासभा व सुरक्षा समिती करते. या न्यायालयावर १५ न्यायाधिश असून त्यांची मुदत ९ वर्षे असते. तसेच त्यांची पुनर्नियुक्तीही होवू शकते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज हेच या ठिकाणी चालते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्यांना परस्परातील विवाद/कोणत्याही प्रकारचा आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा विवाद आंतरराष्ट्रीय न्यायालयात दाखल करता येतो. पण दोन्ही पक्षांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा अंतिम निकाल मान्य करणे बंधनकारक असते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या वरील सर्व घटकांबरोबरच त्याच्याशी संलग्न असलेल्या काही घटकही कार्यरत आहेत. उदा. जागतिक आरोग्य संघटना (WHO), जागतिक बँक (IBRD), आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), अन्न आणि शेतकी संघटना (FAO), शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (UNESCO), संयुक्त राष्ट्रांची व्यापार विकास परिषद (UNCTAD), संयुक्त राष्ट्रांचा बालक निधी (UNICEF), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF).

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या या रचनेनंतर आपणास त्याचे कार्य/जागतिक शांतता टिकविण्यासाठी १९५० पर्यंत संघटनेने दिलेले योगदान अभ्यासणे महत्वाचे आहे, ते खालीलप्रमाणे :-

## ४.२.२.५ संयुक्त राष्ट्रसंघटनेचे कार्य/जागतिक शांततेसाठीचे योगदान

### १. इराण –

संयुक्त राष्ट्रसंघटनेसमोर येणारा इराणचा प्रश्न हा १ला प्रश्न आहे. युद्धकाळात रशियाने इराणमध्ये ठेवलेले सैन्य हे युद्ध समाप्तीनंतरही तेथेच ठेवून रशिया इराणच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करीत आहे. अशी इराणने रशियाविरुद्ध तक्रार केली. पण रशियाने तो आरोप नाकारला. त्यावेळी सुरक्षा समितीने याबाबतीत योग्य ती कारवाई केल्याने रशियाने आपले सैन्य तेथून काढून घेतले. अशाप्रकारे युनोच्या माध्यमातून इराणचा प्रश्न निकाली निघाला.

## २. ग्रीक –

ग्रीकसंबंधी रशियाने अशी तक्रार केली की, ग्रीकमध्ये ब्रिटीश सैन्य ठेवणे म्हणजे तेथील शांतता भंग करणे आहे. पण प्रारंभी सुरक्षा समितीने याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर डिसेंबर १९४५ मध्ये स्वत: ग्रीकनेच अशी युनोकडे तक्रार केली की, ग्रीकच्या उत्तरेकडील राज्ये ग्रीक गनिमी टोळ्यांना आपल्याविरुध्द कुरघोड्या करण्यास प्रोत्साहन देत आहेत. त्यावेळी सुरक्षा समितीने त्या प्रश्नांचे गांभीर्य समजून घेवून एक चौकशी समिती नेमली. त्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही केवळ रशियाच्या विरोधामुळे या प्रश्नावर युनो ठोस निर्णय घेवू शकली नाही.

## ३. सीरिया–लेबॅनॉन –

सीरिया व लेबॅनॉनमध्ये ब्रिटीश आणि फ्रेंच फौजा होत्या. या फौजांमुळे आमच्या सार्वभौमत्वास व शांततेस धोका निर्माण होत आहे, अशी तक्रार सिरिया व लेबॅनॉन यांनी फेब्रुवारी १९४९ मध्ये युनोकडे तक्रार केली. यावेळी अमेरिका इंग्लंडच्या बाजूने उभी राहिली व तरीही अमेरिकेने केलेल्या ठरावावर रशियाने नकाराधिकार वापरून लवकरात लवकर हा प्रश्न सोडविला जावा, असा ठराव केला. दोन्ही ठराव सुरक्षा समितीने नाकारले असले तरी शेवटी केवळ २ महिन्यांच्या काळात फ्रान्सने सीरियातून तर इंग्लंडने लेबॅनॉनमधून आपल्या फौजा काढून घेतल्या व ही समस्या संपली.

## ४. इंडोनेशिया –

इंडोनेशिया ही पूर्वी डचांची वसाहत होती. पण दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी जपानने इंडोनेशियातून माघार घेतली. त्यावेळी तेथील राष्ट्रवादी नेत्यांना इंडोनेशियाचे स्वातंत्र्य जाहीर केले. पण हॉलंडने इंडोनेशियावर आक्रमण करून तेथे पुन्हा आपले सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. जानेवारी १९४६ मध्ये इंडोनेशियाने आपल्या स्वातंत्र्याचा प्रश्न युनोकडे नेला. यावेळी हा प्रश्न सोडवण्यासाठी युनोने इंडोनेशियाच्या वतीने ऑस्ट्रेलिया, हॉलंडच्या वतीने बेल्जियम आणि त्रयस्थ म्हणून अमेरिका यांचे मध्यस्थ मंडळ स्थापन केले, १९४८ मध्ये दोन्ही देशात शांतता करार झाला. तरीही हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे मध्यस्थ मंडळाचे रूपांतर नियंत्रण मंडळात झाले. शेवटी हॉलंडने इंडोनेशियाला सार्वभौम देणे मान्य केले. त्यामुळे इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न सुटला.

## ५. द. आफ्रिकेतील भारतीयांचा प्रश्न –

द. आफ्रिकेतील भारतीयांची युनोकडे जून १९४६ पासून अशी तक्रार आहे की, तेथील भारतीयांना वर्णद्वेषाला बळी पडावे लागते. पण द. आफ्रिकेच्या मते हा त्यांचा अंतर्गत प्रश्न असल्याने युनो त्यामध्ये हस्तक्षेप करू शकत नाही. पण युनोने ते मत नाकारून दोघांनीही परस्पर सामंजस्याने हा प्रश्न सोडविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार फेब्रुवारी १९५० मध्ये केपटाऊन येथे एक परिषद बोलावली, पण तीही आफ्रिकेतील

कडक कायद्यामुळे होवू शकली नाही. सर्वात खेदजनक बाब म्हणजे भारत प्रत्येक वर्षी युनोकडे हा प्रश्न मांडते, पण त्यावर काहीही तोडगा काढता आला नाही.

### ६. पॅलेस्टाईनचा प्रश्न –

एप्रिल १९४७ मध्ये हा प्रश्न इंग्लंडने युनोकडे आणला. पॅलेस्टाइन हा इंग्लंडचा विश्वस्त प्रदेश असल्याने इंग्लंडचे त्यावर नियंत्रण होते. आता इंग्लंडला ती व्यवस्था संपुष्टात आणली पाहिजे अशी इच्छा होती. त्यासाठी युनोने ११ सदस्यांची एक समिती नेमून तिच्याकडून यासंदर्भातील अहवाल मागवून घेतला. १६ मे १९४८ रोजी तेथील ब्रिटीशांची मुदत संपल्याने ज्यू लोकांनी इस्रायलच्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. परिणामी अरब सैन्य पॅलेस्टाईन यांच्यात युद्ध सुरू झाले. अशा परिस्थितीत युनोने सांगूनही दोन्ही पक्षाकडून युद्धबंदीचे पालन होत नव्हते. शेवटी जागतिक शांतता टिकविण्यासाठी युनोने बरेच प्रयत्न करून २४ फेब्रुवारी १९४९ मध्ये इस्त्रायल-इजिप्त युद्धबंदी करार घडवून आणला. तरीही युनोला आजपर्यंत या प्रदेशात कायमस्वरूपी शांतता निर्माण करता आली नाही.

### ७. कोरिया प्रश्न –

दुसऱ्या महायुद्ध काळात जेव्हा जपानचा आक्रमकवाद व विजयी घोडदौड चालू होती, तेव्हा अमेरिकेला आपला अलिप्ततावाद सोडून युद्धात भाग घ्यावा लागला होता. त्यावेळी रशिया व अमेरिकेने जपानचा पराभव करण्यासाठी कोरियाचे दोन भाग करून उत्तरेत रशियाने तर दक्षिणेत अमेरिकेने आपले सैन्य ठेवले. पण युद्धसमाप्तीनंतर त्यांनी ते सैन्य काढून घेणे बंधनकारक होते व कोरियाला स्वतंत्र करणे दोघांनाही बंधनकारक होते. पण रशियाने आपला शब्द पाळण्यास नकार दर्शविल्याने नाइलाजाने १९४७ मध्ये अमेरिकेला हा प्रश्न युनोमध्ये न्यावा लागला. त्यानंतरही रशियाने तेथील सैन्याला शस्त्रास्त्रे पूर्णपणे त्यातून १९५० मध्ये उत्तर कोरियाने द. कोरियावर हल्ला केला. या कठिण परिस्थितीत अमेरिकेच्या आवाहनानुसार जवळजवळ ३९ राष्ट्रांनी वेगवेगळ्या स्वरूपात द. कोरियात मदत देण्यास सुरुवात केली. कोरियाचा हा प्रश्न २७ जुलै १९५३ रोजी शस्त्रसंधी करार करून आणि ३८° अक्षांशावर उत्तर आणि द. कोरियाच्या सीमा निश्चित करून सोडविण्यात युनोला यश आले.

### ८. बर्लिन –

दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व जमिनीवर आणि पूर्व बर्लिन शहरावर रशियाचे तर पश्चिम जर्मनी आणि प. बर्लिनवर इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेचे नियंत्रण होते. या दोन्ही प्रदेशांवर एकमेकांनी दळणवळणासंबंधी अनेक नियंत्रणे घातली. त्यामुळे युद्धपरिस्थिती निर्माण होवून जागतिक शांतता भंग होईल या भीतीने इंग्लंड, फ्रान्स व अमेरिकेने या प्रश्नाकडे युनोचे लक्ष वेधले. तर रशियाची अशी भूमिका होती की, बर्लिनचा प्रश्न युनोच्या अधिकार क्षेत्रात येत नाही. रशियाने या प्रश्नात विरोधी भूमिका घेतली. शेवटी युनोतील तटस्थ राष्ट्रांच्या

मध्यस्थींमुळे असे ठरविण्यात आले की, १ मार्च १९४८ नंतर रशिया, अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स यांनी या प्रदेशावर घातलेली दळणवळणासंबंधीची नियंत्रणे मागे घ्यावीत. त्यानंतर ही परिस्थिती हळूहळू सुधारू लागली.

### ९. काश्मीर प्रश्न –

भारत ज्यावेळी स्वतंत्र झाला तेव्हा काश्मीरमध्ये ९०% जनता ही मुस्लिम होती, तर तेथील राजा हरिसिंग हा हिंदू होता. तेथील जनतेने भारतात की पाकिस्तानात सामील व्हायचे. हा स्वयंनिर्णय घेण्याचा अधिकार तेथील जनतेला दिलेला होता. पण तत्पूर्वीचे हरिसिंगाने दोन्ही देशांशी करार करून परिस्थिती जशाच तशी ठेवली. त्यातूनच काश्मीरचा प्रश्न निर्माण झाला. पाकिस्तानने आपल्या टोळ्या काश्मीर खोऱ्यात पाठविल्या. या बिकट परिस्थितीत स्वत:च्या बचावासाठी राजा हरिसिंगाने भारताकडे मदत मागितली. त्यानुसार भारताने तेथे लष्कर पाठविले आणि त्याचबरोबर १ जानेवारी १९४९ रोजी युनोकडे पाकिस्तानविरुध्द तक्रार केली. सुरक्षा समितीला यावेळी युद्धबंदी करण्यात यश आले असले तरी हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यास युनोला अपयश आलेले दिसते. त्यामुळेच तेव्हापासून आजपर्यंत मधूनमधून हा प्रश्न उफाळून येताना दिसतो.

अशा प्रकारे वरीलपैकी बहुतांश प्रश्नांवर तोडगा काढण्यात युनोला यश आले तर काही प्रश्न सोडविण्यात युनोला मर्यादित यश मिळाले. पण एकंदरीत विचार केल्यास युनोने कोणत्याही प्रश्नांत परिस्थिती हाताबाहेर जावू दिली नाही आणि त्यातून महायुद्धही होवू दिलेले नाही.

युनोचे खरे योगदान हे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील आहे. युनोच्या संलग्न संस्थांच्या मदतीने युनोने या क्षेत्रातील भरीव कार्याबरोबरच स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समान हक्क मिळण्यासाठी, शस्त्रास्त्र कपात, अणुशक्तीच्या प्रयोगांवरील नियंत्रण इ. बाबतीत उल्लेखनीय कार्य करून जागतिक शांतता प्रस्थापित करणे व ती टिकविणे यासाठी मोलाचे प्रयत्न केलेले आहेत. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघटनेला (युनो) ताकदवान बनविणे ही आज काळाची गरज आहे. कारण आज जवळजवळ १८५ सार्वभौम राष्ट्रे युनोचे सदस्य आहेत.

### ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

१. ............ ही आंतरराष्ट्रीय संघटना दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झाली.

*(अ) सार्क* *(ब) संयुक्त राष्ट्रसंघ* *(क) राष्ट्रसंघ* *(ड) डब्ल्यू.एच.ओ.*

२. संयुक्त राष्ट्रसंघाची (युनो) स्थापना ........... रोजी करण्यात आली.

*(अ) २४ ऑक्टोंबर १९४५* *(क) २४ ऑक्टोंबर १९३९*

*(ब) २४ ऑक्टोंबर १९४२* *(ड) २४ ऑक्टोंबर १९४०.*

३. ............ परिषदेत युनोची स्थापना करण्यात आली.

*(अ) जर्मनी* *(ब) लंडन* *(क) सॅन-फ्रॅन्सिस्को* *(ड) पॅरिस.*

४. ........... हा युनोच्या स्थापनेमागील महत्वाचा हेतू होता.

*(अ) जागतिक शांतता व सुव्यवस्था स्थापन करणे.*

*(ब) कृषी-औद्योगिक क्षेत्रात प्रगती करणे.*

*(क) अवकाश संशोधन करणे.*

*(ड) अण्वस्त्र निर्मिती करणे.*

५. युनोचे मुख्यालय .............. येथे आहे.

*(अ) पॅरिस* *(ब) बर्लिन* *(क) न्यूयॉर्क* *(ड) लंडन.*

## ४.२.३ शीत युध्दाचा उदय (Origin of Cold War)

१९३९-१९४५ मध्ये लढले गेलेले दुसरे महायुद्ध म्हणजे दोन जागतिक महासत्तांच्या उदयाचे मूळ कारण होते. कारण दुसऱ्या महायुद्धादरम्यान पाश्चिमात्य राष्ट्रे आणि रशिया म्हणजेच लोकशाही आणि साम्यवादी विचारसरणी यांच्यात परस्पर मतभेद दिसून येत होते. पण जर्मनीसारख्या हुकूमशाही राष्ट्रांचा पाडाव करण्याच्या ध्येयाने पछाडलेली लोकशाही व साम्यवादी राष्ट्रे नाइलाजाने आपले ऐक्य टिकवून होती. परिणामी जर्मनी व त्यांच्या मित्रराष्ट्रांचा पाडाव होवून हुकूमशाही संपुष्टात आली. पण त्यानंतर त्यांच्यात कोणत्याही प्रकारचे सख्य असलेले दिसून येत नाही. कारण रशिया आणि इंग्लंड-अमेरिका यांच्यातील मतभेद दिवसेंदिवस वाढतच होते. दुसऱ्या महायुद्धानंतर पराभूत जर्मनीचे व बर्लिन शहराचे विभाजन करून या दोन्हींचा पूर्व भाग रशियाने तर पश्चिम भाग इंग्लंड-अमेरिकेने घेतला. त्यामुळे पुन्हा या देशांनी आपआपल्या प्रदेशात दळणवळणाची जी बंधने लावली त्यावरून तयांच्यामध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. पण नुकत्याच विनाशकारी महायुद्धाचा अनुभव घेतलेल्या या राष्ट्रांनी प्रत्यक्ष रणांगणांवर शस्त्रांचे युद्ध करणे जाणीवपूर्वक टाळले. पण परस्परविरुद्ध विचारसरणीमुळे या दोन गटांमध्ये सत्तासंघर्ष धूमसत होता. रशिया आणि अमेरिका यांच्यात दुसऱ्या महायुद्धानंतर सत्तेसाठी सुरूअसलेला वैचारिक संघर्ष म्हणजेच 'शीतयुद्ध' (Cold War) असे म्हटले जाते.

'शीतयुद्ध' हा दुसऱ्या महायुद्धाचा जागतिक राजकारणावरील सर्वात मोठा परिणाम आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे जगाची विभागणी दोन परस्परविरुद्ध गटात झाली. म्हणूनच शीतयुद्ध म्हणजे काय? आणि शीतयुद्धाचा उगम कसा झाला/कोणते घटक त्याला जबाबदार होते याचा अभ्यास करणे/आढावा घेणे महत्वाचे आहे.

### ४.२.३.१ 'शीतयुध्द' म्हणजे काय?

शीतयुद्ध म्हणजे काय? याचे उत्तर शोधताना आपल्या असे लक्षात येते की, जगातील अनेक विचारवंतांनी आपआपल्या विचारसरणी, अभ्यास, मिळालेली संदर्भ साधने आणि अन्वयार्थ यांच्या आधारावर 'शीतयुद्धाची' व्याख्या अनेक प्रकारे केली आहे. पण शीतयुद्ध म्हणजे शस्त्रास्त्र-विरहित, युद्धविरहित वैचारिक संघर्ष होय. हा जवळजवळ सर्वांच्या व्याख्येतील समान घटक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रकर्षाने पुढे जागतिक पातळीवरील दोन गट एकमेकांवर सतत वरचढ होण्याचा प्रयत्न करत होते. त्यातून आपल्या गटाचे/विचारसरणीचे महत्व आणि ताकद वाढविण्यासाठी इतर राष्ट्रांना आपल्याकडे घेणे, एकमेकांना सतत अडचणीत आणण्याचा प्रयत्न करणे अशा गोष्टींमुळे जगात एकप्रकारे युद्ध सदृश परिस्थिती निर्माण होत असे. पण त्याचवेळी दोन्ही गटांना आता जाणीवपूर्वक युद्ध नको होते. त्यामुळे केवळ एकमेकांवर मात कशी करता येईल हाच प्रयत्न सतत चालू होता.

अनेक तज्ञांनी शीतयुद्धाच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या असल्या तरी 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम (१६ एप्रिल, १९४७) ज्या व्यक्तीने केला त्याचे नाव आहे बर्नार्ड बरुच (Bernard Baruch) त्यानंतर ही संज्ञा प्रो. वॉल्टर लिपमन (Prof. Walter Lippmann) यांनी आपल्या शीतयुद्धावरील पुस्तकातून लोकप्रिय केली. ते दोघेही अमेरिकन होते. त्यानंतर ही संज्ञा दुसऱ्या महायुद्धानंतरचे रशिया आणि अमेरिकेचे संबंध कसे होते याचे वर्णन करण्यासाठी वापरली गेली. शीतयुद्धाचा उगम कसा झाला हे अभ्यासण्यापूर्वी त्याच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पाहणे महत्त्वाचे आहे. त्या खालीलप्रमाणे :-

**१. आर. के. गॅरथॉफ (R. K. Garthoff) -**

"The conflict between the communist powers and rest of the world waged by means short of overt major War."

''महायुद्धामुळे उघडपणे पांगलेली राष्ट्रे व साम्यावादी संज्ञा यांच्यातील संघर्ष म्हणजे 'शीतयुद्ध' होय.''

**२. प्रो. यंग हंग किम (Prof. Young Hum Kim) -**

यांच्या मते, "Though the term cold war defines precise definition, it may be described as the international environment characterised by president tensions and conflicts between the free world and the communist camp in general and between the united states and the Soviet Union in particular. This new war of cold realatives in international politics has been waged in every connceivable field of internatinal life especially in national defence, economic growth, diplomacy & ideology."

शीतयुद्ध या संज्ञेद्वारे शीतयुद्धाचे तंतोतंत वर्णन करता येत नसले तरी त्याद्वारे आंतरराष्ट्रीय पातळीवरील साम्यवाद आणि मुक्त जग यांच्यातील आणि विशेषत: सोव्हीएत संघ आणि अमेरिका यांच्यातील संघर्षाचे वर्णन केले जावू शकते. जागतिक राजकारणातील थंड वास्तविकतांचे हे नवीन युद्ध आंतरराष्ट्रीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये आणि विशेषत: राष्ट्रीय संरक्षण, आर्थिक विकास, मुत्सद्देगिरी आणि विचारधारा यामध्ये केले गेले.

**३. एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानिका (Encyclopaedia of Britanica) -**

यामध्ये दिलेल्या व्याख्येनुसार शीतयुद्ध म्हणजे 'The loosely used to describe the power struggle with its political, diplomatic & ideological conflicts & Military threats, that arise after 1945 between the communist & the Western Democratic Capitalists Nations specially between Soviet Union & the United States.'

एनसायक्लोपिडीया ऑफ ब्रिटानियकानुसार '१९४५ नंतर साम्यवादी राष्ट्रे आणि पाश्चिमात्य लोकशाहीवादी भांडवलदार राष्ट्रे म्हणजेच मुख्यत: सोव्हिएत रशिया व अमेरिका यांच्यात एकमेकांना शह देण्यासाठी वैचारिक, राजकीय, कावेबाजपणा, लष्करवाद इ.च्या माध्यमातून झालेला संघर्ष म्हणजे शीतयुद्ध होय.'

वरील सर्व व्याख्यांवरून असे म्हणू शकतो की, शीतयुद्ध परस्परांवर मात करण्यासाठी 'शस्त्रास्त्र आणि युद्धविरहीत' सत्तासंघर्ष होय. ती ना युद्धाची अवस्था होती ना शांततेची. ती अस्वस्थ करणाऱ्या शांततेची अवस्था होती. त्याला आपण वैचारिक युद्ध, विशिष्ट विचारसरणीच्या प्रचाराचे युद्ध किंवा कुरघोड्यांचे/कूटनीतीचे युद्ध म्हणू शकतो. म्हणूनच आर. बर्नेट (R. Barnet) या अवस्थेला 'hot Peace' असे म्हणतात तर केनेडी (Kennedy) याचे वर्णन "hard & bitter peace" अशा शब्दात करतात. यावरून आपल्या लक्षात येते की, शीतयुद्धामुळे सर्व राष्ट्रांमध्ये शांतता असूनही कमालीची अस्वस्थतता होती, जी सर्वांनाच त्रासदायक होती.

### ४.२.३.२ शीतयुध्दाचा उगम

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर रशिया व अमेरिकेतील वैचारिक संघर्षाला शीतयुद्ध हे नाव मिळाले असले तरी दोन्ही देशातील हा वैचारिक संघर्ष महायुद्धादरम्यानही होता. म्हणूनच शीतयुद्धाचा उगम केव्हा व कसा झाला याचा अभ्यास करताना आपल्याला मतप्रवाह दिसतात. तज्ञ विचारवंत व इतिहास संशोधकांमध्ये याबद्दल मतभेद दिसून येतात.

शीतयुद्धाच्या उगमाबाबत एक मतप्रवाह असे म्हणतो की, शीतयुद्धाची सुरुवात ही १९१७ च्या रशियन क्रांतीमध्ये (Bolshevik Revolution) आहे, कारण या क्रांतीनंतर साम्यवादी विचारसरणीच्या

लोकांनी साम्यवाद हा केवळ रशियापुरता मर्यादित न ठेवता तो जगभर पसरवून भांडवलशाहीला शह देण्याचे व्यापक स्वप्न पाहिले व त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. त्यामुळे खऱ्या अर्थाने शीतयुद्धाचा उगम येथेच झाला.

शीतयुद्ध उगमाबाबतच्या दुसऱ्या मतप्रवाहानुसार दुसऱ्या महायुद्धामध्ये जर्मनीच्या वाढत्या हुकूमशाहीविरुध्द आणि आक्रमकतेविरुद्ध 'हुकूमशाहीचा' शेवट करणे' या समान हेतूने इंग्लंड-अमेरिका व रशिया इ. लोकशाहीवादी, भांडवलशाहीवादी व साम्यवादी राष्ट्रे परस्परांमध्ये मतभेद असूनही एकत्र आली. पण जर्मनीच्या पाडावानंतर त्यांच्यामध्ये कोणताही सलोखा राहिला नाही. परिणामी, त्यांच्यातील वैचारिक मतभेद आणखीनच तीव्र होऊन जग लोकशाहीवादी आणि साम्यवादी अशा गटांत विभागणले गेले. त्याचवेळी शीतयुदधाचा उगम झाला. महायुद्धांदरम्यानही या दोन्ही राष्ट्रांत मतभेद होते पण त्यांनी आपली सर्व शक्ती जर्मनीविरुद्ध एकवटल्याने त्याची तीव्रता लक्षात येण्याजोगी नव्हती. पण महायुद्ध समाप्तीनंतर रशिया-अमेरिका यांच्यातील परस्परांबद्दलचा द्वेष उफाळून आला. त्यांनी इतर राष्ट्रांशी करार करून त्यांना आपआपल्या गटात खेचण्याची जणू स्पर्धाच चालवली होती. त्या राष्ट्रांमध्ये कोणत्याही क्षणी युद्ध होवू शकेल अशी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण होवूनही कोणत्याच राष्ट्राला युद्ध नको होते.

शीतयुद्ध सुरू झाल्यानंतर लोकशाहीवादी पाश्चात्य राष्ट्रांना असे वाटू लागले की, जगातील कोणत्याही समाजवादी किंवा साम्यवादी चळवळी ह्या लोकशाहीला मारक आहेत. त्यामुळे वेळीच त्या चिरडल्या गेल्या पाहिजेत. या विचारातूनच अमेरिकेने ग्रीस ते व्हीएतनामपर्यंतच्या अशा सर्व चळवळी संपवण्याचा प्रयत्न केला.

## ❍ शीतयुद्धावेळी दोन गटातील संघर्ष वाढण्याची कारणे :-

१) पाश्चिमात्य लोकशाहीवादी राष्ट्रे म्हणजे शांततामय स्वातंत्र्य आणि पूर्वेकडील साम्यवादी राष्ट्रे म्हणजे हुकूमशाही, जुलूम, हिंसाचार, रक्तरंजित क्रांती मार्ग अशा पाश्चिमात्य राष्ट्रांच्या भावना.

२) दोन्ही राष्ट्रातील परस्परविरोधांमुळे यापुढे त्यांच्यात सहकार्य निर्माण होणे अशक्य असण्याची दोन्ही राष्ट्रांचे मत.

३) भविष्यात दोन्ही गटातील संघर्ष अटळ आहे, असा दोघांचाही समज. त्यामुळे युद्धाची दोन्ही पक्षांची तयारी.

४) रशियाच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याला वेळीच शह देण्यासाठी सर्व राष्ट्रांनी आपले लष्करी सामर्थ्य वाढवले पाहिजे, अशी निकड सर्वांना वाटू लागली.

वरील सर्व कारणांमुळे शीतयुद्धाचे स्वरूप अधिक तीव्र होत गेले.

### ४.२.३.३ शीतयुध्दाची कारणे

शीतयुद्धाचा उगम हा नेमक्या कोणत्या कारणांमुळे झाला याचे थोडक्यात विवेचन करणे आवश्यक आहे.

### १) दोन गटातील टोकाचे वैचारिक मतभेद –

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया यांच्यात म्हणजेच लोकशाहीवाद व साम्यवाद यांच्यातील वैचारिक मतभेद हे शीतयुद्धाचे सर्वात महत्त्वाचे कारण होते. तत्पूर्वीही पाश्चिमात्य राष्ट्रांनी रशियन राज्यक्रांतीला म्हणजेच साम्यवादाला कडाडून विरोध केला, पण तो अयशस्वी ठरला. त्यानंतर जर्मनी व इटलीने एकत्र येवून जेव्हा पाश्चिमात्य राष्ट्रांवर आक्रमण केले, तेव्हा जागतिक धोका ओळखून रशिया, इंग्लंड, अमेरिका एकत्र आले व त्यांनी जर्मनीचा पराभव केला. पण युद्धसमाप्तीनंतर त्यांच्यातील साम्यवादी आणि लोकशाहीवादी विचारसरणी यातील मतभेद तीव्र होवून शीतयुद्धाचा प्रारंभ झाला.

### २) पाश्चिमात्य आणि पूर्वेकडील राष्ट्रांमधील अविश्वासांची भावना –

दुसऱ्या महायुद्धात जर्मनीच्या विरोधात एकत्र आलेल्या इंग्लंड, अमेरिका व रशिया यांचा महायुद्धापूर्वी, युद्धकाळात आणि युद्धोत्तर काळातही एकमेकांवर विश्वास नव्हता. स्टॅलिनची अशी इच्छा होती की, दोस्त राष्ट्रांच्या सैन्याने पूर्वेकडे यावे अशी इच्छा होती. पण त्याला पाश्चिमात्य राष्ट्रे तयार नव्हती. म्हणजेच पूर्वेकडे आपली सर्व शक्ती खर्च करायला लावून आपले सामर्थ्य कमी करण्याचा दोस्त राष्ट्रांचा मानस आहे, अशी शंका स्टॅलिनला होती. अणुबॉम्बचे गुपितही अमेरिकेने कित्येक दिवस जगाला कळू दिले नव्हते. त्यामुळे रशिया–अमेरिका यांच्या अविश्वासाची भावना वाढीस लागली व शीतयुद्ध सुरू झाले.

### ३) तोकडा राष्ट्रवाद/राष्ट्रवादाचे बदलते स्वरूप –

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील प्रत्येक राष्ट्रामध्ये राष्ट्रवादाकडे बघण्याची दृष्टी बदलली. १९४५ नंतर दोन परस्परविरोधी प्रवृत्ती महासत्तांच्या स्वरूपात उदयाला आल्याने प्रत्येक प्रबळ राष्ट्राला सुरक्षिततेपोटी असे वाटू लागले की, आपल्याच विचारसरणीची राष्ट्रे आपल्या अवतीभोवती असावीत. स्टॅलिनने तसा प्रयत्न करून साम्यवादी राष्ट्रांची एक साखळीच निर्माण केली. पण अमेरिका व इंग्लंडला हे मान्य नसल्याने त्यांनी या 'समान विचारसरणीची राष्ट्रे एकत्र असोत' या कल्पनेला विरोध दर्शविला. स्टॅलिनच्या या धोरणामुळे युरोपचा पूर्व भाग रशियाच्या वर्चस्वाखाली आला. परिणामी शीतयुद्धाची तीव्रता पुढील काळात वाढतच गेली.

## ४) सत्तेतील द्विध्रुवीकरण (Bi-Polarisation) -

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात झालेला हा मोठा बदल होय. महायुद्धकाळात जर्मन-जपान-इटली ही मित्र राष्ट्रे तर इंग्लंड-अमेरिका-रशिया ही दोस्त राष्ट्रे असे दोन गट होते. युद्धात जर्मनीचा पूर्ण पाडाव झाला. इटलीतील हुकूमशाही संपली. त्यामुळे इटली, फ्रान्स, जपान व इंग्लंड ही राष्ट्रे युद्धोत्तर काळात पूर्णपणे दुर्बल झाली. त्यामुळे युरोपचे नेतृत्व त्यांच्याकडून निसटून युद्धानंतर सामर्थ्यशाली म्हणून राहिलेल्या दोन राष्ट्रांकडे म्हणजेच अमेरिका व रशियाकडे गेले. युद्धसमाप्तीनंतर जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी स्थापन केलेल्या युनोलाही न जुमानता या दोन्ही राष्ट्रातील सत्तासंघर्ष चालूच राहिला. त्यातून सत्तेचे द्विध्रुवीकरण घडून आले व शीतयुद्धास प्रारंभ झाला.

अशा रीतीने आपण येथे शीतयुद्ध म्हणजे काय? शीतयुद्धाच्या व्याख्या आणि शीतयुद्धाचा उगम, त्याची कारणे इ.चा सविस्तर अभ्यास केला.

## ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

१. 'शीतयुद्ध' ही संज्ञा सर्वप्रथम .............. या अमेरिकन मुत्सद्यांनी वापरली.

*(अ) प्रो. वॉल्टर लिपमन* *(क) विन्स्टन चर्चिल*

*(ब) बर्नार्ड बुरूच* *(ड) केनेडी.*

२. शीतयुद्धाची पहिली चुणूक आपल्याला ................. यांनी १९४६ मध्ये फुल्टन या ठिकाणी केलेल्या भाषणात दिसते.

*(अ) लेनीन* *(ब) केनेडी* *(क) स्टॅलिन* *(ड) विन्स्टन चर्चिल.*

३. ................ यांनी अमेरिका आणि रशिया यांच्यातील शीतयुद्धाचे वर्णन 'हार्ड ॲण्ड बिटर पीस' असे केले आहे.

*(अ) स्टॅलिन* *(ब) विन्स्टन चर्चिल* *(क) केनेडी* *(ड) रूझवेल्ट.*

४. दुसऱ्या महायुद्धानंतर जग ................. या दोन परस्परविरोधी गटांमध्ये विभागले गेले.

*(अ) चीन-भारत* *(क) अमेरिका-जर्मनी*

*(ब) रशिया-अमेरिका* *(ड) रशिया-जर्मनी.*

५. शीतयुद्ध म्हणजे .............. .

*(अ) प्रत्यक्ष रणांगणावरील युद्ध*

*(ब) शस्त्रास्त्र स्पर्धा* *(क) अण्वस्त्र स्पर्धा.*

*(ड) परस्परविरोधी वैचारिक गटातील शस्त्रविरहित संघर्ष.*

## ४.२.४ चीनमधील साम्यवादी क्रांती व तिचे जागतिक राजकारणावरील परिणाम

### ४.२.४.१ चीनची राजकीय पार्श्वभूमी –

चीनमध्ये १० ऑक्टोबर १९११ रोजी राष्ट्रवादी उठावाचा सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे तेथे १६४४ पासून अस्तित्वात असलेल्या मांचू घराण्याचा/राजवटीचा शेवट होय. डॉ. सन्-यत-सेन यांच्या संघटनेच्या प्रभावामुळे तेथील क्रांतीकारकांनी चिनी गणराज्याची घोषणा केली. १ जानेवारी १९१२ रोजी डॉ. सन्-यत्-सेन हे चीनी गणराज्याचे पहिले अध्यक्ष होते. परिणामी दक्षिणेत चीनी गणराज्य तर उत्तरेस मांचू घराणे अशी परिस्थिती निर्माण झाली. खरे पाहता १९११ च्या द. चीनमधील क्रांतीने उत्तरेतील मांचू राजवट हादरून गेली. त्यामुळे सेनापती युआन-शि-काई याने तेथे बऱ्याच सुधारणा करून चीनचे नेतृत्व स्वत:कडे येईल असे प्रयत्न सुरू केले. पण त्याचवेळी देशातील यादवी संपावी व पाश्चिमात्यांना धडा शिकवावा, त्यांना यादवीचा कोणताही फायदा मिळू द्यायचा नाही असे वाटत होते. त्यामुळे त्यांनी युआनला असे आवाहन केले की, त्याने उत्तरेतील मांचू घराण्याचा शेवट करावा, संपूर्ण चीनमध्ये एकाच प्रजासत्ताकाची घोषणा करावी व त्याचे अध्यक्षपदही स्वत:कडेच घ्यावे. त्याप्रमाणे युआनने या संधीचा फायदा घेवून चीनमध्ये प्रजासत्ताक स्थापनेची घोषणा केली. सत्ता हाती आल्यानंतर (१९१२ ते १९१६) युआन पाश्चिमात्यांना हाकलून लावेल असे लोकांना वाटत होते, पण तसे काहीही झाले नाही. परिणामी डॉ. सन-यत्-सेन यांना पुन्हा चीनचे नेतृत्व देणे व चीनचा विकास घडवून आणणे गरजेचे बनले. त्यासाठी आपल्याला डॉ. सन्-यत्-सेन यांचे त्यासाठीचे योगदान पाहणे आवश्यक आहे.

### ४.२.४.२ डॉ. सन्-यत्-सेन यांचे योगदान (नोव्हें.१८६६ ते मार्च १९२५) –

डॉ. सन्-यत्-सेन यांचा जन्म चु-युंग गावी गरीब शेतकरी कुटुंबात झाला. यांचे शिक्षण चीनबाहेर हवाई येथे झाले. सुरुवातीपासूनच त्यांचा ख्रिस्ती धर्मप्रचारकांशी संबंध आल्याने पुढे त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला. स्वत:ला राजकारणासाठी झोकून दिले. देशहितासाठी त्यांनी स्वत:हून युआन-शि-काईकडे नेतृत्व दिले. त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वामुळे त्यांना चीनी राष्ट्रवादाचा जनक म्हटले जाते.

पहिल्या महायुद्धानंतर चीनमध्ये मोठ्या प्रमाणात गोंधळ, अव्यवस्था व अंदाधुंदी निर्माण झाली. त्यातून चीनला बाहेर काढण्यामध्ये डॉ. सन्-यत्-सेन यांनी मोठी कामगिरी केली. १९२१ मध्ये ते दुसऱ्यांदा चीनी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष बनले. त्यांचे सुधारणावादी कार्य सुलभ होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १९१६ मध्ये झालेला युआन-शी-काईचा मृत्यू. त्याआधीच १९१३ मध्ये डॉ. सन्-यत्-सेन यांनी कॉमिंगटाँग पक्षाच्या मदतीने सत्ता घेतली होती. मांचू घराण्याचा शेवट करणे, चीनचा विकास घडवून आणणे, लोकशाही प्रस्थापित करणे, तेथील जनतेचे राहणीमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे इ. उद्दिष्ट्ये ठेवून त्यांनी या पक्षाची स्थापना केली होती. त्याद्वारे त्यांनी आधुनिक चीनची निर्मिती केली. पाश्चिमात्यांची हकालपट्टी

करून चीनमध्ये त्यांना साम्यवाद आणावयाचा होता. पण त्याचवेळी प्रजासत्ताकाबाबत त्यांचे मत स्पष्ट दिसत नाही. पण रशियन सल्लागार बोरोडीन यांच्या मदतीने कॉमिंगटॉम पक्षाची पुनर्रचना करण्याचे काम चालू असतानाच १९२५ मध्ये डॉ. सन्-यत्-सेन यांचा मृत्यू झाला. त्यांच्यानंतर चँग-के-शेक यांच्याकडे सत्तेची सूत्रे आली.

## ४.२.४.३ चँग-कै-शेकची राजवट

इ.स. १८८७ मध्ये चँग-कियाँग-प्रांतात चँग-कै-शेक यांचा जन्म एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. ते लष्करी शिक्षणात निपुण असून जपानमध्ये असताना ते प्रजासत्ताकवादी बनले. १९११ च्या राष्ट्रीय क्रांतीनंतर युआन-शि-काईने चीनची सत्ता हाती घेतली. त्यावेळी चँक-कै-शेक चीनमध्ये होते. तेव्हा त्यांनी डॉ. सन्-यत्-सेन यांच्याशी ओळख झाली. १९११ च्या क्रांतीमध्ये, त्यानंतर कॉमिंगटाँग पक्षाच्या पुर्नरचनेच्यावेळी चँक-कै-शेक यांनी डॉ. सन्-यत्-सेन यांना भरपूर मदत केलेली होती. चँग-कै-शेक यांनी सन १६२३ मध्ये रशियातून लष्करी शिक्षण घेतले होते. त्यानंतर ते कॉमिंगटाँग पक्षाचे सेनापती बनले असले तरी त्यांना चीनमधील साम्यवादाविषयी फारसे सख्य वाटत नव्हते. ते तेथील राष्ट्रीय पक्षाचे नेते बनले. दरम्यान १९२५ मध्ये डॉ. सन्-यत्-सेन यांचा मृत्यू झाला. कॉमिंगटाँग पक्षात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. यावेळी रशियन सल्लागार मायकेल बोरोडीन चीनमध्येच होते. चँग-कै-शेकला बोरोडीन व साम्यवादी पक्षाच्या मदतीने सत्ता काबीज करावयाची होती. तर बोरोडीनला चँग-कै-शेकच्या मदतीने चीनमध्ये साम्यवाद आणावयाचा होता. त्यातून चीनमध्ये राष्ट्रीय व साम्यवादी गट यांच्यात संघर्ष निर्माण होवून यादवी युद्ध झाले. यामध्ये चँक-कै-शेक विजयी होवून त्यांनी दक्षिण चीनवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व नानकिंग येथे वेगळे सरकार स्थापन केले.

## ४.२.४.४ माओ-त्से-तुंग

माओ-त्से-तुंग यांचा जन्म १८९३ मध्ये हुनान प्रांतात झाला. बालपणापासूनच त्यांना वाचनाची अतिशय आवड होती. त्यांनी तुंग-शान येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. तेथेच ते पाश्चिमात्यांच्या लिखाणाने आणि मार्क्सच्या विचारसरणीने प्रभावित झाले. चीनमधील १९११ च्या राष्ट्रीय क्रांतीत भाग घेतला. चांगशा येथे शिक्षण घेत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना संघटित करून लोकप्रियता मिळवली. अशाप्रकारे ते संघटक, मार्गदर्शक म्हणून उदयास आले.

## ४.२.४.५ चीनमधील साम्यवादी पक्षाची स्थापना

माओ-त्से-तुंग यांनी शिक्षण पूर्ण होताच पेकिंग विद्यापीठाच्या ग्रंथालयात लिपीक म्हणून रुजू झाले. पण तेथे त्यांचे मन रमत नसल्याने पुन्हा ते हुमान प्रांतातील विद्यार्थी चळवळीत सक्रिय झाले. तेथील वास्तव्याच्या काळात त्यांचा बऱ्याच बुद्धीजीवी लोकांशी संपर्क झाला त्यातूनच त्यांना तेवढ्यात

साम्यवादी पक्ष स्थापन करण्याची कल्पना सुचली. त्यातूनच १९२१ मध्ये शांघाय येथे माओ-त्से-तुंग यांनी 'चीनी साम्यवादी' पक्षाची स्थापना केली.

### ४.२.४.६ कॉमिंगटाँग पक्षाच्या राष्ट्रीय व साम्यवादी गटातील मतभेद व चँग-कै-शेकची भूमिका

चँग-कै-शेक हा चीनमधील साम्यवादाचा कट्टर विरोधक होता. कॉमिंगटाँग पक्षातील राष्ट्रीय व साम्यवादी गट यांचीच विचारसरणी भिन्न असल्याने १९२०-३० दरम्यान हे मतभेद बनले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९२७ मध्ये मायकेल बोरोडीन रशियात परतल्यानंतर चँग-के-शेक ने या पक्षात शुद्धीकरणाची मोहीम सुरू केली. त्यानुसार त्यांनी मोठया संख्येने साम्यवाद्यांची या पक्षातून हकालपट्टी केली. चीनमधील साम्यवादी विचारसरणीची मुळे उपटून काढून त्या विचारसरणीच्या क्रांतीकारकांना संपविण्यात आले. याचा परिणाम म्हणजे चीनकडे भांडवलशाही राष्ट्रे आकृष्ट झाली, चीनमध्ये अंतर्गत गोंधळ वाढला, चँग सर्व परिस्थिती हाताळण्यास असमर्थ ठरले. त्यातूनच १९३१ मध्ये जपानने चीनवर आक्रमण केले. चँगने याबाबतीत कोणतेच गांभीर्य दाखवले नाही. त्यातूनच साम्यवादी गटाला कार्य करणे/आपले संघटन करणे, त्यासाठी वाव मिळाला. परिणामी साम्यवादी विचारसरणीच्या अनेक संघटना चीनमध्ये उदयाला आल्या. त्यांचे नेतृत्व होते माओ-त्से-तुंग या साम्यवादी नेत्याकडे जाते. कियाँली प्रांतात पहिले साम्यवादी राज्य स्थापन करून चँग-कै-शेकला संपविण्याचा प्रयत्न केला. पण ते प्रयत्न अयशस्वी झाले आणि माओ-त्से-तुंगला उत्तरेत जावे लागले.

### ४.२.४.७ चीनमधील साम्यवादी क्रांती

- **साम्यवाद्यांचा दीर्घकालीन मोर्चा -**

चँग-कै-शेकच्या जुलमी राजवटीमुळे माओ-त्से-तुंग आणि त्यांच्या अनुयायांना (साम्यवादी). चीनच्या द. भागातून उत्तरेकडे प्रस्थान करावे लागले. ही घटना जागतिक इतिहासामध्ये खूप महत्त्वपूर्ण समजली जाते. कारण चँग-कै-शेकच्या अन्यायी व असहकाराच्या भूमिकेमुळे चीनी लोकांमध्ये साम्यवादी विचारसरणीविषयी व माओ-त्से-तुंगच्या चीनसंबंधीच्या ध्येय-धोरणांविषयी मोठ्या प्रमाणात जागृती घडून आली. या प्रवासामध्ये साम्यवादी अनुयायांनी वर्षभरात जवळजवळ सहा हजार मैलांचे अंतर पार केले होते आणि तेही चीनमधील चँग-कै-शेक (राष्ट्रीय सैन्य) यांच्या सैन्यांचे होणारे जाचक हल्ले सहन करत. या खडतर प्रवासातून अंतिमत: केवळ वीस हजार सैन्य उत्तरेत पोहचू शकले. तेथे पोहोचल्यानंतर माओ-त्से-तुंग यांनी शेन्सीच्या डोंगराळ प्रदेशातील येनान या ठिकाणाहून आपल्या चळवळीची सूत्रे चालू ठेवली. येनान हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण होते. माओ यांचे दक्षिणेतून उत्तरेकडे झालेले प्रस्थान आणि त्यांचे तत्वज्ञान यामुळे चीनमध्ये जी जाणीव-जागृती निर्माण झाली, त्यामध्येच आपल्याला तेथील साम्यवादी क्रांतीची बीजे

पहावयास मिळतात. चीनच्या इतिहासात माओ आणि त्यांच्या अनुयायांच्या या स्थलांतरास साम्यवाद्याची दीर्घकालीन वाटचाल (Longmarch) असे म्हटले जाते.

### ४.२.४.८ जपानचे चीनवरील आक्रमण

दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी म्हणजे १९३७ मध्ये जपानने चीनमधील अंतर्गत यादवीचा फायदा घेवून १९३१ नंतर पुन्हा एकदा चीनवर आक्रमण केले. यावेळी मात्र हे बाह्य आक्रमण थोपविण्यासाठी साम्यवादी व कॉमिंगटाँग पक्षांनी एकत्र यावे असा निर्णय घेवून दोन्ही पक्षांनी एकत्रितपणे आक्रमणास विरोध केला. पण त्यांच्यातील हा सलोखा कायमस्वरूपी नव्हता. परिणामी युद्धाच्या शेवटी त्यांच्यातील मतभेद तीव्र झाले. त्यातून १९४६ ते १९४९ या काळात यादवी युद्ध झाले. या युद्धाचा परिणाम म्हणजे चीनमधील 'साम्यवादी क्रांती' होय.

सुरूवातीच्या काही वर्षांमध्ये रशियन साम्यवादी सल्लागारांचे या पक्षावर खूप वर्चस्व होते. पण १९३५ नंतर माओ-त्से-तुंग यांनी या पक्षावर नियंत्रण प्रस्थापित करून साम्यवादी पक्षाला स्थैर्य मिळवून दिले. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर म्हणजे १९४९ मध्ये चीनमध्ये माओ-त्से-तुंग यांच्या मार्गदर्शनाखाली साम्यवादी क्रांती घडून आली.

### ४.२.४.९ दुसरे महायुद्ध आणि चीनमधील साम्यवादी क्रांती

जपानच्या चीनवरील आक्रमणाच्यावेळी 'कॉमिंगटाँग' व राष्ट्रीय पक्ष यांच्यात सहकार्य निर्माण झाले. त्यामुळे चीनमधील साम्यवादी पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली. या सहकार्यामुळे त्यांना जपानी आक्रमण थोपवता आले ही पहिली जमेची बाजू तर दुसरी जमेची बाजू म्हणजे या सहकार्याचा फायदा घेवून माओ-त्से-तुंग यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने चीनमध्ये साम्यवादी विचारसरणीचे पाय घट्ट रोवले. शेतकरी व कामगारांच्या सहकार्याने साम्यवादी पक्षाने समाजकार्य करून मोठ्या प्रमाणात लोकांचा पाठिंबा मिळवून साम्यवादी चळवळीमध्ये लोकसहभाग वाढविला. त्यातूनच चीनमध्ये साम्यवादी क्रांती घडून आली.

१९३९ च्या दुसऱ्या महायुद्धाचे विनाशकारी परिणाम सर्व जग अनुभवत असतानाच चीनलाही त्याचे चटके बसणे साहजिकच होते. त्यामुळे या परिणामांना चीन अपवाद नव्हते. १९३७ मध्ये जपानने चीनवर हल्ला केला. त्यानंतर पूर्वीचे मतभेद विसरून चँग-कै-शेक व माओ-त्से-तुंग म्हणजेच राष्ट्रीय पक्ष व कोमिंगटाँग पक्ष एकत्र आले. पण त्यांचे ऐक्य शेवटपर्यंत न टिकू शकल्याने दुसऱ्या महायुद्धादरम्यान व नंतरच्या काळात उद्भवलेल्या समस्यांना तोंड देणे/त्या सोडवणे कॉमिंगटाँग पक्षाला जमले नाही. परिणामी या पक्षाच्या सैन्याला कोठेही यश मिळू शकले नाही. दरम्यान राष्ट्रीय पक्ष व कॉमिंगटाँग पक्षातील मतभेद वाढत गेले. त्याचा फायदा जपानला झाला. या दुफळीचा फायदा उठवून जपानने 'कोमिंगटाँग पक्षाच्या खऱ्या अनुयायांचे सरकार' स्थापन केले.

१९४५ मध्ये जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती स्वीकारली. त्याचा चीनवर मोठा परिणाम झाला. कारण त्यापूर्वी चीनमधील कॉमिंगटाँग व साम्यवादी पक्ष हे जपानविरुध्द एकत्र आले होते, पण जपानच्या शरणागतीनंतर त्यांच्यातील सहकार्य संपुष्टात आले, त्यांच्यातील मतभेद वाढत गेले. परिणामी चीनमध्ये १९४५-१९४९ या दरम्यान यादवी युद्ध सुरू राहिले. १ ऑक्टोबर १९४९ रोजी माओ-त्से-तुंग यांच्या यशाने चीनमधील यादवी युद्धांचा शेवट झाला. माओ यांनी लोकांचे प्रजासत्ताक स्थापन केले. अशा प्रकारे चीनमध्ये माओ-त्से-तुंग यांना आणि त्यांच्या साम्यवादी अनुयायांना भरघोस यश मिळून तेथे साम्यवादी क्रांतीने यश मिळवले.

या साम्यवादी क्रांतीनंतर साम्यवादी चीनने सर्वांच्या नजरेत येण्यासारखी प्रगती केलेली दिसून येते. दारिद्र्य, बेरोजगारी, इतर क्षेत्रातील मागासलेपण दूर होवून बरेचशे अंतर्गत प्रश्न मार्गी लागले. जागतिक पातळीवरील नेतृत्व स्वीकारण्याचे सामर्थ्यही चीनमध्ये आले हे त्यांच्या परराष्ट्र धोरणांवरून स्पष्ट होते.

साम्यवादी क्रांतीच्या यशानंतर चँक-कै-शेक यांच्यावर काय परिणाम झाला, हे पाहणेही आवश्यक आहे. या क्रांतीनंतर १९५० मध्ये चँक-कै-शेक यांना चीनमधील सत्ता सोडावी लागली. तेथून स्थलांतर केलयानंतर चँक-कै-शेक यांनी तैवान या ठिकाणी राष्ट्रीय सरकार स्थापन केले. एकंदरीत या साम्यवादी क्रांतीच्या यशाचा विचार केल्यास असे निदर्शनास येते की, दुसऱ्या महायुद्धानंतर चँग-कै-शेकला युद्धोत्तर समस्या सोडविण्यात आलेले अपयश आणि माओ-त्से-तुंग व साम्यवादी पक्षाने या सर्व परिस्थितीचा घेतलेला फायदा यातूनच साम्यवादी क्रांती यशस्वी होवू शकली.

### ४.२.४.१० चीनमधील साम्यवादी क्रांतीचा जागतिक राजकारणावर झालेला परिणाम

१९४९ च्या चीनमधील क्रांतीने तेथे लोकांचे प्रजासत्ताक स्थापन झाले. या प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर तेथील लोकांमध्ये आत्मविश्वास वाढला, उत्साह आणि उर्मी यांचा संचार होवून त्यांची प्रगतीकडे वाटचाल सुरू झाली. त्यांची अंतर्गत आणि परराष्ट्रीय धारेणे विकासाच्यादृष्टीने परिणामकारक ठरू लागली. एकंदरीत या क्रांतीने चीन हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले लष्करी सामर्थ्य आणि अंतर्गत विकास यांच्या जोरावर महत्वाचे राष्ट्र म्हणून उदयाला आले.

### ❍ सोव्हिएत युनियन व चीन -

१९४९ मध्ये चँग-कै-शेकने चीनची सत्ता सोडल्यानंतर तेथे साम्यवादी सत्ता स्थापन झाली. त्यांच्या सरकारने पेकिंग मधील त्यांच्या मुख्यालयातून प्रशासनाची सर्व सूत्रे हालविण्यास प्रारंभ केला. या त्यांच्या प्रारंभीच्या काळात सोव्हिएत रशियाने त्यांना मोठ्या प्रमाणात लष्करी व आर्थिक मदत केली. १४ एप्रिल १९५० मध्ये त्यांच्यामध्ये मैत्रीचा करार झाला. ("Treaty regarding friendship, Alliance and Mutual Aid between the Soviet, Socialist, Republic and Chinese people's Republic.") या करारामध्ये

दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी सहकार्य देण्याची तयारी ठेवावी, दोन्ही देशांनी जपान व जपानशी संबंधित राष्ट्रांवर संतापाच्या भावना/कुरापती/सूडभावना संपवून शांततेचा भंग होणार नाही. यासाठी उपाययोजना करणे/याची काळजी घेणे, या कराराच्या कलम ५ नुसार प्रत्येक राष्ट्राला सार्वभौमत्वाची खात्री असेल इ. महत्त्वाच्या अटी नमूद केलेल्या होत्या. रशिया आणि चीन यांनी परस्परातील आर्थिक व सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर परस्परांना मदत देण्याचे मान्य केले. रशियाने पूर्व युरोपात चीनला बऱ्याच सवलती दिल्या होत्या. या करारानुसार रशिया व चीन यांच्या संयुक्त व्यवस्थापनाने (५०% रशियन, ५०% चीनी) जवळजवळ १४१ उपक्रम राबविले. हजारो चीनी विद्यार्थी रशियातील विद्यापीठात प्रशिक्षणासाठी गेले. रशियाच्या मदतीने चीनी लष्कर अद्ययावत करण्यात आले. पण हा करार १९५३ नंतर संपुष्टात आल्याचे दिसते. तो फार काळ टिकू शकला नाही. कारण सोव्हिएत युनियन एक युरो आशियाई सत्ता आहे तर चीन फक्त एक आशियाई सत्ता. त्यामुळे दोघांचेही हित भिन्न-भिन्न उद्देशांमध्ये होते, त्यामुळे त्यांच्यात संघर्ष हा अटळ होता. रशियाचे दक्षिण-पूर्व आशियावरील वर्चस्व चीनला कदापि मान्य नव्हते, तर दक्षिण-पूर्व आशिया आणि तशाच प्रकारचे इतर प्रस्ताव रशियाला मान्य होण्यासारखे नव्हते. परिणामी, दोघांमध्ये वैचारिक मतभेद दिसू लागले. ख्रुश्चेव सत्तेत आल्यानंतर त्याने भांडवलवाद आणि समाजवाद यांच्यात शांततापूर्ण सह-अस्तित्वाचे नवीन धोरण स्विकारले. कारण त्याचा असा विश्वास होता की, स्पर्धेत साम्यवादी हे भांडवलशाहीला मात देऊ शकतात. तो परमाणू युद्धाचा धोका पत्करण्यास तयार नव्हता. त्यामुळे माओ-त्से-तुंग आणि चाऊ-एन-लाई यांच्या नेतृत्वाखाली चीनने रशियाच्या या धोरणाला विरोध दर्शविला. कारण चीनी नेत्यांचा क्रांतीचा मार्ग स्विकारून भांडवलशाही संपविण्यावर विश्वास होता.

## ❍ युनायटेड स्टेटस् आणि चीन –

१९४९ मध्ये अमेरिकेची मदत मिळूनही चँग-कै-शेक यांना चीनची मुख्य भूमी सोडून फार्मोसा (तैवान) येथे आश्रय घ्यावा लागला. पण त्यानंतरही साम्यवाद्यांना फार्मोसा ताब्यात घेवून पूर्ण विजय मिळवायचा होता. त्यावेळी अमेरिका चँग-कै-शेक च्या बाजूने साम्यवाद्यांच्या विरोधात उभे राहिले. १९५० मध्ये चीनी साम्यवादी फार्मोसावर हल्ला करण्यास तयार होते. यावेळी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रूमन यांनी फर्मोसाला लष्करी मदत (seventh feet) पाठवून दिली. परिणामी साम्यावाद्यांनी फार्मोसावर हल्ला केला नाही आणि चँक-कै-शेकनेही चीनच्या मुख्य भूमीवर हल्ला केला नाही. ही अवस्था १९५३ पर्यंत जशाच तसे होती. जानेवारी १९५३ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी पूर्वीच्या ट्रूमन यांनी काढलेला आदेश रद्द करून आपले लष्कर चीनमधून काढून घेण्याचा आदेश दिला. यापुढे त्यांना अमेरिकेचे संरक्षण कवच राहणार नव्हते. त्यामुळे राष्ट्रीय चीनला आता चीनच्या मुख्य भुमीवर आणि साम्यवादी चीनला फार्मोसावर हल्ला करण्याचे स्वातंत्र्य मिळाले. राष्ट्राध्यक्ष आयसेन हॉवर यांची अशी भूमिका होती की, अमेरिकन नौदलाने यापुढे चीनच्या संरक्षणासाठी काम करू नये. अशा परिस्थितीत चीनचे पंतप्रधान चाऊ-

एन-लाइ यांनी अमेरिकेला आव्हान दिले की, त्यांच्या मदतीशिवायही आम्ही फार्मोसा वाचवू शकलो आणि स्वातंत्र्य मिळवू शकलो. अमेरिकेने हे आव्हान स्वीकारले. त्यानंतर कित्येकदा साम्यवादी चीनने हल्ले करून फार्मोसा घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना ते शक्य झाले नाही. त्यानंतर अमेरिकेने एक लष्करी करार करून चँग-कै-शेक ना कळविले की, फार्मोसावर हल्ला झाल्यास ते त्यांच्या मदतीला येतील. या करारामुळे साम्यवादी चीनच्या असे लक्षात आले की, फार्मोसावर हल्ला म्हणजे अमेरिकेशी युद्ध-अमेरिकेशी युद्ध करणे म्हणजे एक जुगार आहे आणि तो साम्यवादी चीन व रशियाला परवडण्यासारखा नव्हता त्यामुळे कोणीही तसे धाडस केले नाही.

१९५० च्या कोरियन युद्धाच्या वेळी अमेरिकेने दक्षिण कोरियाला मदत केली होती. या दरम्यान उत्तर कोरिया आक्रमक असल्याचा ठराव अमेरिकेने केला. या परिस्थितीत साम्यवादी चीनने प्रत्यक्षपणे तर रशियाने अप्रत्यक्षपणे उत्तर कोरियाला मदत केली. परिणामी, अमेरिका व चीनमध्ये कोणत्याही क्षणी युद्ध होण्याची शक्यता निर्माण झाली. तथापि, जनरल मॅक ऑर्थरला ३८वे पॅरलल पार करण्याची परवानगी नव्हती आणि त्याला अमेरिकेच्या प्रभुत्वाखालून काढून टाकण्यात आले. कोरियन युद्धात अमेरिकेने अशा प्रकारची भूमिका पार पाडली.

१९४९ नंतर अमेरिकेने काही काळाने चीनचा पाठिंबा काढून घेतला. परिणामी चँग-कै-शेक च्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय सरकार ग्राह्य धरले गेले. अमेरिका-चीनमध्ये सलोखा असेपर्यंत (१९७१ पर्यंत) फार्मोसा युनोच्या सुरक्षा समितीचा कायम सभासद राहिला आहे. अमेरिका फार्मोसाला पाठिंबा देत होते, तर त्याचवेळी रशिया साम्यवादी चीनला पाठिंबा देत होते. त्यातूनच चीन हे शितयुद्धाचा एक भाग राहिले.

अशा प्रकारे १९४९ च्या चीनमधील साम्यवादी क्रांतीचा या-ना-त्या कारणाने जागतिक राजकारणावर परिणाम दिसून येतो.

## ❍ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४

१. १९११ च्या चीनमधील क्रांतीचे नेते ............. हे होते.

*(अ) सन्-यत्-सेन* *(क) लो-युवान वांग*

*(ब) युआन-शी-काई* *(ड) ली हुडको.*

२. चीनमधील क्रांतीचा परिणाम म्हणून ........... या घराण्याचा शेवट झाला.

*(अ) सेन घराणे* *(ब) वांग घराणे* *(क) मांचु घराणे* *(ड) युआन घराणे.*

३. सन-यत्-सेन यांच्या मृत्युनंतर ......... हे चीनमधील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी बनले.

*(अ) लो-चुवान वांग* *(क) चँग-कै-शेक*

*(ब) माओ-त्से-तुंग* *(ड) युआन-शी-काई.*

४. चीनमधील साम्यवादी पक्षाची स्थापना शांघाय येथे ........... मध्ये झाली.

*(अ) १९११* *(ब) १९२१* *(क) १९३१* *(ड) १९४१.*

५. चीनमध्ये ............. रोजी माओ-त्से-तुंग यांच्या अध्यक्षतेखाली 'लोकांचे प्रजासत्ताक' प्रस्थापित झाले.

*(अ) १ ऑक्टोबर १९४९* *(क) ५ नोव्हेंबर १९४९*

*(ब) २ ऑक्टोबर १९४८* *(ड) ७ डिसेंबर १९४९.*

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

**१. ज्यू** – इस्राइलमधील मूळ जमात.

**२. फॅसिझम** – समाजसत्तावादीविरोधी आक्रमक राष्ट्रवादी पंथाची तत्वे व घटना (an authontanan & nationalistic rightwing system of government & social organization.)

**३. मॅजिनो तटबंदी** – स्वत:च्या संरक्षणासाठी संपूर्ण फ्रँको-जर्मन सीमेवर फ्रान्स युद्धमंत्री आंद्रे मजिनो यांच्या नावे १९२९ मध्ये ही तटबंदी बांधण्यात आली. ती आलक्ष पर्वत ते माँतमीदपर्यंत होती.

**४. क्रीटबेट** – भूमध्य समुद्राच्या साधारणत: मध्यावर असलेल्या बेटांना क्रीट बेटे म्हणून ओळखले जाते. त्याची लांबी सुमारे १५० मैल तर रुंदी ७।। ते १५ मैल असून ग्रीसपासून ते १०० तर इजिप्तपासून २५० मैलावर आहे.

**५. आफ्रिका कोअर** – हिटलरनी आफ्रिकेत पाठविलेले सैन्य पुढे 'आफ्रिका कोअर' या नावाने गाजले.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❍ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. *(ब) २८ जून १९१९.*

२. *(ड) मुसोलिनी.*

३. *(क) १९३९-१९४५.*

४. *(अ) हुकूमशाही.*

५. *(ब) १ सप्टेंबर १९३९.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

  १. *(ब) संयुक्त राष्ट्रसंघ.*

  २. *(अ) २४ ऑक्टोंबर १९४५.*

  ३. *(क) सॅन-फ्रॅन्सिस्को.*

  ४. *(अ) जागतिक शांतता व सुव्यवस्था स्थापन करणे.*

  ५. *(क) न्यूयॉर्क.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

  १. *(ब) बर्नार्ड बुरूच.*

  २. *(ड) विन्स्टन चर्चिल.*

  ३. *(क) केनेडी.*

  ४. *(ब) रशिया-अमेरिका.*

  ५. *(ड) परस्परविरोधी वैचारिक गटातील शस्त्रविरहित संघर्ष.*

- **स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे**

  १. *(अ) सन्-यत्-सेन.*

  २. *(क) मांचु घराणे.*

  ३. *(क) चँग-कै-शेक.*

  ४. *(ब) १९२१.*

  ५. *(अ) १ ऑक्टोबर १९४९.*

## ४.५ सारांश

या प्रकरणामध्ये आपण ज्या मूल्यांचा अभ्यास केला त्यावरून आपणास दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी काय होती याचे आकलन झाले. त्याचबरोबर दुसऱ्या महायुद्धकाळात जगातील जवळजवळ सर्वच राष्ट्रे कोणत्या ना कोणत्या कारणाने महायुद्धात खेचली गेली, त्यांच्यातील संघर्षाचे स्वरूप कसे होते, त्यांच्यात कोणते करार झाले यांचा आपण अभ्यास केला. तसेच महायुद्धानंतर या राष्ट्रांच्या परस्परसंबंधावर, जागतिक राजकारणावर झालेल्या परिणामांचे स्वरूप आपणास कळाले. दुसऱ्या महायुद्धानंतर उद्भवलेले शीतयुद्ध म्हणजे काय? त्याचा उगम या गोष्टींबरोबरच त्याच्या कारणांचीही येथे चर्चा करण्यात आली.

याशिवाय चीनमधील १९४९ ची साम्यवादी क्रांतीची कारणे, तेथील नेत्यांचे कार्य/भूमिका काय होती आणि चीनमधील साम्यवादी क्रांतीचे जागतिक राजकारणावर झालेले परिणाम यांची सांगोपांग चर्चा येथे केली गेली, त्यातून दुसरे महायुद्ध आणि त्यानंतर १९५० पर्यंत जागतिक राजकारणावर झालेले परिणाम यांची सविस्तर चर्चा आपण या प्रकरणात केली.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. दुसऱ्या महायुद्धाची कारणे सांगा.

२. दुसऱ्या महायुद्धाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामांची चर्चा करा.

४. युनोच्या स्थापनेची कारणे सांगून तिचे योगदान स्पष्ट करा.

५. 'जागतिक शांतता' ही संकल्पना तयार करा व युनोने ती टिकविण्यासाठी केलेले कार्य सांगा.

६. शीतयुद्धाची पार्श्वभूमी सांगून कारणे सांगा.

७. शीतयुद्धाचे स्वरूप सांगून त्याचे परिणाम लिहा.

८. चीनमधील साम्यवादी क्रांतीची कारणे द्या.

९. चीनमधील साम्यवादी क्रांतीचे स्वरूप सांगून परिणाम स्पष्ट करा.

१०. चीनच्या साम्यवादी क्रांतीचे जागतिक राजकारणावर झालेल्या परिणामांचा आढावा घ्या.

### ब) थोडक्यात टिपा लिहा.

१. दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम.

२. युनो.

३. शीतयुद्ध.

४. चीनमधील साम्यवादी क्रांती.

## ४.७ संदर्भ ग्रंथ

१. Rao B. V. (1991), World History, New Delhi. Sterling Publishers Pvt. Ltd.

२. Mahajan V. D. (1959), History of Modern Europe, Since 1989, New Delhi, S. Chand & Company Pvt. Ltd.

३. शिरसीकर व.मं. (१९६१), आधुनिक जगाचा इतिहास.

४. ढवळीकर श्रीराम (अनुवादक) (२००८), माझा लढा-ॲडॉल्फ हिटलर, भाग-१ व २, पुणे, राजेश प्रकाशन.

५. आचार्य धनंजय (२००७), विसाव्या शतकातील जग (इ.स. १९००-२००५), नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

६. कोलालकर श.गो., (२००५), आधुनिक जग, नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.

७. Khuran K. L., (1991), World History (1453-1966 A.D.) Agra, Laxmi Narain Agarwal, Educational Publisher.

८. Bhattacharjee Arun (2015), World Revolutions, New Delhi, A.P.H. Publishing Corporation.

९. डॉ. पेंडसे अरुणा, सहस्रबुद्धे उत्तरा, (२०११), आंतरराष्ट्रीय संबंध, शीतयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, हैद्राबाद, ओरिएन्ट ब्लॅक खान प्रा. लि.

❑ ❑ ❑